**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४४९/२०१०.**

श्री. शिवकुमार बनवारीलाल अग्रवाल,
१५१, अग्रवाल बिल्डींग, रविनगर चौक,
नागपूर - ४४० ०१३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. वी. रा. गोस्वामी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. आर. एस. भूते,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.१.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.३.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना

... २

विभाग, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांच्याकडे माहितीच्या अधिकाराखाली टी.डी.आर. प्रस्ताव क्र. टी.डी.आर./ एनएमसी/१९९/१३, दिनांक ५.८.२००३ रोजी श्री. आशीष शरद अग्रवाल व इतर २ यांनी महानगरपालिकेकडे टी.डी.आर. मिळणेबाबत केलेल्या कार्यवाही संबंधीची माहिती मागितलेली दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्त्यास दिनांक ३०.४.२०१० रोजी सदरच्या प्रस्तावाची नस्ती त्यांचे विभागात उपलब्ध झालेली नाही. तथापी नस्तीचा शोध घेण्यात येत आहे आणि नस्ती मिळताच आपणास आवश्यक असलेली माहिती देण्यात येईल असे नमुद करुन अपीलकर्त्यास उत्तर पाठविलेले दिसून येते. या उत्तराने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १७.६.२०१० रोजी सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही अपीलकर्त्यास अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी सुनावणीत जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांनी असे नमुद केले की, अपीलकर्ता यांचा माहिती अधिकाराखालील अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ३१.३.२०१० रोजी प्राप्त झाला. त्या अर्जातील माहितीच्या अनुषंगाने माहितीचा शोध घेण्यात आला. तथापी अपीलकर्त्याचा टीडीआर मागणीचा प्रस्ताव हा सन २००३ या वर्षाचा असल्यामुळे त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेला सर्व रेकॉर्ड छाननी व पाहणी केली असता त्यांच्या विभागात सद्यःस्थितीत अपीलकर्ता यांची नस्ती उपलब्ध झाली नाही. मात्र अजूनही त्यांच्या विभागात सदरच्या नस्तीचा शोध घेण्यात येत असून ती नस्ती उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास माहिती पुरविण्यात येईल असे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३०.४.२०१० च्या पत्राने कळविले आहे. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता यांनी सहाय्यक संचालक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.७.२०१० रोजी देण्यात आला त्या निर्णयामध्ये असे नमुद केले की, श्री. बोबडे, कनिष्ठ अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांनी ७ दिवसांत संचिकेचा शोध घ्यावा. दरम्यानच्या काळात अपीलकर्त्याकडील मुळ कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती स्वतःखर्चाने उपलब्ध करुन पुढील कार्यवाहीबाबत

... ३

अपीलकर्त्यास अवगत करावे असा निर्णय देऊन प्रथम अपील निकाली काढले. जनमाहिती अधिकारी यांनी याबाबत आणखी असे नमुद केले की, प्रथम अपीलाचा निर्णयानंतर पुन्हा श्री. बोबडे, कनिष्ठ अभियंता, नगर रचना विभाग यांनी संबंधित संचिकेचा शोध घेतला. परंतु संचिकाच मिळाली नाही. मात्र मुळ कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती अपीलकर्त्याकडून प्राप्त झाल्या. तथापी झेरॉक्स प्रतीच्या आधारे टीडीआर देणे संबंधीचा प्रस्ताव नियमाप्रमाणे सादर करणे शक्य नाही. म्हणून याबाबत नव्याने अर्ज केल्यास पुढील कार्यवाही करणे शक्य आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २५.८.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास पुन्हा कळविले. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने आता नव्याने टीडीआर मागण्याचा प्रस्ताव महानगरपालिकाकडे सादर केलेला आहे. सदरच्या प्रस्तावाबाबत महानगरपालिकेकडून नियमाप्रमाणे कार्यवाही योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांनी असे नमुद केले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांचेकडे दिनांक १७.६.२०१० रोजी प्राप्त झाले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १२.७.२०१० रोजी घेण्यात आली व निकाल देण्यात आला. त्या निकालानुसार श्री. बोबडे, कनिष्ठ अभियंता यांनी पुन्हा नस्तीचा शोध घेतला होता. नस्ती उपलब्ध झाली नाही. तथापी अपीलकर्त्याने पुन्हा नव्याने टीडीआर मिळण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव महानगरपालिकेकडे सादर केलेला आहे. सदरच्या प्रस्तावाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे ही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. जनमाहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने टीडीआर मिळणेबाबत नव्याने प्रस्ताव महानगरपालिकेकडे दाखल केलेला आहे. त्या प्रस्तावावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. म्हणून अपीलकर्त्याने नव्याने टीडीआर मिळणेबाबत दाखल केलेल्या प्रस्तावाबाबतची सध्या सुरु असलेली कार्यवाही त्यांना कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ४

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तास त्यांच्या प्रस्तावावर सद्यःस्थितीत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टा ने किंवा व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४५०/२०१०.**

श्री. महंमदखान रहिमखान पठान,
श्री. लोखंडे कबाडी व्यवसायी यांचे गोडाऊन जवळ,
गौसावी कॉलोनी, गौसावी मस्जिद जवळ, बेसा पावर हाऊस,
नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बा. स. राठोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपकुलसचिव (वि.वि.),
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

श्री. मनीष झोडपे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहायक कुलसचिव (आस्थापना),
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.१.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव (आस्थापना) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन त्यांना विद्यापीठाचा आदेश क्रमांक आस्था/४-९०/व्ही/जे/३६९, दिनांक ३१.१०.१९९० अन्वये सेवेतून बडतर्फ केले आहे त्या आदेशाच्या प्रतीची मागणी केलेली दिसून येते. तथापी जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ११.८.२०१० च्या पत्राप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र त्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी उपकुलसचिव यांचेकडे प्रथम अपील दिनांक ८.९.२०१० रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयात अपीलकर्त्याचे समाधान झाल्याची नोंद असूनही त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्ता यांचा दिनांक २०.७.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्त्यास दिनांक ११.८.२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच त्यांनी सुनावणीत आणखी असे नमुद केले की, अपीलकर्ता हे २० वर्षापुर्वी नागपूर विद्यापीठात वर्ग-४ या पदावर कार्यरत होते. तथापी अपीलकर्ता हे अनुपस्थित राहिल्याने नागपूर विद्यापीठाने दिनांक ३१.१०.१९९० च्या आदेशाने त्यांना सेवेतून कमी केलेले आहे. सदरचे प्रकरण हे २० वर्षापुर्वीचे असल्यामुळे अपीलकर्त्याला दिनांक ३१.१०.१९९० च्या आदेशाने सेवेतून कमी केल्याचे आदेशाची प्रत आता शोध घेऊन उपलब्ध होऊ शकला नाही. मात्र विद्यापीठाकडे अपीलकर्त्याचे सेवापुस्तक उपलब्ध आहे. त्या सेवापुस्तकामध्ये दिनांक ३१.१०.१९९० च्या आदेशाने सेवेतून कमी केल्याची नोंद आढळून आली आहे. म्हणून अपीलकर्त्यास सेवापुस्तकातील नोंदीची वाचनीय व स्पष्ट प्रती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्त्याला आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे प्रस्तुतचे अपील खारीज करावे असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत आग्रहाचे प्रतिपाद केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील

त्यांचेकडे दिनांक ८.९.२०१० रोजी प्राप्त झाले. सदरच्या अपीलावर दिनांक १८.९.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या संदर्भात म्हणणे ऐकून घेऊन दिनांक २४.९.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला. सदरच्या निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याला पाहिजे असलेल्या आदेशाची प्रत निर्गमित होऊन किमान २० वर्षाचा कालावधी झालेला असून माहिती अधिकारात अर्ज सादर करे पर्यंत अपीलकर्त्याने याबाबत कोणतीही कायदेशीर कार्यवाहीची सुचना किंवा साधा पत्र व्यवहार केलेला नाही. सदरच्या अपीलकर्त्याला पाहिजे असलेल्या आदेशाची प्रत ही २० वर्षापूर्वीची असल्यामुळे माहिती अधिकाऱ्याला ती प्रत शोध घेऊन उपलब्ध झाली नाही. तथापी सदरच्या आदेशाची नोंद घेतलेल्या सेवापुस्तकांच्या नोंदीची झेरॉक्स प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. सदरची प्रत वाचनीय व स्पष्ट असल्याबद्यल अपीलकर्त्याचे समाधान झाले त्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज केले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने त्यांना सेवेतून कमी केल्याचे आदेश हे २० वर्षापुर्वीचे आहेत. त्यामुळे सदरचा आदेश जनमाहिती अधिकारी यांनी शोध घेऊन त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध होऊ शकला नाही. तथापी अपीलकर्त्याला ज्या आदेशान्वये सेवेतून कमी केले आहे त्या आदेशाची नोंद अपीलकर्त्याचे सेवापुस्तकात आहे. म्हणून सेवापुस्तकातील नोंदीची प्रत वाचनीय व स्पष्ट अशी प्रती अपीलकर्त्यास पुरविलेली आहे. त्यामुळे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेल्या सेवापुस्तकातील प्रत उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/६-८/३.१.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५३९/२०१०.**

श्री. धर्मेंद्र बंसीलाल बनोदे,
जुनी शुक्रवारी, ग्रेट नाग रोड,
भोला गणेश चौक, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. व्ही. निनावे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रवर्तन अधिक्षक,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. आर. एस. चकोले,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रवर्तन निरिक्षक,
प्रवर्तन विभाग, कॉटन मार्केट चौक,
महात्मा फुले इमारत, १ माळा, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.१.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रवर्तन निरिक्षक, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देऊन श्रीमती छबाबाई भैय्याजी वरले व श्रीमती शेवंताबाई आनंदराव बुजाडे यांचे अतिक्रमण तोडण्याबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून

... २

येते. जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २३.८.२०१० रोजीच्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. तथापी सदरच्या माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रवर्तन अधिक्षक यांचेकडे दिनांक २७.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील त्यांना चुकीची व खोटी माहिती दिली म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी आयोगासमोर असे नमुद केले की, त्यांनी दिनांक २८.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे वर नमुद केल्याप्रमाणे श्रीमती छबाबाई भैय्याजी वरले व श्रीमती शेवंताबाई आनंदराव बुजाडे यांचे अतिक्रमण पाडण्याबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.८.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती चुकीची आहे असे अपीलकर्त्याने सांगितले. त्याचे कारण असे की, दिनांक २५.३.२०१० ला अनधिकृत बाधकाम पाडण्यास गेले असता घरातील लोकांनी तिव्र विरोध केला व महिला पोलीसांच्या अभावी कार्यवाही करता आली नाही असे जनमाहिती अधिकाऱ्यांनी सांगितलेले कारण योग्य नाही. कारण सदरच्या प्रभागात महिला नगरसेविका यांचे अतिक्रमण पाडण्याबाबत अधिकाऱ्यांवर दबाव आहे. त्यामुळे अतिक्रमण पाडले नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले. तसेच प्रस्तुत प्रकरणी अतिक्रमण झालेले आहे. म्हणून ते नियमाप्रमाणे पाडणे आवश्यक आहे असेही अपीलकर्त्याने सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा प्रवर्तन निरिक्षक यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याचे माहिती अर्जाला अनुसरुन त्यांनी दिनांक २३.८.२०१० रोजी पत्राने अपीलकर्त्यास ४ मुद्यांची माहिती दिली आहे. सदरचे अतिक्रमण दिनांक २५.३.२०१० ला तोडण्यास महानगरपालिकेचे अधिकारी गेले असता घरातील महिलांनी तीव्र विरोध केला. त्यावेळी महिला पोलीस नव्हत्या. त्यामुळे अतिक्रमण तोडण्याची कार्यवाही करता आली नाही. मात्र त्यानंतर प्रस्तुतचे अतिक्रमण तोडण्यासाठी दिनांक २८.१०.२०१० रोजी नगरपालिकेचे इजिनिअर प्रत्यक्ष मौक्यावर महिला पोलीस कर्मचारी यांचे सोबत गेले असता कब्जेदार श्रीमती सुनंदा नाल्हे हे त्या घरात राहत असल्याचे निष्पन्न झाले व त्यांनी अतिक्रमण तोडणाऱ्या अधिकाऱ्यांना असे सांगितले की, त्यांना कोणत्याही

प्रकारची नोटीस मिळाली नाही. तसेच त्यांनी घराची कर पावती व सिटी सर्व्हे पत्रानुसार कागदपत्रे सादर केल्यामुळे तसेच सदर भाग स्लम एरिया अंतर्गत येत असल्यामुळे नोटीस कार्यवाही चुकीची असल्याने सदर प्रकरणावर कागदपत्रांची शहानिशा करण्याकरिता महानगरपालिका कडील संबंधित झोनकडे नस्ती परत पाठविण्यात आली आहे. म्हणून उपरोक्त प्रकरणावर सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यावर रितसर कार्यवाही करण्यात येईल असे आयोगासमोर जनमाहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी व संबंधित इंजिनिअर यांनी सादर केलेले आहे.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रवर्तन अधिक्षक यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दिनांक २७.९.२०१० रोजी दाखल झाले. त्या अपीलाची सुनावणी दिनांक २६.१०.२०१० रोजी ठेवण्यात आले होते. मात्र अपीलकर्त्याने विनंती केल्याप्रमाणे नंतर ती सुनावणी दिनांक २७.१०.२०१० रोजी घेण्यात आली म्हणून अपीलाचा निर्णय दिनांक २७.१०.२०१० रोजी देण्यात येऊन अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्रमांक ३ व ४ बाबत माहिती दिलेली दिसून आली व मुद्या क्रमांक २ बाबत माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ३ दिवसांत पुरवावी असा निर्णय दिला. प्रथम अपीलाचे निर्णयास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सुधारित माहिती पाठविली व सदरची माहिती अपीलकर्त्यास दिनांक ३०.१०.२०१० रोजी उपलब्ध झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत कबूल केले.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक २३.८.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास त्यांच्या अर्जातील अतिक्रमण पाडण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची ४ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपीलकर्त्यास त्याबाबत समाधान झालेले दिसून येत नाही. आज आयोगासमोर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अतिक्रमण पाडण्याबाबत अहवाल दिलेला आहे. त्याचे निरिक्षण केले असता असे दिसून येते की, महानगरपालिकाचे अधिकारी दिनांक २८.१०.२०१० रोजी प्रत्यक्ष मौक्यावर महिला पोलीस कर्मचारीसह अतिक्रमण तोडण्यासाठी गेले असता कब्जेदार श्रीमती सुनंदा नाल्हे यांनी त्यांना नोटीस मिळाली

नसल्याचे सांगितले व त्यांचे घराची करपावती व सिटी सर्व्हे पत्रानुसार कागदपत्र सादर केल्यानंतर सदरचा भाग स्लम एरिया येत असल्याने नोटीस कार्यवाही चुकीची असल्याने सदर प्रकरणावर कागदपत्राची शहानिशा करण्याकरिता सदरची नस्ती झोनकडे परत पाठविण्यात आलेली आहे. म्हणून उपरोक्त प्रकरणावर सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतर रितसर कार्यवाही करण्यात येईल असा अहवाल आज आयोगासमोर सादर करण्यात आला म्हणून प्रस्तुत प्रकरणात महानगरपालिकाच्या अतिक्रमण तोडणाऱ्या अधिकाऱ्यांनी दिनांक २८.१०.२०१० रोजी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक हाईल. तसेच संबंधित प्रकरणावर अतिक्रमण तोडण्याची कार्यवाही नियमाप्रमाणे करण्यात येईल असेही अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास महानगरपालिकेच्या वतीने दिनांक २८.१०.२०१० रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच संबंधीत प्रकरणावर अतिक्रमण तोडण्याची कार्यवाही नियमाप्रमाणे करण्यात येईल असेही जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/९-१२/५.१.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५४२/२०१०.

श्री. मनोजकुमार नेमाजी शहारे
प्लॉट नं. १२, नागलोक बुध्द पुतळयाचे मागे,
मु. भिलगांव, पो. खैरी, ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक धर्मदाय आयुकत,
सिव्हील लाईन, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
नागार्जुन संस्था, नागलोक,
(त्रैलोक्य बौध्द महासंघ सहायक गण)
आकाशवाणी रीले केंद्राजवळ, भिलगांव,
पौ. खैरी, ता. कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.१.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. खापेकर, निरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.८.२०१० रोजी माहिती अधिकाराखाली माहिती अधिकारी तथा सचिव, नागार्जुन संस्था, नागलोक, (त्रैलोक्य बौध्द महासंघ सहाय्यक गण) आकाशवाणी रिले केंद्राजवळ, भिलगांव,

... २

नागपूर यांचेकडे नागार्जुन संस्थेस सन २००६-०७ ते २०१०-११ या ५ वर्षाचे कालावधीत विविध मार्गाने संस्थेला मिळालेली उत्पन्नाची रक्कम, विदेशातून (देश निहाय) शासकीय निधी, मा. आमदार, खासदार फंडातील निधी, क वर्ग तिर्थक्षेत्र निधी, देणगी दान निधी, वस्तु स्वरुपात आलेला निधी बाबत वर्षनिहाय माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २०.९.२०१० रोजी प्रथम अपील धर्मादाय उपआयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर यांचे कार्यालयाकडे दाखल केलेले दिसते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ४.१.२०११ रोजी दिलेला दिसून येतो. तथापी सदरचा निर्णय अपीलकर्त्यास अद्यापपर्यंत प्राप्त झाला नाही म्हणून अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली दिनांक २.८.२०१० रोजी अर्ज देऊन वर नमुद केल्याप्रमाणे माहिती मागितलेली होती. तथापी जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी धर्मादाय उपआयुक्त, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय अद्यापपर्यंत प्राप्त झाला नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. अपीलकर्ता यांनी आयोगासमोर आणखी असे नमुद केले की, सदरच्या संस्थेस देशातील, विदेशातील निधी प्राप्त झालेला आहे. तसेच मा.खासदार, आमदार यांचे फंडातून देखील त्यांना निधी प्राप्त झालेला आहे व त्यासंबंधात त्यांनी संस्थेकडे माहिती मागितलेली आहे. परंतु या संस्थेस शासनाकडून निधी प्राप्त झाल्याबाबत सध्यास्थितीत ते कोणताही पुरावा दाखवू शकले नाही. तथापी सदर संस्थेस शासकीय निधी प्राप्त होणाऱ्या निधीची माहिती त्यांना अन्य कार्यालयाकडून प्राप्त करावी लागेल असे त्यांनी सुनावणीत सांगितले. तसेच त्यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, यापुर्वी त्यांनी प्रस्तुत संस्थेचे विरुध्द अपील क्रमांक ५८८/२००८ दाखल झाले होते. त्यामध्ये देखील दिनांक ४.५.२००९ रोजी आयोगाने त्यांचे बाजूने निकाल दिलेला होता. मात्र त्यांना त्या निकालाचे अनुषंगाने ठरावाची प्रत अजुनही मिळालेली नाही असे नमुद केले. तसेच दिनांक ३.८.२०१० च्या माहिती अर्जात मागितलेली माहिती देखील त्यांना अद्याप उपलब्ध झालेली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

४.	जनमाहिती अधिकारी तथा सचिव, नागार्जुन संस्था, नागलोक हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा धर्मादाय उपआयुक्त यांचे प्रतिनिधी श्री. खापेकर, निरिक्षक हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २०.९.२०१० रोजी दाखल झाले. प्रस्तुत अपीलाचे सुनावणीसाठी अपीलकर्त्यास दिनांक २२.१२.२०१० व दिनांक ४.१.२०११ रोजी बोलाविले होते. सदरच्या सुनावणीस अपीलकर्ता यांना साध्या पोस्टाने नोटीस पाठविल्याचे दिसते. मात्र सदरच्या सुनावणीची नोटीस अपीलकर्त्यास मिळालेली नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ४.१.२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे. सदरच्या निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, धर्मादाय उपआयुक्त कार्यालयात प्रस्तुत संस्थेच्या संदर्भात लेखापरिक्षण अहवाल प्रत संस्थेकडून प्राप्त झाली असल्यास ती अपीलकर्त्यास पुरविण्यात यावी.

५.	अपीलकर्ता तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने हजर झालेले प्रतिनिधी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी त्रैलोक्य बौध्द महासंघ सहायक गण या संस्थे विषयी माहिती मागितलेली आहे. सदरच्या संस्थेच्या संदर्भात त्यांनी पुर्वी देखील आयोगाकडे अपील क्रमांक ५८८/२००८ हे दाखल केले होते व त्यामध्ये आयोगाने दिनांक ४.५.२००९ रोजी निर्णय दिलेला आहे. सदरच्या निर्णयात देखील असे नमुद केले आहे की, प्रस्तुतच्या अपीलात संस्थेतर्फे त्यावेळी वकील हजर होते. त्या अपीलात त्यांचे वकीलांनी असे नमुद केले होते की, सदरची संस्था ही धर्मादाय संस्था असून धर्मादाय आयुक्त यांचेकडे पंजीबध्द केलेली आहे व तसा शासनाचा कोणताही निधी उपलब्ध होत नाही. यावरुन ही संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० प्रमाणे धर्मादाय उपआयुक्त यांचे संपूर्ण नियंत्रण या संस्थेवर असल्यामुळे धर्मादाय उपआयुक्त यांचे कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेणे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या व्याख्ये प्रमाणे सुसंगत होईल. त्यावर धर्मादाय उपआयुक्त यांचे कार्यालयातील प्रतिनिधीने असे सांगितले की, त्यांचे कार्यालयात संस्थेचा लेखा परिक्षण अहवाल उपलब्ध असल्यास प्रथम अपीलीय अधिकाऱ्याचे अहवालाप्रमाणे अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येईल.

म्हणून आजच्या सुनावणीत आयोगासमोर अपीलकर्ता व सहाय्यक धर्मादाय उपआयुक्त यांचे कार्यालयातील प्रतिनिधीने सहमतीने असे ठरविले की, अपीलकर्त्याने त्यांचे कार्यालयात २ दिवसात उपस्थित होऊन त्या संबंधात लेखापरिक्षण अहवाल प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक तो अर्ज करुन व फी भरून लेखा परिक्षण अहवाल प्रत प्राप्त करुन घ्यावा. लेखा परिक्षण अहवाल प्रत प्राप्त करुन घेल्यास अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन घेणे शक्य होईल. तसेच कार्यालयात लेखा परिक्षण अहवाल प्रत नसल्यास उपआयुक्त धर्मादाय यांनी सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० च्या तरतुदी अन्वये लेखा परिक्षण अहवाल प्राप्त करुन घेऊन पुरवावा. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे लेखा परिक्षण अहवाल प्राप्त करण्यासाठी आवश्यक त्या फीचा भरणा करावा व फीचा भरणा केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत अपीलकर्त्यास लेखा परिक्षण अहवालाची प्रत त्यांचे कार्यालयाकडे ज्या उपलब्ध असतील त्या उपलब्ध करुन द्याव्यात. तथापी सदरच्या प्रती त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यास त्या प्रती संस्थेकडून मिळविण्यासाठी सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० च्या तरतुदी अन्वये योग्य ती कार्यवाही करुन अपीलकर्त्यास त्या प्रती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५४३/२०१०.

श्री. इमरान इनायतुल्ला चिश्ती
हॉटेल अल जम जम मागे,
आझमशाह चौक, मस्जिद जवळ,
सेंट्रल एव्हेन्यु रोड, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक,
भूमी अभिलेख, नागपूर.

श्री. पी. टी. भूते,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रमुख लिपिक,
जिल्हा अधिक्षक,
भूमी अभिलेख, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.१.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. प्रदीप जगताप, नगर भू मापन अधिकारी क्रमांक १ हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देऊन श्री. जी. बी. डोईफोडे यांचे संबंधित दिनांक

२.७.२०१० व दिनांक ३.७.२०१० रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३१.७.२०१० रोजीच्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. मात्र त्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, दिनांक २७.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे त्यांनी श्री. जी. बी. डोईफोडे यांचे संबंधात दिनाक २.७.२०१० व दिनांक ३.७.२०१० रोजी तक्रार अर्ज केला होता. त्या तक्रार अर्जावर कार्य कार्यवाही केलेली आहे त्याबाबतची माहिती मागितलेली होती. त्या अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३१.७.२०१० च्या पत्राने श्री. जी. बी. डोईफोडे यांचे विरुध्द या कार्यालयांकडील कार्यवाही प्रलंबित असल्याने सदर प्रकरणांत अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही अशी माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निणर्य त्यांना मिळाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याच्या माहिती अर्जास अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक ३१.७.२०१० च्या पत्राने श्री. जी. बी. डोईफोडे यांचे विरुध्द कार्यवाही प्रलंबित असल्याने सदर प्रकरणांत कोणतीही कार्यवाही झालेली नाही असे कळवून माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची कबूली अपीलकर्त्याने सुनावणीत दिली. तथापी सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर यांनी असे नमुद केले की, त्यांचेकडे अपीलकर्त्याचे प्रथम अपील दिनांक २६.८.२०१० रोजी प्राप्त झाले. ते अपील प्राप्त झाल्यानंतर त्यांनी नगर भुमापन अधिकारी क्रमांक १, नागपूर यांना दिनांक ३०.८.२०१० रोजी पत्र लिहून श्री. जी. बी. डोईफोडे यांचे प्रकरणात कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे त्याबाबतचा अहवाल सादर करण्यास सांगितले असून त्याची

... ३

प्रत अपीलकर्त्यास दिलेली आहे. यापत्रास अनुसरुन नगर भुमापन अधिकारी यांचा अहवाल दिनांक २०.९.२०१० रोजी प्राप्त झालेला आहे. म्हणून प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन त्यामध्ये अपीलकर्त्यासही बोलावून श्री. जी. बी. डोईफोडे यांचे विरुध्द केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात असे दिसून येते की, प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे नगर भूमापन अधिकारी क्रमांक १, नागपूर यांचेकडून श्री. जी. बी. डोईफोडे यांचे विरुध्द केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राप्त झालेला आहे म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी १५ दिवसांत घेऊन अपीलकर्त्यास केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येते.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर यांनी त्यांचे कडील प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन सुनावणीस अपीलकर्त्यास बोलावून त्यांचेकडे नगर भुमापन अधिकारी क्रमांक १, नागपूर यांनी श्री. जी. बी. डोईफोडे यांचे सबंधांत पाठविलेल्या अहवालाचे आधारे केलेल्या कार्यवाहीची माहिती त्वरित विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१७-१९/६.१.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५४९/२०१०.

श्री. रत्नशील सी. फुले
प्लॉट नं. ४८, गुरुनानकपुरा,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. जी. पैठणकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
प्लॉट नं. १०, जुनघरे निवास, शिवाजीनगर,
धरमपेठ विस्तार, नागपूर - ४४० ०१०.

श्री. नं. न. रामटेके,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रभारी सह दुय्यम निबंधक वर्ग- २,
नागपूर शहर क्र. १,
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.१.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ७.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, नागपूर शहर क्रमांक-१, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली सन १९७३ मध्ये जिल्हा न्यायालय, नागपूर व

जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, नागपूर यांचेकडे नोंदणीकृत/पंजीबध्द/मान्यता प्राप्त स्टॅम्प पेपर वेंडर यांच्या नावाची यादी मागितलेली होती. तसेच श्री. बा. श्रा. पोरकुटे, स्टॅम्प वेंडर, नागपूर यांनी दिनांक ७.४.१९७३ रोजी जे स्टॅम्प विक्री केलेले आहे व त्याची नोंद ज्या रजिस्टरमध्ये केलेली आहे त्या विक्री नोंदीच्या रजिस्टरची प्रत मागणी केलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यानी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, नागपूर यांचे कार्यालयाकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसते. प्रथम अपीलाचा निर्णय झाल्यानंतरही अपीलकर्त्यास अपेक्षित माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपीलकर्त्यानी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक ९.६.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन सन १९७३ मधील जिल्हा न्यायालय व जिल्हाधिकारी परिसर, नागपूर येथे नोंदणीकृत असलेले स्टॅम्प वेंडरची माहिती मागितलेली होती. तसेच श्री. बा. श्रा. पोरकुटे यांनी दिनांक ७.४.१९७३ रोजी ज्या स्टॅम्पची विक्री केली आहे व दिनांक ७.४.१९७३ रोजी स्टॅम्प विक्रीची नोंद ज्या नोंदवहीत केली आहे त्या नोंद वहीची सत्यप्रत मागणी केली होती. मात्र जनमाहिती अधिकारी यांचेकडून आवश्यक ती माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती उपलब्ध होण्यासाठी द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दिनांक ९.६.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची त्यांचे कार्यालयात पाहणी केली त्यामध्ये असे दिसून आले की, अपीलकर्त्याने सन १९७३ मधील स्टॅम्प वेंडरची यादी मागितलेली आहे. तथापी सदरची यादी त्यांचे कार्यालयात उपलब्ध झाली नाही. म्हणून त्यांच्या कार्यालयाकडे आज रोजी अस्तित्वात असलेले स्टॅम्प वेंडरची यादी अपीलकर्त्यास उपलबध करुन दिलेली आहे. तसेच अपीलकर्त्याचा मुद्या क्रमांक २ श्री. बा. श्रा. पोरकुटे तत्कालीन स्टॅम्प वेंडर यांनी दिनांक ७.४.१९७३ रोजी

जे स्टॅम्प विक्री केलेली आहे त्या विक्रीची नोंद दिनांक ७.४.१९७३ रोजी ज्या नोंदवहीत केलेली आहे त्याची प्रत प्राप्त करण्यासाठी त्यांनी श्री. बा. श्रा. पोरकुटे यांचा मुलगा श्री. जानराव बालाजी पोरकुटे यांना दिनांक २४.६.२०१० रोजी पत्र लिहून दिनांक ७.४.१९७३ चा मुद्रांक विक्री नोंद रजिस्टर निरिक्षणाकरिता त्यांचे कार्यालयात सादर करण्यास कळविले होते. त्यांचे कारण जनमाहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, आता श्री. बालाजी पोरकुटे हे मय्यत झालेले असल्यामुळे त्यांचेकडील रेकॉर्ड त्यांच्या मुलाजवळ असण्याची शक्यता असल्यामुळे त्यांनी त्यांचा मुलगा श्री. जानराव बालाजी पोरकुटे यांना पत्र लिहून अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला. मात्र मय्यत बालाजी श्रावण पोरकुटे यांचया मुलांने अद्यापही दिनांक ७.४.१९७३ च्या स्टॅम्प विक्री नोंद रजिस्टर निरिक्षणासाठी दाखल केलेले नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५. दरम्यानच्या काळात अपीलकर्ताने प्रथम अपील सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ नागपूर शहर, नागपूर यांचेकडे दिनांक २०.७.२०१० रोजी दाखल केले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक २४.९.२०१० रोजी घेण्यात आली व निर्णय दिनांक ४.१०.२०१० रोजी देण्यात आला. सदरच्या निर्णयामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सन १९७३ च्या मुद्रांक विक्रेत्यांच्या नावाची सुची विनाविलंब उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश दिले. तसेच श्री. बा. श्रा. पोरकुटे यांचेकडून रेकॉर्ड उपलब्ध करुन दिनांक ७.४.१९७३ ला किंती मुद्रांक विकले त्या रजिस्टर पानाची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्याचा निर्णय दिला. प्रथम अपीलाचा निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सध्या त्यांचेकडे उपलब्ध असलेले स्टॅम्प विक्री वेंडरची यादी उपलब्ध करुन दिली. सदरची यादी ही ३९ स्टॅम्प वेंडरची आहे. मात्र अपीलकर्ता यांना सन १९७३ ची स्टॅप वेंडरची यादी पाहिजे आहे. सदरची यादी मुद्रांक जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे उपलब्ध होईल असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून सदरची यादी प्राप्त करुन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच श्री. बा. श्रा. पोरकुटे हे मय्यत झालेले असल्यामुळे त्यांचा मुलगा श्रीञ जानराव बालाजी पोरकुटे यांचेकडून दिनांक ७.४.१९७३ रोजी विक्री केलेल्या मुद्रांक रजिस्टरची प्रत उपलब्ध करण्याचा प्रयत्न करावा. तथापी सुनावणीत आयोगाच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, श्री. जानराव बालाजी पोरकुटे यांचे स्टॅम्प वेंडर विक्रीचे लायसन्स देखील रद्द

केलेले आहे. म्हणून दिनांक ७.४.१९७३ चे मुद्रांक विक्री रजिस्टरची प्रत उपलब्ध न झाल्यास श्री. जानराव बालाजी पोरकुटे यांचे लायसन्स रद्द केल्याचे कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून जनमाहिती अधिकारी यांनी १५ दिवसांच्या मुदतीत सन १९७३ च्या स्टॅम्प विक्री वेंडरची यादी मुद्रांक जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून प्राप्त करुन अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) श्री. बा. श्रा. पोरकुटे यांनी दिनांक ७.४.१९७३ ला विक्री केलेल्या स्टॅम्प बाबतची नोंद वहीची प्रत उपलब्ध झाल्यास ती देखील अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. मात्र ती प्रत उपलब्ध न झाल्यास श्री. बा. श्रा. पोरकुटे, तत्कालीन स्टॅम्प वेंडर हे मय्यत झाले असून त्यांचा मुलगा श्री. जा. बा. पोरकुटे यांचे स्टॅम्प विक्रीचे लायसन्स रद्द केले आहे असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२०-२३/७.१.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५५३/२०१०.

श्री. केशव साधू तितिरमारे
मु. रोहा, पो. बेटाळा, ता. मोहाडी,
जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. आर. कुंभारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (महसूल),
जि. भंडारा.

श्री. प्रशांत पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. मोहाडी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.१.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, मोहाडी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन मौजा रोहा येथील ६८ प्लॉट धारकांस शासनाने जे प्लॉट वाटप केलेले आहेत त्याबाबत एकूण ४ मुद्यांवरती माहिती मागितलेली होती. अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाली मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे अपीलकर्त्याने

... २

उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दिनांक ३०.८.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगासमोर सुनावणीत असे नमुद केले की, त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली केलेल्या अर्जाला अनुसरुन त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून मौजा रोहा येथील आबादी प्लॉट वाटपा संदर्भात ६८ प्लॉट धारकांची यादी मिळाली. मात्र बांधकाम केलेल्या प्लाट धारकांची यादी तसेच आबादी प्लॉटवर कब्जा करुन घराचे बांधकाम केलेल्या व्यक्तींची यादी त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय त्यांचे बाजुने देण्यात आला व मुद्या क्रमांक २, ३ व ४ ची माहिती पुरविण्याचा आदेश प्रथम अपीलात देण्यात आला. मात्र अपेक्षेप्रमाणे माहिती नसल्यामुळे त्यांनी माहिती स्विकारलेली नाही असे त्यांनी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार व प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भंडारा यांनी असे नमुद केले की, अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन तलाठी, रोहा यांचेकडून दिनांक २३.६.२०१० रोजी वाटप केलेल्या प्लॉटच्या संदर्भात ६८ प्लॉट धारकांची यादी त्यांना दिली. ती यादी अपीलकर्त्यास मिळाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत कबूल केले. तसेच सुनावणीत उपविभागीय अधिकारी, भंडारा यांनी प्रामुख्याने असे नमुद केले की, त्यांचेकडे अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल झाले. सदरचे अपील दिनांक ३१.८.२०१० रोजी दाखल झाल्यानंतर त्याची अंतीम सुनावणी दिनांक २१.९.२०१० रोजी घेण्यात आली व त्याच दिवशी निर्णय निर्गमित करुन त्यामध्ये असे नमुद केले की, तहसीलदार, मोहाडी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक २, ३ व ४ चे संबंधातील माहिती (मौजा रोहा येथील शासकीय भुखंडाचे अ रजिस्टरची प्रत) ७ दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी. त्याचे कारण उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, गावठाण विस्तारासाठी ज्या प्लॉटचे वितरण होते त्याचे अ रजिस्टर तलाठयाकडे ठेवण्यात येत असते व हे दस्तऐवज महसुली नियमाप्रमाणे शासनाने निर्धारित केलेले आहे. या अ रजिस्टरमध्ये संबंधित प्लॉट विषयीचे संपूर्ण विवरण असते. याशिवाय कोणताही रेकॉर्ड उपलब्ध नसते. म्हणून अपीलकर्त्यास अ रजिस्टर प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपीलात निर्णय दिलेला होता. त्याला अनुसरुन तहसीलदार, मोहाडी यांनी

अपीलकर्त्यास दिनांक २९.९.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्याचे घरी पाठविलेली मात्र अपीलकर्ता घरी नसल्यामुळे पुन्हा सदरची माहिती दिनांक ४.१०.२०१० रोजी शिपाई मार्फत त्यांचे घरी पाठविली. मात्र सदरची माहिती अपीलकर्त्याचे पत्नीने स्विकारण्यास नकार दिला. त्याबाबतचा अहवाल जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविला. त्यानंतरही जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १२.१०.२०१० रोजी अपीलकर्त्यास शिपायामार्फत माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला असता अपीलकर्त्याने ती माहिती स्विकारण्यास नकार दिला म्हणून त्याबाबत पंचनामा करण्यात येऊन त्याची पोच आयोगास दाखविली. सदरची माहिती स्विकारण्यास नकार दिला हे अपीलकर्त्याने आयोगासमोर मान्य केले. त्याचे कारण त्यांनी असे नमुद केले की, त्यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले होते. म्हणून त्यांनी माहिती स्विकारली नाही. परंतु अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी वर नमुद केल्याप्रमाणे प्रयत्न केलेले दिसून येतात. पुन्हा आज आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक २, ३ व ४ ची माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलकर्त्याने सदरची माहिती आयोगासमोर स्विकृत केली म्हणून प्रस्तृत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२४-२६/११.१.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५५६/२०१०.**

श्री. मुकुंद जे. व्यास,
बी/८७, शांतीनगर, एल.आय.जी. कॉलनी,
नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. गिरीष जोशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. तुषार राठोड,
जनमाहिती अधिकारी तथा
मिळकत व्यवस्थापक,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
सिव्हील लाईन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.१.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १२.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.९.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देऊन जनमाहिती अधिकारी तथा गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ, नागपूर यांचे कार्यालयात अर्ज देऊन त्यांची पत्नी

श्रीमती सुमन मुकुंद व्यास यांनी दिनांक ४.९.२०१० रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी मुख्याधिकारी यांचेकडे दिनांक १.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील हे खारीज झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे त्यांची पत्नी श्रीमती सुमन मुकुंद व्यास यांनी दिनांक ४.९.२०१० रोजी अर्ज दिला होता. त्या अर्जावर काय कार्यवाही केली याबाबतची माहिती दिनांक २०.९.२०१० च्या माहिती अर्जाप्रमाणे मागितलेली होती. तथापी सदरची माहिती त्यांना विहित मुदतीत मिळाली नाही म्हणून त्यांनी मुख्याधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयात अपील खारीज झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-२, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे दिनांक २०.९.२०१० रोजी प्राप्त झाला व अपीलकर्त्यास दिनांक १३.१०.२०१० रोजी युपीसीने पत्राचे उत्तर पाठविले आहे. सदर उत्तरामध्ये त्यांनी असे नमुद केले आहे की, श्रीमती सुमन मुकुंद व्यास यांच्या दिनांक ४.९.२०१० च्या अर्जावर मंडळाने कार्यवाही केलेली नाही अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी नमुद केले. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत आणखी असे नमुद केले की, श्रीमती सुमन मुकुंद व्यास यांनी पोलीस आयुक्त व मुख्य अधिकारी, गृहनिर्माण विकास प्राधिकरण विदर्भ मंडळ यांचेकडे दिनांक ४.९.२०१० रोजी अर्ज देऊन त्यामध्ये गैरअर्जदार लोकांनी केलेल्या फसवेगिरीच्या गुन्हयाबाबत कायदेशीर कारवाई करुन मला संरक्षण मिळणेबाबतचा त्यांचा अर्ज आहे. तथापी हा सदरचा अर्ज हा पोलीस विभागाशी संबंधीत असल्यामुळे त्यांचेवर नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने कोणतीही कार्यवाही केली नाही अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १३.१०.२०१० रोजीच्या पत्राने माहिती उपलब्ध

करुन देऊन सदरचे पत्र दिनांक २०.१०.२०१० रोजी साध्या पोस्टाने पाठविल्याचे दिसून येते व त्याबाबतचा जावक रजिस्टरचा पुरावा माहिती अधिकारी यांनी सुनावणीत आयोगासमोर दाखविला. यावरुन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १३.१०.२०१० च्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करु दिलेली दिसून येते. दिनांक १३.१०.२०१० चे पत्र अपीलकर्ता स्वत: माहिती घेण्यास येतील या अपेक्षेने दिनांक २०.१०.२०१० पर्यंत कार्यालयात ठेवण्यात आलेले होते. कारण माहिती अर्जात अपीलकर्त्याने व्यक्तिशः माहिती प्राप्त करेल असे नमुद केलेले होते. तथापी अपीलकर्ता दिनांक २०.१०.२०१० पर्यंत माहिती घेण्यास व्यक्तिशः आले नाही म्हणून नाईलाजाने पोस्टाद्वारे अपीलकर्त्यास पत्र पाठविले असेही जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दिनांक १.११.२०१० रोजी दाखल झाले. त्याची सुनावणी दिनांक १२.११.२०१० रोजी घेण्यात आली. मात्र सदरची सुनावणी १२:०० ऐवजी ३:०० वाजता घेण्यात आली. त्यावेळी अपीलकर्ता हे हजर नव्हते. अपीलकर्ता यांनी १२:०० वाजता कार्यालयात हजेरी लावून व एक पत्र सादर करुन निघुन गेले. म्हणून दुपारी ३:०० वाजता सुनावणीस ते हजर झाले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी हे या सुनावणीस हजर होते. त्यांनी सादर केलेल्या माहिती वरुन असे दिसून आले की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १३.१०.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे प्रथम अपील हे निकाली काढण्ययात आले. मात्र सुनावणीचे वेळी अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, त्यांची पत्नी श्रीमती सुमन मुकुंद व्यास यांनी दिनांक ४.९.२०१० रोजी पोलीस आयुक्त व मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेकडे फसवणूकीबाबत अर्ज केलेला आहे. सदरच्या अर्जावर पोलीस विभागाने योग्य ती कार्यवाही करावी अशा प्रकारे मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी पोलीस विभागास कळविल्यास पोलीस विभाग त्यांच्या अर्जावर कार्यवाही करण्यास तयार आहे. म्हणून अशा प्रकारचे पत्र मुख्य अधिकारी यांनी पोलीस विभागास देण्याची संमती आयोगासमोर दिली म्हणून मुख्य अधिकारी यांनी पोलीस विभागास वर नमुद केल्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्याबाबतचे पत्र पाठविण्याची कार्यवाही करणे संयुक्तिक होईल म्हणून अशी कार्यवाही मुख्य अधिकारी यांनी केल्यास त्याबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले असल्याचे दिसून आले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत मुख्याधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे पोलीस विभागास श्रीमती सुमन मुकुंद व्यास यांच्या दिनांक ४.९.२०१० च्या अर्जावर यौग्य ती कार्यवाही करण्याचे कळवावे व त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५५७/२०१०.

श्री. सुरेंद्र प्रेमलाल घोडीचोर,
मु. सोनेगांव, पो. सिहोरा,
ता. तुमसर, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग,
पुणे - ४११ ००१.

श्री. एस. एन. पांढरे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपआयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग,
पुणे - ४११ ००१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.१.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १२.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

... २

२.  अपीलकर्ता यांनी दिनांक ७.७.२०१० रोजी माहितीचा अधिकारात अर्ज करुन प्राथमिक शिक्षणसेवक भरती प्रक्रिया केंद्रीय निवड परीक्षा व निकाला संबंधी २०१० च्या संबंधात एकूण ११ मुद्यांवर माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज देऊन माहितीची मागणी केलेली आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा उपआयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी त्यांचे कडील दिनांक २२.७.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली असून त्यामध्ये असे नमुद केले आहे की, केंद्रीय माहिती आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपील क्रमांक आयसीपीबी/ए २/सीआयसी/२००६, दिनांक ६.२.२००६ च्या संदर्भात दिलेल्या निर्णयानुसार तपासलेल्या उत्तरपत्रिका हया गोपनीय स्वरुपात मोडतात. तसेच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या तदर्थ समितीनेही ठराव क्रमांक ६९५(२) अन्वये तपासलेल्या उत्तरपत्रिका हया गोपनीय स्वरुपाच्या असल्याने त्याच्या सत्यप्रती/झेरॉक्स प्रती कोणी मागणी केल्यास त्या देण्यात येऊ नये असा निर्णय घेतला असल्यामुळे उत्तर पत्रिकेची प्रत देण्याची विनंती मान्य करता येत नाही. तथापी उत्तर पत्रिका सोडून इतर माहितीच्या संदर्भामध्ये झेरॉक्स प्रती पाहिजे असल्यास रुपये १८०३/- चा माहितीची फी भरणा करणेबाबत कळविलेले आहे. तसेच अपीलकर्ता यांनी प्रत्यक्ष परिषदेमध्ये समक्ष येऊन आवश्यक त्या माहितीची झेरॉक्स प्रत प्राप्त करुन घेऊ शकतात असेही अपीलकर्त्यास कळविलेले आहे. सदरच्या निर्णयाविरुध्द अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेकडे प्रथम अपील दिनांक १२.८.२०१० रोजी सादर केलेले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १४.९.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. मात्र सदरच्या सुनावणीचे अपीलकर्त्यास नोटीस उशिरा मिळाल्यामुळे ते हजर राहू शकले नाही असे दिसून येते. मात्र त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिनांक १७.९.२०१० च्या पत्राने असा निर्णय कळविला की, परिषदेच्या शासकीय माहिती अधिकारी तथा उपआयुक्त यांनी त्यांच्याकडील दिनांक २२.७.२०१० च्या पत्राद्वारे तपासण्यात आलेल्या उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रत परिषदेचा ठराव क्रमांक ६९५(२) नुसार देता येत नसल्याचे कळविण्यात आलेले आहे. तसेच इतर माहितीबाबतचा खर्च कळविलेला आहे. तसेच अपीलकर्ता यांनी बीपीएल साठी रेशनकॉर्ड झेरॉक्स प्रत जोडलेली नाही. म्हणून अपीलकर्त्याने मागितलेली माहितीची प्रत्यक्ष परीक्षा परिषदेमध्ये येऊन आवश्यक त्या पानांची झेरॉक्स प्रत घेऊ शकता अशा प्रकारचा निर्णय देऊन जनमाहिती अधिकारी तथा उपआयुक्त यांनी दिलेल्या निर्णयाशी सहमती दर्शविली असून अपीलकर्ता यांचे

... ३

अपील हे फेटाळलेले आहे. यावरुन असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा कायम केलेला असून उत्तरपत्रिका हे गोपनीय दस्तऐवज आहे. तसेच मंडळ नियमावलीत उमेदवारास उत्तरपत्रिका पाहण्याची किंवा देण्याची किंवा पुनर्मुल्यांकन करण्याची तरतुद नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेले लेखी निवेदनात यापुर्वी अशाच प्रकारच्या संदर्भातील निर्णयाचा संदर्भ देऊन उत्तरपत्रिका हे गोपनीय दस्तऐवज आहे म्हणून ते देता येत नाही याचे पुरावे आयोगासमोर दाखविले. त्यासंदर्भात राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांनी अपील क्रमांक २२५/२००७ मधील निर्णय हा आयोगाचे निदर्शनास आणून दिला व त्यामध्ये देखील असे नमुद केले की, उत्तर पत्रिका हे गोपनीय दस्तऐवज आहे म्हणून उत्तरपत्रिकाची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देण्याचे बाबतीत माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केरळ माहिती आयोगाचा निर्णय मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर सिव्हील ॲप्लीकेशन क्रमांक ८४३/२००६, रीट पिटीशन क्रमांक ३९२८/२००६ या निर्णयाचा संदर्भ आजच्या सुनावणीत देऊन अशा प्रकारे उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देता येणार नाही असे सांगितले. तथापी अपीलकर्त्याने मागणी केलेल्या उत्तरपत्रिकाची झेरॉक्स प्रत सोडून इतर कागदपत्रांची त्यांनी मागणी केली होती. त्यामध्ये दिनांक २.५.२०१० ला घेण्यात आलेल्या सीईटीची प्रश्नपत्रिकाची प्रत, परिषदेने तयार केलेली मॉडेल उत्तरपत्रिकाची दिनांक २.५.२०१० च्या प्रती विनामुल्य उपलब्ध करुन दिली. तसेच अपीलकर्त्यास त्या आयोगासमोर देखील उपलब्ध करुन दिल्या त्या अपीलकर्त्याने स्विकारल्या. तसेच आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे बीपीएल कुटुंबातील असून त्यांनी मुळ रेशनकॉर्ड देखील आयोगासमोर दाखविले. त्यावरुन अपीलकर्ता हे बीपीएल असल्याचे दिसून आले. म्हणून अपीलकर्त्याने उत्तरपत्रिका सोडून बाकीची माहिती मागितलेली आहे. त्यासंदर्भात अपीलकर्त्याने परिषदेच्या कार्यालयात उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती माहिती अधिका-यांकडून विनामुल्य उपलब्ध करुन घेणे व डुप्लीकेट गुणपत्रक मिळविण्यासाठी मंडळ नियमाप्रमाणे अपीलकर्त्याने कार्यवाही करणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांना हा निर्णय मिळाल्यानंतर उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स प्रती वगळून इतर माहिती अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयामध्ये निरिक्षणासाठी हजर झाल्यावर त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्राचे त्यांनी निरिक्षण करुन द्यावी व निरिक्षणानंतर अपीलकर्त्यास आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात

२) सदरच्या कार्यवाहीसाठी अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे येथील कार्यालयात हजर राहावयाचे आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३१-३४/१२.१.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५६०/२०१०.

श्री. अनंत प्रभाकर मुजुमदार,
प्लॉट नं. ओ-३, सायंटिफीक सोसायटी,
आर.पी.टी.एस. रोड, लक्ष्मीनगर, नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. सी. सुर्यवंशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, नागपूर.

श्री. पी. टी. भूते,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रमुख लिपिक,
जिल्हा अधिक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.१.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, भुमी अभिलेख, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देऊन श्री. प्र. गो. मुजुमदार यांचा दिनांक २३.१.२००४ रोजी दिलेला अर्जाबाबत केलेल्या कार्यवाही संबंधात एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन

... २

जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १६.८.२०१० रोजी अपीलकर्त्यास पंजीबध्द डाकेने ती माहिती पाठविली मात्र सदरच्या प्राप्त झालेल्या माहितीमध्ये फक्त मुद्या क्रमांक १ ची माहिती त्यांना मिळाली असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा अधीक्षक, भुमी अभिलेख, नागपूर यांचे कार्यालयाकडे दिनांक ९.९.२०१० रोजी दाखल केले. सदरच्या अपीलाचा निर्णय दिनांक १५.१०.२०१० रोजी देण्यात आला व त्या निर्णयामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक १ ची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र मुद्या क्रमांक २ ते ४ हे प्रश्नार्थक स्वरुपात असल्यामुळे माहिती देता येत नाही असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नमुद केले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक १९.७.२०१० रोजी प्राप्त झाला. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक १६.८.२०१० च्या पत्राने पंजीबध्द डाकेने माहिती उपलब्ध करुन दिली व तसेच माहिती बाबत फी रुपये ३०५/- भरणेबाबतही निर्देश दिले. त्यानुसार अपीलकर्ता हे त्यांचे कार्यालयात दिनांक १८.८.२०१० रोजी हजर झाले. त्यांनी रुपये ३०५/-आवश्यक त्या फीचा भरणा केला व त्यानंतर लगेच त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना मुद्या क्रमांक एकचीच माहिती मिळाली व मुद्या क्रमांक २ ते ४ ची माहिती अद्याप मिळालेली नाही. याबाबत जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असा खुलासा केला की, माहितीच्या अधिकाराखाली ज्या स्वरुपात माहिती कार्यालयात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती माहिती देता येते. अपीलकर्त्याची मुद्या क्रमांक २ ते ४ ची माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात असल्यामुळे ती उपलब्ध करुन देता आली नाही.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तृत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १६.८.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास आवश्यक ती फी भरणा करुन घेऊन मुद्या क्रमांक १ ची माहिती उपलब्ध करुन दिलेले आहे. तसेच मुद्या क्रमांक २ ते ४ हे जरी प्रश्नार्थक स्वरुपाचे असले तरी प्रश्नार्थक माहिती बाबत त्यांच्या कार्यालयाकडे सध्या जी वस्तुस्थिती आहे ती वस्तुस्थिती अपीलकर्त्यास देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून जनमाहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास १० दिवसांचे आंत मुद्दा क्रमांक २ ते ४ ची वस्तुस्थिती विनामुल्य व्यक्तिशः किंवा पोस्टाने कळवावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५६४/२०१०.**

श्री. मुकेश हरीकिशन सुरी,
प्लॉट नं. २९, काचीपूरा, रामदास पेठ,
नागपूर - ४४० ०१०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपनिबंधक सहकारी संस्था (शहर-१),
१८५, आयुर्वेदिक ले आऊट, भांडे प्लॉट चौक,
उमरेड रोड, नागपूर.

श्री. राजेंद्र दाभेराव,
जनमाहिती अधिकारी तथा
उपनिबंधक सहकारी संस्था (शहर-१),
१८५, आयुर्वेदिक ले आऊट, भांडे प्लॉट चौक,
उमरेड रोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.१.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर (शहर-१) नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन लोकसेवा सहकारी गृहनिर्माण संस्था लि. नागपूर नोंदणी क्रमांक एनजीपी/एचएसजी/११४५/८२ या संस्थेनी त्यांना दिलेला भुखंड क्रमांक २२९ बाबत

... २

नोंद कां झाली नाही याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. तसेच श्रीमती अंजना उमरीकर, श्रीमती आशा रोकडे, श्री. नितीन महाजन निंबर्ते व श्री. राजेंद्र शामराव नाईक हे संस्थेचे सभासद कधी झाले व त्यांनी भुखंडाची रक्कम कधी भरली व त्यांना भुखंडाची रजिस्ट्री कधी करुन दिली इत्यादी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

३. उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर (शहर-१), नागपूर यांनी सुनावणीत असे नमुद केले की, लोकसेवा गृहनिर्माण संस्था लि. नागपूर ही संस्था सहकारी कायद्याप्रमाणे नोंदणीकृत झालेली आहे. तथापी त्या संस्थेचे ते जनमाहिती अधिकारी नाही. कारण सदरची संस्था सहकारी कायद्याखाली नोंदणी झालेली आहे. तथापी अपीलकर्ता यांच्या दिनांक १.४.२०१० च्या माहिती मागण्याच्या अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक ३.४.२०१० रोजी प्राप्त झाला. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे उद्येशाने त्यांनी अर्ज संस्थेकडे दिनांक ५.४.२०१० रोजी पाठविला. त्यामध्ये अपीलकर्त्यास मुदतीत माहिती देण्याचे निर्देश देण्यात आलेले होते व त्याची प्रत अपीलकर्ता यांना देऊन सदरचा अर्ज संस्थेकडे वर्ग करण्यात आला असून आपण संस्थेशी संपर्क साधावा असे अवगत करण्यात आले होते. तथापी संस्थेकडून त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-१, नागपूर यांचेकडे दिनांक २१.७.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून उपनिबंधकांनी प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ३०.७.२०१० रोजी व दिनांक ९.८.२०१० रोजी घेतली. त्यावेळेला संस्थेचे जनमाहिती अधिकारी तथा सचिव उपस्थित होते. त्यांनी असे नमुद केले की, सदर संस्थेला कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान प्राप्त झाले नाही किंवा शासकीय जमीन देखील मिळाली नाही. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार गृहनिर्माण सहकारी संस्थेला लागू होत नाही असे नमुद करुन मा. उच्च न्यायालयाने डॉ. पंजाबराव देशमुख सहकारी बॅंकेच्या संदर्भात रिट याचिका क्रमांक ५६६६/२००७ च्या निर्णयाची प्रत सोबत जोडली. सदरच्या निर्णयाला अनुसरुन माहितीचा अधिकार कायदा हा गृहनिर्माण सहकारी संस्थेला लागू होत नाही म्हणून प्रथम अपील फेटाळण्यात आले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आजच्या सुनावणीत नमुद केले.

... ३

४. अपीलकर्ता व उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, लोकसेवा सहकारी गृहनिर्माण संस्था ही सहकारी कायद्याखाली नोंद झालेली असून त्या संस्थेला शासनाचे कोणतेही अर्थ सहाय्य किंवा अनुदान प्राप्त झाले नाही. तसेच शासकीय जमीन देखील त्यांना मिळाली नाही म्हणून माहितीच्या अधिकाराच्या तरतुदी गृहनिर्माण सहकारी संस्थेला लागू होत नसल्या तरी सदरची संस्था ही सहकारी संस्था असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) नुसार "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येप्रमाो माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असे आहे. त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज इत्यादी व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल असे कोणतेही खाजगी निकायाशी संबंधीत माहिती याचा समावेश होतो अशी तरतुद आहे. ती तरतुद असल्यामुळे सहकारी संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना उपनिबंधकांनी पुरविणे संयुक्तिक होईल. वरील व्याख्येमध्ये त्या त्या वेळी अंमलात असलेले अन्य कायद्यान्वये म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल असे म्हणजेच उपनिबंधक या सार्वजनिक प्राधिकरणास देखील ही माहिती मिळविता येईल. म्हणून माहितीचा अधिकार हा प्रत्यक्षपणे गृहनिर्माण सहकारी संस्थेला लागू होत नसला तरी उपनिबंधक, सहकारी संस्था यांचेकडे अर्ज केल्यास त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतुदीनुसार माहिती उपलब्ध करुन घेऊन अर्जदारास माहिती पुरविणे शक्य आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ४

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी संबंधित लोकसेवा सहकारी गृहनिर्माण संस्था यांचेकडून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती सहकारी कायद्याप्रमाणे प्राप्त करण्याची योग्य ती कार्यवाही करावी किंवा संस्थेला अपीलकर्त्यास माहिती पुरविणेबाबत सहकारी कायद्याप्रमाणे निर्देश देण्याची कार्यवाही करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५६६/२०१०.

श्री. भास्कर मिठुजी डोंगरे,
कस्तुरबा वार्ड (कृष्णापूरा),
पंचशील झेंडयाजवळ, ता.जि..गोंदिया - ४४१ ६०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
श्री. शंकरलाल अग्रवाल हायस्कूल, काटी,
ता. जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. टि. के. तागडे, तालुका समादेशक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांच्याकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देऊन एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२०१० रोजी प्रथम

... २

अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २२.७.२०१० रोजी देण्यात आलेला असून त्यात असे नमुद केले की, खाजगी शाळेचे माहिती अधिकारी हे मुख्याध्यापक असल्यामुळे अपीलकर्ता श्री. बी. एम. डोंगरे यांनी मागितलेली माहिती मुख्याध्यापकाने पुरविणे आवश्यक आहे. म्हणून श्री. डोंगरे यांनी मागितलेली माहिती आपण १० दिवसात पुरविण्याची व्यवस्था करावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.१२.२०१० सुनावणीची नोटीस काढलेली असून सुनावणीस दिनांक १५.१.२०११ रोजी बालाविले होते. त्यामध्ये अपीलकर्ता हे हजर आहेत. परंतु जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे हजर नाहीत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी त्यांची आहे व आज ते गैरहजर असल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती उपलब्ध न करुन देण्यास जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे दोषी आढळून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- शास्ती लादणेची कार्यवाही करणेचा विचार करणे योग्य होईल. परंतु शास्ती लादणे पुर्वी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे त्यांचा खुलासा घेणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलबध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांचा दिनांक १७.३.२०१० च्या अर्जाप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी विहित मुदतीत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगापुढे करावा. अन्यथा शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४२-४४/१५.१.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५६७/२०१०.

श्री. भास्कर मिठुजी डोंगरे,
कस्तुरबा वार्ड (कृष्णापूरा),
पंचशील झेंडयाजवळ, ता.जि..गोंदिया - ४४१ ६०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
श्री. शंकरलाल अग्रवाल हायस्कूल, फुक्कीमेटा,
पो. पराडा, ता. देवरी, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. टि. के. तागडे, तालुका समादेशक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. शंकरलाल अग्रवाल हायस्कूल, फुक्कीमेटा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन शाळेच्या कर्मचाऱ्यांचे हजेरी रजिस्टर व वेतन देयकांची प्रमाणित प्रत मागितलेली दिसून येते. प्रस्तुत माहिती २००१ ते २०१० या कालावधीची माहिती

... २

मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२०१० रोजी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली मात्र प्रथम अपीलाचे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे गैरहजर होते. त्यानंतर दिनांक २२.७.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिला असून त्या निर्णयात असे नमुद केले की, खाजगी शाळेचे माहिती अधिकारी हे मुख्याध्यापक असल्यामुळे अपीलकर्ता श्री. बी. एम. डोंगरे यांनी मागितलेली माहिती त्यांना पुरविणे आवश्यक आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्यास १० दिवसात माहिती पुरविण्याची व्यवस्था करावी व तसा अहवाल त्यांचे कार्यालयात सादर करावा असा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे गैरहजर आहेत. राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.१२.२०१० रोजी सुनावणीची नोटीस काढून सुनावणीस दिनांक १५.१.२०१० रोजी सर्व संबंधितांना बोलाविले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. मात्र जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे हजर नाहीत. त्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी प्रथम अपीलाचे निर्णयास अनुसरुन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी त्यांची आहे व आज ते गैरहजर असल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे दोषी आढळून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- शास्ती लादणेची कार्यवाही करणेचा विचार करणे योग्य होईल. परंतु शास्ती लादणे पुर्वी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे त्यांचा खुलासा घेणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १६.३.२०१० च्या माहिती अधिकारात केलेल्या अर्जातील मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलबध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांचा दिनांक १६.३.२०१० चा माहितीच्या अर्जाप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी विहित मुदतीत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगापुढे करावा. अन्यथा शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४५-४७/१५.१.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५६८/२०१०.

श्री. दिलीपकुमार फनिन्द्रनाथ कटरे,
द्वारा - एल. एफ. कटरे,
आदर्श कॉलनी वार्ड नं. १, रेल्वे स्टेशन रोड,
पो. ता. गोरेगांव, जि..गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. एस. बी. पटले,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
स्वामी विवेकानंद विद्यालय, कारंजा,
पो. कारंजा, ता. जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. टि. के. तागडे, तालुका समादेशक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, स्वामी विवेकानंद विद्यालय, कारंजा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देऊन दिनांक ९.७.२०१० ते २००५ पर्यंत अपीलकर्ता त्या शाळेच्या सेवेत होते. त्या कालावधीचे मुळ सेवा पुस्तकाचे सत्यप्रत व सेवापुस्ताकची द्वितीय प्रत

... २

मागितलेली दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांनी या माहिती अर्जाची एक प्रत उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे देखील पाठविली होती. त्याला अनुसरुन उपशिक्षणाधिकारी, गोंदिया यांनी दिनांक १५.७.२०१० रोजीच्या पत्राने अपीलकर्ता यांना असे कळविले की, खाजगी शाळेचे माहिती अधिकारी हे मुख्याध्यापक आहेत म्हणून त्यांचा अर्ज मुख्याध्यापकाकडे पाठविण्यात आला असून त्यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेण्यास कळविले व त्या पत्राची एक प्रत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, स्वामी विवेकानंद विद्यालय, कारंजा यांना दिलेली असून अपीलकर्त्यास माहिती देण्यात यावी अशी सूचना दिलेली दिसून येते.

३. अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.९.२०१० रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १८.१०.२०१० रोजी व दिनांक २५.१०.२०१० रोजी घेण्यात आली. त्या सुनावणीस देखील मुख्याध्यापक हे गैरहजर राहिलेले दिसून येतात. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २७.१०.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देऊन अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी १० दिवसांत माहिती पुरवावी असा निकाल दिलेला दिसून येतो.

४. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी असे नमुद केले की, त्यांचेकडे असलेल्या शालेय कामकाजाचे व्यापामुळे ते अपीलकर्त्यास माहिती पुरवू शकले नाही. तसेच ५ दिवसांचे शालेय प्रशिक्षणाचे काम व इतर शैक्षणिक काम त्याचा व्याप असल्यामुळे ते अपीलकर्त्यास माहिती पुरवू शकले नाही असे त्यांनी सुनावणीत आयोगापुढे नमुद केले. तथापी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी केलेला खुलासा मान्य करता येत नाही. त्याचे कारण असे की, माहितीचाअधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) मधील तरतुदीनुसार ३० दिवसांच्या मुदतीत अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक आहे. तसेच प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील दिनांक २७.१०.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देऊन १० दिवसांत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्यास माहिती पुरविण्याचे आदेश दिले होते. मात्र त्या निर्णयास अनुसरुन देखील मुख्याध्यापकांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. सुनावणी दरम्यान मुख्याध्यापक यांनी असेही सांगितले की, सन २००१ ते २००५ या कालावधीत सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक तयार केल्याचे दिसून येत नाही. कारण त्यावेळी ते

मुख्याध्यापक पदावर नव्हते. तसेच त्यावेळेस शाळा अनुदानावर नव्हती. मात्र सन २००६ पासून शाळेला अनुदान सुरु झालेले आहे व त्यानंतर सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक तयार केले आहे. मात्र अपीलकर्ता यांचा सेवा कालावधी २००१ ते २००५ असा असून सध्या ते शाळेचे सेवेत नाही. म्हणून त्यांचे सेवापुस्तक तयार झालेले दिसून येत नाही.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता हे सन २००१ ते २००५ या कालावधीत स्वामी विवेकानंद विद्यालय, कारंजा येथे सेवेत होते. त्यानंतर ते आता त्या विद्यालयाच्या सेवेत नाही. म्हणून सन २००१ ते २००५ या कालावधीचे सेवापुस्तक जर उपलब्ध नसेल तर तशी वस्तुस्थिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांच्या सेवा पुस्तक उपलब्धतेबाबतची वस्तुस्थिती कळवावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्यास माहितीच्या अधिकारात आलेल्या अर्जाबाबत ३० दिवसांचे मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये त्याचा खुलासा हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. या मुदतीत त्यांचा लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास शास्ती कायम होईल.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४८-५०/१५.१.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५७३/२०१०.

सौ. सुशिला निळकंठराव नेवाळे,
गणेशधाम, सत्यम पॅराडॉईज कॉलनी,
रो हाऊस नं. १०, हुडकेश्वर रोड, नागपूर - ४४० ०३४. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. ए. एन. अधीर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, वाशिम.

श्री. एम. एल. खिल्लारी,
जनमाहिती अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, वाशिम. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.१.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक २३.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ३०.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाशिम यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देऊन त्यांना सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी न मिळाल्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती

... २

प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी प्रथम अपील गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाशिम यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णयात देखील त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ती यांचे वतीने त्यांचे पती श्री. निलकंठराव नेवाळे यांनी अर्ज सादर करुन त्यांची बाजू माडण्याची परवानगी मागितली. त्यांचे वतीने त्यांना बाजू मांडण्याची परवानगी देण्यात आली. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की, त्यांची पत्नी सौ. सुशिला नेवाळे हया पंचायत समिती, वाशिम अंतर्गत शाळेमध्ये शिक्षिका म्हणून कार्यरत हौत्या. त्या दिनांक ३.८.२००७ रोजी सेवानिवृत्त झाल्या असून अद्यापपर्यंत त्यांना सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी मिळाली नाही म्हणून त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना माहिती अधिकाऱ्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांच्या निर्णयानंतरही माहिती प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिले.

४. जनमाहिती अधिकारी तथा प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, त्यांच्याकडे गटशिक्षणाधिकाऱ्यांचा अतिरिक्त पदभार देण्यात आलेला आहे. अपीलकर्ती यांचा माहिती मागण्याचा दिनांक ३०.७.२०१० चा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे खंड विकास अधिकारी यांचे कडून दिनांक ४.८.२०१० रोजी प्राप्त झ ााला. सदरचा अर्ज शिक्षण विभागाचे श्री. के. एस. गायकवाड, अधिक्षक यांचेकडे दिला होता. तथापी त्यांनी गटशिक्षणाधिकारी यांचेकडे माहितीचा अर्ज अपीलकर्त्यीस माहिती देण्यासाठी मुदतीत जनमाहिती अधिकारी यांचेकडे सादर केलेला नाही. मात्र अपीलकर्ती हिने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाशिम यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्यानंतर विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणधिकारी यांचे निदर्शनास ही बाब आली असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. तसेच आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपीलकर्तीचे प्रथम अपील त्यांचेकडे दिनांक १३.९.२०१० रोजी प्राप्त झाले. त्या अपीलाची सुनावणी दिनांक ४.१०.२०१० रोजी घेण्यात आली आणि निर्णय दिनांक १२.१०.२०१० देण्यात आला. सदरच्या निर्णयात असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस १५ दिवसांचे आंत

माहिती उपलब्ध करुन द्यावी असा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिला. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील जनमाहिती अधिकारी यांचेकडून १५ दिवसांचे मुदतीत अपीलकर्तीस कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्याचे कारण विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, प्रथम अपीलाचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्ती हिच्या ६ व्या वेतन आयोगाच्या प्रस्तावाचा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडे पाठपुरावा करण्यात आला. त्यासाठी ते स्वतः शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित झाले व दिनांक १५.१.२०११ रोजी अपीलकर्तीस ६ व्या वेतन आयोगाचे मंजूरीचे आदेश त्यांनी प्राप्त करुन घेतलेले आहे. म्हणून आता अपीलकर्ती हिच्या ६ व्या वेतन आयोगाचे मंजूरीचे आदेश प्राप्त झाल्यामुळे जिल्हा परिषदेकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर सदरची रक्कम अपीलकर्तीस अदा करता येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५. अपीलकर्ती, विद्यमान जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ती हिच्या दिनांक ३०.७.२०१० च्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन ३० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचे याबाबत असे म्हणणे आहे की, त्यांचेकडे गटशिक्षणाधिकारी या पदाचा अतिरिक्त पदभार आहे. त्यामुळे शिक्षण विभागाचे श्री. के. एस. गायकवाड यांचेकडे माहिती अधिकाराचा अर्ज देण्यात आलेला होता. त्यांनी तो अर्ज मुदतीत जनमाहिती अधिकारी यांचे समोर कार्यवाहीसाठी सादर केलेला नाही. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर श्री. के. एस. गायकवाड, अधिक्षक यांना अपीलकर्तीस माहिती उपलब्ध करुन देण्याची सुचना दिली. त्यानंतरही त्यांनी त्यावर कार्यवाही केलेली नाही. म्हणून प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्तीस माहिती उपलब्ध न करुन देण्याच्या विलंबास शिक्षण विभागातील श्री. के. एस. गायकवाड, अधिक्षक हे जबाबदार दिसून येतात. त्यांनी विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती अधिकाराखालील अर्ज माहिती देण्यासाठी सादर केलेला नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(५) प्रमाणे श्री. के. एस. गायकवाड, अधिक्षक हे

जनमाहिती अधिकाऱ्याला सहाय्य करीत असल्यामुळे त्यांना कलम ५(५) खाली जनमाहिती अधिकारी म्हणून समजण्यात येत असून त्यांना रुपये १००००/- शास्ती लादणे योग्य होईल. तथापी श्री. के. एस. गायकवाड, अधिक्षक हे आजच्या सुनावणीस उपस्थित नाही म्हणून त्यांचेवर रुपये १००००/- शास्ती कां लादू नये याचा खुलासा त्यांचेकडून मागविणे संयुक्तिक होईल.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी १० दिवसांचे आंत अपीलकर्तीस त्यांनी त्यांचेकडील दिनांक ३०.७.२०१० च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्तीस माहितीच्या अधिकाराखाली माहिती मुदतीत उपलब्ध न करुन देण्यास शिक्षण विभागाचे श्री. के. एस. गायकवाड, अधिक्षक हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) प्रमाणे रुपये १००००/- ची शास्ती कां लादण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी त्यांचे वरिष्ठा मार्फत हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत सादर करावा. अन्यथा शास्ती कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/५१-५४/१७.१.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५७७/२०१०.

श्री. अनिल गजाननराव बारवे,
आशीर्वाद नगर, डॉ. निकोसे यांचे घराजवळ,
गोकुळनगर, ता. जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. रुचेश जयवंशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
नगर परिषद, गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गडचिरोली यांचेकडे दिनांक १३.५.२०१०, दिनांक ७.६.२०१० व दिनांक २७.७.२०१० या अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवालाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे निवेदन सादर करुन नगर परिषद, गडचिरोली यांनी बोअरींगवरचे गोटे हटविल्यामुळे व माझे समाधान झाल्यामुळे उपरोक्त अपील मागे घेत आहे असे लेखी सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/५५/१८.१.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५७८/२०१०.**

श्री. मनोहर विश्वनाथ बडवाईक,
मु. पो. तारसा, ता. मौदा, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जे. बी. संगीतराव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. रामटेक, जि. नागपूर.

श्री. संजय पवार,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. मौदा, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.१.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, मौदा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्त्याने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी, रामटेक यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेली दिसून येते.

... २

३. अपीलकर्ता यांनी आयोगासमोर असे नमुद केले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांचेकडे दिनांक १२.८.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले. आजच्या सुनावणीत प्रामुख्याने अपीलकर्त्याने असे नमुद केले की, त्यांना जी माहिती प्राप्त झालेली आहे त्यामध्ये ज्यांनी भुखंडाचा वापर केला नाही त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अद्यापही मिळाली नाही. तसेच त्यांना दुकानासाठी तारसा गावामध्ये १०० चौ.मी. जागा मिळणेबाबत अर्ज केला होता त्या अर्जावर माहिती मिळाली नाही. वरील २ मुद्यांची माहिती त्यांना मिळावी असे आग्रही प्रतिपाद त्यांनी सुनावणीत केले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहिती मिळण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १२.८.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले होते म्हणून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तयार करण्यात आली. परंतु ते माहिती घेण्यास आले नाही म्हणून अपीलकर्त्यास दिनांक २१.८.२०१० रोजी साध्या पोस्टाने पत्र पाठवून तयार झालेली माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले. मात्र अपीलकर्ता माहिती घेण्यासाठी कार्यालयात उपस्थित झाले नाही. यावर अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना सदरचे पत्र पोस्टाद्वारे मिळाले नाही. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पाठविलेले पत्र पोस्टाने पाठविल्याचा पुरावा म्हणून जावक रजिस्टरची प्रत दाखविली. त्यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्त्यास पोस्टाने माहिती घेऊन जाण्यास पत्र पाठविल्याचे दिसून येते. अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध व्हावी म्हणून तहसीलदार यांनी पुन्हा दिनांक ३.११.२०१० च्या पत्राने माहिती घेण्यासाठी त्यांना कार्यालयात बोलाविले. सदरचे पत्र कोतवालामार्फत अपीलकर्त्यास देण्यात आले ते पत्र अपीलकर्त्याने मिळाल्याचे सुनानवणी मान्य केले. मात्र अपीलकर्ता त्यानंतरही जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये माहिती घेण्यासाठी गेले नाही असे त्यांनी नमुद केले. त्यानंतर तहसीलदार यांनी अपीलकर्त्यास दिनांक १३.१२.२०१० रोजीच्या पत्राने पंजीबध्द डाकेने त्यांचेकडे असलेली माहिती पाठविलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, रामटेक यांनी आयोगासमोर असे निवेदन केले की, अपीलकर्त्याचा प्रथम अपीलाचा अर्ज हा दिनांक २२.९.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याच्या अर्जाचे अवलोकन केले असता अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी माहिती पुरविणे आवश्यक असल्यामुळे तहसीलदार, मौदा यांनी दिनांक २७.९.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती पुरविण्याचे निर्देश दिले. त्यानुसार तहसीलदार, मौदा यांनी अपीलकर्त्यास दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास पंजीबध्द डाकेने पाठविलेली आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, मौदा यांनी दिनांक २१.८.२०१० रोजी तसेच दिनांक ३.११.२०१० रोजी माहिती घेऊन जाण्यास पत्र पाठविले होते. तथापी अपीलकर्ता व्यक्तिशः माहिती घेण्यास गेले नाही म्हणून तहसीलदार, मौदा यांनी दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास पंजीबध्द डाकेने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील तहसीलदार, मौदा यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविल्याचे दिसून येते. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांचेकडून दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली असे त्यांनी मान्य केले. मात्र ज्यांनी भुखंडाचा वापर केला नाही त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना अद्याप मिळाली नाही व अपीलकर्त्याने दुकानासाठी तारसा गावातील सर्व्हे नं. २८४ मधील १०० चौ.मि. जागेसाठी केलेला फेर अर्जाची माहिती त्यांना मिळाली नाही असे नमुद केले. म्हणून प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी या २ मुद्याबाबत वस्तुस्थिती दर्शक माहिती उपलब्ध करुन देणे योग्य होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अशतः मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा आदेश मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, मौदा यांनी अपीलकर्त्यास खालील २ मुद्यांबाबत वस्तुस्थितीदर्शक माहिती विनामुल्य किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. १) ज्या लाभार्थ्यांनी भुखंडाचा वापर केला नाही त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती. २) अपीलकर्त्याने तारसा गावामधील सर्व्हे नं. २८३ मधील १०० चौ.मि. जागा मिळणेबाबत केलेल्या फेर अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/५६-५९/१९.१.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५८२/२०१०.**

श्री. विलास कवडूजी वरंभे,
द्वारा - श्री. क. गो. वरभे,
न्यु. राष्ट्रीय विद्यालयाचे मागे,
वडाळा (पैकू), ता. चिमूर, जि. चंद्रपूर - ४४२ ९०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. रविकांत देशपांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद. चंद्रपूर.

सौ. एल. व्ही. कुमरे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.१.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, (माध्यमिक शिक्षण विभाग) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देऊन श्री. भिवाजी वरभे कनिष्ठ कला महाविद्यालय, बोथली, ता. चिमूर येथील शैक्षणिक संस्थे संबंधी एकूण ४ मुद्यांच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १३.७.२०१० रोजी

अपीलकर्त्याला माहिती प्राप्त झालेली दिसते. तथापी त्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्त्याने दिनांक १९.७.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगा समोर असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे वर नमुद केल्याप्रमाणे भिवाजी वरभे कनिष्ठ कला महाविद्यालय, बोथली या शैक्षणिक संस्थेविषयी एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्या अर्जाला अनुसरुन त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १३.७.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र सदरची माहिती ही समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २५.८.२०१० रोजी घेण्यात आली. त्या सुनावणीस अपीलकर्ता हजर होते व त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन दिनांक २७.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिला. त्यामध्ये असे नमुद केले की, माहिती अधिकारी यांना दिनांक १३.७.२०१० च्या पत्राप्रमाणे प्राचार्य, भिवाजी वरभे कनिष्ठ कला महाविद्यालय यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय देण्यात आला. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही अपीलकत्यास अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी आयोगास असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २.७.२०१० प्राप्त झाला. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या माहितीची छाननी करण्यात आली. त्यानुसार असे दिसून आले की, अपीलकर्त्याने मागितलेली मुद्या क्रमांक १ ची माहिती ही शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयाशी संबंधीत असून सदरचे कार्यालय हे वरिष्ठ कार्यालय आहे. त्यामुळे मुद्या क्रमांक १ ची माहिती शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर या कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे मुद्या क्रमांक १ ची माहिती जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाचे संबंधित नाही. म्हणून अपीलकर्त्यास दिनांक १३.७.२०१० च्या पत्राने कळविले. त्याचप्रमाणे दिनांक १३.७.२०१० च्या पत्राने मुद्या क्रमांक २ बाबत असे नमुद करण्यात आले की,

सदरची माहिती ही प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर यांचेशी संबंधित आहे. कारण ते कार्यालय देखील स्वतंत्र आहे. म्हणून त्याबाबतची माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही. म्हणून मुद्या क्रमांक २ ची माहिती प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर यांचेकडून घेण्यात यावी असे देखील अपीलकर्त्यास कळविले. मुद्या क्रमांक ३ व ४ याबाबत देखील माहिती प्राचार्य, भिवाजी वरभे कनिष्ठ कला महाविद्यालय, बोथली कडून प्राप्त करुन घ्यावी असे अपीलकर्त्यास दिनांक १३.७.२०१० च्या पत्राने कळविले असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. यावर अपीलकर्ता यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, मुद्या क्रमांक ३ व ४ ची माहिती ही कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधित आहे. मात्र त्या महाविद्यालयाकडून त्यांना माहिती प्राप्त करुन घेणे शक्य होणार नाही. कारण त्या महाविद्यालयात ते सेवा करीत आहेत. म्हणून मुद्या क्रमांक ३ व ४ ची माहिती कनिष्ठ महाविद्यालयाकडून जनमाहिती अधिकारी यांचेमार्फत उपलब्ध करुन द्यावी असे अपीलकर्त्याने नमुद केले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी असे नमुद केले की, त्यांचेकडे अपीलकर्त्याचे प्रथम अपील दिनांक २८.७.२०१० रोजी प्राप्त झाले. त्यांची सुनावणी २५.८.२०१० रोजी घेण्यात आली. त्यावेळी जनमाहिती अधिकारी व अपीलकर्ता उपस्थित होते. त्यांचे उपस्थितीत असा निर्णय दिला की, माहिती अधिकारी यांनी दिनांक १३.७.२०१० च्या पत्राप्रमाणे संबंधितांकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले आहे. तसेच शाळेची माहिती प्राचार्य, भिवाजी वरभे कनिष्ठ कला महाविद्यालय, बोथली यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी असे नमुद करुन अपील निकाली काढण्यात आलेले आहे. मात्र अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील त्यांना प्राचार्य, भिवाजी वरभे कनिष्ठ कला महाविद्यालयाकडून अपूर्ण माहिती मिळाली व दिलेली माहिती देखील दिशाभूल करणारी माहिती आहे असे अपीलकर्त्याने नमुद केले.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती ही शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर तसेच प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर व प्राचार्य, भिवाजी वरभे कनिष्ठ कला महाविद्यालय, बोथली यांचेशी संबंधित आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक

१३.७.२०१० रोजी अपीलकर्त्यास पत्राने तसे कळविले दिसून येते. तसेच शिक्षण उपसंचालक, नागूर व प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर हे दोन्ही जनमाहिती अधिकारी यांचे वरिष्ठ कार्यालय असल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्याने मुद्या क्रमांक १ व २ बाबतची माहिती त्या संबंधित कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेणे योग्य होईल व ती माहिती संबंधित कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेण्यास अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र मुद्या क्रमांक ३ व ४ ची माहिती प्राचार्य, भिवाजी वरभे कनिष्ठ कला महाविद्यालयाचे संबंधित आहे. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची प्रती हया शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे संबंधित महाविद्यालयाकडून पाठविलेल्या असतात. त्यामुळे मुद्या क्रमांक ३ व ४ ची माहितीची सत्यप्रती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच प्राचार्य, भिवाजी वरभे कनिष्ठ कला महाविद्यालयाच्या ज्या कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता मिळालेली आहे त्या मान्यतेची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक ३ व ४ ची माहिती तसेच वैयक्तिक पद मान्यतेची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांनी मुद्या क्रमांक १ व २ बाबत योग्य त्या कार्यालयाकडे माहितीची मागणी करावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/६०-६३/१९.१.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५८५/२०१०.

श्री. आनंद अजाबराव धानोरकर,
तुकाराम सभागृह चौक,
धाडीवाल ले आऊट,
बौध्द विहाराजवळ, रिंगरोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

कु. अनिता एन. ताकसांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
अध्यापक विद्यालय, कोराडी,
ता. कामठी, जि. नागपूर.

श्री. बळवंत एम. सोनटक्के,
जनमाहिती अधिकारी तथा
अध्यापक विद्यालय, कोराडी,
ता. कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.१.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, अध्यापक विद्यालय, कोराडी यांचेकडे सप्टेंबर २००९ ची डी.टी.एड.द्वितीय वर्षाची प्राप्त झालेल्या चुकीच्या गुणपत्रिकाबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी सदरचा अर्ज हा विहित नमुन्यात दिसून येत नाही मात्र

... २

सदरच्या अर्जावर रुपये १०/- चा स्टॅम्प लावलेला आहे. अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ८.५.२०१० रोजी अपीलकर्त्यास मुळ गुणपत्रिका कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्याबाबत कळविलेले दिसून येते व त्या पत्रात जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळविलेले दिसून येते की, सदर गुणपत्रिकेत काही त्रुटया असल्यास आपण महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचेकडे संपर्क साधावा. तथापी अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात मुळ गुणपत्रिका प्राप्त करण्यासाठी आलेले दिसून येत नाही. तसेच त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील प्राचार्य यांचेकडे दिनांक १५.९.२०१० रोजी दाखल केलेले दिसते. त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेतलेले नाही. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्ता यांचा दिनांक २९.४.२०१० चा अर्ज पोस्टाने जनमाहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्याचे सांगितले. तसेच प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्ता हा सप्टेंबर २००९ मध्ये झालेल्या डी.टी.एड्.द्वितीय वर्षाच्या परिक्षेत बसला होता. सदरची परिक्षा महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचेकडून घेण्यात येत असते व परिक्षा आसन क्रमांक, परिक्षा गुणपत्रिका व परिक्षेचा निकाल हया सर्व बाबी महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेकडून हाताळण्यात येतात. अपीलार्थीचे या परिक्षेचे चुकुन २ गुणपत्रक परिक्षा परिषद, पुणे कडून त्यांचे अध्यापक विद्यालयास प्राप्त झाले होते. सदरची चुक अध्यापक विद्यालयाने परिक्षा परिषद, पुणे यांचे निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर परिक्षा परिषदेने अपीलकर्त्याच्या गुणपत्रिकेत सुधारणा करुन सुधारित गुणपत्रिका अध्यापक विद्यालयाकडे पाठविली आहे व त्यामुळे सदरची गुणपत्रिका अपीलकर्त्याने घेऊन जावी म्हणून अपीलकर्त्यास दिनांक ८.५.२०१० च्या पत्राने कळविले. मात्र अपीलकर्ता सुधारित गुणपत्रिका प्राप्त करुन घेण्यासाठी अद्यापही अध्यापक विद्यालय, कोराडी यांचेकडे आलेले नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास सुधारित गुणपत्रिका देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी व प्राचार्य यांनी आयोगासमोर सुनावणीत नमुद केले. सदरची सुधारित मुळ गुणपत्रिका हे महत्वाचे कागदपत्र असल्यामुळे पोस्टाद्वारे पाठविण्यापेक्षा अपीलकर्त्याने स्वतः कार्यालयात येऊन ती गुणपत्रिका मिळाल्याची स्वतःची सही करणे आवश्यक असते. गुणपत्रिकेचे वाटप अध्यापक विद्यालयातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष हजर राहून त्यांची सही घेऊनच वाटप करण्यात येते ही कार्य पध्दती असल्यामुळे सुधारित

गुणपत्रिका अपीलकर्त्यास पोस्टाने पाठविलेली नाही असे आयोगाचे निदर्शनास जनमाहिती अधिकारी यांनी आणून दिले.

४. जनमाहिती अधिकारी आणि प्राचार्य यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचेकडून सुरुवातीस चुकून २ गुणपत्रिका अध्यापक विद्यालयाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर सदरची बाब प्राचार्य यांनी परिक्षा परिषदेच्या निदर्शनास आणून दिली व त्यानंतर परिक्षा परिषद, पुणे यांचेकडून सुधारित गुणपत्रिका अध्यापक विद्यालयाकडे प्राप्त झालेले आहे. मात्र सदरची गुणपत्रिका अपीलकर्ता स्वतः प्राप्त करण्यासाठी अध्यापक विद्यालयात गेले नाही. म्हणून त्यांना सुधारित गुणपत्रिका देता आली नाही असे दिसून येते. गुणपत्रिकेचे वाटप विद्यार्थ्यांना स्वतः करण्यात येते व त्याबद्यल विद्यार्थ्याची गुणपत्रिका मिळाल्याची पोच घेण्यात येत असते अशी अध्यापक विद्यालयाची प्रचलित कार्य पध्दती आहे. त्याला अनुसरुन पुन्हा प्राचार्यानी अपीलकर्त्यास पंजीबध्द डाकेने सुधारित गुणपत्रिका घेऊन जाण्याबाबत कळविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी अपीलकर्त्यास पंजीबध्द डाकेने अपीलकर्त्याचे गुणपत्रिका अध्यापक विद्यालयातून घेऊन जाण्याबाबत कळवावे व अपीलकर्ता कार्यालयात हजर झाल्यावर त्याला सुधारित गुणपत्रिका उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५८६/२०१०.

श्री. विजय केशवराव चन्ने,
मस्जीद जवळ, गांधी चौक,
ता. राजूरा, जि. चंद्रपूर - ४४२ ९०५. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

कु. वंदना सौरंगपते,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, राजूरा, जि. चंद्रपूर.

श्री. पी. एच. रायपूरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निरिक्षक,
नगर परिषद, राजूरा, जि. चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.१.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.१.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.१.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. अपीलकर्ता यांचे वतीने श्री. अनिल ग. गिरडकर, वकील हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, नगर परिषद, राजूरा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देऊन कायदया अनुषंगाने घर बांधकाम परवानगी करिता नगर परिषद हद्दीत अकृषक परावर्तीत क्षेत्रातील आवश्यक कागदपत्रे कोणती. तसेच गावठाण क्षेत्रातील आवश्यक कागदपत्रे

कोणती अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर त्यांना सुधारित माहिती देण्यात आल्याचे दिसते. तथापी त्या माहितीनेही अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्त्याचे वकील यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक २७.८.२०१० रोजी वर नमुद केल्याप्रमाणे नगर परिषद, राजूरा यांचेकडे २ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्या अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २०.९.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वकीलांनी नमुद केले. म्हणून अपीलकर्त्याने मुख्याधिकारी, नगर परिषद, राजूरा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली त्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णयानुसार त्यांना सुधारित माहिती प्राप्त झाली. मात्र सुधारित माहिती देखील अपूर्ण असल्याचे वकीलांनी सुनावणीत नमुद करुन असे सांगितले की, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

४. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २७.८.२०१० चा माहिती मागण्याच्या अर्ज प्राप्त झाला. सदरची माहिती ही नगरपरिषदेच्या बांधकाम शाखेशी संबंधित होती म्हणून बांधकाम शाखेकडून ती माहिती तयार करण्यात आली व दिनांक २०.९.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास दोन्ही मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. दरम्यानच्या काळात अपीलकर्त्याने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ११.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्याची सुनावणी दिनांक १९.१०.२०१० रोजी घेण्यात आली व निर्णय दिनांक ३.११.२०१० रोजी घेण्यात आला असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय देऊन त्यामध्ये असे नमुद केले की, पहिल्या मुद्यांच्या संबंधात इतर कागदपत्रे असे म्हटलेले आहे. म्हणून इतर कागदपत्रात कोणत्या कागदपत्रांचा समावेश होतो हे अपीलकर्त्यास ७ दिवसांचे आंत माहिती अधिकाऱ्याने कळवावे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ८.११.२०१० च्या पत्राने इतर कागदपत्रे विकास शुल्क किंवा बांधकाम शुल्क भरणा केले असल्यास त्याची जमा पावती यांचा समावेश होतो असे नमुद करुन सुधारित माहिती दिनांक ८.११.२०१० च्या

पत्राने अपीलकर्त्यास देण्यात आलेली आहे. याबाबत अपीलकर्त्याचे वकीलांनी असाही मुद्दा मांडला की, मालकी हक्क प्रमाणपत्र म्हणजे नेमके कोणती कागदपत्रे याचा बोध होत नाही. म्हणून त्याची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही असे वकीलांनी नमुद केले. त्यावर जनमाहिती अधिकारी व मुख्याधिकारी यांनी असा खुलासा केला की, मालकी हक्क प्रमाणपत्र म्हणजे मालकी सिध्द करणारा दस्तऐवज असा आहे.

५. अपीलकर्ता यांचे वकील, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २०.९.२०१० च्या पत्राने व दिनांक ८.११.२०१० च्या पत्राने सुधारित माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेवर कार्यवाही करणे योग्य होणार नाही. तथापी मालकी हक्क प्रमाणपत्र म्हणजे मालकी सिध्द करणारे दस्तऐवज म्हणून इतर कागदपत्रे म्हणजे विकास शुल्क किंवा बांधकाम शुल्क भरणा केले असल्यास त्याची जमा पावती यांचा समावेश होतो असे अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मालकी हक्क प्रमाणपत्र म्हणजे मालकी सिध्द करणारे दस्तऐवज व इतर कादपत्रे म्हणजे विकास शुल्क किंवा बांधकाम शुल्क भरणा केले असल्यास त्याची जमा पावती यांचा समावेश होतो असे स्पष्टपणे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तिशः अपीलकर्त्यास कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/६७-६९/२०.१.२०११

# १ फेब्रुवारी, २०११

# ते

# २८ फेब्रुवारी, २०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५९२/२०१०.**

श्री. देवचंद धोंडू बिसेन,
मु. पिंडकेपार, पो. पाथरी,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. व्ही. आकुलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
गोरेगांव, जि. गोंदिया.

श्री. डी. के. मिश्रा,
जनमाहिती अधिकारी तथा
मंडळ अधिकारी, मोहाडी,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.२.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांचेकडील दिनांक १७.९.२०१० च्या माहिती अधिकारखाली अर्जाप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, गोरेगांव यांचेकडे अर्ज सादर करुन गट नं. २५१/७ चा २००६-२००७ चा ७/१२ व ८ अ नकाशा या कागदपत्राची मागणी करुन सदरचा फेरफार श्री. भिमसेन कावसेन चंद्रसेनच्या नांवाचा

... २

पाहिजे आहे. म्हणून ७/१२ व ८ अ मागितले होते. तसेच अपीलकर्ता यांचे बंधू श्री. रुपचंद धोंडू बिसेन यांच्या मृत्युपत्राची झेरॉक्स प्रत त्यांनी मागितली होती. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.१०.२०१० रोजी अपीलकर्त्यास गट नं. २५१/७ चा ७/१२ चा उतारा व ८ अ इत्यादी कागदपत्रे व श्री. रुपचंद्र धोंडू बिसेन यांच्या मृत्युपत्राची प्रत तलाठी, मुढीपार यांनी दिनांक २८.१०.२०१० रोजी पुरविल्याचे दिसून येते. तथापी मिळालेल्या माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसीलदार, गोरेगांव यांचेकडे दिनांक १८.१०.२०१० रोजी दाखल केलेले दिसून येते. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही अपेक्षित माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्ता यांच्या दिनांक १७.९.२०१० चा माहितीचा अर्ज दिनांक २८.९.२०१० च्या पत्राने संबंधित जनमाहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, मोहाडी यांचेकडे नायब तहसीलदार यांचेकडून पाठविण्यात आला. तथापी सदरची माहिती मागण्याचा अर्ज मंडळ अधिकारी यांचेकडे दिनांक १२.१०.२०१० रोजी प्राप्त झालेला दिसून येतो. सदरचा अर्ज मंडळ अधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर मंडळ अधिकारी यांनी तलाठी, मुंडीपार यांचेकडून अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती देण्यासाठी दिनांक १९.१०.२०१० च्या पत्राने कळविले. त्याला अनुसरुन तलाठी, मुंडीपार यांनी दिनांक २८.१०.२०१० रोजी गट नं. २५१/७ चा ७/१२ चा उतारा व ८ अ ही कागदपत्रे उपलब्ध करुन दिली. तसेच मृत्युपत्र देखील उपलब्ध करुन दिले. मात्र यावर अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, सदरचा गट नं. २५१/७ चा ७/१२ चा उतारा व ८ अ हा भिमसेन काळसेन चंद्रसेन यांचे नावाने फेरफार करुन मिळणे आवश्यक आहे. तथापी प्रस्तुत प्रकरणी तहसीलदार, गोरेगांव यांनी आयोगापुढे नमुद केले की, महसूल दस्तऐवज गट नं. २५१/७ चा ७/१२ चा उतारा व ८ अ हा मय्यत श्री. रुपचंद धोंडू बिसेन यांचे रजिस्टर मृत्युपत्रानुसार श्री. हिरदीलाल धोंडू बिसेन यांचे नावावर फेरफार करण्यात आलेला आहे. कारण सदरच्या मृत्युपत्रात मय्यत श्री. रुपचंद्र धोंडू बिसेन यांनी त्यांची सर्व जमीन व मालमत्ता ही त्यांचे बंधू श्री. हिरदीलाल धोंडू बिसेन यांचे नावावर करण्याबाबत मृत्युपत्र दिले आहे. त्या मृत्युपत्राच्या आधारे महसुली दस्तऐवज ७/१२ व ८ अ मध्ये नोंद घेण्याची कार्यवाही संबंधित तलाठयाने केलेले आहे. मात्र अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, सदरचे मृत्युपत्र हे त्यांना मान्य नाही.

म्हणून मृत्युपत्राप्रमाणे झालेले फेरफार देखील त्यांना मान्य नाही. म्हणून याबाबत तहसीलदार यांनी त्यांची भूमिका स्पष्ट करतांना आयोगासमोर असेही सांगितले की, अपीलकर्ता यांना फेरफार संबंधी आक्षेप असल्यास त्यांनी उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांचेकडे अपील करणे आवश्यक आहे.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना तलाठी, मुंडीपार यांनी दिनांक २८.१०.२०१० रोजी महसूली दस्तऐवजाप्रमाणे गट नं. २५१/७ चा ७/१२ चा उतारा व ८ अ तसेच मय्यत श्री. रुपचंद्र धोंडू बिसेन यांच्या मृत्युपत्राची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र महसूली दस्तऐवज फेरफार नोंदी बाबत आक्षेप असल्यास त्या संबंधी अपीलकर्त्याने उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांचेकडे अपील करणे संयुक्तिक होईल. तथापी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५९५/२०१०.

श्री. सुशिल दशरथ ढेंगरे,
प्लॉट नं. १५, रोड नं. २,
विश्वकर्मा नगर, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सुशील वैद्य,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
कळमेश्वर, जि. नागपूर.

श्री. एम. एल. डुमरे,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी साजा क्र. २३, आष्टीकला,
ता. कळमेश्वर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.२.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, माहितीच्या अधिकाराखाली त्यांनी दिनांक २३.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, कळमेश्वर यांचे कार्यालयाकडे माहितीचा अर्ज करुन मौजा चिचभुवन सर्व्हे नं. ४/१ व ४/२ तसेच ६४/६५ आदेश दिनांक २७.७.१९६६ रोजीचे आदेशाची प्रत तसेच ६४/६५ आदेश

अन्वये भुसंपादन अधिकारी, नागपूर यांचे आदेश क्रमांक ३२/अ-६५ या काढलेल्या आदेशाची प्रत मागितली होती. तथापी त्यांना ३० दिवसांत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसीलदार, कळमेश्वर यांचेकडे दिनांक २७.१०.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतर तहसीलदार, कळमेश्वर यांनी दिनांक ३०.१०.२०१० च्या पत्राने त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी उपलब्ध करुन दिलेली माहिती आदेश क्रमांक ३३/अ-६५, दिनांक २४.५.१९६६ तसेच ३१/अ-६५ ही माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र आदेश क्रमांक ३२/अ(६५, दिनांक २७.७.१९६६ ची प्रत त्यांना उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

२. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार, कळमेश्वर यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही तलाठी साजा क्रमांक २३, आष्टीकला, ता. कळमेश्वर यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांचेकडून माहिती प्राप्त करण्यात आली. तलाठी यांचे कार्यालयाकडे जी माहिती उपलब्ध होती ती माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली. तथापी आदेश क्रमांक ३२/अ-६५, दिनांक २७.७.१९६६ सर्व्हे नं. ४/१, ४/२ बाबत काढण्यात आले होते. त्या आदेशाची प्रत मात्र तलाठी यांचेकडे उपलब्ध नसल्यामुळे ती माहिती देता आली नाही. याबाबत तहसीलदार यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्ताने मागितलेली माहिती ही भुसंपादन अधिकारी, नागपूर यांनी दिनांक २७.७.१९६६ रोजी सर्व्हे नं. ४/१, ४/२ आदेश ३२/अ-६५ काढलेलेआहे. सदरची माहिती ही सुमारे ४० वर्षापुर्वीची असल्यामुळे तलाठी कार्यालयाकडे किंवा तहसीलदार कार्यालयाकडे त्याची प्रत उपलब्ध झालेली नाही. तथापी याबाबत अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, भुसंपादन अधिकारी यांचेकडील दिनांक २७.७.१९६६ च्या आदेशान्वये गट क्रमांक ४/२ मध्ये दिनांक २६.३.२००४ रोजी फेरफार केल्याची नोंद ७/१२ च्या उताऱ्यावर केल्याचे दिसून येते. म्हणून सदरचा आदेश त्यांना प्राप्त होणे आवश्यक आहे. तहसीलदार यांनी सुनावणीत असेही नमुद केले की, दिनांक २६.३.२००४ रोजी तलाठयानी घेतलेला फेरफार यांचे कागद पाहिले असता दिनांक २७.६.१९६६ च्या आदेशाची प्रत दिसून येत नाही. तथापी सदरचा आदेश हा भुसंपादन अधिकारी, नागपूर यांचेकडील असल्यामुळे त्यांच्या कार्यालयात याबाबत पत्र व्यवहार करुन शोध घेण्यात येईल व भुसंपादन अधिकारी, नागपूर यांचे कार्यालयात हे आदेश मिळाल्यास अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात येईल असे तहसीलदार यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्त्याने मागितलेले आदेश हे भूसंपादन अधिकारी, नागपूर यांचे कार्यालयाकडील असल्यामुळे सदरच्या कार्यालयाशी तहसीलदार, कळमेश्वर यांनी पत्र व्यवहार करुन सदरच्या आदेशाची प्रत मिळविण्याचा प्रयत्न करावा व सदरच्या आदेशाची प्रत मिळाल्यास अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तिशः रजिस्टर पोस्टाने पाठवावे. तथापी सदरचा आदेश न मिळाल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/७४-७६/२.२.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६०६/२०१०.

श्री. जानबा शंकरराव मस्के,
६०३, हिवरी ले आऊट, पावर हाऊस जवळ,
नागपूर - ४४० ००८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१.

श्री. सुधाकर तांबे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपआयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.२.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ यांचेकडे अशोक अध्यापक विद्यालय, गणेशनगर, नागपूर येथून एप्रिल १९८६ मध्ये द्वितीय वर्ष परिक्षेला ३०

... २

विद्यार्थी बसले होते. त्या परिक्षार्थ्याचे रोल नंबर ११२१८९ पासून ११२१९८ असे एकूण ३० विद्यार्थी त्यापैकी कु. माधूरी मधुकरराव काळे, रोल नंबर ११२१८३ यांच्या निकालाची सध्या स्थितीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी सुनावणीचे दिवशी दिनांक ३.२.२०११ रोजी माहिती आयुक्तांकडे लेखी निवेदन सादर करुन गैरअर्जदार तथा उपायुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे श्री. सुधाकरराव तांबे यांचेशी चर्चा केली असता मला आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत खात्री दिली आहे. त्यामुळे माझे समाधान झाले आहे व याबाबत माझी सध्या कोणतीही तक्रार नाही म्हणून अपील मागे घेत आहे. तसेच पुढे मला संबंधित माहिती न मिळाल्यास मी रितसर तक्रार करील असे निवेदन सादर केल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/७७-७८/३.२.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६०४/२०१०.**

श्री. बुध्दम यादोराव मेश्राम,
द्वारा- कार्यालय जनसेवा जयलक्ष अन्याय भ्रष्टाचार निराकरण समिती महा.,
न्यु आशिर्वादनगर, गिरोला (कारधा), ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एम. लिल्लारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी, (पंचायत),
पंचायत समिती, साकोली.
जि. भंडारा.

श्री. एस. वाय. नंदेश्वर,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, चारगांव/सुंदरी, पो. परसोडी,
ता. साकोली, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.२.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.१२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चारगांव/सुंदरी, ता.साकोली यांचेकडे त्यांनी दिनांक १२.५.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली

... २

अर्ज सादर करुन ग्रामपंचायत अंतर्गत करण्यात आलेल्या कामाची व योजनांची एकूण १४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली होती. सदरची माहिती दिनांक १.१.२००५ ते आजपर्यंत अशा प्रकारची माहिती पुरविण्याबाबत त्यांनी विनंती केली होती. तसेच अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखाली मोडत असल्याचे त्यांनी नमुद केले. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांचेकडून दिनांक २३.५.२०१० च्या पत्राने असे कळविण्यात आले की, त्यांनी मागितलेली माहिती ही ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच सदर माहितीचे कागदपत्राचे झेरॉक्स काढण्यासाठी येणारा खर्च हा सुमारे १५०००/- रुपये लागणार आहे. तथापी झेरॉक्स काढण्यासाठी ग्रामपंचायतच्या अंदाजपत्रकात तरतूद नाही. तसेच ग्रामपंचायतची आर्थीक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे ग्रामपंचायतीस झेरॉक्स काढणे शक्य होणार नाही. म्हणून आपण ग्रामपंचायत कार्यालयात येऊन कागदपत्राचे अवलोकन करावे किंवा निरिक्षण करावे अशा प्रकारे ग्रामसेवक यांनी दिनांक २३.५.२०१० च्या पत्राने उत्तर दिल्याचे नमुद केले. अपीलकर्त्याने आयोगाचे असे निदर्शनास आणले की, दिलेल्या उत्तरामुळे त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दिनांक ३०.६.२०१० रोजी प्रथम अपील सादर केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.७.२०१० रोजी निर्गमित करण्यात आला व त्या निर्णयामध्ये १४ मुद्यांपैकी ५ मुद्यांची माहिती वगळून उर्वरित माहिती पुरविण्याबाबत जनमाहिती अधिकारी यांना सुचना देण्यात आल्या. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील त्यांना उर्वरित मुद्यांची माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसचिव, चारगांव/सुंदरी, ता. साकोली यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक १२.५.२०१० रोजी प्राप्त झाला. त्या अर्जास अनुसरुन अपीलकर्त्यास माहिती पुरविण्याच्या उद्देशाने ग्रामपंचायतची मासिक सभा दिनांक २२.५.२०१० रोजी घेण्यात आली. त्या सभेत अपीलकर्त्यास पुरवावयाच्या माहिती बाबतचा ठराव घेण्यात आला. त्या ठरावात असे नमुद करण्यात आले की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप हे फारमोठया प्रमाणात असल्यामुळे झेरॉक्स खर्च रुपये १५०००/- एवढा खर्च करण्यास ग्रामपंचायत सक्षम नाही. त्यामुळे आजच्या स्थितीत ग्रामपंचायत खर्च करु शकणार नाही. म्हणून अपीलकर्त्यास झेरॉक्स स्वरुपात विनामुल्य माहिती देण्या

... ३

ऐवजी त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या कागदपत्राचे निरिक्षण करण्यासाठी बोलवावे. अशा प्रकारचा ठराव झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २३.५.२०१० रोजी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे पत्र निर्गमित केले. दरम्यानचा काळात अपीलकर्ताने प्रथम अपील दिनांक ३०.६.२०१० रोजी दाखल केले. त्या अपीलाची सुनावणी होण्याच्या आधी अपीलकर्त्याने १४ मुद्यांच्या मागितलेल्या माहिती पैकी ५ मुद्यांचा माहितीचा खर्च हा कमी होता व ती माहिती सुमारे ३३ पेजेसची होती. सदरची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्याचे आजच्या सुनावणीत नमुद केले. मात्र उर्वरित ९ मुद्यांचे माहितीबाबत येणारा झेरॉक्स खर्च हा मोठयाप्रमाणात असल्यामुळे व ग्रामपंचायतीची आर्थीकस्थिती डबघाईस असल्यामुळे अपीलकर्ताने ग्रामपंचायत कार्यालयात येऊन संबंधित माहितीचे निरिक्षण करुन घेण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर संमती दिली.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, साकोली यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दिनांक ३०.६.२०१० रोजी दाखल झाले होते. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व सुनावणी नंतर दिनांक २१.६.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देऊन त्या निर्णयात अपीलकर्त्याने मागितलेल्या १४ मुद्यांपैकी ५ मुद्यांची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली आहे व उर्वरित मुद्यांची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी. मात्र आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, सध्यास्थितीत ग्रामपंचायत, चारगांव/सुंदरी या ग्रामपंचायतीची आर्थिकस्थिती अत्यंत डबघाईस असल्यामुळे अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा खर्च सुमारे १५०००/- रुपये अपेक्षित आहे व सदरचा खर्च ग्रामपंचायतीस पेलण्याची आजची स्थिती नाही. म्हणून अशा परिस्थितीत अपीलकर्त्याने ग्रामपंचायतीमध्ये उपस्थित राहून उपलब्ध असलेल्या कागदपत्राचे अवलोकन करणे योग्य होईल.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ताने माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन एकूण १४

मुद्यांची माहिती मागितलेली आहे. त्यापैकी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी ५ मुद्यांची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र राहिलेल्या ९ मुद्यांची माहितीचा झेरॉक्स खर्च हा सुमारे १५०००/- रुपये येणार असल्यामुळे हा खर्च ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती पेलण्यासारखी नाही. म्हणून अपीलकर्त्याने ग्रामपंचायत कार्यालयामध्ये कार्यालयीन कामकाजाच्या कोणत्याही दिवशी व कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसेवकास उपस्थिती बाबत पुर्व सुचना देऊन कागदपत्राचे निरिक्षणासाठी हजर राहून त्यांना पाहिजे असलेल्या माहितीचे निरिक्षण करुन घेणे योग्य होईल आणि कागदपत्राचे निरिक्षण करण्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे आवश्यक त्या रेकॉर्डचे निरिक्षण करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात हजर राहून निरिक्षण करुन घ्यावे. तथापी निरिक्षणासाठी ज्या दिवशी ग्रामपंचायत कार्यालयात हजर राहावयाचे आहे त्याबाबतची पुर्व सुचना ग्रामसेवक यांना देण्यात यावी व अपीलकर्ता यांना रेकॉर्ड निरिक्षणाची पुर्व सुचना दिल्यानंतर ग्रामसेवक यांनी त्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहावे व अपीलकर्त्यास आवश्यक तो रेकॉर्ड निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावा तसेच अपीलकर्त्यास आवश्यक असलेल्या ५० पेजेस पर्यंतची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/७९-८२/३.२.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६०९/२०१०.**

श्री. एन. सी. गौतम,
७, श्रीरामनगर, मानेवाडा रिंग रोड,
नागपूर - ४४० ०३४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

श्री. सुनिल कोरडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक, (आस्थापना)
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.२.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगासमोर असे सांगितले की, त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली दिनांक ३०.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक (आस्थापना), जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे अर्ज सादर करुन मंडळ अधिकारी जेष्ठता यादी दुरुस्तीबाबत त्यांचा दिनांक ३.४.२००२, दिनांक १८.५.२००२, दिनांक १८.७.२००२ रोजी केलेल्या अर्जावर काय कार्यवाही केली याची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना

... २

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही. त्यानंतर दिनांक ९.८.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना असे कळविले की, माहितीचे अधिकारांतर्गत मागविलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे माहिती अधिकार कायद्यांतर्गत देता येत नाही. तथापी आपणास पाहिजे असलेली माहिती संबंधाने आपण जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. म्हणून संबंधित कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखावरुन माहिती देता येईल असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. त्यानंतर अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे हजर झाले. तथापी त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी होऊन प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.९.२०१० रोजी देण्यात आला. प्रथम अपीलात देखील अपीलकर्त्यास माहिती १५ दिवसात देण्यात यावी असे आदेश देण्यात आलेले आहेत. तरी देखील अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्त्यांनी आजच्या सुनावणीत आयोगाचे निदर्शनास आणून दिले व म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक (आस्थापना) यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्ता यांचा दिनांक ३०.६.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे शाखेत दिनांक १४.७.२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन दिनांक ९.८.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास असे कळविले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे माहिती अधिकार कायद्यांतर्गत देता येणार नाही. तथापी अपीलकर्त्याने त्यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीत आयोगासमोर असेही नमुद केले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती मंडळ अधिकारी जेष्ठता यादी दुरुस्ती बाबत तसेच अर्जदाराचे नांव चुकीच्या अनुक्रमांकावर टाकून जेष्ठता कमी केल्याबाबतच्या संबंधात आहे. मात्र अपीलकर्त्याने अर्जात नमुद केलेल्या त्यांचे अर्ज दिनांक ३.४.२००२, दिनांक १८.५.२००२ व दिनांक १८.७.२००२ या अर्जांचा त्यांच्या कार्यालयात शोध घेण्यात आला. तथापी सदरचे अर्ज त्यांचे कार्यालयात अद्यापपर्यंत उपलब्ध झाले नाही. त्या अर्जाचा अद्याप शोध सुरु आहे. ते अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांचेवर केलेली कार्यवाही अपीलकर्त्यास पुरविण्यात येईल. प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले होते.

त्याचा निर्णय दिनांक २०.९.२०१० रोजी देण्यात आला. त्या निर्णयामध्ये देखील अपीलकर्त्यास १५ दिवसांत माहिती देण्याचे आदेश होते. त्यानुसार अपीलकर्त्याचे तिन्ही अर्ज शोधण्याची कार्यवाही सुरु आहे. मात्र अद्याप ते अर्ज उपलब्ध झाले नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता आणि जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संबंधात कोणतीही प्रश्नार्थक माहिती त्यांनी मागितलेली दिसून येत नाही. अपीलकर्त्याने त्यांचा दिनांक ३.४.२००२, दिनांक १८.५.२००२ व दिनांक १८.७.२००२ रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यावर जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपीलकर्त्याचे तिन्ही अर्ज अद्यापपर्यंत शोध घेऊन त्यांचे कार्यालयात प्राप्त झाले नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याचे तिन्ही अर्जाचा कसून शोध घेऊन त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ताचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३.४.२००२, दिनांक १८.५.२००२ व दिनांक १८.७.२००२ रोजीच्या अर्जाचा कसून शोध घेण्यासाठी एक पथक नेमावे व १५ दिवसात अर्जाचा शोध घ्यावा व अर्ज उपलब्ध झाल्यास त्यावर केलेली कार्यवाही अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापी अर्ज उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/८३-८५/४.२.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६०८/२०१०.

श्री. केशव गोपाळा राऊत,
मु. पो. नगरधन,
ता. रामटेक, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. राजेश बागडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, रामटेक, जि. नागपूर.

श्री. एम. बी. चरपे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, नगरधन,
ता. रामटेक, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.२.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, नगरधन, ता. रामटेक यांचेकडे त्यांनी माहितीचा अधिकाराखाली दिनांक ९.३.२०१० रोजी अर्ज सादर करुन सुर्यलक्ष्मी कॉटन मिल बाबत ३ मुद्यांवरती माहिती मागितलेली होती. तथापी जनमाहिती अधिकारी यांचेकडून

... २

त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, रामटेक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, नगरधन, ता. रामटेक यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दिनांक ९.३.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयात प्राप्त झाला. तथापी सचिव श्री. एम. बी. चरपे हे दिनांक १५.३.२०१० ते दिनांक १६.५.२०१० पर्यंत अर्जित रजेवर गेले. त्यांच्या रजेच्या कालावधीत त्यांचा पदभार श्री. निस्ताने या ग्रामसचिवाकडे देण्यात आला होता. तथापी श्री. चरपे हे रजेवर गेल्यामुळे श्री. निस्ताने यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसात माहिती देण्याची कार्यवाही केलेली नाही. श्री. चरपे हे रजेवरुन परत येऊन दिनांक १७.५.२०१० रोजी हजर झाले. ते रजेवरुन परत आल्यानंतर अपीलकर्त्यास त्यांनी दिनांक १६.९.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली होती. तथापी अपीलकर्त्याने सदरची माहिती घेण्यास नकार दिला. त्या नकाराबाबत ग्रामपंचायतच्या शिपायाने अहवाल दिलेला आहे तो अहवाल श्री. चरपे यांनी आयोगासमोर दाखविला.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, रामटेक यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील दिनांक ५.८.२०१० रोजी दाखल झाले त्याची सुनावणी घेण्यात आली व सुनावणी नंतर प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.९.२०१० रोजी देण्यात आला व त्या निर्णयात अपीलकर्त्यास ३ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. त्यानुसार जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी दिनांक १६.९.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र सदरची माहिती अपीलकर्त्याने घेण्यास नकार दिला असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १६.९.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिली होती. मात्र अपीलकर्त्याने ती माहिती स्विकारण्यास नकार दिल्याचे

ग्रामपंचायत शिपायांचा अहवालावरुन दिसून येते. तथापी सदरची माहिती आज आयोगासमोर अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली ती माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकारुन त्यांची पोच दिली. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी ही माहिती सुमारे ५ महिन्याचे विलंबाने उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. या कालावधीत श्री. एम. बी. चरपे हे रजेवर गेल्यामुळे श्री. निस्ताने यांचेकडे त्यांच्या रजेच्या कालावधीचा पदभार होता. म्हणून सदरची माहिती पुरविण्यास ५ महिने विलंब कां झाला याबाबतचा खुलासा श्री. एम. बी. चरपे व श्री. निस्ताने यांनी आयोगाकडे हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात सादर करावा. अन्यथा त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० प्रमाणे शास्ती लादण्यात येईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत श्री. एम. बी. चरपे व श्री. निस्ताने यांनी अपीलकर्त्यास माहिती पुरविण्यास ५ महिने कां विलंब केला त्या विलंबाबद्यल सविस्तर खुलासा करावा. अन्यथा त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० प्रमाणे योग्य ती शास्तीची कार्यवाही करण्यात येईल.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/८६-८८/४.२.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६०७/२०१०.

श्री. शक्तीरंजन घोष,
माता मंदीर जवळ, गोरेवाडा स्लम वस्ती,
कोड क्र. ९०५, भरतवाडा रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जी. डी. जांभूळकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प संचालक, (स्लम)
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. व्ही. डब्ल्यू. गभणे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता, लोककर्म विभाग,
मंगळवारी झोन क्र. १०,
महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.२.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, लोककर्म विभाग, झोन क्रमांक १०, मंगळवारी, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे उत्तर गोरेवाडा, स्लम कोड क्र. ९०५

... २

मध्ये लोककर्म विभाग, मंगळवारी झोन क्र. १० द्वारा केलेल्या कामाची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता हे आयोगाच्या कार्यालयात आज दिनांक ४.२.२०११ रोजी उपस्थित झाले आणि त्यांना माहिती मिळाली असून ते अपील मागे घेत असल्याचे नमुद करुन त्यांनी रोजनाम्यावर सही केली म्हणून सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/८९-९०/४.२.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६१३/२०१०.**

श्री. विवेक केशवराव पाटील
शनिवारी, इमामवाडा रोड,
बाबासाहेबांच्या पुतळयाजवळ, नागपूर - ४४० ०१८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक ३,
प्रशासकीय इमारत क्रमांक २, नागपूर.

श्री. आर. डी. आत्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी/सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक ३,
प्रशासकीय इमारत क्रमांक २, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.२.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ५.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी /सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक ३, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन फिरोज गांधी विद्यालय, धम्मदिपनगर, नागपूर येथील शिक्षकांनी जाती वैधता प्रमाणपत्र प्रस्तावातील जोडलेल्या कागदपत्रांची मागणी केलेली दिसून येते. ज्या शिक्षकांनी जाती वैधता प्रमाणपत्र प्रस्ताव सादर केलेला आहे त्या

... २

शिक्षकांची नावे पुढील प्रमाणे दिसून येतात. श्री. एस. डी. देऊळकर, श्री. एस. एस. मने, श्री. जे. व्ही. ठोंबरे. तथापी अपीलकर्त्यास माहिती अधिकारी यांनी दिनांक १८.११.२०१० रोजीच्या पत्राने माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसते. मात्र तत्पुर्वीच अपीलकर्त्याला विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. तथापी प्रथम अपीलानंतरही अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

३. अपीलकर्ता हे सुनावणीस उशिरा उपस्थित झाले त्यांचे सोबत एक त्रयस्थ व्यक्ती देखील आली होती. त्या त्रयस्थ व्यक्तीने सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळणे जरुरीचे आहे. म्हणजे अपीलकर्त्यापेक्षा त्रयस्थ व्यक्ती ती माहिती मिळविण्यास रस दाखवित होती असे सुनावणीच्या वेळी आयोगाच्या निदर्शनास आले.

४. जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांनी आयोगासमोर सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा दिनांक ५.८.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याने ज्या ३ शिक्षकांची माहिती मागितलेली होती. त्यांनी त्यांचे कार्यालयाकडे जाती वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्याचा कोणताही पुरावा जोडलेला नव्हता. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २१.८.२०१० च्या पत्राने मागितलेल्या माहिती संबंधी पुरावा जोडणेबाबत कळविले. त्याला अनुसरुन दिनांक ८.९.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्याने पुरावा सादर केला. सदरचा पुरावा प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थ व्यक्तीची संबंधित असल्यामुळे माहिती देणेबाबत तिन्ही शिक्षकांना दिनांक २३.९.२०१० च्या पत्राने त्यांची संमती मागितली. मात्र तिन्ही शिक्षकांनी दिनांक १४.१०.२०१० च्या पत्राने असे कळविले की, सदरची माहिती त्यांची वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे अपीलकर्त्यास ती माहिती देण्यात येऊ नये. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असेही सांगितले की, त्यांच्या कार्यालयाकडे जाती वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी सुमारे ३०००० प्रस्ताव प्राप्त होतात. त्यामुळे अशा प्रस्तावांच्या कागदपत्रांची

माहिती उपलब्ध करुन देण्यास कार्यालयाचा फार मोठा वेळ खर्च होतो. तसेच कार्यालयीन कर्मचारी सुध्दा माहिती काढण्यासाठी गुंतवावे लागतात व त्याचा विपरीत परिणाम जाती वैधता प्रमाणपत्र देण्याच्या कार्यवाहीवर होतो. तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणी त्रयस्थ पक्षानी त्यांची वैयक्तिक स्वरुपाची माहिती देण्याबाबत हरकत असल्यामुळे अपीलकर्त्यास सदरची माहिती देता येत नाही असे दिनांक १८.११.२०१० रोजी कळविले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सागितले.

५. अपीलकर्ता आणि जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे एकूण घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १८.११.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध न करुन देण्याबाबत घेतलेला निर्णय योग्य दिसून येतो. कारण त्यामध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसत नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांच्या निर्णयात फेरबदल करण्याची आवश्यकता दिसत नाही. म्हणून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६१५/२०१०.**

श्री. पँथर प्रकाश बन्सोड,
सचिव, सिव्हील-हयुमन राईटस् प्रोटेक्शन असो.,
१८०, ऊंटखाना, डॉ. भदंत आनंद कौसल्यायन मार्ग,
नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. प्रदीप एस. आठवले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
भालेराव सायन्स कॉलेज,
ता. सावनेर, जि. नागपूर.

श्री. मिलींद प्रेमदास बरबटे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्राध्यापक,
भालेराव सायन्स कॉलेज,
ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.२.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ५.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २४.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, भालेराव विज्ञान महाविद्यालय, सावनेर याचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन

माहितीच्या अधिकाराची अंमलबजावणीच्या संबंधाने भालेराव विज्ञान महाविद्यालयानी केलेल्या कार्यवाहीबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्राचार्याकडे दिनांक २०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही व निकालही दिलेला नाही. त्यानंतर मात्र जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ३.१.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी सदरची माहिती सुमारे १८० दिवस उशिराने उपलब्ध करुन दिली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार त्यांचेवर शास्तीची कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

२. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दिनांक २४.६.२०१० चा अर्ज त्यांचेकडे दिनांक ५.१.२०११ रोजी महाविद्यालयाकडून प्राप्त झाला. सदरचा अर्ज उशिरा त्यांचेकडे प्राप्त झाला. त्याबाबत त्यांनी असे नमुद केले की, सदरचा अर्ज महाविद्यालयाने त्यांचेकडे उशिराने दिला. तथापी सदरचा अर्ज हा संबंधित लिपिकाकडे किंवा प्राचार्यांकडे कां ठेवून घेण्यात आला याची विचारणा केली असता त्यांनी असे नमुद केले की, माहिती अधिकार हा कायदा त्यांचे महाविद्यालयास लागू नाही असा त्यांचा समज झाला. म्हणून त्या अर्जावर ३० दिवसांत कार्यवाही झालेली नाही. मात्र डिसेंबर, २०१० मध्ये आयोगाने एका अपील प्रकरणात माहितीचा अधिकार त्यांच्या महाविद्यालयास लागू आहे असा निकाल दिल्यामुळे अपीलकर्त्यास त्यांच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन दिनांक १३.१.२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली. मात्र १८० दिवस उशिराने ती माहिती प्राप्त झाली असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद करुन संबंधिता विरुध्द शास्तीची कार्यवाही करावी असे प्रतीपादन केले.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, त्यांचेकडे अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल झालेले होते. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ त्यांच्या महाविद्यालयास लागू नाही असा त्यांचा समज असल्यामुळे त्यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिला नाही. त्यानंतर माहिती अधिकार

हा त्यांच्या महाविद्यालयास लागू आहे याबाबतचा मा. आयुक्तांचा आदेश त्यांचे कार्यालयात माहे डिसेंबर २०१० मध्ये प्राप्त झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १३.१.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिल्याचे सुनावणीत नमुद केले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास त्यांच्या दिनांक २४.६.२०१० च्या माहिती अर्जावर माहिती ३० दिवसाचे मुदतीत जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्यानतर सदरची माहिती दिनांक १३.१.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास सुमारे १८० दिवस विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून माहिती देण्याच्या विलंबास जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. त्यांचेकडे अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज हा महाविद्यालयाकडून दिनांक ५.१.२०११ रोजी म्हणजे उशिराने प्राप्त झाला असे त्यांनी नमुद केले म्हणून त्यांचेकडे अर्ज उशिराने कां प्राप्त झाला याचा सविस्तर खुलासा त्यांनी आयोगाकडे सादर करावा. त्यांचेकडे अर्ज विलंबाने देण्यास कोण जबाबदार आहेत त्याचा खुलासा १५ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. अन्यथा त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये १००००/- शास्ती लादणेबाबत विचार करण्यात येईल. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील प्रथम अपील दाखल झाल्यानंतर त्याची सुनावणी घेऊन ३० दिवसाचे मुदतीत अपीलकर्त्यास कां निर्णय दिला नाही याचाही खुलासा त्यांनी आयोगापुढे १५ दिवसात सादर करावा. अन्यथा त्यांचे विरुध्दही योग्य ती कार्यवाही करण्याचा विचारणा करण्यात येईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सुमारे १८० दिवस विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली आहे. अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांचेकडे विलंबाने हस्तांतरण करण्यास कोण जबाबदार आहे त्याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) प्रमाणे रुपये १००००/- शास्ती लादणे बाबतची कार्यवाही करण्यात येईल.

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य यांनी देखील प्रथम अपीलाचा निर्णय ३० दिवसाचे मुदतीत कां घेतला नाही याचा खुलासा आयोगाकडे हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत सादर करावा. अन्यथा त्यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/९४-९७/५.२.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६१४/२०१०.

श्री. मुश्ताक अहमद वल्द अब्दुल जब्बार,
मोमीनपूरा पोलीस चौकी जवळ, नागपूर - ४४० ०१८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विजयकुमार गोस्वामी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. आर. एस. भूते,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.२.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ५.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगा पुढे असे नमुद केले की, दिनांक २४.८.२०१० रोजी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे मौजा भानखेडा, वार्ड नं. ५२, घर क्रमांक ५४, घर मालक श्रीमती सायराबी ज. अब्दुल मजीद यांनी दिनांक

... २

२.७.१९९१ रोजी नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर कडून घराचे रेखाचित्र मंजूर केले. रेखाचित्र क्र. ८५/इ.पी.आर/५२ आहे. ते रेखाचित्र मंजूर करुन घेते वेळी स्लम विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेते होते काय व घेतले असल्यास त्यांना नाहरकत प्रमाणपत्राची सत्यप्रत मिळण्याची मागणी केली होती. मात्र त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २२.९.२०१० रोजीच्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेली माहितीबाबतची नस्ती दिनांक २.७.१९९१ ची असल्यामुळे त्या नस्तीचा अभिलेख विभागात शोध घेणे सुरु असून त्यासाठी १५ दिवसांचा कालावधी लागेल असे कळविले होते. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ५.१०.२०१० रोजी अपीलकर्त्याला पुन्हा असे कळविले की, आपण मागितलेल्या नस्तीचा शोध अभिलेख कक्षात घेण्यात आला. परंतु ती नस्ती अभिलेख विभागात आढळली नाही. म्हणून आपणास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यांना कळविण्यात आले. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील दिनांक ६.१०.२०१० रोजी सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दाखल केले. या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व अपीलाचा निर्णय दिनांक १५.१०.२०१० रोजी देण्यात आला व त्या निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीबाबतचे नस्तीचा शोध घेऊन ७ दिवसांत अपीलकर्त्यास माहिती द्यावी. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे देखील त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही असे अपीलकर्त्यांनी सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता यांनी आयोगा समोर असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक २४.८.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २७.८.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही दिनांक २.७.१९९१ च्या नस्तीबाबत होती. म्हणून सदरची नस्ती ही सुमारे २० वर्षापुर्वीची असल्यामुळे त्यांचे कार्यालयात त्या नस्तीचा शोध घेण्याचे काम सुरु केले व शोध घेण्यासाठी १५ दिवसाचा कालावधी लागेल असे अपीलकर्त्यास दिनांक २२.९.२०१० च्या पत्राने कळविण्यात आले. त्यानंतर अभिलेख विभागात या नस्तीचा कसून शोध घेण्यात आला. मात्र सदरची नस्ती उपलब्ध झाली नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकर्त्यास दिनांक ५.१०.२०१० च्या पत्राने कळविण्यात आलेले आहे. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आणखी असे सांगितले की, प्रथम अपीलाचे निर्णयाला अनुसरुन देखील त्यांनी पुन्हा या नस्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यानंतर देखील या नस्तीचा शोध झाला नाही. तथापी

... ३

अपीलकर्त्याने महानगरपालिकेच्या स्लम विभागाकडे देखील ना हरकत प्रमाणपत्राची माहिती मागितलेली आहे असे दिसते. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी महानगरपालिकेच्या स्लम विभागाकडे त्यांनी या प्रकरणी नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे काय याबाबतचा पत्र व्यवहार करुन शोध घेण्याचा प्रयत्न करणे योग्य हाईल व स्लम विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र दिले असल्यास ते अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतःमंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेले नाहरकत प्रमाणपत्रा बद्यलची माहिती महानगरपालिकेचे स्लम विभागाकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी व त्या विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यास अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावे. तथापी स्लम विभागाकडूनही ना हरकत प्रमाणपत्र उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य किंवा व्यक्तिशः रजिस्टर पोस्टाने कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/९८-१००/५.२.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६२५/२०१०.**

श्री. अविनाश श्यामराव रामटेके,
आंबेडकर वार्ड, वरठी, ता. मोहाडी,
जि. भंडारा - ४४१ ९०५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय आयुक्त (सा. प्र.),
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
औद्योगिक जिल्हा समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.२.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. निशाणकर, तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, त्यांनी दिनांक १३.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष, औद्योगिक जिल्हा समिती, जिल्हाधिकारी भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन महाराष्ट्र शासनाकडील उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक स्थलोरो-२००८/प्र.क्र.९३/उद्योग-

... २

६, दिनांक १७.११.२००८ नुसार औद्योगिक उपक्रमामध्ये किमान ८०% स्थानिक उमेदवारांना नौकरीमध्ये प्राधान्य देण्याबाबत निर्णय झालेला आहे. त्या निर्णयाला अनुसरुन सनफ्लॅग आर्यन ॲण्ड स्टिल कंपनी प्रा.लि., मौजा वरठी, ता. मोहाडी, जि. भंडारा येथील कंपनीत सन २००५ पासून भरती करण्यात आली त्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते व माहितीचा कालावधी हा २००५ ते २०१० पर्यंत असा नमुद केलेला आहे. तथापी सदरच्या माहितीचा अर्ज हा जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांचेकडून दिनांक १५.९.२०१० च्या पत्राने शासकीय माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, भंडारा यांचे कार्यालयाकडे त्यांचेशी ही माहिती संबंधित असल्यामुळे पाठविलेला दिसून येतो. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, भंडारा यांनी त्यांचेकडील दिनांक ६.१०.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी त्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे दिनांक २९.१०.२०१० रोजी सादर केलेले दिसून येते. आजच्या सुनावणीस विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयाकडून श्री. निशाणकर, तहसीलदार हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील हे विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेशी संबंधित नाही. म्हणून अपीलकर्ता यांना त्यांनी दिनांक ३.११.२०१० च्या पत्राने अपील अर्ज परत करुन अपील अर्ज योग्य त्या प्राधिकरणाकडे सादर करण्यास सुचना दिल्याचे दिसून येतात.

३. म्हणून प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याला जनमाहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, भंडारा यांनी दिनांक ६.१०.२०१० च्या पत्राने जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहिती बाबत त्यांचे समाधान झाले नसल्यामुळे त्या माहितीच्या संबंधात प्रथम अपील हे सहाय्यक कामगार आयुक्त, भंडारा यांचे कार्यालयाकडे दाखल करणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सहाय्यक कामगार आयुक्त, भंडारा यांचेकडे दाखल करावे. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर त्यांचे समाधान झाले नाही तर आयोगाकडे त्यांना द्वितीय अपील दाखल करण्याची मुभा आहे. या सुचनासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सहाय्यक कामगार आयुक्त, भंडारा यांचे कार्यालयाकडे दाखल करावे व त्यांच्या निर्णयानंतर आवश्यकता असल्यास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे. या निर्देशासह अपील खारीज करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत सहाय्यक कामगार आयुक्त, भंडारा यांचेकडे माहितीकरिता स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६२४/२०१०.**

श्री. सुरेश रामाजी गारोडे,
गौतम नगर, बाजपेई वार्ड,
गोयल सॉ मिलजवळ, ता. जि. गोंदिया - ४४१ ६०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. बिहारीलाल लिल्हारे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
हरिदास भवरजार हायस्कूल,
गणखैरा, ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.२.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. एन. ए. तुरकर, पर्यवेक्षक हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगासमोर असे सांगितले की, त्यांनी दिनांक २६.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हरिदास भवरजार हायस्कूल, गणखैरा, ता. गोरेगांव, जि. गोंदिया यांचेकडे

... २



माहितीचा अधिकाराखाली अर्ज करुन एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अर्जाचे अनुषंगाने त्यांना मुद्या क्रमांक १, ३, ४, ५ व ७ या मुद्यांची माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनाक २५.९.२०१० च्या पत्राने प्राप्त झाली. मात्र मुद्या क्रमांक २, ६ व ७ मधील संस्थेच्या ठरावाची प्रत मिळालेली नाही व मुद्या क्रमांक ४ मधील मुलाखतीच्या वेळी उपस्थित उमेदवारांची यादी मिळालेली नाही असे अपीलकर्त्याने नमुद केले. अपीलकर्त्यास अपूर्ण माहिती मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १.१०.२०१० रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे दाखल केले. त्या अपीलाचा निर्णय दिनांक १९.१०.२०१० रोजी देण्यात आला व त्यामध्ये शाळेकडे माहिती उपलब्ध असल्यास पुरविण्यात यावी असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिला. मात्र त्यानंतरही पूर्ण माहिती अपीलकर्त्यास मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३.	जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन मुद्येनिहाय माहिती दिनांक २५.९.२०१० च्या पत्राने शाळेकडे जी माहिती उपलब्ध होती ती माहिती पाठविलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र वर नमुद केल्याप्रमाणे काही मुद्यांची माहिती अपीलकर्त्यास मिळाली नाही असे अपीलकर्त्याने आयोगाचे निदर्शनास आणले. जनमाहिती अधिकारी यांनी आणखी असेही सांगितले की, प्रथम अपीलाचे निर्णयानंतर अपीलकर्त्यास पुन्हा दिनांक २२.१०.२०१० च्या पत्राने त्यांचे कार्यालयात जी माहिती उपलब्ध नाही ती पुरविण्यास ते असमर्थ आहेत असे नमुद करुन अपीलकर्त्यास कळविल्याचे सांगितले. तथापी याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांना मुद्या क्रमांक २, ४ ची माहिती आणि मुद्या क्रमांक ७ मधील ठरावाची प्रत ही माहिती उपलब्ध नाही. म्हणून प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्यास माहिती अर्जातील मुद्या क्रमांक २, ४ व ७ मधील ठरावाची प्रत उपलब्ध नाही हे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३



**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक २, ४ व ७ मधील ठरावाची प्रत शाळेकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६२३/२०१०.

श्री. रमेश ज्ञानेश्वर भांदककर,
जुनी मंगळवारी, गुजरी चौक,
श्री. पंचमजी खोत यांचे घरी, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.२.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे सुनावणीत गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणत्याही प्रकारचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. आशीष वानखेडे, नायब तहसीलदार हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी हे मा. राष्ट्रपती यांचे दौरा कार्यक्रमात व्यस्त असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाही असे श्री. वानखेडे यांनी सांगितले.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, कामठी यांचेकडे दिनांक २६.३.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन न्यायालयीन दिवाणी दावा क्रमांक २९/२००५ मध्ये झालेल्या आदेशाप्रमाणे मौजा पांढुर्णा येथील शेत नं. ७९ व ८ च्या केलेल्या फाडणीची व त्यासंबंधीत

... २



मामला क्र. रा. मा. क्र./४३ एस.आर.व्ही./२००७-२००८ मध्ये तहसीलदार, कामठी यांनी पास केलेल्या आदेशाची प्रत मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी, नागपूर यांचेकडे दिनांक २४.६.२०१० रोजी सादर केल्याचे दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.७.२०१० रोजी देण्यात येऊन त्यामध्ये असे नमुद केलेले आहे की, अपीलार्थीने मागणी केलेल्या आदेशाचा कसून शोध घेऊन त्या आदेशाची प्रत अपीलकर्त्यास १५ दिवसांत पुरविण्यात यावी असे नमुद केलेले दिसून येते.

३.	जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, कामठी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याच्या माहिती मागण्याच्या दिनांक २६.३.२०१० च्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक २२.४.२०१० च्या पत्राने उत्तर पाठवून असे कळविले आहे की, आपल्या अर्जात नमुद केलेल्या माहिती प्रमाणे आपल्याला राजस्व मामला क्रमांक ४३/एस.आर.व्ही./०७-०८ च्या प्रकरणाचा शोध सुरु असून प्रकरणाचा शोध लागताच आपणास कळविण्यात येईल. तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा समोर असेही सांगितले की, अपीलकर्त्याने मागणी केलेल्या माहितीचे प्रकरण सन २००७-०८ मध्ये तहसील कार्यालय, कामठी येथे प्राप्त झाले होते. त्याची नोंद तहसील, कार्यालयातील महसूली प्रकरणाचे नोंदवहीत एस.आर.व्ही. ४३ या शिर्षाखाली करण्यात आलेली आहे. मात्र सदरच्या प्रकरणाची पाहणी केली असता ते प्रकरण अभिलेखागारात आता उपलब्ध असलेले दिसून येत नाही. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील या प्रकरणाचा शोध घेण्यात आला. मात्र अद्यापही ते प्रकरण मिळाले नाही. अपीलकर्त्याचे हे प्रकरण ज्या वेळेला प्राप्त झाले त्यावेळेला श्री. राहांगडाले प्रस्तुतकार-१ यांचे पदभारामध्ये हे प्रकरण होते. तथापी त्यांची आता बदली झाली असल्यामुळे त्यांनी बदली होतांना जो पदभार दिलेला आहे त्या पदभारामध्ये या प्रकरणाची नोंद दिसून येत नाही. त्यामुळे श्री. राहांगडाले यांना त्यांचे कार्यालयाने दिनांक २४.९.२०१० च्या पत्राने कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. त्या

नोटीसमध्ये त्यांना या प्रकरणाबाबत विचारणा केलेली आहे. तथापी त्यांनी या नोटीसला अद्याप उत्तर दिलेले नाही. म्हणून त्यांना पुन्हा त्यांच्या कार्यालयात बोलावून त्यांनी प्रकरणाचा शोध घेण्याची कार्यवाही करुन प्रकरण प्राप्त झाल्यास अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल असे विद्यमान जनमाहिती

... ३



अधिकारी यांनी सांगितले. तथापी प्रकरणाचा शोध घेऊनही प्रकरण उपलब्ध न झाल्यास अपीलकर्त्यास पुन्हा नव्याने अर्ज करण्याबाबत सुचित करण्यात येईल आणि त्यांच्या अर्जावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असेही विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

४. प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे प्रकरण तत्कालीन प्रस्तुतकार-१ श्री. राहांगडाले यांचेकडे होते त्याची नोंद महसूली प्रकरणाच्या नोंदवहीत झालेली दिसून येते. तथापी हे प्रकरणे आता दिसून येत नाही म्हणून विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी श्री. राहांगडाले यांना पुन्हा त्यांचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळवून या प्रकरणाचा कसून शोध घ्यावा. तथापी प्रकरण प्राप्त न झाल्यास प्रकरण गहाळ होण्यास जबाबदार असणाऱ्या व्यक्ति विरुध्द योग्य ती कार्यवाही नायब तहसीलदार, कामठी यांनी प्रस्तावित करणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी तत्कालीन प्रस्तुतकार-१ श्री. राहांगडाले यांना त्यांचे कार्यालयामध्ये बोलावून त्या प्रकरणाचा कसून शोध घ्यावा व प्रकरण मिळाल्यानंतर अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापी प्रकरण उपलब्ध न झाल्यास हे प्रकरण गहाळ होण्यास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यां विरुध्द योग्य ती कार्यवाही सक्षम अधिकाऱ्याकडे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी प्रस्तावित करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१०७-१०९/७.२.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६२६/२०१०.

श्री. राजन अनंतराव मोटघरे,
२१७, नार्थ बाजार रोड, गोकुलपेठ,
नागपूर - ४४० ०१०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नगर भुमापन अधिकारी क्रमांक २,
नागपूर.

श्री. जे. एम. बेंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर भुमापन अधिकारी क्रमांक २,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.२.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ८.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक २८.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर भुमापन अधिकारी, नागपूर यांचेकडे मौजा बाबुलखेडा, ख. नं. ६८/१ फेरफार न झाल्याबाबतची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.१.२०११ ला मागणी केलेली माहिती विनामुल्य मिळाली आहे. तरी मी

... २



दिलेला अर्ज नस्तीबध्द करण्यास हरकत नाही. यानंतर याबाबत माझी कोणतीही उजर हरकत राहणार नाही. असे लेखी निवेदन नगर भूमापन अधिकारी क्रमांक २, नागपूर यांचेकडे दिलेले असून त्यांनी आयोगाकडे सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/११०-१११/८.२.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६३४/२०१०.

श्री. रामकृष्ण कमलाकर मोहरील,
ग्रीन रेसीडेन्सी कॉलनी, पाटील नगर,
वर्धा - ४४२ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ऊर्जा-२,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

श्री. ल. ना. सदाफुले,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.२.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. बी. शिंदे, सहाय्यक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगासमोर असे सांगितले की, त्यांनी दिनांक २२.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ऊर्जा-२, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती

अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांचे पत्र दिनांक ८.२.२०१० अन्वये मागणी केलेल्या पत्राचे उत्तराबाबतचे संबंधाने दिनांक १५.६.२००९ च्या नंतरच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत झालेला शासन निर्णयाची प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापी त्याना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १६.२.२००९ च्या शासन निर्णयाची प्रत प्राप्त झाली. मात्र दिनांक १५.६.२००९ नंतरच्या शासन निर्णयाची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १.५.२०१० रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना दिनांक १५.६.२००९ नंतरच्या शासन निर्णय त्यांना प्राप्त झाले नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने अर्जात मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला व तो शोध घेतल्यानंतर त्यांचे असे निदर्शनास आले की, विज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनाबाबत शासन निर्णय दिनांक १६.२.२००९ रोजी झालेला आहे. त्याची प्रत अपीलकर्त्यास यापुर्वीच म्हणजे दिनांक २२.१२.२००९ च्या पत्राने पाठविण्यात आलेली असून दिनांक १५.६.२००९ नंतरच्या कालावधीत त्याबाबत आणखी कोणताही शासन निर्णय झालेला नाही. म्हणून अपीलकर्त्यास दिनांक ३१.५.२०१० रोजी कळविल्याचे नमुद केले. सदरचे पत्र पोस्टाद्वारे पाठविण्यात आल्याचे सांगितले. तथापी अपीलकर्त्यास सदरचे पत्र अद्याप पर्यंत प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. म्हणून सदरच्या पत्राची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आयोगाचे समोर उपलब्ध करुन दिली व अपीलकर्त्याने दिनांक ३१.५.२०१० च्या पत्राची प्रत आयोगाचे समोर स्विकृत केली. तसेच अपीलकर्त्याने सुनावणीत असे नमुद केले की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून विज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या सेवा निवृत्ती पेंशन योजनाबाबत दिनांक १६.२.२००९ चा शासन निर्णय प्राप्त झालेला आहे. मात्र दिनांक १५.६.२००९ नंतर पुन्हा याबाबत सुधारित शासन निर्णयाची त्यांना माहिती पाहिजे आहे. मात्र दिनांक १६.२.२००९ नंतर सुधारित शासन निर्णय झालेला नाही असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, दिनांक १५.६.२००९ नंतर विज वितरण

कंपनीच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेंशन योजनेबाबत कोणताही सुधारित शासन निर्णय झालेला नाही अशी माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३१.५.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/११२-११४/९.२.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६३२/२०१०.

श्री. विलास रामचंद्रराव लाडीकर,
लाडीकर ले आऊट, मानेवाडा रोड,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रदिप डांगे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा दंडाधिकारी (गृह शाखा)
जिल्हाधिकारी, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.२.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. रायबोले, कनिष्ठ लिपिक हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगासमोर असे नमुद केले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री. रामचंद्र गोपाळराव लाडीकर यानी दिनांक १३.२.२००५ रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांना अर्ज देऊन अंत्यसंस्कारबाबत परवानगी मागितली

... २

आहे. त्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची प्रत व त्या पत्राचे आवक रजिस्टर मधील नोंद याबाबतची माहिती त्यांनी मागितली होती. तथापी विहित मुदतीत जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे दिनांक १३.९.२०१० रोजी दाखल केले. त्या अपीलाची सुनावणी घेण्यात आली. मात्र त्यांना प्रथम अपीलाचा निर्णय मिळाला नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलार्थी श्री. विलास रामचंद्रराव लाडीकर यांनी दिनांक ९.१२.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत श्री. रामचंद्र गोपाळराव लाडीकर यांनी दिनांक १३.२.२००५ रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांना अंत्यसंस्कार विधीबाबत परवानगी मिळण्या करिता सादर केलेल्या अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती मिळण्यासाठी त्यांच्या कार्यालयाकडे अर्ज दाखल केला होता. त्यानुषंगाने अपीलार्थी यांना दिनांक १६.१२.२०१० रोजी या प्रकरणात कार्यवाही करण्या करिता या प्राधिकरणाला सहकार्य करण्यासाठी आवश्यक कागदपत्रासह दिनांक २४.१२.२०१० रोजी हजर राहण्यासाठी कळविण्यात आले होते. अपीलकर्ता दिनांक २४.१२.२०१० रोजी त्यांचेकडे उपस्थित झाले. परंतु त्यांनी या प्रकरणात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची मदत केलेली नाही. त्यासाठी श्री. रामचंद्र गोपाळराव लाडीकर यांनी दिनांक १३.२.२००५ रोजी वरील प्रमाणे दाखल केलेल्या अर्जाचा कार्यालयात शोध घेण्यात आला. सदरचा अर्ज हा एम.आर.सी.-८१ या शिर्षकाखाली अंतर्भूत होत असल्याने सदर शिर्षाकांतर्गतचा अभिलेख हा स्थायी स्वरुपाचा नसल्यामुळे उक्त अर्ज आजपर्यंत जतन करुन ठेवण्यात आला नाही. त्यामुळे अपीलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा अभिलेख त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्याने अपीलार्थीस माहिती देणे शक्य नसल्याबाबत दिनांक २८.१२.२०१० च्या पत्राद्वारे पंजीबध्द डाकेने अपीलकर्ता यांना कळविण्यात आले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचे कार्यालयाकडे दाखल झाले होते. त्याची सुनावणी घेण्यात आली. सुनावणीचे वेळी अपीलकर्ता

देखील हजर होते. परंतु जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गृह विभागात दिनांक १३.२.२००५ रोजी पाठविलेल्या अर्जाचा शोध घेण्यात आला. परंतु दाखल केलेला अर्ज हा एम.आर.सी.-८१ या शिर्षकाखाली अंतर्भुत असल्यामुळे सदर शिर्षांतर्गतचा अभिलेख हा स्थायी स्वरुपाचा नाही. करिता उक्त अर्ज जतन करुन ठेवण्यात आला नाही. म्हणून अपीलकर्त्याचा दिनांक १३.२.२००५ रोजीचा अर्ज व त्यासंबंधीचा अभिलेख उपलब्ध नसल्याने अपीलार्थीस माहिती देणे शक्य नसल्याबाबत अपीलार्थीस दिनांक २८.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे प्रथम अपील फेटाळण्यात आलेले आहे.

५. तसेच सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे समोर असेही सांगितले की, अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या दिनांक १३.२.२००५ चा अर्ज सक्करदरा, पोलीस स्टेशनकडे पाठविला होता. म्हणून त्यांचेकडून ही माहिती उपलब्ध होईल असे अपीलकर्त्याने सांगितल्यामुळे दिनांक १४.१२.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी पोलीस निरिक्षक, सक्करदरा पोलीस स्टेशन, सक्करदरा, नागपूर यांना पत्र पाठवून त्यांचे पोलीस स्टेशनमध्ये याबाबत उपलब्ध असलेल्या नस्तीची एक प्रत त्यांचे अभिप्रायासह मागितली होती. मात्र संबंधित पोलीस स्टेशनमधून याबाबत कोणतीही माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे मिळालेली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक १३.२.२००५ चा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात वर नमुद केलेल्याप्रमाणे उपलब्ध झालेला दिसून येत नाही. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी पोलीस निरिक्षक, सक्करदरा पोलीस स्टेशन, सक्करदरा, नागपूर यांचेकडे दिनांक १४.१२.२०१० रोजी पत्र पाठवून या प्रकरणाची नस्तीची प्रत व त्यांचे अभिप्राय मागविल्याचे दिसून येते. मात्र संबंधित पोलीस स्टेशन कडून याबाबत अद्याप पर्यंत कोणतेही उत्तर त्यांना प्राप्त झाले नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पोलीस निरिक्षक, सक्करदरा पोलीस स्टेशन, सक्करदरा, नागपूर यांचे कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ४

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर यांनी पोलीस निरिक्षक, सक्करदरा पोलीस स्टेशन, सक्करदरा, नागपूर यांचेकडून याबाबतची माहिति उपलब्ध करण्याची कार्यवाही करावी व त्यांचेकडून माहिती उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती व्यक्तिशः किंवा पोस्टाने पाठवावी. तसेच संबंधित पोलीस स्टेशनकडून माहिती उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/११५-११८/९.२.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६३३/२०१०.

श्री. विलास रामचंद्रराव लाडीकर,
लाडीकर ले आऊट, मानेवाडा रोड,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्रमांक ३, नागपूर.

श्री. एस. एम. वानखडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
सक्करदरा विभाग, नागपूर शहर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.२.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री, कामाळे, वाचक, पोलीस उपनिरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगासमोर सुनावणीत असे नमुद केले की, त्यांनी दिनांक २५.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सक्करदरा विभाग, नागपूर शहर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन सक्करदरा पोलीस स्टेशन येथील दिनांक २९.९.२००६, दिनांक ३०.९.२००६ आणि दिनांक

... २

१.१०.२००६ रोजीचे दैनंदिनी स्टेशन डायरी नोंद व कर्मचारी हजेरी रजिस्टर नोंद याचे प्रत्येकी २ प्रती प्रमाणित करुन माहिती मागितली होती. अर्जाचे अनुषंगाने त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती फी रुपये १२/- टपालखर्च वगळून भरली व फी भरल्यानंतर त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र त्यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती ही अपूर्ण देण्यात आली. त्यामध्ये फक्त स्टेशन डायरीच्या नोंदीची प्रत त्यांना देण्यात आली. मात्र हजेरी पटाच्या प्रती त्यांना देण्यात आलेल्या नाही. अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दिनांक १३.९.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. मात्र त्यानंतरही त्यांना हजेरी पटाची प्रत मिळालेली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत आयोगासमोर असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागणी केलेल्या माहिती प्रमाणे दिनांक २९.९.२००६, दिनांक ३०.९.२००६ व दिनांक १.१०.२००६ रोजीच्या ठाणे दैनंदिनीच्या प्रती अपीलकर्त्यास देण्यात आलेली आहे. परंतु पोलीस नियमावली भाग-२, पान क्रमांक २५५ मध्ये पोलीस कर्मचाऱ्यांचे हजेरी पट राखून ठेवण्याची मुदत २ वर्ष ऐवढी असल्याने ते आज रोजी उपलब्ध नसल्यामुळे हजेरी पटाची प्रत त्यांना उपलब्ध करुन देता आली नाही.

४. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्रमांक ४, नागपूर शहर यांचे कार्यालयात अपूरी माहिती मिळाल्याबाबत दिनांक १३.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्या अपीलाची सुनावणी दिनांक ९.१०.२०१० रोजी घेण्यात आली व अपील अर्जात मागणी केल्याप्रमाणे पोलीस स्टेशन, सक्करदरा येथील दिनांक २९.९.२००६, दिनांक ३०.९.२००६ व दिनांक १.१०.२००६ रोजीच्या संपूर्ण स्टेशन डायरी नोंदीच्या छायाप्रती देण्यात याव्यात व पोलीस नियमावली भाग-२, पान क्रमांक २५५ मध्ये कर्मचारी हजेरी पटाची मुदत २ वर्ष एवढी असल्याने व ती उपलब्ध नसल्याबाबत जनमाहिती अधिकारी सक्करदरा विभाग, नागपूर यांनी अपीलकर्त्यास ७ दिवसांचे आंत कळवावे असा आदेश प्रथम अपीलात पारित करण्यात आला असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. प्रथम अपीलाचे निर्णयानुसार

... ३

अर्जदारास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १९.१०.२०१० रोजी लेखी पत्र देऊन माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले. त्यानुसार दिनांक २३.१०.२०१० रोजी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहितीची एकूण २३ पेजेस कोणतेही शुल्क न घेता उपलब्ध करुन देण्यात आली असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने माहितीच्या अधिकारात मागितलेल्या माहिती पैकी दिनांक २९.९.२००६, दिनांक ३०.९.२००६ व दिनांक १.१०.२००६ रोजीच्या संपूर्ण स्टेशन डायरी नोंदीची छायाप्रती जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना उपलबध करुन दिलेल्या आहेत. मात्र पोलीस नियमावली भाग-२, पान क्रमांक २५५ मध्ये पोलीस कर्मचारी हजेरी पटाची मुदत २ वर्ष ऐवढी असल्यामुळे व ती आता उपलब्ध नाही असे दिसून येते. म्हणून हजेरी पट उपलब्ध नसल्याबाबतची वस्तुस्थिती स्पष्टपणे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी पोलीस नियमावली भाग-२, पान क्रमांक २५५ मध्ये पोलीस कर्मचारी हजेरी पट राखून ठेवण्याची मुदत २ वर्ष ऐवढी असल्याने आता दिनांक २९.९.२००६, दिनांक ३०.९.२००६ व दिनांक १.१०.२००६ चे हजेरी रजिस्टर उपलब्ध नसल्याने हजेरी रजिस्टरची प्रत देता येत नाही असे अपीलकर्त्यास स्पष्टपणे विनामुल्य व्यक्तिशः किंवा पोस्टाने कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/११९-१२१/९.२.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६५८/२०१०.

श्री. नारायण नत्थुजी धांडे,
प्लॉट नं. १६०, नागार्जून कॉलोनी,
नारा रोड, जरिपटका, नागपूर- ४४० ०१४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.

श्री. कोरडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.

श्री. ज. च. भंडारी,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अधिक्षक अभियंता,
नागपूर पाटबंधारे मंडळ, सिंचन सेवा भवन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.२.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री, कोरडे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ८.६.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे अर्ज सादर करुन त्यांचे मुलाला अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यासाठी केलेल्या अर्जावर कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १७.८.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा त्यांना कोणत्याही प्रकारचा निर्णय मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ८.६.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. परंतु सदरच्या माहितीच्या अर्जात माहितीबाबत कोणत्याही प्रकारची स्पष्टता नव्हती म्हणून त्यांनी दिनांक ९.६.२०१० रोजी अपीलकर्ता यांना पत्र पाठवून नेमकी त्यांना कोणती माहिती पाहिजे आहे याबाबत स्पष्ट अर्ज करण्यास कळविले. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. ते प्रथम अपील माहिती अधिकारी या पदनावाने त्यांनी दाखल केले. त्या अर्जावरुन असे दिसून आले की, अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती ही पाटबंधारे विभागाशी संबंधित असल्यामुळे अपीलकर्ताचा माहिती मागण्याचा दिनांक १७.८.२०१० चा अर्ज दिनांक २२.९.२०१० च्य पत्राने अधिक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर यांचेकडे पाठविला. कारण सदरचा अर्ज नागपूर पाटबंधारे विभागाशी संबंधित होता असे जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचे जनमाहिती अधिकाऱ्यांनी सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर यांनी आयोगासमोर असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडील दिनांक २२.९.२०१० चे पत्र त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ४.१०.२०१० रोजी प्राप्त झाले. त्या पत्रासोबत अपीलकर्ताचा माहिती मागण्याचा दिनांक ८.६.२०१० चा अर्ज होता. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, अपीलकर्ता यांच्या अर्जात या मंडळ कार्यालयाचे पत्र दिनांक १३.९.१९९३ चा उल्लेख केलेला होता. परंतु

अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याबाबतच्या या अर्जावर यापूर्वी या मंडळ कार्यालयास कोणताही पत्रव्यवहार झाल्याचा दिसून येत नाही. तसेच सदरचे प्रकरण जवळपास सुमारे १८ वर्षा पुर्वीचे असल्यामुळे ते कोणत्या मंडळ कार्यालयाशी संबंधित होता हे जाणून घेण्याकरिता त्यांनी दिनांक २४.८.२०१० अन्वये अपीलकर्त्यास पत्र पाठवून त्यांचेकडून माहिती मागितलेली होती. परंतु अपीलकर्त्यानी त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही. तथापी चौकशी अंती असे दिसून आले की, अपीलकर्ता हे अधिक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, नागपूर अंतर्गत रामटेक नुतनीकरण विभाग, भंडारा येथे मुकदम (रु.अ.आ.) या पदावर कार्यरत होते व ते दिनांक ३१.१०.१९९२ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानंतर सदर्हु मंउळ कार्यालय बंद झाले असून त्यांचे दस्ताऐवज हे या कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५. तसेच अपीलकर्ता यांचा दिनांक ८.६.२०१० चा माहितीच्या अर्जात उल्लेखित सेवानिवृत्ती कर्मचाऱ्यांच्या पालकांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचे आदेश या मंडळ कार्यालयाकडून निर्गमित झाले असल्याचे उपलब्ध दस्तऐवजावरुन दिसून येत नाही. तसेच अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळण्याबाबत अपीलकर्ता यांचा मुलगा श्री. हरीहर नारायण धांडे यांच्या अर्जाचे स्थितीबाबत अधिक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे प्रकल्प मंउळ, नागपूर यांनी दिनांक ८.१२.१९९७ अन्वये अपीलकर्ता यांना यापुर्वीच उत्तर दिलेले आहे. तथापी अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या मुलाला अनुकंपा योजनेखाली नोकरी देण्यात यावी. याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, शासन निर्णय दिनांक २६.१०.१९९४ अन्वये यापुर्वी अनुकंपा योजने संबंधात निर्गमित करण्यात आलेले सर्व आदेश रद्द करुन सुधारित नियम अस्तित्वात आले. सदर्हु शासन निर्णयात वर्ग-४ मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या मुलास अनुकंपा तत्त्वावर शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत कोणतेही निर्देश नाही. त्यामुळे अपीलकर्त्याच्या मुलाला शासकीय सेवेत सामावून घेण्याची कार्यवाही करता येत नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १.११.२०१० च्या पत्राने सविस्तर उत्तर कळविले आहे.

६. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी त्यांचेकडील दिनांक ८.६.२०१० चा माहिती अधिकाराखालील अर्जाप्रमाणे त्यांच्या मुलाला अनुकंपा

तत्वावर शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १.११.२०१० रोजी सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१२२-१२५/१५.२.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६५७/२०१०.**

श्री. अशोक रायभान चिमनकर,
प्लॉट नं. १७६, शिक्षक कॉलनी, भारत नगर,
कळमना मार्केट रोड, नागपूर- ४४० ००८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बा. ह. पाटील,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती पतंगे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.२.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे नमुद केले की, त्यांनी दिनांक २०.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन दिनांक १.४.१९९९ पासून दिनांक २०.९.२०१० पर्यंत नागपूर जिल्हयातील

... २

शाळेतील शिपाई पदाची समायोजित करण्यासाठी अतिरिक्त शिपायांची प्रतिक्षा यादीची प्रमाणित प्रत मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडून दिनांक २२.९.२०१० रोजी माहिती प्राप्त झाली. परंतु त्या प्रतिक्षा यादीत अपीलकर्त्याचे नांव नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना परिपूर्ण माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्ता हे श्री.लक्ष्मी विद्यालय, जुनी मंगळवारी, नागपूर या खाजगी अनुदानित शाळेत शिपाई पदावर कार्यरत होते. तथापी ही खाजगी शाळा आता बंद झालेली आहे. खाजगी बंद शाळेतील शिपाई हे अतिरिक्त ठरत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे नांव शिपायांच्या प्रतिक्षा यादीत नाही. तथापी त्यांचे कार्यालयाकडे अतिरिक्त ठरलेल्या शिपायांच्या प्रतिक्षा यादीची प्रत अपीलकर्त्यास दिनांक २२.९.२०१० रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे.

४. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, महाराष्ट्र खाजगी शाळा सेवा शर्ती नियम, १९८१ मधील तरतुदीनुसार बंद शाळेतील कोणत्याही शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याला सेवेत सामावून घेण्याची तरतूद या नियमात नाही. म्हणून बंद शाळेतील कर्मचारी हे अतिरिक्त ठरत नाही. त्यामुळे त्यांचे नांव प्रतिक्षा यादीत येत नाही.

५. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २२.९.२०१० रोजी त्यांचे कार्यालयाकडे अतिरिक्त ठरत असलेल्या शिपायांची प्रतिक्षा यादी उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र त्या प्रतिक्षा यादीत अपीलकर्त्याचे नांव कां आले नाही याची माहिती अपीलकर्त्यास पाहिजे आहे. म्हणून त्याबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ताचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यास अतिरिक्त शिपाई प्रतिक्षा यादीत त्यांचे नाव कां समाविष्ट केले नाही याची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास स्पष्टपणे व्यक्तिशः किंवा पोस्टाने कळवावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६५९/२०१०.

श्री. प्रदीप शंकर उके,
रा. लहान इंदोरा, १६, गिरणी विहार,
इलेक्ट्रीक पोल नं. ५४,
नागपूर- ४४० ०१४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

श्री. कोरडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.२.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांनी आजच्या सुनावणीस आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्ता यांनी यापुर्वी देखील याच विषयाबाबत मा.राज्य माहिती आयोग यांचेकडे

... २

अपील क्रमांक ७९९/नाग/२०१० हे दाखल केलेले होते. त्याचा निर्णय आयोगाने दिनांक ३०.६.२०१० रोजी दिलेला असून सदरचे अपील आयोगाने खारीज करुन निकाली काढलेले आहे. म्हणून अपीलकर्ताने आता देखील केलेले अपील क्रमांक १६५९/२०१० हे देखील त्याच विषयाबाबतचे आहे. म्हणून हे अपील देखील खारीज करण्यास पात्र आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणात यापुर्वी आयोगाने अपील क्रमांक ७९९/नाग/२०१०, दिनांक ३०.६.२०१० रोजी निकाल दिला असून सदरचे अपील खारीज करुन निकाल दिलेला आहे. त्यामुळे आताचे अपील क्रमांक १६५९/२०१० देखील त्याच विषयाबाबत असल्यामुळे अपीलकर्त्याचे सदरचे अपील देखील खारीज करण्यास पात्र ठरते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१२९-१३०/१५.२.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६६३/२०१०.

श्री. गेंदलाल शंकर ठाकरे,
श्रीकृष्ण हॉलचे मागे, वार्ड नं. १,
रा. पो. कोराडी, ता. कामठी, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष भूसंपादन अधिकारी (सामान्य),
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.

श्री. पी. के. वऱ्हाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अव्वल कारकून - २,
विशेष भूसंपादन अधिकारी (सामान्य),
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.२.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री. एस. एच. बरबटकर, वकील हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे रजेवर असल्यामुळे ते उपस्थित होऊ शकले नाही. त्यांचे वतीने जनमाहिती अधिकारी यांनी त्यांची बाजु मांडली.

२. अपीलकर्ता यांचेवतीने वकीलांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याने दिनांक २९.६.२०१० रोजी

... २

माहितीच्या अधिकाराखाली जनमाहिती अधिकारी तथा अव्वल कारकून-२, विशेष भुसंपादन अधिकारी (सामान्य), नागपूर यांचेकडे अर्ज करुन भुसंपादन प्रकरण क्रमांक २१-अ-६५/८०-८१ मौजा कोराडी या प्रकरणातील प्लॉट नं. ३२९ च्या भुसंपादन अवार्डची कॉपी मागितलेली होती. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १२.७.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेल्या प्रकरणातील निवाडयाचा प्रतीचा शोध घेण्यात आला. तथापी सदरच्या निवाडयाची प्रत उपलब्ध झाली नसल्यामुळे आपणास ती देता येत नाही असे त्यांनी कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील विशेष भूसंपादन अधिकारी (सामान्य) नागपूर यांचेकडे दिनांक ११.८.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ९.९.२०१० रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिला आणि सदरच्या निर्णयात प्रकरण उपलब्ध होत नसल्यामुळे निवाडयाची प्रत पुरविता येत नाही असे नमुद करुन अपील नामंजूर केले. म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे वकीलांनी सुनावणीत आयोगासमोर सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २९.६.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन माहितीचा शोध घेण्यात आला. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन १९८०-८१ ची आहे. त्यामुळे सदरची माहिती ही सुमारे ३० वर्षापुर्वीची जुनी असल्यामुळे ती मिळाली नाही. म्हणून अपीलकर्त्यास दिनांक १२.७.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध होत नाही असे कळविलेले आहे. त्यानंतर अपीलकर्त्यानी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विशेष भुसंपादन अधिकारी (सामान्य), नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली आणि सुनावणीमध्ये देखील असे दिसून आले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे ३० वर्षापुर्वीची असल्यामुळे माहिती उपलब्ध झाली नाही. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील फेटाळले.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे ३० वर्षापेक्षा जास्त कालावधीची दिसून येते. तथापी मागितलेली माहिती ही जमीनीच्या भुसंपादनाच्या अवार्डशी संबंधीत असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अभिलेखागारात

पुन्हा या माहितीचा कसून शोध घेणे आवश्यक आहे. यासाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या मदतीला आणखी १ कर्मचारी देऊन अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा अभिलेखागारात कसून शोध घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी तथा विशेष भुसंपादन अधिकारी (सामान्य), नागपूर यांनी माहितीचा शोध घेण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांचे सोबत आणखी १ कर्मचा-यांची नेमणूक करावी. त्यांनी या माहितीचा अभिलेखागारात कसून शोध घ्यावा व त्यानंतर माहिती उपलब्ध झाल्यास अपीलकतर्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी आणि याउपरही माहिती उपलब्ध न झाल्यास पुन्हा स्पष्टपणे तसे अपीलकर्त्यास कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१३१-१३३/१७.२.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६६५/२०१०.

श्री. वामन निळकंठ देशपांडे,
एम. आय. जी. २४/४, भामटी परसोडी हाऊसिंग बोर्ड कॉलनी,
त्रिमुर्तीनगर, रिंग रोड, नागपूर - २२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. गिरीष जोशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
नागपूर.

श्री. ए. एस. अंकलगी,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.२.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे प्रकृती अस्वास्थाचे कारणाने सुनावणीस उपस्थित राहू शकले नाही. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२०१० रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन जनमाहिती

... २

अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नागपूर यांचेकडे २ मुद्यांची माहिती व नोटशिटची माहिती छायांकित प्रतीत मागितलेली आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्त्याने मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नागपूर यांचेकडे दिनांक २४.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १.११.२०१० रोजी घेण्यात आला व त्यामध्ये अपीलकर्त्यास माहिती अधिकारी यांनी दिनांक ३.११.२०१० पर्यंत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते. तथापी त्यानंतरही अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यानी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १८.८.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जातील माहिती ही उपअभियंता-१ व विभागीय लेखापाल यांचेशी संबंधित असल्यामुळे दिनांक ३१.८.२०१० च्या पत्राने माहिती पुरविण्याबाबत त्यांना पत्र दिले. तथापी यापुर्वीच यासंदर्भात पुर्वी केलेल्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अर्जामध्ये सदर माहिती उपलब्ध नसल्याची टिपणी सहाय्यक माहिती अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांचे निदर्शनास आणून दिले. कारण अर्जदाराने मागितलेल्या माहितीचा कालावधी हा सन १९९० चा जरी नमुद केला असला तरी ही प्रत्यक्षात १९८७ च्या सुमारास सदर योजनेतील सदनिकेचे वितरण झालेले दिसून येते. म्हणून सदरची योजना १९८३-८४ च्या सुमारास कार्यान्वित झाली असावी. कारण यासंदर्भातील कागदपत्रे आज रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिसून आले नाही.

४. दरम्यानच्या काळात अपीलकर्त्याने प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. मुख्याधिकारी यांचेकडे सुनावणी झाली. सुनावणीतील निर्णयाप्रमाणे या योजनेची निविदा प्रत शोधण्यात आली. मात्र अपीलकर्त्याने मागितलेली २८० भामटी-परसोडी, नागपूर या कामाचे टेंडर्स कॉपी त्यांच्या विभागामध्ये शोधले असता रेकॉर्डरुम मध्ये ती प्राप्त झाली नाही म्हणून करारनाम्याची प्रत उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही असे पत्र जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १.११.२०१० च्या पत्राने कळविले आहे. मात्र अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक

२ बाबतची माहिती म्हणजे अंतीम विक्री किंमतीमध्ये अकल्पित बाबीसाठी केलेली तरतुदची विल्हेवाट कशा पध्दतीने लावली याबाबतची माहिती नागपूर मंडळाकडे उपलब्ध नाही असे देखील उपअभियंता तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३.११.२०१० रोजी कळविले आहे.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, त्यांचेकडे प्रथम अपील दाखल झाले होते. त्याची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १.११.२०१० रोजी देण्यात आला. त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३.११.२०१० पर्यंत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिला होता.

६. अपीलकर्ता यांचे द्वितीय अपीलातील मुद्दे तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने दिनांक १८.८.२०१० च्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली होती. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध नाही हे दिनांक १.११.२०१० रोजीच्या पत्राने कळविलेले दिसून येते. म्हणजे जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांचे आंत अपीलकर्त्यास काहीही कळविलेले दिसून येत नाही आणि दिनांक १.११.२०१० च्या पत्राने सुमारे ७२ दिवसांनी माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. सदरची माहिती उपलब्ध नाही म्हणून हे कळविण्यास ७२ दिवस विलंब कां झाला याबाबत जनमाहिती अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्यास माहिती देण्यासाठी शोध सुरु होता, म्हणून अपीलकर्त्यास कळविण्यास विलंब झालेला आहे. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला खुलासा समर्थनीय दिसून येत नाही. कारण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांचे आंत अर्जदारास उत्तर देणे किंवा माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही जनमाहिती अधिकारी यांनी केलेली नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) प्रमाणे दंडास पात्र ठरतात. म्हणून अपीलकत्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दिनांक १८.८.२०१० च्या माहिती अधिकाराखाली अर्जाला अनुसरुन वर नमुद केल्याप्रमाणे सुमारे ७२ दिवसांनी म्हणजे दिनांक १.११.२०१० च्या पत्राने दिलेले उत्तर हे विलंबाने दिलेले दिसून येते. म्हणून त्यांना विलंबाबद्यल माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- दंडाची कार्यवाही करण्यात येत आहे.

२) सदरच्या शास्तीची रक्कम मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांनी त्यांचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१३४-१३७/१७.२.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६४६/२०१०.**

श्री. किशोर महादेवराव वाळके,
जानकीनगर, तिनखेडे ले आऊट,
ता. काटोल, जि. नागपूर- ४४१ ३०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण प्रसारक मंडळ,
धंतोली, काटोल, जि. नागपूर - ४४१ ३०२.

जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षण प्रसारक मंडळ,
धंतोली, काटोल, जि. नागपूर - ४४१ ३०२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.२.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरची सुनावणी त्या दिवशी न झाल्यामुळे दिनांक १७.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी तर्फे श्री. अतुल एम. नबीरा, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षण प्रसारक मंडळ, काटोल यांचेकडे शिक्षण प्रसारक मंडळाच्या कारभाराची अधिक माहिती मिळण्यासाठी एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १४.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे निवेदन सादर करुन द्वितीय अपील तसेच त्याबाबतची सुनावणी रद्द करावी अशी विनंती केल्यामुळे व उत्तरवादी यांनी सदर प्रकरणी खुलासा सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१३८/१७.२.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६६४/२०१०.**

श्री. रामराव बुधाजी पौनीकर,
प्लॉट नं. ६३, श्रीराम हाऊसिंग सोसायटी,
प्रेमनगर, पो. नयापूरा, नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक कार्यालय,
नविन प्रशासकीय इमारत, ग्राऊंड फ्लोअर,
कौंसिल हॉल समोर, पुणे.

श्री. एस. सी. कुदळे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक,
नविन प्रशासकीय इमारत, ग्राऊंड फ्लोअर,
कौंसिल हॉल समोर, पुणे. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.२.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. भामरे, प्रभारी सहजिल्हा निबंधक वर्ग-१ हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ८.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक कार्यालय, पुणे यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर

... २

करुन दिनांक २२.१२.१९९३ ला मृत्युपत्राचा लेख नागपूरला सहदुय्यम निबंधक वर्ग-२ यांचे कार्यालयात पंजीकृत झालेले आहे. दस्ताऐवजाचा अनुक्रम ३/७१३ सन १९९३ चे यादी क्र. १५ मधील मुळदस्त ७०१ ते ७२२ एकूण २२ दस्त दिले होते. त्यांची मुळ दस्तऐवज उपलब्ध करुन द्यावे ही माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना मुळ मृत्युपत्र व इतर २२ दस्त त्यांना प्राप्त झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्या नंतरही मुळ मृत्युपत्र व २२ दस्त त्यांना प्राप्त झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ८.३.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १७.३.२०१० रोजी पोस्टाने प्राप्त झाला होता. सदरची माहिती ही सह जिल्हा निबंधक वर्ग-१, नागपूर शहर या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे त्यांनी दिनांक २०.३.२०१० च्या पत्राने माहिती अधिकाराखाली कलम ६(३) अन्वये सदरचा अर्ज त्यांचेकडे हस्तांतरण केला व त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवून त्यांचेशी संपर्क साधण्यासाठी कळविले. त्यानंतर सहजिल्हा निबंधक वर्ग-१ यांचेकडे सदरचा अर्ज दिनांक २६.३.२०१० रोजी प्राप्त झाला त्यांनी दिनांक ३१.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२ नागपूर शहर क्र.२, नागपूर यांचेकडे वर्ग केला व त्याची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिली.

४. जनमाहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नागपूर यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा दस्त क्रमांक ३/७१३ ची दुय्यम निबंधक क्रमांक ३ या कार्यालयात नोंदणी झाली असून त्या कार्यालयाकडून सदरचे दस्तऐवज स्कॅनिंगसाठी शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे यांचेकडे पाठविण्यात आले होते. मात्र त्यांचे कार्यालयाकडून या कार्यालयाकडे अपीलकर्त्यास मुळ दस्तऐवज अद्यापही प्राप्त झाले नाही. म्हणून शासकीय छायाचित्र नोंदी कार्यालय, पुणे यांचे कार्यालयात सतत पत्रव्यवहार केला. मात्र शासकीय छायाचित्र नोंदी कार्यालय, पुणे यांचेकडून अपीलकर्त्याने मागितलेले मुळ मृत्युपत्र व त्याचे सोबतचे २२ दस्तऐवज प्राप्त झाले नाही. मात्र त्यामृत्युपत्राचर स्कॅनींग प्रत त्यांचेकडे उपलब्ध आहे. सदरच्या स्कॅनींगची प्रत सर्टिफाईड करुन

अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येईल व ज्या वेळेला शासकीय छायाचित्र नोंदी कार्यालय, पुणे यांचेकडून मुळ मृत्युपत्र प्राप्त होईल त्यावेळेस अपीलकर्त्यास देणे शक्य होईल असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले. यावर अपीलकर्त्याने देखील सुनावणीत आयोगासमोर असे नमुद केले की, त्यांना पाहिजे असलेला मृत्युपत्राची स्कॅनींग प्रत सर्टिफाईड करुन दिली तर त्यांची हरकत नाही. ती स्कॅनींग प्रत घेण्यास अपीलकर्त्याने मान्य केले आणि ज्यावेळेला मुळ प्रत प्राप्त होईल त्यावेळेला ती प्रत उपलब्ध करुन द्यावी असेही अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांनी मागणी केलेल्या मृत्युपत्राची स्कॅनींग प्रत सर्टिफाईड करुन विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापी ज्यावेळेला मुळ प्रत उपलब्ध होईल ती देखील अपीलकर्त्यास पुरविण्यात येईल असे देखील अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळवावे व सदरच्या स्कॅनींगची प्रत ही माहिती अधिकाराचा अर्जाला अनुसरुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे असे देखील अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी स्वतंत्र पत्र देऊन कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१३९- १४१/१७.२.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६७३/२०१०.**

श्री. विजय केशवराव चन्ने,
रा. मस्जीद जवळ, गांधी चौक,
ता. राजूरा, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, राजूरा,
जि. चंद्रपूर.

श्री. प्रभाकर हरीजी रायपुरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निरीक्षक,
नगर परिषंद, राजूरा,
जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.२.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगासमोर असे सांगितले की, त्यांनी दिनांक १६.९.२०१० रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन जनमाहिती अधिकारी तथा नगर परिषद, राजूरा यांचे कार्यालयाकडे त्यांची वैयक्तिक माहिती मिळण्याच्या संदर्भात एकूण ३ मुद्यांबाबतच्या कागदपत्रांच्या सत्यप्रती मागितलेल्या होत्या.

... २

तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ११.१०.२०१० रोजी माहिती प्राप्त झाली. त्या माहितीमध्ये मुद्या क्रमांक १ ची माहिती त्यांना मिळाली. परंतु मुद्या क्रमांक २, ३ बाबतची माहिती त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी मिळाली असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून त्यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद, राजूरा यांचेकडे प्रथम अपील दिनांक १.११.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील त्यांना आवश्यक ती माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे दिनांक १६.९.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती नगरपरिषदच्या कर विभाग तसेच बांधकाम विभाग व आरोग्य विभाग यांचेशी संबंधित असल्यामुळे तिन्ही विभागांना माहिती देण्यासाठी कळविले. त्यानुसार तिन्ही विभागांनी माहिती काढली व सर्व माहिती संकलीत करुन अपीलकर्त्यास दिनांक ११.१०.२०१० च्या पत्राने स्पीड पोस्टाने ती माहिती अपीलकर्त्यास पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली. मात्र अपीलकर्त्याचे म्हणणे असे आहे की, त्यांचे माहिती अर्जातील मुद्या क्रमांक २ मधील दिनांक १३.११.२००३ च्या पत्राची सत्यप्रत त्यांना मिहाली नाही. तसेच मुद्या क्रमांक ३ दिनांक ३.१२.२००४ ला दिलेल्या नोटीसची सत्यप्रत त्यांना मिळालेली नाही. याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, मुद्या क्रमांक २ च्या संदर्भात दिनांक १३.११.२००३ च्या पत्राची कार्यालयीन प्रत उपलब्ध नाही म्हणून ती देता आली नाही. तसेच दिनांक ३.१२.२००४ च्या नोटीसची वैयक्तिक प्रत नसून कॉमन प्रत आहे. म्हणून अपीलकर्त्यास दिनांक १३.११.२००३ व दिनांक ३.१२.२००४ च्या पत्राच्या प्रती त्यांचेकडील रेकॉर्डची पुन्हा पडताळणी करुन सत्यप्रत देण्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत मान्य केले. म्हणून अपीलकत्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १३.११.२००३ च्या पत्राची प्रत व दिनांक ३.१२.२००४ च्या नोटीसची प्रत त्यांचेकडील रेकॉर्डची पडताळणी करुन सत्यप्रत उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६७२/२०१०.**

श्री. प्रदीप प्यारेलाल दुबे,
बजाज वार्ड, गणेशनगर,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, गोंदिया, जि. गोंदिया.

श्री. अमीत सोनवाने,
जनमाहिती अधिकारी तथा
सभा लिपिक,
नगर परिषद, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.२.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. रंगारी, सहाय्यक माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे नमुद केले की, त्यांनी दिनांक ७.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सभा लिपिक, नगर परिषद, गोंदिया यांचेकडे माहितीचा अधिकाराखाली अर्ज सादर करुन नगर परिषदेच्या दिनांक २७.९.२०१० रोजी झालेल्या आमसभेच्या मिनिटबुकाची प्रत त्यांनी मागितली होती. तथापी

... २

जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ८.११.२०१० रोजी दाखल केली. प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा सभा लिपिक यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक ७.१०.२०१० चा माहिती अधिकाराखालील अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ८.१०.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात नगरपरिषदेचे दिनांक २७.९.२०१० च्या आमसभेचे मिनीटबुक तयार करण्यात आले होते. परंतु त्यांच्यावर अध्यक्षांची सही नसल्यामुळे अध्यक्षांची सही झाल्यानंतर मिनीट बुकची प्रत देण्यात येईल असे अपीलकर्त्यास दिनांक २५.१०.२०१० रोजी मौखीक सांगितले होते. त्यानंतर दिनांक १.१२.२०१० रोजी अपीलकर्त्यास असे लेखी कळविले की, उपरोक्त झालेल्या सभेचे पूर्ण कार्यवृत्त तयार आहे. परंतु सदर कार्यवृत्ताबाबत तत्कालीन अध्यक्षा महोदय यांची मान्य असल्याबाबत स्वाक्षरी होणे बाकी आहे ती होताच आपणास कळविण्यात येईल असे त्यांना लेखी कळविले. त्यानंतर सदरच्या कार्यवृत्तांत पुस्तकावर तत्कालीन अध्यक्षांनी दिनांक ५.२.२०११ रोजी सही केली. त्यानंतर दिनांक ५.२.२०११ रोजी अपीलकर्त्यास या मिनीट बुकाची प्रत देण्यासाठी शिपाई त्यांचेकडे पाठविण्यात आला व शिपाईद्वारा त्याच दिवशी माहिती पाठविण्यात आली. परंतु शिपई यांनी सांगितले की, अपीलकर्ता हे १५.२.२०११ पर्यंत बाहेर गावी गेल्याचे त्यांचे शेजाऱ्यांनी सांगितले म्हणून दिनांक ८.२.२०११ ला यु.पी.सी. ने पुन्हा अपीलकर्त्यास माहिती घेऊन जाण्याबाबत पत्र पाठविण्यात आले. नंतर दिनांक १७.२.२०११ ला पुन्हा शिपाई यांचे मार्फत माहिती पाठविण्यात आली असता घराला कुलुप असल्यामुळे ती माहिती अपीलकर्त्यास देता आली नाही. तथापी आताही अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याची संमती जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दिली. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आयोगासमोर त्यांनी मागणी केलेली मिनिट बुकाची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन दिली. याबाबत अपीलकर्ता यांनी प्रत प्राप्त करुन असे नमुद केले की, त्यांना माहिती ही विलंबाने प्राप्त झालेली आहे. म्हणून संबंधितां विरुध्द शास्तीची कार्यवाही करावी.

४. जनमाहिती अधिकारी व अपीलकर्ता यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्तानी मागितलेली माहितीबाबत मिनिट बुकावरती अध्यक्षांची स्वाक्षरी होणे बाकी होते. सदरची स्वाक्षरी दिनांक ५.२.२०११ रोजी झाली. म्हणून मिनिट बुकाची प्रत विलंबाने त्यांना देण्यात आली. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत अध्यक्षांची सही न झाल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे फक्त तोंडी कळविले मात्र लेखी देखील कळविणे आवश्यक होते. मात्र तशी लेखी कार्यवाही जनमाहिती अधिकारी यांनी केलेली नाही म्हणून भविष्यात जनमाहिती अधिकारी यांनी अशा कार्यवाहीची पुनरावृत्ती केल्यास त्यांचे विरुध्द शास्तीच कार्यवाही करण्यो येईल अशी सक्त ताकीद त्यांना देण्यात येत आहे. तथापी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१४५-१४७/१८.२.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६४७/२०१०.

श्री. यशवंत प्रेमलाल धमगाये,
प्लॉट नं. ६४, कोहळे ले आऊट,
खडगांव रोड, वाडी, नागपूर - ४४० ०२३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. एस. घाटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अपर आयुक्त,
आदिवासी विकास कार्यालय, गिरीपेठ, नागपूर.

श्री. एच. एम. गेडाम,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक प्रकल्प अधिकारी,
अपर आयुक्त,
आदिवासी विकास कार्यालय, गिरीपेठ, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.२.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी त्या दिवशी घेण्यात न आल्यामुळे आज दिनांक २१.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगासमोर असे नमुद केले की, त्यांनी दिनांक १४.६.२०१० रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी, अप्पर आयुक्त,

आदिवासी विकास कार्यालय, नागपूर यांचेकडे गृहपाल परीक्षाबाबत निवड झालेल्या उमेदवारांची यादी तसेच त्यांची शैक्षणिक पात्रता तसेच त्यांना मिळालेले गुण इत्यादी बाबतची माहिती मागितलेली होती. त्यांना दिनांक २९.६.२०१० च्या पत्राने माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती माहितीचा अधिकार नियम २(च)(झ) नुसार देता येत नाही. तसेच गृहपाल या पदाची लेखी परीक्षा व मुलाखती संबंधात माहितीचे अधिकारात मागविलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे नियम ८(१)(ड) नुसार व्यापक जनहिताच्या दृष्टिकोनातील नसल्याने माहिती देता येत नाही असे कळविले. त्यामुळे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला व त्यामध्ये गृहपाल पदासाठी निवड झालेल्या पात्र उमेदवारांची यादीची माहिती देण्याबाबत आदेश दिले. त्यानंतर प्रथम अपीलाचे निर्णयानंतर अपीलकर्ता यांना फक्त पुरुष गृहपाल पदाची निवड झालेल्यांची यादी मिळाली. मात्र स्त्री गृहपाल म्हणून निवड झालेल्या स्त्री गृहपाल पदाची यादी मिळाली नाही. तसेच निवड झालेल्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रता बद्यलची माहिती त्यांना मिळाली नाही. तसेच अपीलकर्त्याने आयोगापुढे सुनावणीत आणखी असे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकारात मागितलेल्या माहिती पैकी त्यांना स्त्री व पुरुष यांच्या गृहपाल पदासाठी निवड झालेली यादी व त्यांची शैक्षणिक पात्रता ही माहिती देखील मिळणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा दिनांक १४.६.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदरच्या अर्जात मागितलेली माहिती संकलीत करुन देण्यासाठी दिनांक १५.६.२०१० रोजी सदरचा अर्ज आस्थापना शाखाकडे देण्यात आला व आस्थापना शाखेने सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे नियम ८(१)(ड) नुसार व्यापक लोकहिताच्या दृष्टिकोनातून नसल्याने व ज्यांच्याकडे गुणपत्रिका आहेत त्यांच्या मधील विश्वासार्हतेचे नाते असल्यामुळे अशी माहिती उघड करणे शक्य नाही. या कारणासाठी माहिती देता येणार नाही असे आस्थापना शाखेने कळविल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २९.६.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व त्या सुनावणीनंतर प्रथम

... ३

अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास गृहपाल पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांची यादी देण्याबाबत आदेश दिले. त्याला अनुसरुन अपीलकर्ता यांना गृहपाल पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांची यादी देण्यात आली. मात्र अपीलकर्ता यांना फक्त पुरुष उमेदवार जे गृहपाल पदासाठी निवड झाली त्यांचीच यादी त्यांना मिळाली मात्र स्त्री गृहपाल पदासाठी निवडलेल्या उमेदवारांची त्यांना माहिती मिळाली नाही. तसेच निवड झालेल्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रतेची माहिती सुध्दा त्यांना मिळाली नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, गृहपाल पदासाठी पुरुष व स्त्री उमेदवारांची एकदा निवड झाल्यानंतर त्या निवड केलेल्या उमेदवारांची यादी व शैक्षणिक पात्रता उपलब्ध करुन दिल्यास कोणत्याही गोपनीयतेचा भंग होईल असे दिसून येत नाही. तसेच अपीलकर्त्यास यापुर्वीच पुरुष गृहपालाची निवड यादी दिलेली आहे. त्याचप्रमाणे स्त्री गृहपाल पदावर निवड झालेल्या उमेदवारांची यादी व त्यांची शैक्षणिक पात्रतेची माहिती देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे यथोचित होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास स्त्री गृहपाल पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांची यादी उपलब्ध करुन द्यावी. तसेच स्त्री व पुरुष गृहपाल पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रतेची माहिती देखील विनामुल्य अपीलकर्त्यास व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१४८- १५०/२१.२.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६४८/२०१०.

श्री. दुधराम राजाराम झोडे,
रा. नेताजी वार्ड, ता. पवनी,
जि. भंडारा - ४४१ ९१०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक
भूमी अभिलेख, भंडारा.

श्री. जे. एस. राठोड,
जनमाहिती अधिकारी तथा
उप अधिक्षक,
भूमी अभिलेख, ता. पवनी,
जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.२.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी त्या दिवशी होऊ शकली नाही म्हणून पुढील सुनावणी आज दिनांक २२.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. बी. जगणे, प्रमुख लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे नमुद केले की, त्यांनी दिनांक २७.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भूमी अभिलेख, ता. पवनी, जि. भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज

... २

सादर करुन मौजा चडकापूर/मा.मा.अ.०५/१०, पवनी यांची हद्द कायम प्रकरणात केलेल्या कार्यवाही बाबत माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना माहितीच्या अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २४.८.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती ही अपूर्ण व चुकीची असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, भंडारा यांचेकडे दिनांक ३०.८.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व सुनावणी घेऊन दिनांक ५.१०.२०१० रोजी आदेश पारित करण्यात आले. त्या आदेशामध्ये निष्कर्ष क्रमांक ४ मध्ये जनमाहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी अशा प्रकारचे आदेश दिले होते. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे केलेली कार्यवाही त्यांना कळविली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २७.७.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे संबंधात दिनांक २४.८.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती पुरविली. तथापी त्या माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून अपीलकर्त्याने दरम्यानचा काळात प्रथम अपील जिल्हा अधिक्षक, भुभी अभिलेख, भंडारा यांचेकडे दाखल केलेल्या प्रथम अपीलाचा निर्णय झाला. तथापी त्या काळात उपअधिक्षक, भुमी अभिलेख, ता. पवनी या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. आर. बी. फडतरे यांचेकडे होता. म्हणून अतिरिक्त पदाच्या कार्यबाहूल्यामुळे प्रथम अपीलातील निर्णयाप्रमाणे कार्यवाही झाली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. तथापी आता प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे ३० दिवसाचे मुदतीत कार्यवाही करण्यात येईल असे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले व ३० दिवसाचे आंत कार्यवाही करण्यास अपीलकर्त्याची कोणतीही हरकत नाही असे अपीलकर्त्यानी मान्य केले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, प्रथम अपीलाचा निर्णयाप्रमाणे अद्याप कार्यवाही झालेली दिसून येत नाही. म्हणून विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांचे आंत प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे कार्यवाही करुन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक ५.१०.२०१० रोजीच्या निर्णयातील निष्कर्ष क्रमांक ४ प्रमाणे कार्यवाही करावी व अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे मुदतीत कार्यवाही न केल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत त्यांचे विरुध्द शास्ती करण्यात येईल.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६४९/२०१०.

श्री. रमेश भैय्यालाल रहेकवार,
महात्मा ज्योतीबा फुले नगर, वार्ड नं. ४,
साई मंदीर परिसर, ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जे. एन. नगराळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
नागपूर ग्रामीण प्रविभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विद्युत भवन, काटोल रोड, नागपूर .

जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
स. व सु. वि. २,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत,
गणेश भवन, सिव्हील लाईन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.२.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी त्या दिवशी होऊ शकली नाही म्हणून पुढील सुनावणी आज दिनांक २८.२.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. यु. बी. चहांदे, हे हजर आहेत.

... २

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ५.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ओ आणि एम विभाग २, नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन माहे जून २००९ महिन्याचे प्रवास भत्ता बिल ऑडीट होऊनही आजपावेतो त्यांना मिळालेले नाही याबाबतची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. तसेव अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असेही नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना दिनांक २१.९.२०१० रोजीच्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की, त्यांचे माहे जून २००९ चे प्रवास बिल हे गहाळ झालेले आहे. म्हणून प्रवास भत्त्याचे देयक देता आले नाही. त्यासाठी डुप्लीकेट प्रवास भत्त्याचे बिल सादर करावे. म्हणजे प्रवास भत्त्याचे बिल देता येईल असे कळविले. सदरचे उत्तर जनमाहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसांचे आंत त्यांना मिळाले नाही. म्हणून त्यांचे विरुध्द शास्ती करावी असे त्यांनी नमुद केले. तसेच त्यांनी प्रथम अपील अधिक्षक अभियंता, नागपूर ग्रामीण प्रविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड यांचेकडे केले होते. तथापी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही म्हणून त्यांचे विरुध्द देखील शास्तीची कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी आयोगासमोर असे सांगितले की, अपीलकर्ता हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडच्या सावनेर उपविभागात कार्यरत होते. त्यांचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक ९.८.२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्या अर्जामध्ये त्यांनी त्यांचे माहे २००९ चे प्रवास भत्ता बिल न मिळाल्याबाबत माहिती मागितलेली होती. म्हणून सदरची माहिती ज्युनिअर मॅनेजर (वर्क्स पर्सनल) महावितरण विभाग क्रमांक २ यांचेकडे दिनांक १३.८.२०१० च्या पत्राने मागविली होती. ज्युनिअर मॅनेजर, महावितरण यांनी अपीलकर्त्यास माहे जून २००९ च्या प्रवास भत्ता बिलाचा शोध घेतला. त्यावेळेला त्यांनी दिनांक २०.९.२०१० च्या पत्रान्वये असे कळविले की, अपीलकर्त्याचे माहे जून २००९ चे प्रवास भत्ता बिल हे अंकेक्षित झाले आहे व अंकेक्षणानंतर बिल मंजूर करुन ते आस्थापना विभागाला पाठविला पाठविण्यात आले

होते. परंतु ते बिल रोखपालाकडे गेले नाही त्यामुळे ते गहाळ झाल्याचे दिसून येते. ज्युनिअर मॅनेजर, महावितरण, नागपूर यांनी दिनांक २०.९.२०१० च्या पत्राने कळविल्यानंतर दिनांक २१.९.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी बिल गहाळ झाल्याचे कळविलेले आहे. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी असेही नमुद केले की, अपीलकर्त्याचे प्रवास भत्ता बिल गहाळ झालेल्या प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द त्यांचे कार्यालयाने चौकशी सुरु केलेली आहे.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांची सुनावणी घेतली नाही व प्रथम अपीलाचा निर्णय दिला नाही असे त्यांच्या वतीने हजर असलेले श्री. नगराळे, कार्यकारी अभियंता यांनी सुनावणीत नमुद केले. यावरुन असे दिसून येते की, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही व कोणताही निर्णय देखील घेतलेला नाही.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचे जून २००९ चे प्रवास भत्ता बिल गहाळ झाल्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक २१.९.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास कळविलेले आहे. तसेच या प्रवास भत्ता बिलाचे डुप्लीकेट प्रत अपीलकर्त्याने सादर करावी म्हणजे त्यांना रक्कम देता येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविले आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील दाखल झाल्या नंतर त्याची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला दिसून येत नाही. वास्तविक पाहता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय देणे त्यांचेवर बंधनकारक आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांनी ही वैधानिक जबाबदारी योग्यरित्या पार पाडली नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकी देणे संयुक्तिक होईल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात याची पुनरावृत्ती टाळावी अशी समज देण्यात येत आहे. या निर्णय एक प्रत स्वतंत्रपणे त्यांचे **<u>कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई</u>** यांचेकडे पुढील कार्यवाही पोस्टाने पाठविण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# १ मार्च, २०११

# ते

# २४ मार्च, २०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६७७/२०१०.**

श्री. हरीश्चंद्र काशीनाथ राऊत,
सहाय्यक शिक्षक,
उच्च प्राथमिक शाळा, टाका, पो. जवळी,
ता. भिवापूर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. नैताम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर .

जनमाहिती अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, भिवापूर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.३.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.३.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. जी. डी. उमाठे, विस्तार अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३१.१०.२००९ रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन जनमाहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, भिवापूर,

... २

जि. नागपूर यांचेकडे वर्गखोली बांधकाम उच्च प्राथमिक शाळा, आलेसूर येथील कार्यकारी अभियंता, सर्व शिक्षा अभियान यांनी केलेल्या चौकशी संबंधात एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना ३ मुद्यांची माहिती मिळाली. मात्र १ मुद्यांची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना १ मुद्यांची अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहिती अधिकाराखालील दिनांक ३१.१०.२००९ चा अर्ज त्यांचेकडे दिनांक ४.११.२००९ रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती गटसमन्वयक, गटसाधन केंद्र, पंचायत समिती, भिवापूर यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांचेकडे दिनांक १६.११.२००९ रोजी पत्र पाठवून त्यांचेकडून माहिती मागविली. त्यांनी सदरची माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक २३.११.२००९ च्या पत्राने पाठविली आणि त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २५.११.२००९ रोजी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली. मात्र त्यामाहितीमुळे त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी झाली. सुनावणी नंतर दिनांक ११.१.२०१० च्या पत्राने माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी अपीलकर्त्यास सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली. मात्र मुद्या क्रमांक २ बाबत ग्राम शिक्षण समितीला चौकशीसाठी उपस्थित राहण्यासाठी दिलेल्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे त्यांनी नमुद केले. परंतु याबाबत माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वर्गखोली बांधकामाबाबत चौकशीसाठी श्री. आर. व्ही. नाईक, कार्यकारी अभियंता, सर्व शिक्षा अभियान यांना दिनांक २६.७.२००७ च्या पत्राने कळविण्यात आले होते आणि त्या पत्राची प्रत सरपंच, ग्रामपंचायत, आलेसुर, पंचायत समिती, भिवापूर यांना दिली होती. मात्र या चौकशीसाठी ग्राम शिक्षण समितीला स्वतंत्रपणे हजर राहण्यासाठी कळविण्यात आले नव्हते. त्याचे कारण असे की, ग्राम शिक्षण समितीचे अध्यक्ष हे सरपंच असतात म्हणून त्या सरपंचाना दिनांक २६.७.२००७ च्या पत्राची प्रत दिली होती असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी सुनावणीत आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र मुद्या क्रमांक २ बाबत ग्राम शिक्षण समितीला चौकशीसाठी हजर राहण्यासाठी स्वतंत्रपणे शिक्षणाधिकारी यांनी पत्र दिले नाही. तथापी सदरच्या पत्राची प्रत सरपंच यांना दिली आहे असे दिसून येते व सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. म्हणून ग्राम शिक्षण समितीला चौकशीस हजर राहण्याबाबत पत्र दिले नाही असे अपीलकर्त्यास शिक्षणाधिकारी यांनी कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा आदेश मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की, दिनांक २६.७.२००७ च्या पत्राची प्रत फक्त सरपंच हे ग्राम शिक्षण समितीचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांना देण्यात आलेले आहे असे स्पष्टपणे विनामुल्य व्यक्तिशः किंवा पोस्टाने कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१५९- १६१/१.३.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६७६/२०१०.**

श्री. सच्चिदानंद केशरीप्रसाद पांडे,
ज्योती किराणा स्टोअर्स जवळ, सुरेंद्रगढ,
सेमिनरी हिल्स, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
८, सहकार सदन, हिंदुस्थान कॉलनी,
अमरावती रोड, नागपूर .

श्री. आर. एन. वसू,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक (प्रशासन),
८ सहकार सदन, हिंदुस्थान कॉलनी,
अमरावती रोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.३.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.३.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १६.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयाकडे वेंडर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. नागपूर या संस्थे

... २

विषयी एकूण ७ मुद्यांवरती माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती विहित मुदतीत मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ३०.९.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा दिनांक १६.७.२०१० चा अर्ज हा दिनांक २१.७.२०१० रोजी त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला. सदरची माहिती ही अवसायक, वेंडर्स को-ऑप.सोसायटी लि. नागपूर यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांचेकडे दिनाक २१.७.२०१० रोजी अपीलकर्त्यास माहिती देण्यासाठी पाठविण्यात आला. त्याला अनुसरुन अवसायक यांनी दिनांक १६.८.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की, सदर संस्थेस शासनाकडून तसेच वित्तीय संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे अर्थ सहाय्य मिळाले नाही म्हणून माहितीचा अधिकार हा कायदा या संस्थेस लागू नाही. त्याच्या पृष्ठर्थ त्यांनी त्या पत्रात मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्रमांक ५६६६/२००७ मधील निर्णयानुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही असे कळविलेले आहे. त्यानंतर अपीलकर्त्याने जिल्हा उपनिबंधक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला व त्यामध्ये देखील असे नमुद केले की, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक दिनांक ८.२.२००६ व मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचेकडील याचिका क्रमांक ५६६६/२००७ अन्वये दिलेल्या निर्णयानुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा कायदा सहकारी संस्थेस लागू होत नाही म्हणून अपील खारीज करण्यात आले असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती वेंडर्स को-ऑप.सोसायटी लि. नागपूर या संस्थेबाबत असून सदर संस्थेस शासनाचे कोणत्याही प्रकारचे अर्थ सहाय्य प्राप्त झालेले नाही. मात्र सदरची संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० प्रमाणे नोंदणी झालेली असल्यामुळे सदर संस्थेवर जिल्हा उपनिबधंक सहकारी संस्था, नागपूर यांचे वैधानिक नियंत्रण आहे. त्यामुळे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांनी सहकारी कायद्यातील तरतुदींना अनुसरुन अपीलकर्त्यास वेंडर्स को-ऑप. सोसायटी लि. नागपूरची माहिती अवसायकाकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास पुरविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांनी अपीलकर्त्यास वेंडर्स को-ऑप.सोसायटी लि. नागपूर या संस्थेबाबतची माहिती अपीलकर्त्याकडून योग्य ती फी घेऊन सहकारी कायद्यातील तरतुदीनुसार उपलब्ध करुन द्यावी. त्यामध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम १०५ मधील अवसायकाचे अधिकाराची प्रत, संस्थेचे डेड्स्टॉक रजिस्टरची झेरॉक्स प्रत, संस्थेचे कामकाज सुरु असल्याबाबत केलेल्या करारनाम्याची प्रत, संस्थेचे नौकर असल्यास नौकरांची माहिती तथापी नौकर नसल्यास तसे स्पष्टपणे कळवावे. वरील मुद्यांची माहिती जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांनी अवसायकाकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास योग्य ती फी आकारुन उपलब्ध करुन घेऊन ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१६२- १६४/१.३.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६७५/२०१०.

श्री. हरीश राजेरामजी नान्हे,
मेन रोड, सारडा वस्त्रालयाजवळ, इतवारी,
ता. उमरेड, जि. नागपूर - ४४१ २०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती वसुधा नाईक,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, नागपूर .

श्री. आर. आर. गायकवाड,
जनमाहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी,
अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, नागपूर . ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.३.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.३.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, त्यांनी दिनांक २१.१०.२००९ रोजी त्याच प्रमाणे दिनांक २६.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, अनुसुचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी

... २

समिती, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली २ अर्ज देऊन सुरेखा विठोबाजी बावणे यांचे जात वैधता प्रमाणपत्राची प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल न करता पुन्हा माहिती मागण्याचा अर्ज सादरा केला. त्यानंतरही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा दिनांक २१.१०.२००९ चा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झालेला नाही. मात्र अपीलकर्त्याचा दिनांक २६.१२.२००९ चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक ३०.१.२०१० रोजी असे कळविले की, सुरेखा विठोबाजी बावणे यांचे जात वैधता प्रमाणपत्र देणेबाबत अद्याप निर्णय झालेला नाही असे कळवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र त्या माहितीवर अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसंचालक, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे दाखल न करता पुन्हा दिनांक ३.४.२०१० रोजी माहिती अधिकाराखाली माहिती मागण्याचा अर्ज केला. त्या अर्जाला अनुसरुन देखील दिनांक २१.४.२०१० रोजी असे कळविले की, सुरेखा विठोबाजी बावणे यांचे जाती वैधता प्रमाणपत्र देण्यासंबंधी निश्चित तारीख सांगता येत नाही. कारण जाती वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता प्रकरण अनेक टप्प्यातून जात असते. त्यामुळे निश्चित तारीख कळविता येत नाही अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, सुरेखा विठोबाजी बावणे यांचे जाती वैधता प्रमाणपत्र देणे बाबतचे प्रकरण त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहे. मात्र सदरच्या प्रकरणाचे संबंधात पोलीस दक्षता पथकाद्वारे चौकशी पूर्ण झालेली असून त्यासंदर्भात सुरेखा विठोबाजी बावणे यांचे जमाती प्रमाणपत्राची तपासणी बाबत दिनांक २२.२.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. तथापी त्या दिवशी सुरेखा विठोबाजी बावणे हया हजर झाल्या नाही. म्हणून सुनावणी होऊ शकली नाही. प्रस्तुत प्रकरणी संबंधिताचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे अद्यापपर्यंत अपीलकर्त्याने मागितलेली सुरेखा विठोबाजी

बावणे यांचे जाती वैधता प्रमाणपत्र देण्याचा निर्णय झालेला नाही व ही माहिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेले जाती वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कडून अद्याप पुर्ण झालेले नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास जाती वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करुन देता येत नाही अशी माहिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६५०/२०१०.**

श्री. शेषराव सदाशिव काथवटे,
मु. पो. हिंगणा (बा), ता. पारशिवनी,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, पारशिवनी, जि. नागपूर .

कु. सुषमा लोणकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्रामपंचायत हिंगणा (बारा)
ता. पारशिवनी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.२.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी सुनावणी घेण्यात आली नाही. कारण त्यादिवशी जनमाहिती अधिकारी यांचेकडे ग्राम पंचायतचे एकूण उत्पन्न व खर्च याची माहिती त्यांचे जवळ नव्हती. म्हणून ग्रामपंचायतीचे एकूण उत्पन्न व खर्च, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा खर्च इत्यादी बाबतची माहिती आयोगा समोर सादर करण्यासाठी सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर असून अपीलकर्ता यांचे वतीने श्री. एम. डी. चिखले, वकील हे हजर आहेत. व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. गोविंद इंगळे, कनिष्ठ सहाय्यक हे हजर आहेत.

... २

२.  अपीलकर्ता यांचे वकीलांनी आयोगासमोर सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्यानी दिनांक १३.४.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, हिंगणा (बारा), ता. पारशिवनी यांचेकडे अर्ज सादर करुन ग्रामपंचायत हिंगणा येथील नमुना १ ते २७ या रजिस्टरमध्ये ज्या नोंदी घेतलेल्या आहेत. त्या सर्व नोंदीच्या माहितीची छायांकित प्रती मागितलेली दिसून येते व सदरची माहिती ही जानेवारी २००८ पासून दिनांक २१ मार्च २०१० या कालावधीची माहिती मागितलेली होती व सदरचा माहिती अर्ज हा दारिद्रय रेषेखालील व्यक्तीचा असल्यामुळे विनामुल्य मिळणे आवश्यक आहे असे सुनावणीत वकीलांनी नमुद केले. तथापी जनमाहिती अधिकारी यांचेकडून विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १०.६.२०१० रोजी विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पारशिवनी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णयानंतरही त्यांना अपेक्षेप्रमाणे माहिती मिळाली नाही असे अपीलकर्त्याचे वतीने वकीलांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून माहिती दिली नाही. तसेच माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे म्हणून जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीच्या अधिकाराखाली शास्तीची कार्यवाही करावी यासाठी अपीलकर्त्याचे वकीलांनी मा.उच्च न्यायालय, पंजाब व हरियाणा यांचेकडील त्यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत आयोगासमोर सादर केली आणि जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीच्या अधिकाराखाली शास्तीची कार्यवाही करावी असे आग्रही प्रतिपादन अपीलकर्त्याचे वकीलांनी आयोगासमोर सांगितले.

३.  जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयास प्राप्त झाला होता. त्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक ५.५.२०१० रोजी पत्र पाठवून असे कळविले की, आपण मागिलेला नमुना नं. १ ते २७ मुळ रजिस्टरची नेमकी कोणती माहिती हवी आहे त्याचा खुलासा करावा. कारण मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे. तथापी अपीलकर्त्याने त्याबाबत नेमकी माहिती त्यांना कोणती पाहिजे आहे याबाबत खुलासा केला नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ७.७.२०१० रोजी देण्यात आला. त्या अपीलामध्ये असे निर्णय दिला की, अपीलकर्ता यांनी ग्रामपंचायतला नियमानुसार माहितीच्या

फीची रक्कम भरुन सचिवाकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी. त्यानंतर सचिवांनी माहिती पुरवावी. या निर्णयाला अनुसरुन अपीलकर्त्याला जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३१.७.२०१० रोजी माहितीची फीची रक्कम रुपये १४५००/- भरणा करण्याबाबत मात्र त्यामधून १००/- रुपये वजा करुन उर्वरित रक्कम भरण्याबाबत कळविले. मात्र अपीलकर्त्याने प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे माहितीची फी भरली नाही. म्हणून माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असेही नमुद केले की, सदरच्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या दोन्ही गांवे मिळून १११८ आहे व वार्षिक उत्पन्न रुपये ९७०००/- आहे व वार्षिक खर्च रुपये ९६८७१/- आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीकडे कोणत्याही प्रकारची जास्तीची रक्कम शिल्लक नाही. अपीलकर्ता हा दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांनी मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स खर्च सुमारे १३२७८/- रुपये येईल व सदरचा खर्च पेलण्याची ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती नाही. म्हणून विनामुल्य माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येणार नाही. त्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा समोर ग्रामपंचायतीचे उत्पन्न व खर्चाचा तपशील व अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा खर्चाचा तपशील सादर केला.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे एकूण घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यानी जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १३.४.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन माहिती मागितलेली होती. त्या माहितीमध्ये नमुना नं. १ ते २७ च्या रजिस्टरच्या नोंदी त्यांनी मागितलेल्या होत्या. त्याबाबत अपीलकर्त्यास नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ५.५.२०१० च्या पत्राने कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचे निर्णयात अपीलकर्त्याने माहितीची फी भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा आदेश प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला दिसून येतो. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानुसार अपीलकर्त्याने माहितीची फी भरली नाही. म्हणून माहिती त्यांना उपलब्ध झालेली दिसून येत नाही. अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे माहितीच्या अधिकाराप्रमाणे त्यांना विनामुल्य माहिती मिळाली पाहिजे असे अपीलकर्त्याचे वकीलांचा आग्रह आहे. तथापी ग्राम पंचायत यांची आर्थिक स्थिती वर नमुद केल्याप्रमाणे सबळ

दिसून येत नाही. कारण अर्जदाराने मागितलेल्या माहितीचा खर्च हा सुमारे १३२७८/- रुपये अपेक्षित आहे. एवढा खर्च पेलण्याची त्यांच्या ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती देणे आवश्यक आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी पंचायत समिती मार्फत शासनाकडे अनुदान मागणी करुन अनुदान प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याला पुरविण्याच्या माहितीसाठी पंचायत समिती मार्फत शासनाकडे अनुदानाची मागणी करावी व अनुदान प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१६८- १७१/३.३.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६८७/२०१०.

श्री. अमर ताराचंद तिरपुडे,
न्यु आशिर्वाद नगर, गिरोला (कारधा),
ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. पवनी, जि. भंडारा.

श्री. डी. एस. खराबे,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी, कोंढा (कोसरा),
ता. पवनी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. ए. एम. राऊत, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी, कोंढा (कोसरा), ता. पवनी यांचेकडे दिनांक १३.९.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन गट नं. ७२ च्या फेरफाराबाबत माहिती मागितलेली होती. तसेच फेरफार झाल्यानंतर ७/१२ च्या उताऱ्याची माहिती

... २

मागितलेली होती. त्याचप्रमाणे गट नं. ७२, गट नं. ७२/१ याबाबतच्या नकाशाच्या प्रती मागितलेल्या होत्या. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती अपुर्ण असल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून त्यांनी तहसीलदार, पवनी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असे अपीलकर्त्याने सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दिनांक १३.९.२०१० चा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन माहिती काढण्यात आली व सदरची माहिती अपीलकर्ता यांचेवतीने श्री. बळीराम चिंगा रामटेके यांना दिनांक ८.१०.२०१० रोजी दिली. श्री. बळीराम चिंगा रामटेके यांना माहिती दिल्याबाबतची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविली. परंतु श्री. बळीराम चिंगा रामटेके यांनी सदरची माहिती अपीलकर्ता यांना दिली नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ८.११.२०१० रोजी आवश्यक ती १ ते १० पेजेसची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. त्यामध्ये गट नं. ७२/१ चा ७/१२ उतारा तसेच फेरफारा बाबतच्या नोंदीच्या प्रती अपीलकर्त्यास देण्यात आल्या. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र गट नं. ७२/१ यांचा नकाशा त्यांना प्राप्त झाला नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, गट नं. ७२ चा गट नं. ७२/१ झालेला आहे त्यामुळे अपीलकर्त्यास गट नं. ७२/१ च्या नकाशासाठी भुमापन अधिकारी यांचे कार्यालयाकडे मागणीसाठी कार्यवाही करावी लागेल असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

४. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास गट नं. ७२ व गट नं. ७२/१ याबाबतची वस्तुस्थिती स्पष्टपणे कळविणे योग्य होईल. तसेच गट नं. ७२ व गट नं. ७२/१ च्या नकाशाबाबतची वस्तुस्थिती देखील कळविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास गट नं. ७२ आणि गट नं. ७२/१ चा ७/१२ च्या उताऱ्याची वस्तुस्थितीदर्शक माहिती तसेच नकाशाबाबतची माहिती विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६८६/२०१०.

श्री. घनश्याम रामचंद्र ठाकरे,
मु. राजनी, पो. ओपारा,
ता. लाखांदूर, जि. भंडारा - ४४१ ८०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. ई. कोमलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, लाखांदूर, जि. भंडारा.

श्री. के. एस. हटकर,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्राम पंचायत, राजनी,
ता. लाखांदूर, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, राजनी, ता. लाखांदूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत मार्फत शिवकालीन पाणी साठवण योजना व इतर माहिती अशी एकूण ३ मुद्यांची माहिती

... २

मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलामध्ये माहिती देण्याचा निर्णय देण्यात आल्या नंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. परंतु अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही अस्पष्ट होती. त्याचा कोणताही बोध होत नव्हता. म्हणून त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक १५.१०.२०१० रोजी पत्र पाठवून १ ते ३ मुद्यांमधील नेमणी कोणती माहिती पाहिजे याबाबत विचारणा केली होती. त्या पत्राला अनुसरुन अपीलकर्त्याने दिनांक २२.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे खुलासा सादर केला. परंतु सदरच्या खुलाश्यामध्ये पुन्हा संदिग्ध माहिती असल्याचे दिसून आल्यामुळे दिनांक १.११.२०१० रोजी पुन्हा हव्या असलेल्या स्पष्ट माहितीबाबत विचारणा केली. परंतु अपीलकर्त्याने ते पत्र घेतले नाही व माहिती बाबत खुलासा केला नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३.१२.२०१० रोजी देण्यात आला. त्या प्रथम अपीलाच्या निर्णयास अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक ५.१२.२०१० रोजी अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक १, २ व ३ ची ग्रामपंचायतकडे उपलब्ध असलेल्या लिखित दस्तऐवज छायांकित प्रती तयार करुन अपीलकर्त्याकडे पाठविले. मात्र अपीलकर्त्याने दिनांक ५.१२.२०१० रोजी सदरची माहिती घेण्यास नकार दिला. म्हणून गावातील ६ लोकांचे उपस्थित पंचनामा करण्यात आला व त्या पंचनाम्यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचे कडून माहिती स्विकारण्यास नकार दिलेला आहे. मात्र याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, केलेला पंचनामा हा खोटा आहे. त्यांनी माहिती घेण्यास नकार दिलेला नाही. म्हणून आज आयोगासमोर देखील सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याची तयारी जनमाहिती अधिकारी यांनी दाखविली व आयोगासमोर अपीलकर्त्यास सुमारे ११३ पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलकर्त्याने सदरची माहिती आयोगासमोर स्विकारली. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-      दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६८८/२०१०.

श्री. बुधा सुदाम बडोले,
मु. दिघोरी (नान्होरी), पो. मुरमाडी,
ता. लाखनी, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. गुलाबराव बडगे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
लाखनी, जि. भंडारा.

श्री. आर. एस. गिऱ्हे,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी,
शिवनी (मोगरा),
ता. लाखनी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगासमोर असे नमुद केले की, त्यांनी दिनांक ४.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी, शिवनी (मोगरा) यांचेकडे गट नं. ३६१ च्या फेरफाराबाबतची कागदपत्रे मागितलेली होती.

... २

अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ११.५.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिनांक १२.५.२०१० ला माहिती उपलब्ध करुन दिली आहे व त्याची पोच सुध्दा घेतलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी पुन्हा तहसीलदार यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्या संदर्भात तहसीलदार यांनी दिनांक १२.६.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली तरी सुध्दा समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना ज्या कागदपत्राचे आधारे फेरफार झालेले आहे ती कागदपत्रे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ११.५.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहेत. तथापी आज पुन्हा आयोगा समोर फेरफार ज्या कागदपत्राचे आधारे झालेले आहे ती कागदपत्रे आयोगासमोर अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा उपलब्ध करुन दिली. मात्र अपीलकर्त्या यांना माहिती उपलब्ध झाली तरी फेरफार घेतलेल्या नोंदणीच्या गुणवत्तेबाबत त्यांची तक्रार दिसून येते व त्याबाबत चौकशी हवी अशी त्याची अपेक्षा आहे. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत चौकशी करणे अपेक्षित नसल्यामुळे व जनमाहिती अधिकारी आणि तहसीलदार यांनी अपीलकर्त्यास सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६८४/२०१० व अपील क्रमांक १६८५/२०१०.**

श्री. मो. आरिफ व. मो.शब्बीर,
गुजरी बाजार, ता. कामठी,
जि. नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. रविंद्र पांढरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कामठी,
जि. नागपूर.

श्री. सुभाष नरेलवार,
जनमाहिती अधिकारी तथा
जलप्रदाय अधिक्षक,
नगर परिषद, कामठी,
जि. नागपूर.

श्री. अशोक चिंतलवार,
जनमाहिती अधिकारी तथा
बाजार अधिक्षक,
नगर परिषद, कामठी,
जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये उपरोक्त दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ३.३.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

... २

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी पाणी पुरवठा विभाग, नगर परिषद, कामठी यांचेकडे एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तसेच दिनांक २.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कर अधिक्षक, नगर परिषद, कामठी यांचेकडे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. परंतु सुनावणीचे दिवशी अपीलकर्ता यांनी दोन्ही अपीलाचे रोजनाम्यावर सदर प्रकरणी माहिती मिळाली असल्याने अपील मागे घेत असल्याबाबत अपीलकर्ता यांनी हजर राहून सांगितले व रोजनाम्यावर स्वाक्षरी केली त्यामुळे सदरचे दोन्ही अपीले खारीज करण्यात येत आहेत.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६९२/२०१०.**

श्री. प्रमोद केशवराव कन्हेरे,
मु. जोहरीपूरा, टिळक रोड,
महाल, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
डॉ. जे. जे. मगदूम होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज,
जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

जनमाहिती अधिकारी
डॉ. जे. जे. मगदूम होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज,
जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.३.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.३.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी तर्फे श्री. सुर्यवंशी धुळोबा शत्रुध्न, वरिष्ठ लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी डॉ. जे. जे. मगदूम होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज, जयसिंगपूर यांचेकडे एम.डी. शिक्षणाबाबत प्रथम वर्षाची टयूशन फी किती व शैक्षणिक सत्र २००७-२००८ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची नांवे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे

अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२०११ रोजी राज्य माहिती आयुक्त यांचेकडे निवेदन सादर करुन जनमाहिती अधिकारी यांचेकडून मागितलेली माहिती दिनांक १०.१.२०११ रोजी प्राप्त झाली आहे. याबाबत माझी काहीच तक्रार नाही. तरी आपणांस विनंती करतो की, माझा दिनांक १०.१२.२०१० चा अर्ज कृपया रद्य समजावा व सदर्हु प्रकरणे नस्ती करावे अशी विनंती केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६९६/२०१० व अपील क्रमांक १६९७/२०१०.

श्री. पांडुरंग गणपतराव सपकाळ,
रा. करंभाड, पो. ता. पारशिवनी, जि. नागपूर - ४४१ १०५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. पी. सपाटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, पारशिवनी, जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी
ग्राम पंचायत विभाग,
पंचायत समिती, पारशिवनी, जि. नागपूर.

श्री. विलास कोलते,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यपालन अधिकारी,
ग्राम पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. सलामपूरे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
ग्राम पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.३.२०११)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ५.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय

... २

अपीलांची सुनावणी आज दिनांक ७.३.२०११ रोजी घेण्यात आली. सदरच्या दोन्ही अपीलामधील माहितीचा विषय हा एकच असल्यामुळे दोन्ही अपीलांची सुनावणी एकत्र घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे नमुद केले की, त्यांनी दिनांक १२.१०.२०१० रोजी व दिनांक ११.१०.२०१० रोजी एकच माहितीचा अर्ज दाखल केलेला आहे. एका अर्जामध्ये जनमाहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी यांचेकडे आणि दुसऱ्या अर्जामध्ये जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे माहिती मागितली आहे आणि त्या माहितीमध्ये खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी यांनी श्री. पांडुरंग गणपतराव सपकाळ व श्री. मोहन पुंडलिकराव लोहकरे यांच्या लोकशाही दिनातील तक्रारीची चौकशी केली असल्यास चौकशी अहवालाची सत्यप्रत व इतर कागदपत्रे इत्यादी बाबत एकूण १४ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती अपुर्ण व दिशाभूल करणारी असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही अपेक्षित माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक १२.१०.२०१० रोजी प्राप्त झाला. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सचिव, ग्रामपंचायत, करंभाड, ता. पारशिवनी व खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी यांचे कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज दिनांक २८.१०.२०१० रोजी पाठविला व अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक १३ ची माहिती उपलब्ध करुन दिली व बाकी मुद्यांची माहिती ग्रामपंचायत करभांडशी व पंचायत समिती, पारशिवनी यांचे कार्यालयातून घेणे बाबत अपीलकर्त्यास कळविले.

४.	जनमाहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी यांनी आयोगासमोर सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्यास दिनांक ९.११.२०१० रोजी पंचायत समितीशी संबंधित असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व सदरची माहिती अपीलकर्त्याने प्राप्त केली असल्याची पोच त्यांनी सुनावणीत दाखविली. मात्र याबाबत अपीलकर्त्याने सुनावणीत असे नमुद केले की, त्यांना दिलेली चौकशी अहवालाची प्रत सोबत ज्यांचे बयाण घेतलेले होते त्या बयाणाची प्रत त्यांना मिळालेली नाही. म्हणून आयोगा समोर चौकशी अहवालातील दोन बयाणाच्या प्रती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्या.

५.	तसेच ग्रामपंचायत, करभांडशी संबंधित असलेल्या माहिती बाबत विद्यमान सचिव तथा जनमाहिती अधिकारी, ग्राम पंचायत, करंभाड यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तयार करण्यात आली व त्या माहितीची फी रुपये २५२/- भरण्यासाठी अपीलकर्त्यास दिनांक ३१.१२.२०१० रोजी कळविले. मात्र याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, रुपये २५२/- फी भरण्यासाठी जे कळविण्यात आले त्यामध्ये किती पेजेसची माहिती आहे याचा कोणताही उल्लेख नाही. म्हणून त्यांनी फीचा भरणा केलेला नाही असे अपीलकर्त्याने सांगितले. वास्तविक पाहता अपीलकर्त्यास रुपये २५२/- फी भरण्याबाबत जे कळविण्यात आले त्यामध्ये किती कागदपत्रे आहेत त्याचा उल्लेख करणे आवश्यक होते. मात्र तसे केलेले दिसून येत नाही. म्हणून सुनावणीत सचिव, ग्राम पंचायत यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांनी सुनावणीच्या वेळी आणल्या आहेत. ती संपूर्ण माहिती सचिवांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे आयोगासमोर अपीलकर्त्यास सचिवांनी विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिली.

६.	अपीलार्थीला जी माहिती प्राप्त झालेली आहे त्यामध्ये त्यांचे म्हणणे असे आहे की, खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी यांनी श्री. पांडुरंग गणपत सपकाळ व मोहन पुडलिकराव लोहकरे यांच्या लोकशाही दिनातील तक्रारीतील आरोपात तथ्य नाही असा निष्कर्ष उपमुख्य कार्यपालन अधिकारी यांनी काढलेला आहे तो योग्य नाही. म्हणून त्याबाबत त्यांचा आक्षेप आहे. मात्र माहितीच्या अधिकारामध्ये चौकशी अहवालाच्या

गुणवत्तेबाबत निर्णय देता येत नाही. यासाठी अपीलकर्त्याने सक्षम अधिकाऱ्यांकडे दाद मागणे योग्य होईल. तसेच अपीलकर्त्याने असाही मुद्या मांडला की, शासनाच्या निकषापेक्षा ग्रामपंचायत पाणी कराची आकारणी जास्त करीत आहे. याबाबत सचिव, ग्रामपंचायत यांनी असे नमुद केले की, पाणी पुरवठा करण्यासाठी जलशुध्दीकरण प्लॅन्ट असल्यामुळे पाणी कराची आकारणी ही जादा करण्यात येत आहे व ग्रामसभेतील निर्णयाप्रमाणे जादा पाणी कर आकारण्याचे अधिकार ग्रामपंचायतला असल्यामुळे पाणी कराची जादा आकारणी करण्यात येत आहे. तसेच अपीलकर्त्याचे असेही म्हणणे आहे की, ग्रामपंचायत मध्ये मंजूर आकृतीबंधाप्रमाणे दोनच कर्मचारी भरणे आवश्यक आहे. मात्र ग्राम पंचायतने तीन कर्मचारी नेमले आहे. याबाबत सचिव, ग्रामपंचायत, करंभाड यांनी सुनावणीत असे सांगितले की, ग्राम सभेच्या ठरावाप्रमाणे एक जादा कर्मचारी नेमला आहे. यावरुन असे दिसून येते की, पाणी कराची आकारणी आणि कर्मचारी नेमणूक या ग्रामसभेच्या ठरावाप्रमाणे झालेल्या दिसतात. तथापी याबाबत अपीलकर्त्याने सक्षम अधिकाऱ्यांकडे दाद मागणे योग्य होईल. तसेच अपीलकर्त्याचे पुन्हा असे म्हणणे आहे की, उपमुख्य कार्यपालन अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे जो चौकशी अहवाल सादर झालेला आहे त्याबाबतच्या कार्यवाहीची माहिती त्यांना पाहिजे आहे. म्हणून चौकशी अहवालावर झालेल्या कार्यवाही माहिती उपमुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून उपमुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या चौकशी अहवालावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावा.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७०५/२०१० व अपील क्रमांक १७०६/२०१०.

श्री. रामचंद्र क्रिष्णाजी मारटकर,
अमराई वार्ड, मु. पो. ता. राजुरा,
जि. चंद्रपूर - ४४२ ९०५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

कु. ज्योती प्र. कल्लुरवार,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
आदर्श मराठी प्राथमिक विद्या मंदीर,
ता. राजूरा, जि. चंद्रपूर - ४४२ ९०५.

कु. संगीता लांडे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
आशादेवी मराठी प्राथमिक विद्या मंदिर,
जवाहर नगर वार्ड, ता. राजूरा, जि. चंद्रपूर - ४४२ ९०५. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.३.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये उपरोक्त दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. वर नमुद केलेल्या दोन्ही अपीलांचा विषय हा एकच असल्यामुळे व जनमाहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी हे देखील एकच असल्यामुळे दोन्ही अपीलाची सुनावणी एकत्र घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. दोन्ही जनमाहिती अधिकारी यांचे वतीने श्री. डी. आर. वरघणे, वकील हे हजर आहेत.

... २

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ११.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, आदर्श मराठी प्राथमिक विद्या मंदिर, राजूरा, जि. चंद्रपूर यांचेकडे आणि जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, आशादेवी प्राथमिक विद्या मंदिर, राजूरा जि. चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली दोन अर्ज सादर करुन सन १९९९ ते २००४ एप्रिल पर्यंतचे मुळ शिक्षकवृंद हजेरी रजिस्टरच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन मिळण्याबाबत माहिती मागितलेली होती आणि दुसऱ्या अर्जात सन २००२ ते २००३ व २००३ ते २००४ एप्रिल पर्यंतचे मुळ शिक्षकवृंद हजेरी रजिस्टरच्या छायांकित प्रती प्रमाणित करुन मागितलेले होते. सदरची माहिती त्यांना प्राप्त झाली. मात्र प्राप्त झालेली माहिती ही साक्षांकित करुन मिळाली नाही म्हणून त्यांनी द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणी नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांचे वकीलांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दिनांक ११.८.२०१० चा अर्ज दिनांक ३१.८.२०१० रोजी रजिस्टर पोस्टाने त्यांचेकडे प्राप्त झाला होता. अर्जदाराने मागितलेल्या माहिती बाबत त्यांना हवी असलेली माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी दिनांक १६.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास बोलाविले होते. तसेच माहिती फी भरण्याबाबतही अपीलकर्त्यास कळविण्यात आले होते. मात्र अपीलकर्त्याने माहिती फी भरली नाही व अपीलकर्ता उपस्थित झाले नाही. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याला दिनांक २०.१०.२०१० रोजी प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. ती माहिती अपीलकर्त्यान प्रथम अपीलीय अधिकारी यांचे समक्ष प्राप्त केली. सदरची माहिती अपीलकर्त्याने प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. परंतु सदरची माहिती ही प्रमाणित करुन दिली नाही असे नमुद केले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे वकीलांनी असे सांगितले की, अपीलकर्त्यास रजिस्टर पोस्टाने प्रमाणित केलेली माहिती पाठविली होती. परंतु अपीलकर्त्याने ती स्विकारली नाही. तथापी आयोगासमोर सुनावणीचे वेळी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचे वकीलांनी प्रमाणित माहिती उपलब्ध करुन दिली व सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत करुन समाधान व्यक्त केले म्हणून अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे दोन्ही अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे वर नमुद केलेले दोन्ही अपीले हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७०१/२०१०.**

श्री. सादिक अली रमजान अली,
नयी बस्ती, आझादनगर, टेका,
सलामभाई मिठाई वाले के सामने, नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. रवि काळे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
वेतन पथक, भविष्य निर्वाह निधी कार्यालय,
रविनगर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.३.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्रीमती पतंगे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, वेतन पथक, भविष्य निर्वाह निधी, कार्यालय, रविनगर, नागपूर यांचेकडे फिरोज गांधी हायस्कूल, धम्मदिपनगर, शितला माता चौक, नागपूर या शाळेतील १४ कर्मचाऱ्यांचे वेतन देयकाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे

... २

अनुषंगाने अपीलकर्त्यास माहिती मिळाली माझे समाधान झाले असे अपीलकर्त्याने रोजनाम्यावर लिहून देऊन स्वाक्षरी केली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५/२०११.

श्री. ॲड. गौरीशंकर रामेश्वर रावत,
रेवती अपार्टमेंट, एफ. ए. ४, वाडी नाका समोर,
अमरावती रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. एस. अंबेराव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
तालुका भूमी अभिलेख कार्यालय,
अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.३.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.२.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ८.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.३.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. पी. आर. पाटनकर, नगर भुमापक हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, त्यांनी दिनांक ११.२.२००८ रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, अमरावती यांचेकडे श्री. पलसार दिपक गुप्ता यांनी दिनांक ४.२.२००८ रोजी दाखल केलेल्या हरकत अर्जाची प्रमाणित प्रत व दिनांक

... २

२.२.२००८ रोजी श्री. पलसार दिपक गुप्ता यांनी फेरफार करिता केलेला अर्ज व त्याबाबतच्या कागदपत्रांची मागणी केली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १२.३.२००८ रोजी अधिक्षक, भुमी अभिलेख, अमरावती यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख, अमरावती यांनी व प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, अमरावती यांनी सुनावणीत आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्ता यांनी पुर्वी हयाच माहितीबाबत राज्य माहिती आयुक्त, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचेकडे अपील क्रमांक १०१३/२००८ दाखल केले होते. त्यावेळी राज्य माहिती आयुक्त, अमरावती यांचेकडे सुनावणी होऊन त्यांनी याबाबत दिनांक ४.८.२००९ रोजी निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयात मा. राज्य माहिती आयुक्त, अमरावती खंडपीठ, अमरावती यांनी जनमाहिती अधिकारी यांना असे आदेशित केले होते की, जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, अमरावती यांनी दोन्ही पक्षांना नोटीसेस काढून त्यांचे म्हणणे ऐकून ६ आठवडयांचे आंत निर्णय घेण्याबाबत कळविले होते. मा. राज्य माहिती आयुक्त, अमरावती यांचे आदेशाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणी दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकण्यासाठी दिनांक १६.१२.२००९ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. त्या सुनावणीत अपीलकर्ता हे गैरहजर होते. तथापी गैरअर्जदार हे हजर होते. सुनावणीनंतर गुणवत्तेच्या निकषावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २३.१.२००९ रोजी निर्णय दिलेला आहे व त्या निर्णयामध्ये अपीलकर्त्यास दिनांक ११.३.२००८ रोजी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षांशी संबंधित असल्याने व त्रयस्थ पक्षाने त्यांची माहिती पुरविण्याचा नकार दिलेला असल्यामुळे माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले आहे. तो निर्णय पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी कायम केलेला आहे.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांचेकडील याच विषयाचे अपील राज्य माहिती आयुक्त, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचेकडे अपील क्रमांक १०१३/२००८ दाखल झाले होते आणि त्याचा निर्णय

दिनांक ४.८.२००९ रोजी देण्यात आलेला होता आणि त्या निर्णयातील आदेशाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणी पुन्हा दोन्ही पक्षांना सुनावणीची नोटीस पाठवून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यास संधी उपलब्ध करुन देऊन निर्णय दिनांक २३.१.२०१० रोजी दिलेला आहे. तथापी जनमाहिती अधिकारी यांच्या दिनांक २३.१.२०१० चा निर्णय अपीलकर्त्यास मिळाला नाही असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २३.१.२०१० च्या निर्णयाची प्रत आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. म्हणून मा.राज्य माहिती आयुक्त, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचेकडील अपील क्रमांक १०१३/२००८ मधील दिनांक ४.८.२००९ च्या आदेशाप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी कार्यवाही केली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१९३- १९५/८.३.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७१३/२०१०.**

श्री. के. अशोक रेड्डी,
युटी नं. ३४७८, अंडा बैरक,
नागूपर मध्यवर्ती कारागृह, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नागपूर मध्यवर्ती कारागृह,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
नागपूर मध्यवर्ती कारागृह,
नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.३.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी तर्फे श्री. सुभाष सोळंखे, सहाय्यक माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, अपीलकर्त्याने माहिती अधिकाराखाली अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे सादर करुन कारागृह बंदी म्हणून ठेवण्यात आलेल्या बंदीस्तांच्या आरोग्या संबंधी व तापमानाचे संबंधी माहिती मागितलेली दिसून येते.

३.	सहाय्यक माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्ता हा न्यायाधीन बंदी क्रमांक ३४७८ असून तो आंध्रप्रदेश राज्यातील रहिवासी आहे. त्यास पोलीस स्टेशन, धंतोली, नागपूर यानी अपराध क्रमांक ४९/२००७ कलम १०, १३, २० बेकायदेशीर अधिनियम प्रकरणात दिनांक २५.५.२००७ रोजी दिक्षाभूमी, नागपूर येथे अटक करुन कारागृहात दाखल केले. उक्त बंदयावर वेगवेगळया न्यायालयाचे एकूण २० गंभीर स्वरुपाचे केसेसमध्ये न्यायालयीन कोठडीत दाखल करण्यात आले होते. आज देखील १२ गंभीर स्वरुपाचे केसेस प्रलंबित आहेत. तसेच सहाय्यक माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आणखी असे निदर्शनास आणून दिले की, सदरील अपीलकर्ता न्यायाधिन बंदी क्र. ३४७८ महेश ऊर्फ मुरली ऊर्फ अशोक सत्या रेड्डी हा जहाल (माओवादी) संघटनेचा मुख्य कार्यकर्ता असून त्यांचेवर गडचिरोली, गोंदिया, मध्यप्रदेश येथील नक्षल संबंधित अनेक गंभीर स्वरुपाचेच केसेस प्रलंबित आहेत. सदरील माओवादी बंदी व त्यांचे इतर सह आरोपींना कारागृहाची सुरक्षा अबाधित राहणेसाठी कारागृहातील अतिसुरक्षा विभागात ठेवण्यात आले आहेत. या कारागृहातील प्रशासनाविरुध्द व इतर शासकीय कार्यालयास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत वेगवेगळे स्वरुपाचे अर्ज करुन प्रशासनास विनाकारण अडचणीत आणण्याचे प्रयत्न करतो. ही बाब लक्षात घेऊन यापुर्वी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर येथील अपीलकर्त्याचे अपील क्रमांक ८८५/२००८, ८८६/२००८, ९९५/२००८, ९९६/२००८ दिनांक १७.६.२००९ रोजी निकाल देऊन खारीज केलेले आहे. त्याची प्रत ही श्री. सुभाष सोळंखे यांनी आयोगासमोर सादर करुन निदर्शनास आणून दिले. तसेच अपीलकर्त्याने दिनांक १२.६.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी, नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन निसर्गाशी निगडीत असलेली व तापमानाशी संबंधीत असलेल्या बाबींबाबत माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही आरोग्याशी संबंधित असल्यामुळे ती माहिती प्राप्त करण्यासाठी कारागृहाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त करण्यासाठी २३.८.२०१० रोजी पत्र दिले व त्याची प्रत अपीलकर्त्यास देण्यात आली. तसेच दिनांक १६.१०.२०१० रोजी पुन्हा मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांना माहिती पुरविण्याबाबत विनंती केली. त्याला अनुसरुन मुख्य वैद्यकीय अधिकारी, नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर यांनी त्यांच्या दिनांक १४.१०.२०१० च्या पत्राने आरोग्याशी संबंधीत निगडीत बाबींची माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकड सादर केली. त्यानंतर जनमाहिती यांनी दिनांक १६.१०.२०१० रोजी अपीलकर्त्यास सदरची माहिती

उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच या माहितीमध्ये ज्या मुद्यांची माहिती ही माहितीच्या स्वरुपात उपलब्ध नाही ती देता येत नाही असे देखील कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली माहिती अर्जदारास उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकत्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१९६- १९८/९.३.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६/२०११.

श्री. विश्वास आत्मारामजी क्षिरसागर,
७३ अ + ब सन्मार्गनगर क्रमांक २,
हुडकेश्वर रोड, वार्ड क्र. ५३१, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. सी. सुर्यवंशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक,
भूमी अभिलेख, नागपूर.

श्री. जे. एम. बेंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर भुमापन अधिकारी क्रमांक २,
५ वा माळा, प्रशासकीय इमारत, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.३.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.२.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.३.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगासमोर असे नमुद केले की, त्यांनी दिनांक १२.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर भुमापन अधिकारी क्रमांक २, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन मौजा बिडपेठ, ख. नं. ११/३, न.भु.क्र. १४४२ ची मोजणी दिनांक २३.७.२०१० केली त्याचा नकाशाची प्रत व त्या नकाशांत क्षेत्रफळ दिलेले नाही. त्या क्षेत्रफळाबाबतची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना नकाशाची प्रत मिळाली. मात्र त्या नकाशामधील क्षेत्रफळाची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दा ाल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना क्षेत्रफळाबाबत अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

... २

३. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १२.१०.२०१० चा माहिती अधिकाराचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्तास दिनांक ३.११.२०१० च्या पत्राने नकाशा उपलब्ध करुन दिला. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडील दिनांक १३.१२.२०१० च्या प्रथम अपीलाचे निर्णयानुसार दिनांक २९.१२.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविण्यात आलेले आहे की, खसरा क्रमांक ११/३, नगर भूमापन क्रमांक १४४२ व इतर संबंधित मिळकतीची मोजणी करुन घेतल्यास व मोजणी मेळात बसत नसल्यास आराजी काढून तोंडी कळविण्यात येईल की, ज्यामुळे दुरुस्तीची कार्यवाही करणे शक्य व योग्य अशी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी याबाबत अपीलकर्त्याने असे नमुद केले की, त्यांना नकाशा प्राप्त झालेला आहे. मात्र नकाशाचे क्षेत्रफळाची माहिती त्यांना पाहिजे आहे. म्हणून याबाबत आयोगासमोर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकतर्यास नकाशाचे क्षेत्रफळाची माहिती देण्याचे मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या नकाशातील क्षेत्रफळाची माहिती विनामुल्य द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/१९९- २००/९.३.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७१५/२०१०.

श्री. वासुदेवराव पांडुरंग सातफळे,
गाळा क्र. ८७, ८८, २०३ गाळे, अल्प उत्पन्न गट,
दवलामेटी, ता. जि. नागपूर - ४४० ०२३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. गि. मं. जोशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नागपूर.

श्री. जे. टी. रघुवंशी,
जनमाहिती अधिकारी तथा
मिळकत व्यवस्थापक,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.३.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की, त्यांनी दिनांक २०.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन गाळा क्र. ८७, ८८ ची बाबत एकूण ६ मुद्यांची माहिती मागितलेली

... २

होती आणि माहितीचा कालावधी हा मार्च १९९५ ते फेब्रुवारी २००३ पर्यंत असा होता. त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १५.१०.२०१० रोजी त्यांना माहिती प्राप्त झाली. परंतु प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण दिली. त्यामध्ये त्यांचे टेपरेकॉर्ड जप्तीची माहिती त्यांना मिळाली नाही. तसेच सन १९९५ ते २००३ व्याजाची रक्कम किती आहे त्याची माहिती दिली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दिनांक २६.१०.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना पूर्ण माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दिनांक २०.५.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २६.५.२०१० रोजी रजिस्टर पोस्टाने प्राप्त झाला होता. माहिती अर्जाला अनुसरुन माहितीची फी भरण्यासाठी त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक २२.६.२०१० रोजी पत्र पाठवून माहिती फी रुपये ९/- भरण्याबाबत कळविले होते. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने दिनांक १४.७.२०१० रोजी रुपये ९/- माहितीची फी भरली व त्यानंतर दिनांक १५.१०.२०१० रोजी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. अपीलकतर्याने माहिती फी रुपये ९/- दिनांक १४.७.२०१० रोजी भरल्यानंतरही दिनांक १५.१०.२०१० रोजी माहिती उशिराने कां उपलब्ध करुन दिली याबाबत जनमाहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, माहिती संकलीत करण्यास वेळ लागला. म्हणून माहिती उशिरा उपलब्ध करुन दिली परंतु जनमाहिती अधिकारी यांनी हा केलेला खुलासा समर्थनीय व योग्य दिसून येत नाही. मात्र यावर अपीलकर्त्याने आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती विलंबाने देऊन देखील जनमाहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील मुख्य अधिकारी यांचेकडे केले होते. त्या अपीलाचा निर्णय दिनांक १५.१.२०११ रोजी देण्यात आला. त्यामध्ये माहिती अधिकाऱ्याने अर्जदारानी मागितलेली माहिती पूर्णपणे दिलेले नाही असे मोघम नमुद करुन अपीलाचा निर्णय दिला. वास्तविक पाहता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती पैकी नेमक्या कोणत्या मुद्यांची माहिती मिळाली व कोणत्या मुद्यांची

माहिती मिळाली नाही याचा ऊहापोह करुन प्रथम अपीलाचा निर्णय देणे आवश्यक होते. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय योग्य दिलेला दिसून येत नाही. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची पुन्हा सुनावणी घेऊन अपीलकर्त्यास ज्या मुद्यांची माहिती मिळाली आहे व ज्या मुद्यांची माहिती मिळाली नाही याची खात्री करुन घेऊन प्रथम अपीलाचा निर्णय देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांनी प्रथम अपीलाची पुन्हा सुनावणी घेऊन सविस्तर निर्णय द्यावा.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १५.१०.२०१० रोजी दिलेली माहिती विलंबाने दिलेली असून ती अपूर्ण दिल्याचे दिसून येते. सदरच्या माहितीस विलंब झाल्याबद्दल जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला खुलासा हा समर्थनीय व योग्य दिसून येत नाही म्हणून विलंबाबद्दल ते जबाबदार दिसून येत असल्यामुळे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- शास्ती त्यांचेवर लादण्यात येत आहे.

३) सदरच्या शास्तीची रक्कम मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांनी जनमाहिती अधिकारी यांचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२०१- २०३/९.३.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७१४/२०१०.

श्री. आनंदकर मधुकररावजी मेश्राम,
वार्ड नं. २, नवीन वसाहत, बावलानगर,
बुट्टीबोरी, ता. जि. नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. संजय जाधव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक (प्रशासन),
आयुक्तालय राज्य कामगार विमा योजना,
मा. म. गां. स्मरणी रुग्णालय, ३ रा मजला,
डॉ. एस. एस. राव मार्ग, परेल, मुंबई -४०० ०१२.

श्री. डॉ. अ. मा. श्रीखंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
वैद्यकीय प्रशासन अधिकारी,
राज्य कामगार विमा योजना, विदर्भ विभाग,
इमामवाडा, नागपूर - ४४० ००३. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.३.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २५.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय प्रशासन अधिकारी, राज्य कामगार विमा योजना, विदर्भ विभाग, नागपूर यांचेकडे माहितीच्या

अधिकाराखाली अर्ज सादर करुन एकूण १७ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्या माहितीबाबत फी भरणा करण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १६.९.२०१० रोजी त्यांना माहिती फी रुपये १५७९६/- भरणा करण्याबाबत कळविले. मात्र सदरच्या माहितीची फी जास्त असल्यामुळे त्यांनी मागितलेल्या माहिती पैकी ज्या माहितीची त्यांना आवश्यकता आहे त्याचीच फी ते भरण्यास तयार आहेत. कारण मागितलेल्या १७ मुद्यांतील काही मुद्यांमध्येच छायांकित प्रती मागितल्या होत्या. म्हणून मागितलेल्या छायांकित प्रती कशा कशाच्या आहेत याची यादी पुरविण्यात यावी असे त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना दिनांक २७.९.२०१० च्या पत्राने कळविले. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी नेमकी माहिती कोणत्या झेरॉक्स प्रतीची आहे हे कळविले नाही म्हणून त्यांनी माहितीची फी भरलेली नाही. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे सुनावणीला त्यांना बोलाविण्यात आले नाही आणि त्यांचे म्हणणे ऐकून न घेता अपील फेटाळण्यात आले असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे दिनांक ३०.८.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही १० वर्षाची होती. म्हणून सदरच्या माहितीचे स्वरुप मोठे असल्यामुळे ती माहिती संकलीत करण्यात आली व त्या माहितीची होणारी फी भरणा करण्यासाठी अपीलकर्त्यास दिनांक १६.९.२०१० च्या पत्राने कळवून माहिती फी रुपये १५७९६/- भरणा करण्याबाबत कळविले. मात्र अपीलकर्त्याने माहिती फी भरली नाही. तसेच प्रथम अपीलाचा निर्णयानंतरही अपीलकर्त्याने माहितीची फी भरणा केलेली नाही म्हणून अपीलकत्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही.

४. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणखी असे आणून दिले की, अपीलकर्ता हा त्यांच्या कार्यालयामध्ये नौकरीवर कार्यरत आहे आणि कार्यालयातील अधिकाऱ्यांना त्रास देण्याचे हेतुने तो सतत माहिती अधिकाराखाली माहिती मागत असतो. इतकेच नव्हेतर बीपीएल खालील लोकांना देखील त्यांच्या कार्यालयातील माहिती मागण्यासाठी प्रवृत्त करीत असतो. याबाबत अपीलकर्त्याने असे नमुद केले की, माहिती अधिकाराखाली माहिती मागण्यामध्ये अधिकाऱ्यांना कोणताही त्रास देण्याचा त्यांचा हेतु नाही. एक नागरीक म्हणून ते त्यांना माहिती अधिकाराखाली माहिती मागितलेली आहे असे अपीलकर्त्याने आयोगासमोर नमुद केले.

५.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती पैकी त्यांना ज्या माहितीची आवश्यकता आहे त्याच माहितीचे ते फी भरण्यास तयार आहेत. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास रेकॉर्डचे निरिक्षण करु द्यावे आणि निरिक्षणानंतर अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या माहितीच्या छायांकित प्रतीची फी भरुन घेऊन अपीलकर्त्याने फी भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल आणि रेकॉर्डचे निरिक्षण करण्याबाबत अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर संमती दिली. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.३.२०११ रोजी सकाळी ११:०० वाजता जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे निरिक्षण करुन घ्यावे व निरिक्षणानंतर त्यांना ज्या माहितीची आवश्यकता आहे त्यांच्या छायांकित प्रतीची फी भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी. यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८.३.२०११ रोजी अपीलकर्त्यास रेकॉर्डचे निरिक्षण करण्यासाठी आवश्यक तो रेकॉर्ड उपलब्ध करुन द्यावा व अपीलकर्त्याने फी चा भरणा केल्यानंतर आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास ७ दिवसांत उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-	दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७२७/२०१०.**

श्री. कृष्णा नागोराव पाटील,
कौशल्यायन नगर, वार्ड नं. १०६,
पो. भगवाननगर, नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जे. डी. जांभुळकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प संचालक,
स्लम विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. ए. बी. कडू,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअभियंता, स्लम विभाग,
धंतोली झोन क्र. ४,
महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.३.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता स्लम विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अतिक्रमणाबाबत माहिती मागितलेली दिसून येते.

... २

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी सदर प्रकरणी माहिती मिळाली असल्याचे कबुल केले व अपील मागे घेत असल्याचे तोंडी सांगितले असून रोजनाम्यावर अपीलकर्त्याने स्वाक्षरी केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७३०/२०१०.

श्री. नितीन गोवर्धन कापसे,
मनोहर चौक, गांधी वार्ड क्र. २२,
साईनाथ दुग्ध डेअरीच्या मागे,
ता. जि. गोंदिया - ४४१ ६०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
प्रशासकीय इमारत क्र. २, नागपूर विभाग, नागपूर.

श्री. जी. पी. मोहबंशी,
जनमाहिती अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
पतंगा मैदान, ता. जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.३.२०११)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. किशोर भोयर, समाज कल्याण अधिकारी गट-ब हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी अपीलकर्त्याने द्वितीय अपीलासोबत जोडलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, त्यांनी दिनांक १३.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा विशेष समाज कल्याण, गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा

... २

खाली अर्ज सादर करुन दिनांक २९.४.२०१० रोजी शिपाई पदाच्या परीक्षा घेण्यात आल्या होत्या. त्या परिक्षेत निवड झालेले उमेदवार श्री. योगेश इस्तारी हजारे, रोल नं. पी-७६ व श्री. शैलेषकुमार तुकाराम उजवणे, रोल नं. पी-१२६ या दोन्ही उमेदवारांनी सोडविलेल्या उत्तर पत्रिका व प्रश्न पत्रिका मागितलेली दिसून येते. तथापी त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील त्यांचे निकाली काढल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी तथा विशेष समाज कल्याण अधिकारी गोंदिया यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १३.८.२०१० चा माहिती अधिकाराखालील अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदर अर्जात अपीलकर्त्याने त्यांचे कार्यालया मार्फत दिनांक २९.४.२०१० रोजी शिपाई पदाच्या निवडीसाठी परिक्षा घेतण्यात आली होती. त्या परिक्षेमध्ये उत्तीर्ण होऊन निवड झालेले श्री. योगेश ईस्तारी हजारे व श्री. शैलेषकुमार तुकाराम ऊजवणे या दोघांनी सोडविलेल्या प्रश्न पत्रिका व उत्तर पत्रिकेच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(सी) अन्वये देता येत नाही म्हणून अपीलकर्त्यास दिनांक ८.९.२०१० च्या पत्राने लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका किंवा सोडविलेल्या उत्तरपत्रिका देता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविण्यात आले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचेकडील दिनांक ७.४.२००७ च्या निर्णयाची प्रत आयोगाचे निदर्शनास आणून देऊन असे नमुद केले की, यापुर्वी मुख्य माहिती आयोगांनी कोणत्याही उमेदवारास उत्तर पत्रिका उपलब्ध करुन देता येत नाही असा निर्णय दिलेला आहे व त्या निर्णयाची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिली.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा प्रथम अपील अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दाखल झालेला होता. त्यानुसार प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली होती. त्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. जनमाहिती अधिकारी व अपीलकर्ता यांचे म्हणणे ऐकून घेऊन दिनांक २९.१०.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देऊन मा. मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचेकडील अपीलाचा संदर्भ देऊन अपीलकर्त्याने मागितलेली माहिती माहितीच्या अधिकारात येत नाही असा आदेश करुन प्रथम अपील निकाली काढल्याचे सुनावणीत नमुद केले.

५. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडील दिनांक १३.८.२०१० च्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन दिनांक ८.९.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी मा. मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांनी दिलेला दिनांक ७.४.२००७ च्या निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, परीक्षेच्या संबंधात प्रश्न पत्रिका व गुणपत्रिका हे उपलब्ध करुन देता येत नाही. कारण त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित दिसून येत नाही असे त्यांनी निकाल पत्रात नमुद केले आहे. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार अपीलकर्त्यास प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देता येत नाही हे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य दिसून येते. तथापी शिपाई पदासाठी अंतिमरित्या निवड केलेल्या उमेदवाराला मिळालेले गुण, गुणवत्ता यादीची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ताचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास शिपाई पदासाठी अंतिमरित्या गुणवत्तानुक्रमाने निवड केलेल्या उमेदवारांची यादी व त्यांना मिळालेले गुण अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२०९- २११/११.३.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७२९/२०१०.

श्री. सुभाष हरिश्चंद्रजी कापगते,
मु. रेंगेपार/कोहळी, पो. पिंपळगांव/सडक,
ता. लाखनी, जि. भंडारा - ४४१ ८०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
विकास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,
खरबी (नाका) पो. ठाणा (पेट्रोल पंप), जवाहरनगर,
ता. जि. भंडारा - ४४१ ९०६. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.३.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. नरेश जिभकाटे, वकील हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. येरणे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २९.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विकास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, खरबी नाका, ता. जि. भंडारा यांचेकडे माहितीच्या

... २

अधिकाराखाली अर्ज सादर करुन कु. जी. एस. बोरकर, तत्कालीन सहाय्यक शिक्षिका यांचेबाबत दिनांक १.१०.१९८९ ते ३०.६.१९९२ या कालावधीचे शिक्षक हजेरी पटाची सत्यप्रत, वार्षिक तपासणी अहवाल, संस्थेने दिलेले त्या कालावधीचे नियुक्ती पत्र, त्यांचे पगार वाटप रजिस्टरची सत्यप्रत इत्यादी माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी दिनांक ७.९.२०१० च्या पत्राने त्यांना असे कळविले की, आपण मागितलेली माहिती २० वर्षावरील असून फारच जुनी आहे म्हणून सदर माहितीचा शोध घेणे सुरु आहे. माहिती मिळाताच आपणास कळविण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले होते. मात्र अद्यापपर्यंत जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. तसेच प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना प्रथम अपीलाचा निर्णय मिळाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेवतीने श्री. जिभकाटे, वकील यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २९.७.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज पोस्टाद्वारे त्यांचेकडे दिनांक ११.८.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही २० वर्षापेक्षा जास्त कालावधीची असल्यामुळे तिचा शोध घेणे सुरु केले आणि माहितीचा शोध घेणे सुरु असून माहिती मिळताच ती अपीलकर्त्यास पुरविण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ७.९.२०१० च्या पत्राने कळविले होते. तसेच वकीलांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात कु. जी. एस. बोरकर, तत्कालीन सहाय्यक शिक्षिका यांची माहिती मागितलेली होती. तथापी सदरची शिक्षिका ही १९९२ मध्येच त्यांच्या हायस्कूलची नौकरी सोडून गेली आहे. त्याच्या बाबत सन १९८९ पासून माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती २० वर्षापेक्षा जास्त कालावधीची असल्यामुळे त्या माहितीचा शोध घेण्यात आला. परंतु शोध घेऊनही अपीलकर्त्याने मागितलेली माहिती फार जूनी असल्यामुळे ती माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून पुन्हा अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २३.९.२०१० च्या पत्राने असे कळविले की, कु. गिता शिवराम बोरकर यांची मागितलेली माहिती ही डी वर्गीकरणाची असल्यामुळे व २० वर्षाच्या पुर्वीची असल्यामुळे संबंधित रेकॉर्ड जतन करुन ठेवण्यात आलेला नाही. त्यामुळे माहिती पुरविता येत नाही असे अपीलकर्त्यास दिनांक

२३.९.२०१० च्या पत्राने पोस्टाद्वारे अपीलकर्त्यास कळविण्यात आले होते. मात्र अपीलकर्त्यास पोस्टाने सदरचे पत्र प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत आयोगासमोर नमुद केले. म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचे वकीलांनी दिनांक २३.९.२०१० च्या पत्राची प्रत आयोगासमोर उपलब्ध करुन दिली.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचे तर्फे श्री. येरणे, अधिक्षक यांनी सुनावणीत आयोगासमोर असे सांगितले की, अपीलकर्त्याचा प्रथम अपीलाचा अर्ज शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. मात्र सदरचा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. वास्तविक पाहता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) प्रमाणे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, भंडारा यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन ३० दिवसांचे आंत प्रथम अपीलाचा निर्णय देणे आवश्यक होते. मात्र शिक्षणाधिकारी यांनी माहिती अधिकारान्वये त्यांचेकडे सोपविलेली जबाबदारी पार पाडलेली दिसून येत नाही. म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याची पुनरावृत्ती करु नये अशी समजही त्यांना देण्यात येत आहे.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्या नंतर प्रस्तु प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही २० वर्षाची जुनी असल्याचे दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी या माहितीचा शोध घेऊनही त्यांना अपीलकर्त्याने मागितलेली माहिती मिळालेली नाही. म्हणून याबाबत जनमाहिती अधिकारी यांचे वकील व अपीलकर्ता यांचे संमतीने असे ठरविण्यात आले की, दिनांक २५.३.२०११ रोजी ११:०० ते ५:०० या कालावधीत अपीलकर्ता यांनी शाळेत उपस्थित राहून शाळेमध्ये उपलब्ध असलेल्या रेकॉर्डचे निरिक्षण करुन घ्यावे. त्यासाठी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेला रेकॉर्ड निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याचे जनमाहिती अधिकारी यांचे वकीलांनी आयोगासमोर मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून दिनांक २५.३.२०११ रोजी अपीलकर्त्या यांनी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विकास हायस्कूल व कनिष्ठ कला महाविद्यालय, खरबी (नाका), ता. जि. भंडारा यांचे कार्यालयात रेकॉर्डचे निरिक्षण करण्यासाठी ११:०० ते ५:०० वाजेच्या दरम्यान उपस्थित राहावे व अपीलकर्ता रेकॉर्ड निरिक्षणासाठी आल्यानंतर जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्यास त्यांचे शाळेकडे उपलब्ध असलेला रेकॉर्ड निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे. रेकॉर्डचे निरिक्षणानंतर अपीलकर्त्याला हवी असलेली माहिती मिळाल्यास त्याची प्रत अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी उपलब्ध करुन द्याव्यात व रेकॉर्डचे निरिक्षण केल्याबाबतचा अहवाल अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचेकडे लेखी स्वरुपात द्यावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२१२- २१५/११.३.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७५९/२०१०.**

श्री. सुनील जॅकब,
यीशु हाऊस, ६४०/ बी,
एन.आर.सी.डी.सी. कॉलोनी,
खलाशी लेन, मोतीबाग, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
विद्युत वितरण कंपनी,
प्रकाश भवन, लिंक रोड, सदर,
नागपूर - ४४० ००१.

श्री. जी. टी. सोरते,
जनमाहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
एमआरएस, गोविंद भवन, कडबी चौक,
कामठी रोड, नागपूर - ४४० ००४. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.३.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक २०.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, विद्युत वितरण कंपनी, कडबी चौक यांचेकडे एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १८.३.२०१० रोजी कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे निवेदन सादर करुन सदर प्रकरणी माहिती मिळाली असून अपील मागे घेत आहे असे लिहून दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-		दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७७९/२०१०.

श्री. सय्यद मो. अली शेर अली,
गांधी चौक, मच्छीसाथ, कन्हान,
ता. पारशिवनी, नागपूर - ४४१ ४०१. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विलास कोलते,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नागपूर - ४४० ००१.

श्री. सी. एन. सलामपुरे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक, जिल्हा परिषद, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.३.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.२.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २४.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी आयोगापुढे माहिती दिली असल्यामुळे समाधान झाले असल्याचे तोंडी सांगितले व रोजनाम्यावर स्वाक्षरी केली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२१८/२४.३.२०११

# १८ एप्रिल, २०११

# ते

# २८ एप्रिल, २०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९६/२०११.

श्री. मनोहर धकाते,
अंचलेश्वर वार्ड, ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. नंदकिशोर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य वनसंरक्षक (कार्मिक),
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय,
वन भवन, सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. सुधाकर गेडाम,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी (कक्ष - ९),
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय,
वन भवन, सिव्हील लाईन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.४.२०११)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २९.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कक्ष-९), प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन भारतीय वन सेवा व महाराष्ट्र वनसेवा या संवर्गात कार्यरत असलेल्या विविध पदावर स्थानापन्न अधिकाऱ्यांनी केलेल्या अनियमिततेबाबत दोषारोप पत्राची माहिती मागितलेली होती. तसेच या अधिकाऱ्यांच्या

... २

मालमत्ता पत्राची माहिती मागितलेली होती तसेच माहिती आयोग यांचेकडून दंड करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती इत्यादीबाबत त्यांनी ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २४.८.२०१० च्या पत्रान्वये १ ते ४ मुद्यांबाबत खुलासा करुन माहिती देण्यास नकार दिला म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) यांचेकडे दाखल केले. तथापी प्रथम अपीलाचे निर्णयानतर त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २९.७.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २.८.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने वर नमुद केल्याप्रमाणे एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन दिनांक २४.८.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास एकूण ४ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलकत्याने मुद्या क्रमांक १ मध्ये भारतीय वनसेवा व महाराष्ट्र वनसेवा या संदर्भात कार्यरत अधिकाऱ्यां विरुध्द विभागीय चौकशी बाबत शिस्तभंगाचे सुरु असलेल्या प्रकरणात शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले दोषारोप पत्र व त्या सोबतची इतर माहिती मागितली. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(एच) नुसार सदर प्रकरणी चौकशीची कार्यवाही सुरु असल्याने सदर चौकशीचा निकाल होईपर्यंत या संदर्भातील दस्तऐवज देता येणार नाही असे कळविले आहे. तसेच मुद्या क्रमांक २ व ३ बाबत अधिकाऱ्यांच्या मालमत्तेच्या विवरणाबाबत माहिती मागितलेली होती. सदारची माहिती शासन स्तरावर सादर होत असल्यामुळे शासनाकडून ती माहिती प्राप्त होऊ शकेल असे अपीलकर्त्यास कळविलेले आहे. मुद्या क्रमांक ४ बाबत माहिती आयोगाने ज्यांचे विरुध्द दंडाची कार्यवाही करण्यात आलेली आहे त्यांची माहिती अपीलकर्त्यास देण्यात आलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २४.८.२०१० च्या पत्राने माहिती प्राप्त झ ालेली आहे असे त्यांनी मान्य केले. मात्र ज्या अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीचे दोषारोप पत्र सादर केलेले आहे त्याची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते. तथापी अपीलकर्त्याने अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशीचे संदर्भात दोषारोप पत्राबाबत माहिती मागितलेली होती. परंतु ज्या अधिकाऱ्यांची विभागीय चौकशीचे प्रकरणात आवश्यक दस्तऐवज शासनास सादर केलेले आहे त्या प्रकरणी अद्याप निर्णय न झाल्याने सदर दोषारोपांच्या प्रती व शासनास त्या अनुषंगाने पाठविलेल्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास पुरविणे योग्य होणार नाही. कारण त्यामुळे चौकशीवर विपरीत परिणाम होईल ही बाब लक्षात घेऊन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) (एच) प्रमाणे देता येत नाही असे कळविले आहे ते योग्य आहे. तसेच मुद्दा क्रमांक २ व ३ ची माहिती शासन स्तरावरची असल्याने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे ती माहिती उपलब्ध नाही व मुद्दा क्रमांक ४ बाबत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे नमुद करुन प्रथम अपीलाचा निर्णय दिल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशीच्या संदर्भात मागितलेल्या दोषारोप पत्राच्या प्रती व शासनास सादर केलेल्या पत्राच्या प्रती उपलब्ध करुन देणे योग्य होणार नाही. कारण शासन स्तरावर त्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) (एच) नुसार सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे योग्य होणार नाही. कारण त्यामुळे चौकशीवर विपरीत परिणाम होईल. तसेच मुद्दा क्रमांक २ व ३ बाबत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उत्तर पाठविलेले असून मुद्दा क्रमांक ४ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणून अपील खारीज करण्यात येत आहे.

... ४

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४/२०११ व अपील क्रमांक ९५/२०११.

श्री. मनोहर धकाते,
अंचलेश्वर वार्ड, ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. जे. गजराज,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय,
वन भवन, सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. गणेश तानुजी कऱ्हाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी (कक्ष - १३),
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय,
वन भवन, सिव्हील लाईन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.४.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये वर नमुद केलेले २ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. दोन्ही अपीलामध्ये अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे दोन्ही अपीलाची एकत्र सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. **अपील क्रमांक ९४/२०११** मध्ये अपीलकर्ता यानी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १५.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कक्ष-१३) प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय,

... २

नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री. सुधाकर गंगाराम गेडाम यांचेबाबत १ ते ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून मुद्या क्रमांक १ ची माहिती मिळाली नाही. परंतु त्याबाबत त्यांना श्री. सुधाकर गंगाराम गेडाम यांचे सेवापुस्तकामधील वरिष्ठ लिपिक पदावर सामावून घेतलेल्या बाबतच्या नोंदीची झेरॉक्स प्रत मिळाली. तसेच मुद्या क्रमांक २ ची माहिती अपूर्ण मिळाली. मुद्या क्रमांक ३ ची माहिती मिळाली. मुद्या क्रमांक ४ ची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ६.१२.२०१० रोजी प्रशासकीय अधिकारी, प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही अपेक्षित माहिती त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १५.९.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक २३.९.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व माहितीचे शुल्क भरण्याबाबत अपीलकर्त्यास दिनांक १८.१०.२०१० च्या पत्राने कळविण्यात आले. त्यानुसार अपीलकर्त्याने दिनांक ११.११.२०१० रोजी माहितीचे शुल्क भरले व त्याच दिवशी म्हणजे दिनांक ११.११.२०१० च्या पत्राने माहिती पाठविली. अपीलकर्त्यास सदरची माहिती प्राप्त झाल्याचे मान्य केले. मात्र मुद्या क्रमांक २ मधील श्री. सुधाकर गंगाराम गेडाम यांची बंधपत्राची प्रत त्यांना मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले. तसेच मुद्या क्रमांक १ बाबत त्यांना आदेशाची प्रत मिळाली नाही. याबाबत अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्यास श्री. सुधाकर गंगाराम गेडाम यांना सामावून घेतल्याबाबत त्यांच्या सेवापुस्तकात नोंद आहे त्या सेवापुस्तकाची नोंदीची प्रत त्यांना पुरविण्याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला होता. त्यानुसार त्यांना सेवापुस्तकाच्या झेरॉक्स प्रती दिलेल्या आहेत. तसेच श्री. सुधाकर गंगाराम गेडाम यांचे बंधपत्र त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही असे देखील जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून श्री. सुधाकर गंगाराम गेडाम यांचे बंधपत्र उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येते.

४. **<u>अपील क्रमांक ९५/२०११</u>** मध्ये अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २२.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कक्ष-१३) यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन दिनांक १.४.१९९२ पासून आजपर्यंत झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या कार्यवृत्तांताच्या प्रमाणित झेरॉक्स प्रती पुरविण्याबाबत माहिती मागितलेली होती. त्यामध्ये मुद्दा क्रमांक १ शिपाई पदावरुन नाईक, दप्तरी, रेनिओ ऑपरेटर तसेच मुद्दा क्रमांक २ वर्ग-४ ड मधील कर्मचाऱ्यांची लिपिक, लेखापाल या पदावर पदोन्नती झाल्याबाबत विभागीय पदोन्नती समितीच्या कार्यवृत्तांताच्या प्रती मागितल्या होत्या. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक १ बाबत दिनांक २७.१२.२००७, दिनांक ३०.१०.२००७ व दिनांक ५.४.२००९ च्या कार्यवृत्तांच्या प्रती दिल्या व मुद्दा क्रमांक २ मधील माहिती बाबत दिनांक २.२.२००५ व दिनांक २९.१०.२००७ च्या कार्यवृत्तांताच्या प्रती दिल्या. तथापी सदरची माहिती पूर्ण दिली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयात जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा पुनःश्च शोध घेऊन अपीलकर्त्यास माहिती देण्यात यावी असे नमुद केले. तरी देखील त्यांना १९९२ ते २००० मधील प्रती मिळालेल्या नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

५. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.९.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २७.९.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व माहितीचे शुल्क रुपये ७१/- भरण्याबाबत अपीलकर्त्यास दिनांक २१.१०.२०१० च्या पत्राद्वारे कळविण्यात आले. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क मनीऑर्डर द्वारा दिनांक ११.११.२०१० रोजी प्राप्त झाले व त्याच दिवशी म्हणजे दिनांक ११.११.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास मुद्दा क्रमांक १ व २ ची माहिती त्यांचेकडे जी उपलब्ध होती ती पुरविण्यात आली. तथापी अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.१२.२०१० रोजी देण्यात आला व त्यामुध्य पुनःश्च दस्तऐवज आवश्यक तो तपास घेऊन अपीलकर्त्यास माहिती पुरविण्याचे आदेश दिले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. प्रथम अपीलाचे निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी पुनःश्च माहितीचा शोध घेतला व त्यामध्ये सन २००० ते २००५ या कालावधीतील उपलब्ध झालेली माहिती पृष्ठ

... ४

क्रमांक १ ते ४८ अपीलकर्त्यास दिनांक २३.१२.२०१० च्या पत्राने पुन्हा उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत आयोगापुढे मान्य केले. तथापी सन १९९२ ते २००० ची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले. याबाबत जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, सन २००० पुर्वी शिपाई पदावरुन नाईक, दप्तरी, रेनिओ ऑपरेटर, लिपिक, लेखापाल या पदासाठी विभागीय पदोन्नती समितीची सभा झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे त्याचे कार्यवृत्तांत उपलब्ध नाही.

६. प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर सन २००० पुर्वी शिपाई पदावरुन नाईक, दप्तरी, रेनिओ ऑपरेटर, लिपिक, लेखापाल या पदासाठी विभागीय पदोन्नतीची सभा झाल्याचे दिसून येत नाही अशी वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ताचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ९४/२०११ हे अशंतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास श्री. सुधाकर गंगाराम गेडाम यांचे बंधपत्र त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे विनामुल्य लेखीपत्राद्वारे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळवावे.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ९५/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी सन २००० पुर्वी शिपाई पदावरुन नाईक, दप्तरी, रेनिओ ऑपरेटर, लिपिक, लेखापाल या पदासाठी विभागीय पदोन्नती समितीची सभा झाल्याचे दिसून येत नाही असे अपीलकर्त्यास स्पष्टपणे विनामुल्य लेखी पत्राद्वारे कळवावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२२४-२२७/१८.४.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९८/२०११.

श्री. खेमलाल नामाजी बावनकर,
चंद्रशेखर आझाद वार्ड, श्रीनगर,
मोठया विहिरीजवळ, ता. जि. गोंदिया - ४४१ ६०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. जी. पी. मोहबंशी,
जनमाहिती अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
पतंगा मैदान, ता. जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.४.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. डी. एस. लांजेवार, लेखाधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा विशेष समाज कल्याण अधिकारी, गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन दिनांक २९.४.२०१० रोजी झालेली शिपाई पदाची परीक्षेबाबत एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना आवेदन पत्राची प्रत मिळाली नाही. तसेच उत्तरपत्रिकाची प्रत मिळालेली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल

... २

केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.१०.२०१० रोजी देण्यात आला व त्यामध्ये अपीलकर्त्यास मुद्दा क्रमांक १ ची माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच मुद्दा क्रमांक २ संदर्भात उत्तरपत्रिका हया गोपनीय असतात म्हणून देता येत नाही व मुद्दा क्रमांक ३ ची माहिती अपीलकर्त्यास मिळाली आहे असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला होता. मात्र अपेक्षित माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १.९.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला व त्याला अनुसरुन दिनांक ३०.९.२०१० रोजी ३ मुद्यांची माहिती पाठविली. त्यामध्ये मुद्दा क्रमांक १ बाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (ञ) प्रमाणे माहिती देता येत नाही असे कळविले होते. तसेच मुद्दा क्रमांक २ बाबत देखील माहिती कलम ८ (ञ) प्रमाणे देता येत ाही असे कळविले होते व मुद्दा क्रमांक ३ बाबत श्री. योगेश ईस्तारी हजारे आणि श्री. शैलेषकुमार तुकाराम उजवणे यांनी रुजू होतांना सादर केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या प्रती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्या होत्या. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय सुनावणी घेऊन दिनांक ३०.१०.२०१० रोजी देण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधीनी सुनावणीत नमुद केले व जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगास असेही निदर्शनास आणून दिले की उत्तरपत्रिकाची प्रत ही गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे ती प्रत देता येत नाही.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मुद्दा क्रमांक १ मध्ये श्री. शैलेशकुमार तुकाराम उजवणे व श्री. योगेश ईस्तारी हजारे यांनी शिपाई पदासाठी जे आवेदन पत्र दाखल केले आहे त्याची प्रत मागितलेली आहे. सदरच्या आवेदन पत्राची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. कारण त्यामध्ये कोणत्याही प्रकारची कागदपत्रे ही गोपनीय प्रकारची असू शकत नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (ञ) प्रमाणे आवेदन पत्राची प्रत देता येत नाही हा जनमाहिती अधिकारी यांनी काढलेला निष्कर्ष चुकीचा

आहे. तसेच उमेदवारांनी सोडविलेल्या उत्तर पत्रिका ही गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे त्याची प्रत उपलब्ध करुन देता येणार नाही हे प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य दिसून येते. तसेच मुद्या क्रमांक ३ बाबत श्री. शैलेशकुमार तुकाराम उजवणे व श्री. योगेश ईस्तारी हजारे यांनी सेवेत रुजू होतांना दाखल केलेले डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्राची प्रत दिलेली आहे. मात्र त्यानंतरही दोन्ही उमेदवारांनी सिव्हील सर्जन यांचेकडून वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे नमुद केले. म्हणून सिव्हील सर्जन यांचेकडून प्राप्त झालेले प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे संयुक्तिक हाईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास श्री. शैलेशकुमार तुकाराम उजवणे व श्री. योगेश ईस्तारी हजारे यांनी शिपाई पदासाठी भरलेल्या आवेदन पत्राची छायांकित प्रती विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच या दोन्ही उमेदवारांनी त्यांचे कार्यालयाकडे दाखल केलेले सिव्हील सर्जन यांचे वैद्यकीय प्रमाणपत्राची प्रत देखील व्यक्तिशः अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्याव्यात. वर नमुद केलेल्या प्रती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२२८-२३०/१८.४.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९२/२०११ व अपील क्रमांक ९३/२०११.

श्री. मनोहर धकाते,
अंचलेश्वर वार्ड, ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विश्वजीत मित्र,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी,
(मुख्यालय व नियोजन)
वनसंरक्षक कार्यालय,
चंद्रपूर वनवृत, चंद्रपूर - ४४२ ४०१.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
वनसंरक्षक कार्यालय,
चंद्रपूर वनवृत, चंद्रपूर - ४४२ ४०१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.४.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये २ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. दोन्ही अपीलामध्ये अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे दोन्ही अपीलाची एकत्र सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे आजारी असल्यामुळे त्यांच्यावतीने श्रीमती नम्रता बागेश्वर, लेखापाल हे हजर आहेत.

२.	**अपील क्रमांक ९२/२०११** मध्ये अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २०.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन जाती वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे पदावन्नतीबाबत २ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना मुद्या क्रमांक १ ची माहिती उशिरा प्राप्त झाली. मात्र मुद्या क्रमांक २ ची माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक २८.१०.२०१० रोजी दाखल केले. परंतु प्रथम अपीलाचे निर्णयानंतर त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

३.	जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधीने आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २०.९.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा अभिलेखागारात शोध घेण्यात आला व शोध घेऊन अपीलकर्त्यास दिनांक ३.११.२०१० च्या पत्राने माहिती पाठविली. दिनांक ३.११.२०१० च्या पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. मात्र सदरची माहिती ३० दिवसाचे आंत उपलब्ध करुन दिली नाही व पाठविलेली माहिती ही अपूर्ण होती. म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २८.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता उपस्थित झाले नाही म्हणून प्रथम अपील खारीज करण्यात आले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधीनी आयोगास सांगितले.

४.	जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे आणखी असे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध सुरु होता. त्यानंतर अपीलकर्त्यास पुन्हा दिनांक ७.४.२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास सुधारित माहिती मुद्या क्रमांक १ व २ ची पाठविण्यात आली. सदरची माहिती देखील अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र मुद्या क्रमांक २ ची माहितीबाबत त्यांना सर्व प्रवर्गातील म्हणजे अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यामधील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती मागितलेली होती. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी फक्त अनुसुचित जमातीच्या कर्मचाऱ्यांची माहिती दिली. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचेवतीने उपस्थित असलेले

प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्यास फक्त अनुसुचित जमातीच्या कर्मचाऱ्याची माहिती पाहिजे आहे असे जनमाहिती अधिकारी यांचा समज झाला. म्हणून त्यांनी अनुसुचित जमाती कर्मचाऱ्याची माहिती दिली आहे. तथापी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांची मुद्या क्रमांक २ ची माहिती पाहिजे असल्यामुळे त्यांना ती पुरविणे संयुक्तिक होईल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

५. **अपील क्रमांक ९३/२०११** मध्ये अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २२.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यलय अधिक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन महाराष्ट्र शासन, महसलू व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अ.शा.पत्र दिनांक २६.१०.१९८७ नुसार मुख्य लिपिक व लेखापालाची पदे भरण्याविषयी दिलेल्या सुचनांचे पालन केल्याबाबत १ ते ५ मुद्यांची माहिती मागितलेली होती. यामुद्यांमध्ये मुख्यतः मुख्य लिपिक व लेखापाल या पदाबाबत माहिती मागितलेली होती. तथाप त्यांना ३० दिवसांचे आंत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विभागीय वन अधिकारी (मुख्यालय) वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. परंतु त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याने आयोगा पुढे सुनावणीत नमुद केले.

६. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक यांचे वतीने उपस्थित झालेले प्रतिनिधी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २२.९.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही वरिष्ठ कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी सदरचा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष-१० अ, प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचेकडे दिनांक ३०.१०.२०१० च्या पत्राने हस्तांतरण केला. त्यानंतर त्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना अवगत नाही. तथापी अपीलकर्ता यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष-१३, प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचे कार्यालयाने दिनांक

२.१२.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचेकडे पत्र पाठवून अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जातील मुद्या क्रमांक १, २ व ४, ५ ची माहिती आपलेच कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे सदरची माहिती अर्जदारास आपणकडूनच पाठविणे अपेक्षित आहे. तसेच मुद्या क्रमांक ३ ची माहिती या कार्यालयातील अभिलेख्याची पडताळणी करुन उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास पाठविण्यात येईल असे प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर कार्यालयाने कळविल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे सुनावणीत सांगितले. तथापी प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचे कार्यालयाकडील दिनांक २.१२.२०१० चे पत्र चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाले नसल्याचे श्रीमती नम्रता बागेश्वर यांनी आयोगापुढे सांगितले.

७. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते. तथापी अपीलकर्ता सुनावणीस उपस्थित राहिले नाही म्हणून त्यांचे अपील हे खारीज केल्याचे त्यांनी नमुद केले.

८. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.९.२०१० चा माहितीचा अधिकाराखालील अर्ज जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षकयांनी दिनांक ३०.१०.२०१० च्या पत्राने प्रथमतः कक्ष अधिकारी कक्ष-१० अ, प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचे कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांचेकडे पाठविलेला होता. सदरच्या अर्जावरती त्यांनी ३० दिवसांचे आंत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यानंतर प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचे कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २.१२.२०१० च्या पत्राने पुन्हा सदरचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचेकडे पाठविलेला दिसतो. परंतु अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील केवळ अपीलकर्ता सुनावणीत गैरहजर आहे म्हणून अपील खारीज केलेले आहे असे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होणे आवश्यक असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) **अपील क्रमांक ९२/२०१०** हे अशंतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक २ ची माहिती म्हणजे अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती/विमुक्त जाती/भटक्या जमाती (अ, ब, क, ड)/ईतर मागासवर्ग/विशेष मागास प्रवर्ग यामधील अधिकारी व कर्मचारी यांची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक यांनी अपीलकर्त्यास दिनांक २०.९.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसांचे आंत कोणतीही माहिती दिली नाही म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याचा खुलासा १५ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केवळ अपीलकर्ता सुनावणीस हजर राहिला नाही म्हणून अपील खारीज करणे योग्य दिसून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती व जनमाहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती यासंदर्भात उपलब्ध कागदपत्राचे आधारे निर्णय घेणे अपेक्षित आहे. म्हणून भविष्यात त्याचे कडून पुन्हा अशा बाबींची पुनर्वृत्ती होणार नाही यांची समज प्रथम अपीलीय अधिकारी यांना देण्यात येत आहे.

४) **अपील क्रमांक ९३/२०१०** हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक यांनी अपीलकर्त्यास त्यांना दिनांक २२.९.२०१० च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात यावी.

५) विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक यांनी अपीलकर्त्यास दिनांक २२.९.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसांचे आंत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- शास्ती कां लादू नये याचा खुलासा त्यांना हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. अन्यथा शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७२६/२०१०.

श्री. शेख सलीम शेख अकबर,
इस्माईलपुरा, ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर - ४४० ००१.

श्री. शा. रा. कुकडे,
जनमाहिती अधिकारी तथा
शास्त्र सल्लागार,
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर - ४४० ००१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.४.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.१.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.३.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु अपीलकर्ता यांचे दिनांक ४.३.२०११ चे पत्रानुसार पुढील सुनावणी दिनांक १९.४.२०११ रोजी घेण्यात आली. सदर सुनावणीस अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ८.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शास्त्र सल्लागार, शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन शिक्षण विभागातंर्गत येणाऱ्या सर्व महानगरपालिका व नगरपालिकाच्या सर्व

... २

माध्यमांच्या शाळा बाबत १ ते ७ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्याने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दिनांक २६.८.२०१० रोजी शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय प्राप्त झालेला नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ८.१२.२००९ चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १४.१२.२००९ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व त्यानुसार अपीलकर्त्यास दिनांक २२.१२.२००९ च्या पत्राने काही माहिती उपलब्ध करुन दिली व काही माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले. त्यानुसार अपीलकर्त्याने दिनांक १८.१.२०१० रोजी माहिती शुल्क भरणा केला व त्यांनी माहितीचे शुल्काचा भरणा केल्यानंतर दिनांक ४.२.२०१० रोजी पोस्टाने माहिती पाठविण्यात आली. तसेच अपीलकर्त्या त्यांचे कार्यालयात दिनांक ५.२.२०१० रोजी हजर झाले तेव्हा देखील अपीलकर्त्यास हस्तदेय स्वरुपात पुन्हा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र सदरच्या माहितीमध्ये शिक्षक निश्चितीकरणाची माहिती चुकीची दर्शविली आहे. त्यावर जनमाहिती यांनी आयोगापुढे असे खुलासा केला की, अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये टंकलेखणाचे स्वरुपात काही तांत्रिक चुक झालेली आहे त्या अपीलकर्ताने निदर्शनास आणून दिल्या त्या दुरुस्त करण्याचे आयोगासमोर मान्य केले. सदरच्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे दिनांक २६.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले होते. तथापी सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय अद्याप घेण्यात आलेला दिसून येत नाही. त्याचे कारण जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, यापुर्वी देखील अपीलकर्त्याने त्यांचे कार्यालयाकडे माहितीच्या अधिकाराखाली अनेक प्रथम अपील दाखल केलेले आहे. त्याची सुनावणी घेण्यात आली. मात्र दिनांक २६.८.२०१० च्या प्रथम अपीलाची सुनावणी अनावधानाने घेण्यात आलेली नाही. म्हणून सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय देण्याचे त्यांनी मान्य केले व प्रथम अपीलाचे सुनावणीमध्ये अपीलकर्त्यास दिलेल्या माहितीच्या संबंधाने झालेल्या चुका निदर्शनास आणून दिल्यास त्या चुकांची दुरुस्ती करण्याचे त्यांनी मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी अपीलकर्त्याच्या दिनांक २६.८.२०१० च्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेऊन संबंधितांचे म्हणणे ऐकून घेऊन त्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

२) सुनावणीत अपीलकर्त्याने दिलेल्या माहितीच्या संबंधात चुक निदर्शनास आणून दिल्यास त्या चुकाची दुरुस्ती करण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२३७-२३९/१९.४.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९९/२०११, अपील क्रमांक १००/२०११, अपील क्रमांक १०१/२०११, अपील क्रमांक, अपील क्रमांक १०२/२०११ व अपील क्रमांक १०३/२०११.**

श्री. राजेश नवलकिशोर ठाकूर,
विशाखा निवास, अजयनगर,
अंबाझरी हिल टॉप, नागपूर - ४४० ०३३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. पी. सानप,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी, (पंचायत)
पंचायत समिती, हिंगणा, जि. नागपूर.

श्री. एन. एन. कापसे,
जनमाहिती अधिकारी तथा,
ग्रामसेवक,
ग्राम पंचायत खैरी पन्नासे,
ता. हिंगणा, जि. नागपूर.

श्री. आय. बी. चंदनशिवे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत सुकळी (गुपचूप)
ता. हिंगणा, जि. नागपूर.

श्री. एच. डब्ल्यू. लोहे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्राम पंचायत हिंगणा,
ता. हिंगणा, जि. नागपूर.

श्री. नितीन कापसे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्राम पंचायत किन्ही (धानोली),
ता. हिंगणा, जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्राम पंचायत रायपूर (हिंगणा),
ता. हिंगणा, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.४.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये वर नमुद केल्याप्रमाणे ५ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. या पाचही अपीलामध्ये अपीलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे आणि या पाचही अपीलामध्ये अपीलकर्त्याने एकाच प्रकारची माहिती ५ वेगवेगळया जनमाहिती अधिकारी तथा संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांना मागितली असून पाचही अपीलाची एकत्रित सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. अपील क्रमांक १०३/२०११ मध्ये जनमाहिती अधिकारी हे आजारी असल्यामुळे त्यांच्यावतीने श्री. एन. एन. कापसे, ग्रामसेवक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २५.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, खैरी पन्नासे, ता. हिंगणा यांचेकडे, दिनांक २०.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, सुकळी (गुपचूप), ता. हिंगणा यांचेकडे, दिनांक ११.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, हिंगणा यांचेकडे, दिनांक २५.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, किन्ही धानोली, ता. हिंगणा यांचेकडे व दिनांक १२.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक रायपूर, ता. हिंगणा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन या ५ ही ग्रामपंचायत बाबत ग्रामपंचायत कार्यालयाची रचना, ग्रामसेवकांचे अधिकार व कर्तव्याबद्यलची माहिती, ग्रामसेवक व अधिकारी-कर्मचारी यांचे वेतन, ग्रामपंचायत अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्वस्व योजनांची माहिती, आर्थीक योजनेचा ठरावाप्रमाणे प्रत, वितरित

... ३

केलेल्या रकमांचा तपशील, ग्रामपंचायतच्या प्रत्येक कर्मचाऱ्यांचा कामाचा तक्ता, ग्रामसेवक यांचे स्वतःचे कार्य पार पाडण्यासाठी ठरविण्यात आलेली मानके (धोरण) ची माहिती, धोरण तयार करण्यासंदर्भात व्यवस्थेचा तपशील बद्यलची माहिती, अधिकारी व कर्मचाऱ्यांची निर्देशिका बद्यलची माहिती, व्यक्तींना सवलती बद्यलची माहिती, ग्रामपचांयतकडून परवाने दिली जात असली तर त्यांचा तपशीलची माहिती अशी माहिती मागितलेली दिसून येते. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हिंगणा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अर्ज संदिग्ध स्वरुपाचा आहे असे नमुद करुन अपीलकर्त्यास जी माहिती पाहिजे आहे त्याबाबत सविस्तर विवरण देणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे जी माहिती हवी आहे त्याबाबत लेखी कळवावे व माहितीचे शुल्क भरुन माहिती देण्याचा निर्णय दिला. मात्र माहिती देण्यास आता विलंब झाला असल्याने त्यांना विनामुल्य माहिती देण्यात यावी असे अपीलकर्ता यानी अपीलाचे सुनावणीत सांगितले.

३. वर नमुद केलेले पाचही जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची असल्यामुळे अपीलकर्त्यास नेमकी कोणत्या प्रकारच्या माहितीची झेरॉक्स स्वरुपात माहिती पाहिजे आहे. त्यासाठी अपीलकर्त्याला यु.पी.सी.ने पत्र पाठवून त्यांच्या ग्रामपंचायत कार्यालयामध्ये बोलाविले होते व त्या पत्रात पाचही जनमाहिती अधिकारी यांनी स्पष्टपणे असे कळविले होते की, आपणास नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे याचा उल्लेख आपण करावा. असे पाचही जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ग्रामपंचायत कार्यालयामध्ये हजर राहण्याबाबत यु.पी.सी.ने पत्र पाठवून कळविले होते. त्याचा पुरावा म्हणून पाचही जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर यु.पी.सी.ने पत्र पाठविण्याचा पुरावा म्हणून झेरॉक्स प्रत दाखल केली. तथापी सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने आयोगासमोर सुनावणीत नमुद केले. मात्र पाचही जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत वर नमुद केलेले पत्र पाठविल्याचा पोस्टाचा पुरावा दाखल केला म्हणून सदरचे पत्र जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पाठविल्याचे दिसून येते. मात्र अपीलकर्ता पाचही जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित झालेले

नाही व त्यांना नेमकी कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे याची माहिती त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना दिलेली नाही असे पाचही जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले.

४. नंतर अपीलकर्त्याने ५ प्रथम अपील विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हिंगणा यांचेकडे दाखल केले. त्या पाचही प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व सुनावणी नंतर पाचही प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित करण्यात आले व त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची आहे त्यामुळे अपीलकर्ता यांना जी नेमकी कोणती माहिती हवी आहे त्याबाबत त्यांनी संबंधित जनमाहिती यांना लेखी कळवावे व माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असा निर्णय पाचही प्रथम अपीलात दिल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक व प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, अपीलकर्त्याने ग्राम पंचायत कार्यालयाची रचना, ग्राम सेवकाचे अधिकार व कर्तव्य इत्यादी बाबत माहिती मागितलेली आहे. तथापी सदरची माहिती मुंबई ग्राम पंचायत कायद्यामध्ये नमुद केलेली आहे. म्हणून माहितीच्या अधिकारामध्ये जी माहिती कायद्याच्या पुस्तकात नमुद केलेली आहे ती उपलब्ध करुन देण्याची अपेक्षा नाही.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याने पाचही जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली सादर केलेला अर्ज हा एकाच स्वरुपाचा आहे. सदरच्या अर्जात मागितलेली काही मुद्यांची माहिती ही संदिग्ध स्वरुपाची दिसून येते. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती पैकी जी माहिती संबंधित ग्राम पंचायत स्तरावर कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध आहे ती माहिती अपीलकर्त्याकडून माहितीचे शुल्क भरुन घेऊन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे पाचही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांची पाचही अपीले हे अशंतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत पाचही जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे ग्रामपंचायत स्तरावर अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी ज्या मुद्यांची माहिती कागद पत्राच्या स्वरुपात उपलब्ध होईल ती माहिती अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क आकारुन उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरुन सदरची माहिती प्राप्त करुन घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२४०-२४४/१९.४.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०५/२०११.**

श्री. अमर मेघराज नागपाल,
मेघराज भवन, तिसरा मजला,
तीन नल चौक, नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विजयकुमार गोस्वामी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. आर. एस. भुते,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.४.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २६.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना विभाग, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्रीमती सरस्वतीबाई गोपीनाथ लाहोटी, घर नं. ३४४, जी.आर. नं. ८/१३, सीआरएस सेक्शन

... २

द्वितीय अ, कसारपूरा तीननल चौक, इतवारी, नागपूर या मकानाच्या संदर्भात नागपूर सुधार प्रन्यास यांनी मंजूर केलेला नकाशा तसेच त्याबाबत रिवाईज प्लॉन इत्यादी बाबत १ ते ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी पत्र पाठवून आपण मागितलेल्या कागदपत्राची नस्ती कार्यालयात उपलब्ध झाली असून कार्यालयात माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले होते. त्यानंतर अपीलकर्ता माहितीचे शुल्क भरण्यास त्यांचे कार्यालयाकडे गेले नाही. त्याचे कारण अपीलकर्त्याने सुनावणीत असे नमुद केले की, दरम्यानच्या काळात त्यांची बहीण आजारी असल्यामुळे ते नागपूर शहराच्या बाहेर वास्तव्यास होते. म्हणून ते शुल्क भरण्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडे जाऊ शकले नाही. तथापी ते नागपूर शहरात आल्यानंतर त्यांनी दिनांक २६.४.२०१० रोजी विद्यमान जनमाहिती अधिकारी यास एक साधेपत्र दिले व त्यांना पाहिजे असलेल्या माहितीची फी भरुन माहिती द्यावी असे त्यांनी लेखी दिले. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ५.८.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेल्या माहितीच्या नस्तीचा शोध कार्यालयातील अभिलेख कक्षात घेण्यात आला. तथापी रेकॉर्ड किंपरने दिलेल्या माहितीनुसार सदरची नस्ती अभिलेख कक्षात मिळाली नाही. त्यामुळे माहिती देता येणे शक्य नाही असे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दिनांक ३०.८.२०१० रोजी सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १४.९.२०१० रोजी घेण्यात आली व निर्णय देण्यात आला व प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी एक आठवडयाचे आंत पुन्हा नस्तीचा शोघ घेऊन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापी प्रथम अपीलाचा निर्णयानंतरही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचे वेळी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला होता. त्यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी अपीलकर्त्यास पत्र पाठवून त्यांनी मागितलेल्या माहितीची नस्ती उपलब्ध झाली असून शुल्क भरुन माहिती प्राप्त करावी असे कळविले होते. तथापी अपीलकर्ता माहितीचे शुल्क भरण्यास सुमारे २ वर्ष कार्यालयात आले नाही.

मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने दिनांक २६.४.२०१० रोजी साधा अर्ज देऊन माहितीचे शुल्क भरुन घेण्याबाबत व माहिती देण्याबाबत साधा अर्ज दिला. दिनांक २६.४.२०१० रोजीच्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला. तथापी अभिलेख कक्षात संबंधित रेकॉर्ड किपरने नस्तीचा शोध घेतला. मात्र सदरची नस्ती मिळाली नाही म्हणून माहिती देता येत नाही असा अहवाल रेकॉर्ड किपरने जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिला. त्यानुसार दिनांक ५.८.२०१० रोजी अपीलकर्त्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आपण मागितलेल्या माहितीच्या नस्तीचा शोध घेतला असता नस्ती मिळालेली नाही त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दिनांक ३०.८.२०१० रोजी दाखल केले. त्याची सुनावणी दिनांक १४.९.२०१० रोजी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.९.२०१० रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाचा निर्णयामध्ये अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची नस्तीचा शोध एक आठवडयात घेऊन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला होता. प्रथम अपीलाचे निर्णयाला अनुसरुन पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी अभिलेख कक्षात या नस्तीचा शोध घेतला. परंतु नस्ती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती देता आली नाही असे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणी सांगितले.

५. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असेही सांगितले की, अद्यापही संबंधित नस्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यांचे कार्यालयातील कागदपत्रांची अदलाबदलीमध्ये संबंधित नस्ती अनावधानाने कुठेतरी ठेवण्यात आलेली असावी म्हणून संबंधित नस्तीचा शोध घेण्यास त्यांना मुदत द्यावी. या नस्तीचा शोध घेण्यास २ महिन्याची मुदत देण्यास हरकत नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी संबंधित नस्तीचा पुन्हा कसून शोध घेण आवश्यक असल्याने नस्तीचा शोध घेऊन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून २ महिन्यांचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी संबंधित नस्तीचा कसून शोध घ्यावा व नस्ती उपलब्ध झाल्यानंतर अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापी नस्ती उपलब्ध न झाल्यास त्याबाबत योग्य ती चौकशी करुन संबंधिता विरुध्द योग्य ती कार्यवाही करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-        दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२४५-२४८/१९.४.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०४/२०११.**

श्रीमती डॉ. नैनतारा दुर्गादास वासुदेव,
प्लॉट नं. २४७, एकता अॅन्ड बसेरा अपार्टमेंट जवळ,
पोलीस लाईन टाकळी मागे, नागपूर - ४४० ०१३. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. विजयकुमार गोस्वामी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. आर. एस. भुते,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.४.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक १३.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असें सांगितले की, त्यांनी दिनांक २४.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना विभाग, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन Which Litigation pending against Gift dead of १५०' Ft. x १५०' Ft. in my

... २

name याबाबतची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी होऊन प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ७.१२.२०१० रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाचे निर्णयात अपीलकर्ती यांना माहितीची धारिका पाहण्याकरिता उपलब्ध करुन द्यावी व योग्य शुल्क आकारुन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस माहिती द्यावी असा निर्णय दिलेला होता. प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे त्यांनी संबंधित धारिकेची पाहणी केली. परंतु त्या धारिकेमध्ये अपीलकर्तीस हवी असलेली माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक २४.९.२०१० चा माहितीचा अज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २९.९.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्तीने मागितलेल्या माहिती बाबतची नस्ती कार्यालयीन कामकाजाकरिता महानगरपालिकेच्या सिव्हील कोर्ट एजंटकडे गेलेली असल्यामुळे सदरची नस्ती सिव्हील कोर्ट एजंट कडून प्राप्त झाल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस दिनांक १८.१०.२०१० च्या पत्राने कळविले होते. त्यानंतर अपीलकर्तीने दिनांक २०.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी महानगरपालिकेच्या सिव्हील कोर्ट एजंट कडून सदरची नस्ती प्राप्त करण्यात आली होती. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्तीस सदरची नस्ती निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देऊन अपीलकर्तीस त्यातील जे कागदपत्रे मागितली ती कागदपत्रे योग्य शुल्क आकारुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस देण्यात यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ७.१२.२०१० रोजी देण्यात आला होता. प्रथम अपीलाचे निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस दिनांक २०.१२.२०१० रोजी संबंधित नस्ती निरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिली. मात्र त्या नस्तीमध्ये अपीलकर्तीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. म्हणून अपीलकर्तीने माहिती अधिकाराखाली मागितलेली माहिती धारिकेत उपलब्ध नाही असे दिसून येते. याबाबत अपीलकर्तीचे असे म्हणणे आहे की, जर त्यांनी मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नसेल तर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना तसे स्पष्टपणे कळविणे आवश्यक आहे.

... ३

४.  अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्तीने संबंधित नस्तीचे निरिक्षण केलेले आहे. तथापी त्यांना पाहिजे असलेली माहिती त्या नस्तीमध्ये आढळून आली नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस त्यांनी मागितलेली माहिती त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस त्यांचेकडील दिनांक २४.९.२०१० च्या माहिती अर्जात मागितलेली माहिती त्यांचेकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे विनामुल्य कळवावे.

.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-   दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११२/२०११.

सौ. अश्विनीबाई अशोक चांदेवार,
मु. राका, पो. चिखली, ता. सडक/अर्जुनी,
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. बी. आर. कांबळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, सडक/अर्जुनी,
जि. गोंदिया.

श्री. एस. सी. तागडे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्राम पंचायत, राका, पो. चिखली,
ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.४.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक १२.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती हया गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक ५.१०.२०१० रोजीचा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १८.१०.२०१० रोजी हस्तदेय प्राप्त झाला होता. अपीलकर्तीने मागितलेली माहिती ही तयार करण्यात आली व अपीलकर्तीस दिनांक १५.११.२०१० रोजी पत्राने असे कळविले

... २

की, आपण मागितलेली माहिती ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध आहे. परंतु माहिती कशी द्यावी टपालाद्वारे किंवा व्यक्तिशः त्याचा कोणताही उल्लेख आपल्या माहितीच्या अर्जात नाही. म्हणून सदर माहिती घेण्याबाबत कळवावे. परंतु अपीलकर्ती सदरची माहिती घेण्यास आली नाही किंवा त्यांनी कळविले देखील नाही. मात्र त्यानंतर त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, सडक/अर्जुनी यांचेकडे दाखल केले. त्याची सुनावणी दिनांक १०.१२.२०१० रोजी ठेवण्यात आली व दिनांक १०.१२.२०१० रोजी अपीलकर्तीस १२ व्या वित्त आयोग कडून उचल केलेल्या ४००००/- रुपयांची माहिती तसेच सन २०१० मध्ये झालेले दोन्ही नाल्याची एम.बी.ची माहिती. बी.आर.जी.एफ. मधील खर्चाची माहिती देण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्तीने प्राप्त केली असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. फक्त सुधारित अंदाजपत्रकाची प्रत प्राप्त झाल्यानंतर पुरविण्यात येईल हे देखील अपीलकर्तीस कळविण्यात आले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीस ग्रामपंचायत भवनाचे दुरुस्तीचे सुधारित अंदाजपत्रका व्यतिरिक्त इतर माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच सुधारित अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर ती माहिती उपलब्ध करुन देण्याचे त्यांना कळविलेले आहे. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्तीस सुधारित अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर त्याची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य पुरवावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२५२-२५३/२०.४.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १११/२०११.**

श्री. अच्युत शंकरराव शनिवारे,
४१, हायकोर्ट सोसायटी, गोविंदनगर,
नागपूर - ४४० ०२५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
धर्मदाय उपआयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.४.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २७.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री. साईबाबा सेवा मंडळ, वर्धा रोड (साई मंदिर), नागपूर बाबत १ ते ४ मुद्यांची कर्मचाऱ्यांशी संबंधित माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर यांनी असे कळविले की, आपण मागितलेली २ ते ४ मुद्यांची माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्याने पुरविता येत

... २

नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ९.११.२०१० रोजी धर्मदाय उपआयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील त्यांनी फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले आणि आयोगापुढे असे सांगितले की, श्री. साईबाबा सेवा मंडळ (साई मंदिर) यांची नोंदणी बॉम्बे पब्लीक ट्रस्ट या कायदाखाली झालेले असल्यामुळे या मंदिरावर सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाचे नियंत्रण आहे. म्हणून त्यांना माहिती मिळणे आवश्यक आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी हे आजच्या सुनावणीत गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता येत नाही. तथापी अपीलकर्त्याचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, श्री. साईबाबा सेवा मंडळ, वर्धा रोड, नागपूर याची नोंदणी बॉम्बे पब्लीक ट्रस्ट या कायद्याखाली झालेली असल्यामुळे त्या कायद्यातुली तरतुदीनुसार सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी संबंधित ट्रस्टकडून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे न्यायोचित होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी श्री.साईबाबा सेवा मंडळ, वर्धा रोड, नागपूर यांचेकडून बॉम्बे पब्लीक ट्रस्ट ॲक्ट मधील तरतुदीनुसार माहिती मागवावी व त्यांचेकडून माहिती प्राप्त झाल्यावर अपीलकर्त्यास सदरची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२५४-२५५/२०.४.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२०/२०११.**

श्री. डॉ. भास्कर रामराव काटे,
७१, विद्याविहार, प्रतापनगर,
नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. शि. म. म्हात्रे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
वित्त विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री. य. द. देशकर,
जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४४० ०३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.४.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगासमोर असे सांगितले की, त्यांनी दिनांक ४.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ५ वे वेतन आयोगामध्ये संचालक पदाला व अधिष्ठाता पदाला जे वेतन दिलेले आहे त्या वेतनामध्ये विसंगती आहे. सदरची

... २

विसंगती दूर करण्याच्या हेतुने त्यांनी दिनांक २३.१.२००७ ला अर्ज दिला होता. त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांचे अपेक्षेप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दाखल केले. त्यानंतर उपसचिव यांनी दिनांक ९.८.२०१० च्या पत्राने प्रथम अपील सुमारे ८ महिने विलंबाने दाखल केल्यामुळे अपील निकाली काढले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ४.११.२००९ च्या माहितीचा अर्ज त्यांचेकडे दिनांक १४.११.२००९ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक ७.१२.२००९ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्याचे वेतनातील विसंगती दूर करण्याचा दिनांक २३.१.२००७ चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही ही बाब देखील त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक ७.१२.२००९ च्या पत्राने कळविले आहे. त्यावर अपीलकर्त्याने आयोगापुढे असे नमुद केले की, त्यांचे कडील दिनांक २३.१.२००७ चा अर्ज हा वेतनातील विसंगती दूर करण्याचा होता. त्यांनी सदरचा अर्ज सचिव, वित्त विभाग, सचिव, वैद्यकीय शिक्षण यांचेकडे सादर केलेला आहे. मात्र सदरचे पत्र हे वित्त विभागाच्या सेवा-४ या कक्षाकडे प्राप्त झालेले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिले. तसेच अपीलकर्त्याने त्यांचेकडील दिनांक २३.१.२००७ च्या निवेदनाची प्रत आयोगाचे समोर जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याच्या दिनांक २३.१.२००७ च्या निवेदनावर वित्त विभागाच्या सेवा-४ कक्षाकडून किंवा वैद्यकीय शिक्षण विभागाकडून झालेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी वित्त विभागाच्या सेवा-४ कक्षाकडून व वैद्यकीय शिक्षण विभागाकडून अपीलकर्त्याच्या दिनांक २३.१.२००७ च्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती व्यक्तिशः किंवा पोस्टाने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३०/२०११.

श्री. रमेश घनश्यामदास माखिजा,
रामनगर, सिंधी कॉलनी, दुर्गा माता मंदिर जवळ,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
ता. जि. चंद्रपूर.

श्री. अतुल रा. आदे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी,
उपप्रादेशिक परिवहन कार्यालय,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.४.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १४.९.२०१० चा

... २

माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या माहिती अर्जात अपीलकर्त्याने १ मार्च २०१० ते ३१ एप्रिल २०१० या कालावधीत प्रादेशिक परिवहन कार्यालय, चंद्रपूर यांचेमार्फत वाहनासाठी देण्यात आलेल्या लायसन्स तसेच वाहनाची वैधता प्रमाणपत्र इत्यादी माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व सदरची माहिती अपीलकर्त्यास दिनांक १२.१०.२०१० च्या पत्राने एकूण १४ पाने ब व क नमुन्यात पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली. परंतु त्या माहितीबाबत समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दिनांक २१.१०.२०१० रोजी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १२.१०.२०१० रोजी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.१.२०११ रोजी देण्यात आला असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात लायसेंस व योग्यता प्रमाणपत्र बाबत दररोज विवरण पत्र/तक्ता तयार करण्यात येत नाही. याबाबत मा.परिवहन आयुक्त, कार्यालय, मुंबई यांना जे मासिक विवरणपत्र सादर करण्यात येते ते अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १२.१०.२०१० च्या पत्राने पुरविलेले आहे. तसेच अपीलकर्त्यास अभिलेखावर उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती कार्यालयीन वेळेत पुर्व परवानगीने ते तपासण्याची किंवा टिपणे काढण्याबाबतची मुभा असल्याबाबत लेखी कळविलेले आहे. त्यामुळे अर्जदारास माहिती देण्याबाबत कोणतीही टाळाटाळ करण्यात आलेली नाही किंवा अर्जदारापासून माहिती लपविण्याचा प्रयत्न केलेला नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णयात नमुद केलेले आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १२.१०.२०१० च्या पत्राने त्यांचे कार्यालयाकडे ज्या नमुन्यात माहिती उपलब्ध आहे त्या नमुन्यातील माहितीची झेरॉक्स प्रतीच्या स्वरुपात १ ते १४ पाने उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणजे कार्यालयात अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. तसेच अपीलकर्त्यास कार्यालयात अभिलेखावर उपलब्ध असलेल्या संपूर्ण माहिती कार्यालयीन वेळेत पुर्व परवानगीने तपासण्याची

किंवा टिपणे काढण्याबाबतची मुभा असल्याचे देखील लेखी कळविले आहे. त्यामुळे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२५९-२६१/२६.४.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२७/२०११.

श्री. पी. एम. पद्मावार,
बी-१/२०२, शिवराया सोसायटी, समृध्दी संकुल,
अमरावती रोड, नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. एन. नंदनवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
जुने सचिवालय इमारत, नागपूर.

श्री. आय. एच. कुंभरे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक (प्रशासकीय)
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
जुने सचिवालय इमारत, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.४.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २४.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक (प्रशासकीय), सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन दिनांक १५.१.२०१० च्या पत्राने मा. लोक आयुक्त यांना पाठविलेल्या पत्रातील माहिती तसेच

... २

निवासस्थान वाटप झाल्याबाबतची माहिती इत्यादी संदर्भाम एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना दिनांक २०.७.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी माहिती पाठविली. मात्र सदरची माहिती ही वस्तुस्थितीला धरुन नाही तसेच कार्यवाही संदर्भात कोणतीही माहिती दिली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १९.८.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २४.६.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २९.६.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे तसेच त्यांचे कार्यालयास मा. लोक आयुक्त यांनी सादर केलेल्या अहवालाविषयी वेगवेगळे ५ आक्षेप दर्शवून स्थायी आदेशाची मागणी केली आहे. म्हणून अर्जातील मुद्या क्रमांक १ ते ५ मध्ये नेमकी माहिती न मागता मा. लोकआयुक्त यांना सादर करण्यात आलेल्या अहवालातील स्थायी आदेश आहे काय याची माहिती मागितलेली आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २०.७.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले आहे की, मा. लोकआयुक्त प्रकरणी सक्षम अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवाला विषयी त्या संदर्भात आदेशाचा शोध घेऊन माहिती पुरविणे अपेक्षित नाही. तसेच मुद्या क्रमांक ६ मध्ये नमुद मुख्य अभियंता यांचे पत्र क्रमांक ३३२५ हे पत्र मुख्य अभियंता यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक १ नागपूर यांना पाठविलेले असल्याने त्यावरील कार्यवाही विषयक दस्तऐवज त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने सहाय्यक अधिक्षक अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १३.९.२०१० रोजी तसेच दिनांक २७.९.२०१० रोजी ठेवण्यात आली. मात्र दोन्ही वेळेला अपीलकर्ता हे गैरहजर राहिले. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २०.७.२०१० च्या पत्रानुसार पाठविलेली माहिती योग्य असल्याचे नमुद करुन मुद्या क्रमांक ४ ची माहिती देण्याबाबत प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.१०.२०१० रोजी दिलेला आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने वर नमुद केल्या प्रमाणे एकूण १ ते ६ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २०.७.२०१० च्या पत्राने उत्तर पाठविले असून प्रथम अपीलाचे निर्णयानंतर मुद्या क्रमांक ४ ची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे दिसून येते. तथापी अपीलकर्त्याने मुद्या क्रमांक १, २, ३, ५ व ६ याबाबत जी माहिती मागितलेली आहे त्या माहिती बाबतची वस्तुस्थिती स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक १, २, ३, ५ याबाबत त्यांचे कार्यालयाकडे कोणतेही स्थायी आदेश उपलब्ध नाही किंवा इतर कोणतीही माहिती उपलब्ध नाही असे स्पष्टपणे विनामुल्य कळवावे. तसेच मुद्या क्रमांक ६ बाबत मुख्य अभियंता, नागपूर यांचेकडील दिनांक ४.८.२००९ च्या पत्रावर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९/२०११.

श्री. पी. एम. पद्मावार,
बी-१/२०२, शिवराया सोसायटी, समृध्दी संकुल,
अमरावती रोड, नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव (आस्थापना)
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.

श्री. सु. गं. गांगरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी (कार्या. ५-स),
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.४.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे जनमाहिती अधिकारी यांना प्राधिकृत केलेले आहे.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २५.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कार्या. ५-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांच्या विभागीय चौकशी संबंधित व अन्य आस्थापना बाबी संदर्भात १ ते ५

... २

मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १९.७.२०१० च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती अर्धवट व वस्तुस्थितीला धरुन नसल्यामुळे त्यांनी उपसचिव यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २५.६.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २.७.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने त्यांच्या विभागीय चौकशी संबधात व अन्य आस्थापना बाबी विषयी एकूण १ ते ५ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन माहिती काढण्यात आली व दिनांक १९.७.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास मुद्येनिहाय १ ते ५ मुद्यांची वस्तुस्थिती कळविण्यात आली. तसेच माहिती अधिकार अधिनियमांतर्गत कार्यालयात अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती देणे अभिप्रेत आहे. त्यानुसार अपीलकर्त्यास त्यांच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन दिनांक १९.७.२०१० च्या पत्राने माहिती देण्यात आलेली आहे. तसेच माहितीच्या व्याख्येमध्ये अभिप्राय देणे किंवा मार्गदर्शन करणे याचा समावेश होत नाही. त्यामुळे सुसंगत व पूर्ण माहिती दिली नाही हा अपीलकर्त्याचा आरोप निराधार आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १९.७.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेल्या माहिती बाबत त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दिनांक १२.८.२०१० रोजी उपसचिव यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाची सुनावणी दिनांक १४.९.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. परंतु प्रथम अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता हे हजर झाले नाही. त्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ४.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्त्याचे प्रथम अपील उपसचिव यांनी फेटाळलेले आहे असे देखील जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २५.६.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन दिनांक १९.७.२०१० च्या पत्राने १ ते ५ मुद्यांची मुद्येनिहाय माहिती/वस्तुस्थिती कळविलेली दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र त्यांनी मागितलेल्या स्थायी आदेशाच्या प्रती किंवा टिपणीच्या प्रती त्यांना मिळालेल्या नाही असे त्यांनी नमुद केले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली टिपणींची माहिती पुरविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास खालील प्रमाणे मुद्ये निहाय टिपणीची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. मुद्या क्रमांक १ बाबत नस्तीतील टिपणीची प्रत उपलब्ध करुन द्यावी. मुद्या क्रमांक २ ची माहिती अपीलकर्त्यास यापुर्वी उपलब्ध करुन दिलेली आहे. मुद्या क्रमांक ३ बाबत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली टिपणी व्यतिरिक्त इतर कोणतीही टिपणी नाही असे स्पष्टपणे कळवावे. मुद्या क्रमांक ४ बाबत झालेल्या कार्यवाहीच्या संबंधात टिपणीची प्रत देण्यात यावी. मुद्या क्रमांक ५ बाबत देखील नस्तीतील टिपणीची प्रत उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२६५-२६७/२६.४.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३१/२०११.**

श्री. मनोज गौतम घोटेकर,
जटपूरा, वार्ड नं. ३, न्यु इंग्लिश शाळेमागे,
चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. आर. देशट्टीवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
प्रशासकीय इमारत, बस स्टँन्ड समोर, चंद्रपूर.

श्री. आनंद कवाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अध्यक्ष,
ब्राईट नागरी पत संस्था मर्यादित,
चोरखिडकी जवळ, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.४.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, ब्राईट नागरी पत संस्था मर्यादित, चंद्रपूर रजि. नं. ३८७ यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन घटनेची सत्यप्रत, सभासद यादीची सत्यप्रत व संचालक मंडळाची सत्यप्रत मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या

... २

अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यानी दिनांक २१.४.२०११ रोजी आयुक्त, राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे निवेदन सादर करुन पतसंस्थेला आणि सहकार विभागाला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही. त्यामुळे अर्जदाराने आपणांपुढे दाखल केलेली अपील परत घेत आहे असे लेखी निवेदन सादर केल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-        दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३४/२०११.**

श्री. प्रकाश दगडू भारंबे,
द्वारा - किशोर मुंजनकर, ७ - ए, साटोणे ले आऊट,
गिताईनगर, धुनीवाले मठासमोर, नागपूर रोड,
वर्धा - ४४२ ४०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव (पदुम)
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.

जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव (पदुम-६),
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.४.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २७.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यावतीने श्री. ए. आर. पाजनकर, प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ४.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास खाते, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीच्या

... २

अधिकाराखाली अर्ज सादर करुन शासन निर्णय क्रमांक दुविप्र-२५०९/१२४८/प्र.क्र. १/२००९/पदुम-६, दिनांक २०.१०.२००९ नुसार जो शासन निर्णय निर्गमित केलेला आहे त्या निर्णयामध्ये महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या याचिका क्रमांक ५५३/२००८ चा उल्लेख आहे. म्हणून या याचिकेची प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना दिनांक ५.१०.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी असे कळविले की, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेली याचिका क्रमांक ५५३/२००८ ही आपण स्वतःच दाखल केलेली असल्याने सदर याचिकेच्या प्रती आपणांस उपलब्ध करुन देता येणार नाहीत. मात्र याचिका क्रमांक ५५३/२००८ ही त्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेली नसून त्यांनी दाखल केलेली याचिका क्रमांक ५३३/२००८ असे आहे असे त्यांनी कळवून प्रथम अपील दिनांक १४.१०.२०१० रोजी दाखल केले व त्यामध्ये देखील ही बाब स्पष्ट केली. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १६.११.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. तथापी मला त्या दिवशी रेल्वेचे आरक्षण उपलब्ध झाले नाही म्हणून ते सुनावणीस हजर राहिले नाही. त्याप्रमाणे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना कळवून माझ्या युक्तीवादाची खात्री करुन प्रथम अपीलाचा निर्णय घ्यावा असे त्यांनी कळविले होते. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयाची त्यांनी मागणी करुनही अद्याप पर्यंत त्यांना प्रथम अपीलाचा निर्णय मिळाला नाही. तसेच याचिका क्रमांक ५५३/२००८ ची प्रत देखील त्यांना मिळाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधीनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला होता व त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ५.१०.२०१० रोजी असे कळविले आहे की, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेली याचिका क्रमांक ५५३/२००८ ही आपणच स्वतः नागपूर येथे दाखल केलेली असल्याने सदर याचिकेच्या प्रती आपणांस उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविलेले आहे. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने असे निदर्शनास आणून दिले की, याचिका क्रमांक ५५३/२००८ ही याचिका त्यानी दाखल केलीली नाही. म्हणून त्यांनी याचिका क्रमांकाचा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,

मुंबई, खंडपीठ नागपूर यांचे कार्यालयात प्रत्यक्ष चौकशी केली असता अपीलकर्ता श्री. प्रकाश दगडू भारंबे यांची याचिका क्रमांक ५३३/२००८ अशी आहे. म्हणून सुरुवातीस चुकून सदर याचिका क्रमांक ५५३/२००८ असे नमुद झालेले आहे. आता सदरचा याचिका क्रमांक हा ५३३/२००८ असा आहे याची खात्री झालेली असल्याने सदरची याचिकेची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याची त्यांनी तयारी दर्शविली. मात्र अपीलकर्त्याने असे सांगितले की, याचिका क्रमांक ५३३/२००८ ची प्रत त्यांचे जवळ आहे म्हणून त्याप्रतीची त्यांना आवश्यकता नाही. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, दिनांक २०.१०.२००९ च्या शासन निर्णयात याचिका क्रमांक ५५३/२००८ असा उल्लेख आहे. त्यांचे ऐवजी याचिका क्रमांक ५३३/२००८ असा उल्लेख करणे आवश्यक आहे आणि म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी सदरची याचिका क्रमांक ५५३/२००८ नसून याचिका क्रमांक ५३३/२००८ असा आहे असे त्यांना लेखी कळविण्यात यावे असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. तसेच अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केल्या नंतरही त्यांना प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही व्हावी अशी मागणी त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागणी केलेली याचिका क्रमांक ५५३/२००८ नसून त्या याचिकेचा क्रमांक ५३३/२००८ असा आहे. म्हणून दिनांक २०.१०.२००९ च्या शासन निर्णयात नमुद केलेली याचिका क्रमांक ५५३/२००८ नसून तो याचिका क्रमांक ५३३/२००८ असा आहे असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविणे योग्य होईल. तसेच प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याची पुनरावृत्ती करु नये याची समज त्यांना देण्यात येत आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ४

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २०.१०.२००९ च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या याचिका क्रमांक ५५३/२००८ नसून सदरचा याचिका क्रमांक ५३३/२००८ असा आहे हे अपीलकर्त्यास विनामुल्य कळवावे व त्या अनुषंगाने दिनांक २०.१०.२००९ च्या शासन निर्णयात योग्य ती दुरुस्ती करण्याची कार्यवाही करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३५/२०११.**

सौ. ज्योती वसंतराव पाठक,
धरमपेठ महिला बँकेसमोर,
वाकर रोड, महाल, नागपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. अशोक पाटील,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
गांधीबाग झोन क्र. ६,
महानगरपालिका, नागपूर.

श्री. अरुण बा. मोगरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
गांधीबाग झोन क्रमांक ६,
महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.४.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक २८.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २७.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १६.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, लोककर्म विभाग, झोन क्रमांक ६, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकाराखाली अर्ज सादर करुन वार्ड नंबर २९, महाल, वॉकर रोड, घर क्रमांक ५५४ येथे उपेक्षा नागरी

सहकारी पत संस्थेच्या अध्यक्षाकडून होत असलेल्या अवैध बांधकामाबाबत तसेच बांधकामाचे मंजूर नकाशाची प्रत मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून मंजूर नकाशाची प्रत मिळाली. मात्र सदरची प्रत ही विलंबाने प्राप्त झाली म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक आयुक्त, झोन क्रमांक ६, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ७.९.२०१० रोजी घेण्यात आली मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक १६.७.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १९.७.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्तीने मागितलेल्या माहितीचे नकाशाची प्रत काढण्यात आली व अपीलकर्तीस दिनांक ५.८.२०१० रोजी यु.पी.सी.द्वारे लेखी पत्र पाठवून अपीलकर्तीस असे कळविले की, उपेक्षा नागरी सहकारी संस्था, वॉकर रोड, महाल यांचा बांधकामाचा नकाशा दिनांक २७.७.२०१० मंजूर करण्यात आला आहे. नकाशाच्या प्रतीचे शुल्क केंद्रीय अभिलेख विभाग, महानगरपालिका, नागपूर येथे भरणा करुन नकाशाची प्रत प्राप्त करुन घ्यावी. तथापी सदरचे यु.पी.सी.चे पत्र अपीलकर्तीने घेतले नाही म्हणून ते पोस्टाद्वारे परत आले. त्याचा पुरावा जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविला. त्यांनंतर अपीलकर्ती त्यांचे कार्यालयात दिनांक २.९.२०१० रोजी हजर झाली. त्यांनी नकाशाचे शुल्क भरणा दिनांक २.९.२०१० रोजी केला व त्याच दिवशी अपीलकर्तीस मंजूर नकाशाची प्रत उपलब्ध करुन दिली. सदरची प्रत अपीलकर्तीस प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र नकाशा मंजूरीची कार्यवाही योग्य झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ७.९.२०१० रोजी देण्यात आला. त्या निर्णयामध्ये असे नमुद केले की, अपीलार्थी यांनी मागितल्याप्रमाणे नकाशा प्राप्त झाला आहे. फक्त अनाधिकृत बांधकामाबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्तीस देण्यात यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय दिला होता. प्रथम अपीलाचे या निर्णयाला अनुसरुन पुन्हा दिनांक १७.९.२०१० च्या पत्राने अनधिकृत बांधकामाबाबत असे कळविले की, अपेक्षा नागरी सहकारी संस्था तर्फे अध्यक्ष श्री. मोहन महादेवराव कर्णे, रा. वाकर रोड, महाल यांनी महानगरपालिकेचया मंजूरी विरुध्द केलेल्या अनधिकृत

बांधकामाबाबत एमआरटीपी ॲक्ट अन्वये नोटिस कलम ५३(१) व कलम ५४ नुसार कार्यवाही करण्यात आली आहे. सदरची माहिती अपीलकर्तीस प्राप्त झाल्याचे अपीलकर्तीने सुनावणीत नमुद केले. मात्र महानगरपालिकेने बांधकामाच्या नकाशाला दिलेली मंजूरी योग्य नाही असे अपीलकर्तीने नमुद केले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचा नकाशास विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे मंजूरी दिलेली आहे. म्हणून सदरच्या नकाशास मंजूरी ही विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे दिलेली आहे असे अपीलकर्तीस कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ती यांना विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने असे कळवावे की, बांधकामाच्या नकाशास दिलेली मंजूरी ही विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे दिलेली आहे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२७४-२७६/२७.४.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४१/२०११.

श्री. शरद उध्दवराव टेंभरे,
रा. पुलफैल, महात्मा फुले शाळेजवळ,
वर्धा - ४४२ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सु. अ. बुटले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि. श्रे.)
व मुद्रांक, जिल्हाधिकारी कार्यालय,
वर्धा.

श्री. उमेश मधुकर सरपटवार,
जनमाहिती अधिकारी तथा
सह दुय्यम निबंधक वर्ग-२,
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.४.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १७.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहदुय्यम निबंधक वर्ग-२, वर्धा यांचे कार्यालयाकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन खरेदी खत क्रमांक ११७६/११७७/११७८ दिनांक २० फेब्रुवारी २००७ या खरेदीखताबाबत एकूण १ ते ११ मुद्यावर माहिती मागितलेली होती. त्यांना त्यांचे अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी

... २

तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, वर्धा यांचेकडे दिनांक २७.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १७.८.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १८.८.२०१० रोजी प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज विहित नमुन्यात केले नसल्यामुळे अपीलकर्त्यास दिनांक २१.८.२०१० रोजी तसेच दिनांक २२.९.२०१० रोजीच्या पत्राने विहित नमुन्यात अर्ज करण्याबाबत कळविले होते. मात्र अपीलकर्त्याने विहित नमुन्यात अर्ज पाठविला नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने दिनांक २७.९.२०१० रोजी सह जिल्हा निबधक, वर्धा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २०.१०.२०१० रोजी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ११.११.२०१० रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाचे निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विहित नमुन्यात माहितीचा अर्ज करण्यास कळविले आहे. मात्र माहिती देण्यास नकार दिलेला नाही. तथापी अपीलकर्त्याने विचारलेल्या माहिती बाबतचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन विचारणा केलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील परिपत्रक दिनांक ६.१२.२००८ नुसार अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्यात यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय दिला.

४. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १३.४.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे. अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जात मागितलेली मुद्दा क्रमांक १ च्या माहितीबाबत माहिती शुल्क भरुन घेऊन माहिती घेऊन जावी असे कळविलेले आहे. तसेच मुद्दा क्रमांक २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० या मुद्यांची माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. तसेच त्यामध्ये स्पष्टीकरण मागितलेले आहे. त्यामुळे त्यांची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविलेले आहे. मुद्दा क्रमांक ११ संबंधात दिनांक १.१.२००७ ते ३.३.२००७ या

कालावधीत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात झालेल्या खरेदी खतांची माहिती सिडी स्वरुपात देण्यात यावी असे अपीलकर्त्याने माहिती मागितलेली आहे. मात्र जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात संगणकावर खरेदी खत, मृत्युपत्र, प्रतिज्ञापत्र इत्यादी माहिती एकाच सिडीमध्ये आहे. नुसत्या खरेदी खताची सिडी त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही. त्यामुळे नुसत्या खरेदी खतांची सिडी उपलब्ध करुन देता येणार नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सुनावणीत नमुद केले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने खरेदी खत क्रमांक ११७६/२००७ च्या खरेदी खताच्याबाबतच्या दस्तऐवजांची विहित केलेली फी भरणा करुन प्राप्त करुन घेणे योग्य होईल. तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या खरेदी खताची स्वतंत्र सिडी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलबध नाही म्हणून ती उपलब्ध करुन देता येणार नाही असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. तथापी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असलेले दस्तऐवज निरिक्षण करावयाचे झाल्यास त्याची निरिक्षण फी भरणा करुन अपीलकर्त्यास दस्तऐवज निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास खरेदी खत क्रमांक ११७६/२००७ च्या दस्तऐवजाबाबत विहित केलेली फी अपीलकर्त्याने भरल्या नंतर माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) दिनांक १.१.२००७ ते दिनांक ३.३.२००७ या कालावधीच्या खरेदी खताची स्वतंत्र सिडी त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही असे स्पष्टपणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळवावे.

३) जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असलेल्या दस्तऐवजांच्या निरिक्षणाची फी भरल्यानंतर अपीलकर्त्यास दस्तऐवज निरिक्षणासाठी जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावे. त्यासाठी अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजाचे दिवशी पुर्व सुचना देऊन निरिक्षणासाठी हजर राहावे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२७७-२८०/२८.४.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४२/२०११.

श्री. कृष्णराव माधवराव धकाते,
राममंदीर वार्ड, बडाबाजार,
भंडारा - ४४१ ९०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई सेंट्रल - ४०० ००८.

जनमाहिती अधिकारी तथा
महाव्यवस्थापक (क. व औ. सं.)
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई सेंट्रल - ४०० ००८. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.४.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी यांचेवतीने श्री. आंबाडेकर, विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात आले असल्यामुळे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ९.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक (क व औ.सं.) म.रा. मुंबई सेंट्रल यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन २

... २

मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्यामध्ये पहिल्या मुद्याची माहिती अशी मागितली होती की, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास दिनांक ४.८.२०१० च्या पत्राचे अनुषंगाने माहिती मागितलेली होती व मुद्या क्रमांक २ मध्ये अपीलकर्त्याने उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना दिनांक १०.११.२००९, दिनांक ३०.१२.२००९ व दिनांक ५.२.२०१० या पत्राचे संदर्भात माहिती मागितलेली होती. तथापी त्यांनी दिनांक १४.९.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी असे कळविले की, आपण मागितलेली मुद्या क्रमांक १ च्या माहितीची प्रत आपणास त्या त्या वेळी माहिती देण्यात आलेली आहे. तसेच मुद्या क्रमांक २ मध्ये मागणी केलेली माहिती ही सक्षम प्राधिकाऱ्याकडे पत्र व्यवहार करुन प्राप्त करुन घ्यावी असे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. तथापी त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २४.९.२०१० रोजी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, राज्य परिवहन, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई सेंट्रल यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. उत्तरवादी यांचे प्रतिनिधीने आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ९.८.२०१० चा माहितीचा अर्ज मुंबई कार्यालयाकडे दिनांक २३.८.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्ता हे महामंडळात आगार व्यवस्थापक पदी कार्यरत असतांना त्यांचेवर शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार कारवाई करण्यात आलेली असल्याने त्यांनी अपराधासंदर्भात अहवालकर्त्याचे नांव, सक्षम प्राधिकाऱ्यांचे नांव व पद, दिलेली शिक्षा, प्रथम अपीलाची प्रत, त्याचा निकाल आणि द्वितीय अपीलाची प्रत, त्याचा निकाल मिळणेबाबत इत्यादी माहिती मागितलेली आहे. शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार अनुसुची ई (१) नुसार गैरवर्तनुकीच्या कोणत्या कृत्याबाबत आरोपपत्र देण्यात आले आहे याची माहिती तसेच अहवालकर्ता चौकशी अधिकाऱ्याचे नांव व पदनाम, प्रथम अपील कोणाकडे करावे, प्रथम अपीलाचे निर्णयाविरुध्द द्वितीय अपील कोणाकडे करावे इत्यादी सर्व माहिती संबंधीत आरोपी व्यक्तिस कळविण्यात येते. त्यामुळे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १४.९.२०१० च्या पत्राने असे कळविले आहे की, आपणास आगार व्यवस्थापक म्हणून गोंदिया आगारात कार्यरत असतांना दिनांक ९.३.२००५ रोजी डिझेल टँकर गोंदिया आगाराच्या भूमिगत टाकीमध्ये रिकामा करुन

घेतांना ९९३ लिटर डिझेलची घट आल्याचे प्रकरणी यंत्र अभियंता (चालान) भंडारा यांनी सादर केलेल्या दिनांक १४.३.२००५ च्या अहवालावर आधारित सक्षम प्राधिकारी प्रादेशिक व्यवस्थापक, नागपूर यांनी आपणावर आरोपपत्र बजावले असून त्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी म्हणून आपणास दिलेली शिक्षा व त्यावर आपण केलेले प्रथम व द्वितीय आवेदनावर झालेल्या निर्णयाच्या प्रती आपणास त्या त्या वेळी देण्यात आलेल्या आहेत. तसेच मुद्या क्रमांक २ मध्ये मागणी केलेल्या माहितीबाबत सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविल्याचे सुनावणीत नमुद केले. त्यानंतर अपीलकर्त्याने उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे दिनांक २४.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २.११.२०१० रोजी ठेवण्यात आली. त्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर राहिले. तथापी जनमाहिती अधिकारी हे हजर राहिले. त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २.११.२०१० रोजी देण्यात येऊन अपील निकाली काढले व त्या निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्यास नेमकी कोणत्या आरोपपत्राबाबत माहिती हवी आहे ती त्यांनी विभागीय कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी. तसेच अपीलकर्त्यास महामंडळाने विहित केलेल्या शिस्त व आवेदन कार्यपध्दतीचे प्रत हवी असल्यास नियमानुसार आवश्यक ते शुल्क घेऊन अपीलार्थीस देण्यात यावी असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिला.

४. अपीलकर्ता तसेच उत्तरवादी यांचे प्रतिनिधी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक ९.८.२०१० चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक २३.८.२०१० रोजी पोस्टाने प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १४.९.२०१० च्या पत्राने उत्तर पाठविले आहे. तथापी अपीलकर्त्याचे विरुध्द केलेल्या कारवाईच्या संबंधात त्यांनी मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रती जरी त्यांना त्या त्या वेळी उपलब्ध करुन दिलेल्या असल्यातरी आता माहितीच्या अधिकारात त्यांना मुद्या क्रमांक १ व २ मध्ये त्यांचे अपराधा संबंधात मागितलेल्या माहितीच्या प्रती त्यांना पुन्हा उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

... ४

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४३/२०११.

श्री. कृष्णराव माधवराव धकाते,
राममंदीर वार्ड, बडाबाजार,
भंडारा - ४४१ ९०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. एन. गोहत्रे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
भंडारा विभाग, भंडारा.

श्री. एस. एम. वधवा,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय लेखा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
भंडारा विभाग, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.४.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २०.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन जात अवैध ठरविल्यानंतर वरिष्ठ पदावरुन कनिष्ठ पदावर पदावन्नत केल्यानंतर

... २

करण्यात आलेल्या पगाराचे वसुलीबाबत त्यांनी श्री. व्ही. एस. रंभाड, श्री. एम. एम. ढवळे, श्री. एस. जी. सातकर, श्री. डी. एन. निमजे या कर्मचाऱ्यांचे वसुलीबाबत माहिती मागितलेली होती. कारण सदरच्या कर्मचाऱ्यांची जात अवैध ठरविल्यानंतर त्यांना वरिष्ठ पदावरुन कनिष्ठ पदावर पदावन्नत केले होते. त्यामुळे त्यांचे पगारातून वसुली करण्याची त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १०.१२.२०१० रोजी असे कळविण्यात आले की, आपण ४ कर्मचाऱ्यांची जात अवैध ठरविल्यानंतर वरिष्ठ पदावरुन कनिष्ठ पदावर पदावन्नत केल्यानंतर करण्यात आलेल्या वसुलीबाबतची माहिती ही आपणासी संबंधित नसून त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ११ नुसार ही माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने त्यामध्ये जनहित नसून वैयक्तिक हित असल्याने व गोपनीयतेचा कायदा, १९२३ नुसार आपणास गोपनीय माहिती पुरविता येणार नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी कळवून माहिती देण्यास नकार दिला म्हणून त्यांनी प्रथम अपील विभाग नियंत्रक, भंडारा यांचेकडे सादर केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ११.१.२०११ रोजी घेण्यात आली. प्रथम अपीलाचे निर्णयात सदरची माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने ज्यांनी माहिती देण्यास संमती दिली ती माहिती देण्यात यावी व ज्यांनी संमती दिली नाही ती माहिती देता येणार नाही असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिला. तथापी अपीलकर्ता यांना कोणतीच माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २०.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयात दिनांक २६.११.२०१० रोजी प्राप्त झाला व अपीलकर्त्यास दिनांक १०.१२.२०१० रोजीच्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने व गोपनीयतेचा कायदा, १९२३ नुसार सदरची माहिती गोपनीय असल्याने आपण मागितलेली माहिती देता येणार नाही असे कळविलेले आहे. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. दरम्यानचा काळात जनमाहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाला माहिती देण्याबाबत विचारणा केली. त्यामध्ये एका व्यक्तिने माहिती देण्यास हरकत नाही असे कळविले. एक व्यक्ती हा मय्यत झालेला असुन २ व्यक्तींनी माहिती देण्याचे संदर्भात काहीही कळविले नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

... ३

४.  अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने महामंडळाचे सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या जाती अवैध ठरविल्यामुळे वरिष्ठ पदावरुन कनिष्ठ पदावर पदोन्नती झाल्यास वसुलीच्या संबंधात माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती ही महामंडळाचे कार्यालयाशी संबंधित आहे. तसेच सदरची माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे त्यामध्ये त्रयस्थ पक्षाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. तसेच सदरची माहिती वसुलीबाबत असल्यामुळे त्यामध्ये कोणतीही गोपनीयता दिसून येत नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २०.११.२०१० च्या माहिती अर्जात मागितलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-  दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२८५-२८७/२८.४.२०११

# २ मे, २०११

# ते

# ३१ मे, २०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६३/२०११.

श्री. मिताराम धनलाल मंगलकर,
मु. ब्राम्हणी, पो. बोरकन्हार, ता. आमगांव, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, आमगांव, जि. गोंदिया.

श्री. पी. सी. मेश्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत बाम्हणी, पो. बोरकन्हार, ता. आमगावं, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. खोब्रागडे, कक्ष अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, बाम्हणी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत भवन बांधकामाबाबतची एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १९.१.२०११ रोजी मागितलेली माहिती ग्रामपंचायत, बाम्हणी कडून मिळाली आहे. मिळालेल्या माहिती पासून माझे समाधान झाले आहे व माझी कोणतीही तक्रार नाही असे लेखी निवेदन दिल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२८९/२.५.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६४/२०११.

श्री. अशोक कवडू फुंडे,
मु. ब्राम्हणी, पो. बोरकन्हार, ता. आमगांव, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, आमगांव, जि. गोंदिया.

श्री. पी. सी. मेश्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत बाम्हणी, पो. बोरकन्हार, ता. आमगावं, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. खोब्रागडे, कक्ष अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, बाम्हणी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन रोजगार हमी योजनेची कामे २००७ ते २०१० पर्यंतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.१.२०११ रोजी मागितलेली माहिती ग्रामपंचायत, बाम्हणी कडून मिळाली आहे. मिळालेल्या माहिती पासून माझे समाधान झाले आहे व माझा कोणतीही आक्षेप नाही असे लेखी निवेदन दिल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२९०/२.५.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६६/२०११.

श्री. अमरलाल महागुजी प्रजापती,
मु. ब्राम्हणी, पो. बोरकन्हार, ता. आमगांव, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, आमगांव, जि. गोंदिया.

श्री. पी. सी. मेश्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत बाम्हणी, पो. बोरकन्हार, ता. आमगावं, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. खोब्रागडे, कक्ष अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, बाम्हणी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन १२ वा वित्त आयोग, सामान्य फंड अंतर्गत एकूण निधी, पाणी पट्टी फंड, एम. आर. ई. जी. फड ची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती मला प्राप्त झाली आहे. त्या माहिती पासून समाधान झाले आहे व त्यावर माझा कोणतीही आक्षेप नाही असे लेखी निवेदन दिल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२९१/२.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७८/२०११.**

श्री. जावेद अली जुल्फेकार अली,
नातीक चौक, सर्कल नं. १, भालदारपुरा
नागपूर - ४४० ०१८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. पी. वाय. थोटे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय,
नरसाळा रोड, नागपूर - ४४० ०३४. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. अविनाश शिरभाते, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ८.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन सन १९९३, १९९४, १९९५, १९९६ व १९९७ या कालावधीत नेमलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर यांचे नावांची

... २

यादी व त्या संबंधात एकूण ९ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांचेकडे दिनांक ८.१२.२०१० रोजी दाखल केले. तथापी प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

२. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ८.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १०.११.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक १६.११.२०१० च्या पत्राने एकूण ९ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची त्यांनी सुनावणीत नमुद केले. परंतु सन १९९३ मधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीची कोणतीही माहिती त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधीने असे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाले होते. त्या अपीलाची सुनावणी दिनांक ४.२.२०११ रोजी ठेवण्यात आली. त्या दिवशी अपीलकर्ता हे गैरहजर राहिले. मात्र प्राचार्य यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याची कागदपत्रे पुराव्यानिशी दाखविल्यामुळे प्रथम अपील निकाली काढण्यात आल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडील दिनांक ८.११.२०१० चा माहितीच्या अर्जाला अनुसरुन दिनांक १६.११.२०१० च्या पत्राने एकूण ९ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी सन १९९३ मध्ये कोणतीच नियुक्ती केलेली नाही असे देखील जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविलेले आहे. म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७७/२०११.

श्री. राधेश्याम परसरामजी काबरा,
शिवाजी वार्ड, मु. पो. ता. देसाईगंज,
जि. गडचिरोली - ४४१ २०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,
जि. गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. देसाईगंज, जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांच्यावतीने श्री. एम. आर. चव्हाण, नायब तहसीलदार हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. एन. जी. राचेलवार, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २.७.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरच्या अर्जात अपीलकर्त्यास उविअ/रा.मा.क्र. ३८/एल. एन. ए. २२/९४-९५, मौजा देसाईगंज या प्रकरणात दिनांक ६.४.१९९८ रोजी झालेल्या करारनाम्या संबंधाने एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती

... २

अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी दिनांक २६.७.२०१० रोजीच्या पत्राने अपीलकर्त्यास एकूण ३ मुद्यांची वस्तुस्थिती कळविली व त्यामध्ये असे नमुद केले की, मुद्या क्रमांक १ बाबत व मुद्या क्रमांक २ बाबत प्रश्नोत्तराचे स्वरुपात माहिती असल्याने पुरविता येत नाही. त्या संदर्भात नेमका दस्ताऐवज मागण्यात यावा. तसेच मुद्या क्रमांक ३ बाबतही दस्तऐवजांची मागणी नसल्याने माहिती पुरविता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडे दिनांक ४.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ८.९.२०१० रोजी व दिनांक १५.९.२०१० रोजी घेण्यात आली. परंतु दोन्ही तारखांना अपीलकर्ता हे गैरहजर राहिले. तथापी अपीलाचा निर्णय जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेऊन दिनांक ३०.१०.२०१० रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्यास प्रत्यक्ष कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत जनमाहिती अधिकारी यांनी बोलावून त्यांना आवश्यक असलेले दस्तऐवज तपासणीसाठी देऊन त्यांच्या प्रती अर्जदारास विनामुल्य पुरविण्यात याव्यात असा निर्णय दिला. प्रथम अपीलाचे निर्णयानुसार अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक १८.११.२०१० रोजी हजर झाले. त्यांना दस्तऐवज तपासणीसाठी देण्यात आले असता त्यांनी मागणी केलेले दस्तऐवज प्रमाणित प्रत १ ते १६ पेजेस विनामुल्य उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधीचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे दिनांक १८.११.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/२९५-२९६/३.५.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७६/२०११.

श्री. नानाजी जैदास रामटेके,
रा. जानवा, पो. इटखेडा,
ता. अर्जूनी/मोर, जि. गोंदिया. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सी. एन. इंगळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जलस्वराज प्रकल्प अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. जी. जे. जाधव,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत जानवा,
ता. अर्जुनी/मोर, जि. गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ८.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत जानवा, पो. इटखेडा, ता. अर्जुनी/मोर, जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्राम पंचायत, जानवा मार्फत जलस्वराज प्रकल्प योजना राबविण्यात आली असून प्रकल्प क्रमांक १ अनुषंगाने अंदाजपत्रकाची प्रत, नकाशाची प्रत, बांधकाम ठेका दिलेल्या करारनाम्याची प्रत, साहित्य

... २

खरेदी केलेल्या देयकाची प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापी विहित मुदतीत त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ६.१२.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जलस्वराज प्रकल्प, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यांना दिनांक १.५.२०११ रोजी माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती विलंबाने मिळाल्याचे त्यांनी नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ८.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही जलस्वराज प्रकल्प राबविण्याबाबत होती. ग्रामपातळीवर जलस्वराज प्रकल्प राबविण्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती आहे. या समितीचे अध्यक्ष व सचिव हे जलस्वराज प्रकल्प राबविण्याचे संपूर्ण आर्थिक व्यवहार पाहत असतात. या समितीकडे हा प्रकल्प राबविण्यासाठी जिल्हा स्तरावरुन चमू प्रमुख जिल्हा सुलभीकरण गट यांचेकडून निधी प्राप्त होतो. तो निधी या समितीचे स्वतंत्र खात्यात जमा होतो व त्यांचा संपूर्ण रेकॉर्ड हा ग्रामसेवकाकडे नसून त्या समितीकडे असतो. म्हणून ग्रामसेवकाने दिनांक १९.१०.२०१० च्या पत्राने सचिव, जलस्वराज प्रकल्प, जानवा, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांचेकडे पत्र पाठवून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले व त्याची प्रत अपीलकर्त्यास देऊन आपण मागितलेली माहिती संबंधित सचिव, जलस्वराज प्रकल्प, जानवा या समितीकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविले. तथापी ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जानवा यांचे सचिवाकडून अपीलकर्त्याला कोणतीही माहिती त्यांना प्राप्त झाली नाही. म्हणून अपीलकर्त्याने प्रथम अपील जलस्वराज प्रकल्प अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे दिनांक ६.१२.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २८.४.२०११ रोजी ठेवली होती व त्या सुनावणीमध्ये अपीलकर्ता तसेच ग्रामसेवक व अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामपंचायत जानवा यांना देखील संपूर्ण माहितीसह हजर राहण्याबाबत कळविले होते. तथापी दिनांक २८.४.२०११ च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर झाले नाही. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जलस्वराज समिती, जानवा यांचेकडून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती प्राप्त केली व सदरची माहिती त्यांनी सचिव, ग्राम पंचायत, जानवा यांना दिनांक ३०.४.२०११ रोजी अपीलकर्त्यास उपलब्ध

करुन दिली. त्यानंतर सचिव, ग्रामपंचायत, जानवा यांनी अपीलकर्त्यास उपरोक्त माहिती दिनांक १.५.२०११ रोजी उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच सचिवांनी आयोगासमोर दाखविली व अपीलकर्त्याने देखील सदरची माहिती प्राप्त झाल्याचे मान्य केले. अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती उपलब्ध झाल्याने अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७१/२०११.**

श्री. उदाराम लक्ष्मणराव डेकाटे,
प्रेमनगर, झेंडा चौक, नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
धर्मदाय उपआयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर.

श्री. नारायण कावळे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
बहुउद्येशिय त्रिरुप शिक्षण संस्था,
ईतवारा, मस्कासाथ रेल्वे पुलाजवळ,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. उमाठे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, बहुउद्येशिय त्रिरुप शिक्षण संस्था, ईतवारा, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज

... २

सादर करुन बहुउद्देशिय त्रिरुप शिक्षण संस्था व श्री उच्च प्राथमिक शाळा, राजेंद्रनगर, नागपूर यांचे विषयी एकूण ७ मुद्यांची माहिती सन १९८७ ते मार्च २०१० पर्यंत माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १.७.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २.७.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत म्हणजे दिनांक २९.७.२०१० च्या पत्राने उत्तर पाठविले व त्यामध्ये असे नमुद केले की, बहुउद्देशिय त्रिरुप शिक्षण संस्था, नागपूर ही संस्था सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदविण्यात आली आहे. तथापी या संस्थेला शासनाकडून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणतेही आर्थिक सहाय्य मिळत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये ही संस्था शासकीय प्राधिकरणामध्ये मोडत नाही. त्यामुळे या संस्थेची माहिती देता येणार नाही. तसेच श्री.उच्च प्राथमिक शाळा, राजेंद्रनगर, नागपूर या शाळेची माहिती मागितलेली आहे. यासंबंधी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दिनांक ८.६.२०१० ला झालेल्या सुनावणीचे वेळी आपण शिक्षणाधिकारी कार्यालयात माहिती प्राप्त केली आहे. त्यामुळे पुन्हा माहिती देण्याची आवश्यकता नाही असे त्यावेळी सांगितले म्हणून आपणास माहिती मिळाली असल्यामुळे व आमचेकडे त्या व्यतिरिक्त माहिती नसल्यामुळे पुन्हा माहिती देता येत नाही असे सचिवांनी दिनांक २९.७.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास कळविल्याचे सुनावणीत नमुद केले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, बहुउद्देशिय त्रिरुप शिक्षण संस्था, नागपूर यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येंते की, बहुउद्देशिय त्रिरुप शिक्षण संस्था, नागपूर ही सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० खाली नोंद झालेली आहे. तसेच या संस्थेच्या माध्यमातून श्री.उच्च प्राथमिक शाळा, राजेंद्रनगर, नागपूर ही शैक्षणिक संस्था कार्यरत आहे. सदरच्या शैक्षणिक संस्थेला शासनाकडून अनुदान प्राप्त होत आहे म्हणून जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडे जी माहिती उपलब्ध असेल ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच अपीलकर्ता यांनी

मागितलेल्या माहितीच्या अर्जातील माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी सन १९८७ ते मार्च २०१० पर्यंत व्यापक प्रमाणात माहिती मागितलेली आहे असे दिसून येते. त्यामुळे सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्त्यास जी माहिती उपलब्ध असेल त्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, बहुउद्देशिय त्रिरुप शिक्षण संस्था, नागपूर यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती पैकी उपलब्ध झालेलया माहितीची छायांकिती प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३००-३०२/३.५.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७२/२०११.

श्री. उदाराम लक्ष्मणराव डेकाटे,
प्रेमनगर, झेंडा चौक, नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सोमेश्वर रघुनाथ नैताम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
आदर्श उच्च प्राथमिक शाळा,
गोपाल नगर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.५.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका हया शाळेचा निकाल असल्यामुळे हजर राहू शकल्या नाही तरी त्यांचेवतीने श्री. बाकडे, अध्यक्ष हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १३.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, आदर्श उच्च प्राथमिक शाळा, गोपालनगर, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन शाळेच्या शाळा समितीच्या कार्यवृत्ताची झेरॉक्स प्रत, नोटीस बुकाची झेरॉक्स प्रत, शाळेचे

... २

सर्वच प्रकारचे बँक खात्याची माहिती सन २००५ ते ३१ मार्च २०१० पर्यंतची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ११.१०.२०१० रोजी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली. प्रथम अपीलात ८ दिवसात माहिती देण्याचा निर्णय दिला. तरी देखील त्यांना माहिती उपलबध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे व माहिती देण्यास विलंब झाल्याबद्यल जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधीनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा दिनांक १३.८.२०१० चा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे दिनांक १६.८.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्ता हे या शैक्षणिक संस्थेचे उपाध्यक्ष आहेत म्हणून त्यांनी मागितलेल्या माहितीचे निरिक्षण करुन घ्यावे असे त्यांना कळविले होते. तथापी अपीलकर्ता माहितीचे निरिक्षण करुन घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात आले नाही. तसेच जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका सौ. उषा जोशी यांनी आयोगाकडे दिनांक ७.१.२०११ रोजी लेखी निवेदन सादर करुन असे नमुद केले आहे की, अपीलकर्ता हे या शाळेचे उपाध्यक्ष असून व्यवस्थापनात व त्यांचेमध्ये वाद असल्यामुळे अपीलकर्त्याने ही माहिती मागितलेली असून त्या माहितीचा ते दुरुपयोग करण्याची शक्यता आहे.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ४.१२.२०१० रोजी घेण्यात आली. तथापी अपीलाचे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका हया गैरहजर होत्या. अपीलकर्त्याचे म्हणणे ऐकून घेऊन अपीलकर्त्यास ८ दिवसांत जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय त्यांनी दिलेला आहे. मात्र त्यानंतरही अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही.

... ३

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक १३.८.२०१० चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचेकडे दिनांक १६.८.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्ता जरी संस्थेचे उपाध्यक्ष असले तरी माहितीच्या अधिकाराखाली त्यांनी मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध केलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यास झालेल्या विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका हया जबाबदार दिसून येतात. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, आदर्श उच्च प्राथमिक शाळा, गोपालनगर, नागपूर यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केला आहे म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. उपरोक्त कालावधीत त्यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २०५/२०११.**

श्री. निलकंठ काशीनाथ ठाकरे,
मु. वेळवा, पो. तो. पोभुर्णा, जि. चंद्रपूर - ४४२ ५०६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. पी. ठाकरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, पोभुर्णा,
जि. चंद्रपूर.

श्री. एस. यु. सब्बनवार,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, वेळवा,
ता. पोभुर्णा, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २७.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, वेळवा, ता. पोभूर्णा, जि. चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत वेळवाने भारत निर्माण योजनेअंतर्गत केलेल्या कामाची एकूण ११ मुद्यांवर माहिती मागितलेली

... २

होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून मुद्या क्रमांक १ ते ६ व ९ मुद्यांची माहिती प्राप्त झाली. मात्र मुद्या क्रमांक ७, ८, १० व ११ या ४ मुद्यांची माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, पोभुर्णा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयात १५ दिवसात राहिलेल्या मुद्यांची संबंधितांकडून माहिती प्राप्त करुन घेऊन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुरविण्याबाबत निर्देश दिले होते. तथापी त्यांना अद्यापही मुद्या क्रमांक ७, ८, १० व ११ ची माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा ग्राम सचिव यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २७.९.२०१० चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक २७.१०.२०१० च्या पत्राने ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध असलेली मुद्या क्रमांक १ ते ६ ची व मुद्या क्रमांक ९ ची माहिती अपीलकर्त्यास पुरविण्यात आली. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली मुद्या क्रमांक ७, ८, १० व ११ ची माहिती ही भारत निर्माण योजना अंतर्गत गावात पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा केला जातो. या योजनेची अंमलबजावणी ग्राम पातळीवर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती आहे त्यांचे मार्फत या कामाचा हिशोब ठेवला जातो. म्हणून अपीलकर्त्याने मागितलेली मुद्या क्रमांक ७, ८, १० व ११ ची माहिती ही या समितीकडे असल्यामुळे व समितीने सदरचे काम कंत्राटदाराला दिलेली असल्यामुळे त्यांचेकडून माहिती मागविलेली आहे. तथापी सदरच्या ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडून किंवा ठेकेदाराकडून त्यांची माहिती प्राप्त झाली नसल्यामुळे उर्वरित मुद्यांची माहिती अपीलकर्त्यास देण्यात आलेली नाही असे सचिव यांनी सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, पोंभूर्णा यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याने दिनांक २८.१०.२०१० रोजी त्यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ११.११.२०१० रोजी घेण्यात आली त्या निर्णयामध्ये ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध असलेली माहिती ७ दिवसांत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुरवावी. मात्र मुद्या क्रमांक ७, ८, १० व ११ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध नसून संबंधित समितीकडून माहिती मागवून १५ दिवसांत

अपीलकर्त्यास पुरविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध असलेली मुद्दा क्रमांक १ ते ६ व मुद्दा क्रमांक ९ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र मुद्दा क्रमांक ७, ८, १० व ११ ची माहिती ही ग्रामपातळीवरील ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडे आहे. त्यांनी ही माहिती अद्यापपर्यंत जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिला नाही म्हणून अपीलकर्त्यास या मुद्यांची माहिती पुरविता आली नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. याबाबत संवर्ग विकास अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, भारत निर्माण योजने अंतर्गत करावयाच्या कामांबाबत पाणी पुरवठा संबंधात ग्रामपातळीवर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती आहे. सध्या ती समिती ग्रामसभेमधून निवडून येते व या समितीमार्फत या योजनांची अंमलबजावणी होत असते आणि याची माहिती समितीचे अध्यक्ष व सचिव यांचेकडे असते. तसेच या बांधकामावर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणीसाठी उपअभियंता असतो. तो उपअभियंता या कामावर देखरेख ठेवत असतो. म्हणून प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, मुद्दा क्रमांक ७, ८, १० व ११ ची माहिती ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती कडून किंवा या कामावर देखरेख ठेवणारे उपअभियंता यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास सदरची माहिती पुरविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, वेळवा आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, पोभुर्णा यांनी मुद्दा क्रमांक ७, ८, १० व ११ ची माहिती ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती कडून किंवा या कामावर देखरेख ठेवणारे उपअभियंता यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास विनामुल्य पाठवावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २०६/२०११.

श्री. आनंद जगन्नाथ गुल्हाने,
ए-२५ माईन्स रेसक्सू स्टेशन,
डब्ल्यु. सी. एल. इंदोरा कॉम्प्लेक्स,
नागपूर - ४४० ०२६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
सावनेर, जि. नागपूर.

श्री. अरुण मावळे,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. व्ही. आर. दर्भे, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, सावनेर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन मौजा पाटणसावंगी येथील सर्वे नं. ३२३ ए व सी ची संपूर्ण जमीन ३८ + २ म्हणजे ४० प्लॉटमध्ये विभागणी करुन तलाठी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम किंवा

... २

इतर कुठलेही नियम व कायद्यानुसार अंमलबजावणी केली याबाबत ३ मुद्यांची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना ३० दिवसांत जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ४.१२.२०१० रोजी तहसीलदार, सावनेर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २७.१२.२०१० रोजी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३१.१२.२०१० रोजी देण्यात आला व प्रथम अपीलाचे निर्णयात असा आदेश दिला की, जनमाहिती अधिकारी यांना हा आदेश प्राप्त झाल्या पासून ८ दिवसांत अपीलकर्त्यास माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर दिनांक २४.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती प्राप्त झाली. मात्र मुद्या क्रमांक ३ बाबतची माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून माहिती देण्यास विलंब झालेला असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

३. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ४.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे तहसीलदार यांचे प्रस्तुतकार यांचेकडून दिनांक २५.१०.२०१० रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्यावेळी जनमाहिती अधिकारी म्हणून कु. शरयु आडे, परिविक्षाधीन तहसीलदार या कार्यरत होत्या. कु. शरयु आडे हया ऑक्टोंबर २०१० ते ७ मार्च २०११ पर्यंत या पदावर कार्यरत होत्या असे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. अपीलकर्त्याच्या दिनांक ४.१०.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक २४.१.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध झालेली आहे. म्हणजे अपीलकर्त्यास ३० दिवसानंतर माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. या विलंबास तत्कालीन जनमाहिती अधिकारी कु. शरयु आडे हया जबाबदार दिसून येतात. अपीलकर्त्यास प्रथम अपीलाचे निर्णयानंतर दिनांक २४.१.२०११ रोजी २ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते व मुद्या क्रमांक ३ ची माहिती अद्यापही अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक ३ ची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक ३ ची माहिती विनामूल्य पोस्टाने किंवा व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्त्याचा दिनांक ४.१०.२०१० माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे दिनांक ८.१०.२०१० रोजी प्राप्त झालेला दिसतो. सदरच्या अर्जावर ३० दिवसांचे मुदतीत तत्कालीन जनमाहिती अधिकारी कु. शरयु आडे यांनी कोणतीही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर दिनांक २४.१.२०११ रोजी अपीलकर्त्यास २ मुद्यांची माहिती उपलब्ध झालेली दिसून येते व मुद्या क्रमांक ३ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही या विलंबास जनमाहिती अधिकारी कु. शरयु आडे हया जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- शास्ती कां लादु नये याबाबत खुलासा त्यांना हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा.

३) विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सदरच्या आदेशाची प्रत कु. शरयु आडे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २०४/२०११.

श्री. काशीनाथ जनार्दनराव सोनकुसळे,
प्रतापनगर जवळ, न्यु पोस्टल कॉलनी,
मुनोत लॉन मागे, मानस मंदीर पोस्ट,
वार्ड नं. १, वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विवेक बोंदरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.)
जिल्हा परिषद, वर्धा.

श्री. डी. ए. ऊईके,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, सेलू,
जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २८.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन सन २००६-०७ व २००७-०८ या वित्तीय वर्षात पंचायत समिती मार्फत वॉटर फिल्टर खरेदी केल्या संबंधात एकूण ८ मुद्यांवर

... २

माहिती मागितली. जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना माहिती मिळाली. मात्र मिळालेली माहिती ही अपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दिनांक ३.१.२०११ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे दाखल केले. तथापी प्रथम अपील खारीज झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २८.९.२०१० च्या माहितीचा अर्ज प्राप्त झालेला होता. त्या माहिती अर्जाला अनुसरुन सामान्य प्रशासन विभागामध्ये उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास दिनांक १४.१०.२०१० ला प्रत्यक्ष पुरविलेली आहे. तसेच माहिती अर्जातील काही माहिती ही पंचायत समिती स्तरावरील असल्यामुळे सर्व पंचायत समितीच्या जनमाहिती अधिकारी यांचेकडे अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज दिनांक १.१०.२०१० च्या पत्राने पाठवून अपीलकर्त्यास परस्पर माहिती पुरविण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने वॉटर फिल्टर खरेदी संबंधात मागितलेली माहिती ही सेलू व वर्धा या दोन पंचायत समिती कडून वाटर फिल्टर खरेदी झालेली होती. म्हणून सेलू पंचायत समितीकडून अपीलकर्त्यास दिनांक १८.११.२०१० च्या पत्राने पैसे भरण्यास कळविले. अपीलकर्त्याने दिनांक ३.१२.२०१० रोजी माहितीचे शुल्क भरले व ती माहिती अपीलकर्त्यास दिलेली आहे. तसेच वर्धा पंचायत समिती यांनी अपीलकर्त्यास दिनांक ५.५.२०११ रोजी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दिली. त्यानंतर अपीलकर्त्याने दिनांक ३.१.२०११ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १७.१.२०११ रोजी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय त्याच दिवशी देण्यात येऊन अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्यामुळे अपीलकर्त्याचे प्रथम अपील खारीज केले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

४. त्यावर अपीलकर्त्याने आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झालेली आहे. मात्र त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक ५ संदर्भात वॉटर फिल्टर खरेदी संबधाने नस्ती व अभिलेखाच्या सत्यप्रती त्यांना मिळाल्या नाही. तसेच मुद्या क्रमांक २ बाबत विजेवर न चालणाऱ्या उपकरणाचे खरेदी संदर्भात दर कराची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

५. याबाबत माहिती अधिकारी आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आयोगास पुढे असे सांगितले की, वॉटर फिल्टर खरेदी संदर्भात संबंधित कार्यालयाच्या सदरच्या नस्त्या विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे चौकशीसाठी सादर केलेल्या आहेत म्हणून त्या सद्यःस्थितीत उपलब्ध करुन देता येत नाही. कारण चौकशीची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही. म्हणून ही वस्तुस्थिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. तसेच मुद्या क्रमांक २ बाबत विजेवर न चालणाऱ्या वॉटर फिल्टरच्या शासकीय दराची माहिती जनमाहिती अधिकारी, वर्धा व सेलू यांचेकडे उपलब्ध नाही असे दोन्ही जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. म्हणून ही वस्तुस्थिती देखील अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक ५ बाबत संबंधित धारिका विभागीय चौकशीच्या कामासाठी विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे सादर केलेली असल्यामुळे सद्यःस्थितीत त्याची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे स्पष्टपणे कळवावे.

२) तसेच मुद्या क्रमांक २ बाबत विजेवर न चालणाऱ्या वॉटर फिल्टरचा शासकीय दर पंचायत समिती, सेलू व पंचायत समिती, वर्धा यांचेकडे उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती, वर्धा व जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती, सेलू यांनी अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळवावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३१२-३१४/१०.५.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २०३/२०११.

श्री. काशीनाथ जनार्दनराव सोनकुसळे,
प्रतापनगर जवळ, न्यु पोस्टल कॉलनी,
मुनोत लॉन मागे, मानस मंदीर पोस्ट,
वार्ड नं. १, वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. के. एस. चव्हाण,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक (ए.क्षे.वि.का.)
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्विन्स गार्डन, पुणे - १.

श्री. आय. एस. कसबे,
जनमाहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्विन्स गार्डन, पुणे - १ ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १६.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज

... २

सादर करुन महाराष्ट्रातील सर्व जमात पडताळणी समितीत उमेदवारांनी मागणी केल्यावर खुली चौकशी होते अथवा नाही याबाबत माहिती मागितलेली होती. तसेच जमाती पडताळणी प्रमाणपत्र समितीमध्ये दक्षता पथकातील कर्मचाऱ्यांची उलट तपासणी घेता येईल अथवा नाही याबाबत माहिती मागितलेली होती. तसेच जमात पडताळणी प्रमाणपत्र समिती उलट तपासणी घेणे, साक्षी पुरावे तपासणे, नोंदविणे याबाबत माहिती मागितली. अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ६.९.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली होती. तथापी सदरच्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १.११.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. तथापी प्रथम अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता हजर होऊ शकले नाही. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २६.११.२०१० रोजी देण्यात आला व त्या निर्णयामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ६.९.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली ती योग्य आहे. तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीसाठी www.trti.mah.nic.in या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध असून त्या संकेत स्थळाचा वापर करावा असा निर्णय दिलेला असून प्रथम अपील फेटाळले आहे. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १६.८.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे पोस्टाने दिनांक २५.८.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची तसेच मतप्रदर्शन स्वरुपाची व अभिप्राय स्वरुपाची असल्यामुळे अपीलकर्त्यास दिनांक ६.९.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच अनुसुचित जमाती प्रमाणपपत्र तपासणी समिती कामकाजाबाबत त्यांचे कार्यालयाचे संकेत स्थळावर संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामध्ये अपीलकर्त्याने विचारलेले प्रश्नाबाबतची माहिती ही उपलब्ध आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ६.९.२०१० च्या पत्राने कळविले असल्याचे सुनावणीत सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसंचालक यांचेकडे सादर केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली.

मात्र अपीलकर्ता सुनावणीस हजर राहिले नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले व जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ६.९.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे प्रथम अपील फेटाळण्यात आले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक १६.८.२०१० चा माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपीलकर्त्याने अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणीचे कामकाजाबाबत १ ते ३ मुद्यांमध्ये प्रश्नार्थक तसेच मतप्रदर्शन व अभिप्रायात्मक माहिती विचारलेली दिसते. त्याला अनुसरुन जनमाहिती आिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ६.९.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच अनुसुचित जमाती प्रमाणपत्र समितीचे कामकाजाबाबतची संकेत स्थळ अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेले आहे. त्या संकेत स्थळाचा अपीलकतर्याने उपयोग करुन त्यांना त्या संकेत स्थळावरुन आवश्यक ते मार्गदर्शन होऊ शकेल. म्हणून अपीलकर्ताचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३१५-३१७/१०.५.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २०९/२०११.

श्री. ओ. प. कटयारमल,
११८/डी, पांडे ले आऊट, खामला, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद.

श्री. एस. एम. मांगुळकर,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोग, औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचा दिनांक १५.३.२००७ चा माहितीचा अर्ज माहिती आयोग, नागपूर, औरंगाबाद व मुंबई येथे पाठविले असल्याचे दिसून येते. नागपूर खंडपीठाकडे दाखल केलेल्या अर्जावर दिनांक १६.२.२००९ रोजी निर्णय दिलेला आहे. औरंगाबाद आयोगाने नागपूर आयोगास हस्तांतरीत केलेल्या अर्जावर आज सुनावणी आहे. एकदा आयोगाचा निर्णय झाल्यावर त्याच अर्जावर पुन्हा निर्णय घेणे योग्य होणार नाही. त्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३१८/१०.५.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१६/२०११.

श्री. लक्ष्मय्या राजम नागुला,
वन परिक्षेत्र कार्यालय, नागभिड,
जि. चंद्रपूर - ४४१ २०५. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. २,
चंद्रपूर.

श्री. अनिल काळे,
जनमाहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. २,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांनी रोजनाम्यावर सही केली परंतु प्रत्यक्ष सुनावणी दरम्यान हजर राहिले नाही. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. संजय देवकाते, जनसंपर्क अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे आयोगापुढे प्रत्यक्ष सुनावणीस हजर झाले नाही म्हणून प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

... २

३.	जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ३०.९.२०१० व दिनांक २१.१०.२०१० चा माहिती अधिकाराखालील अर्ज त्यांचे कार्यालयाकडे अनुक्रमे दिनांक ४.१०.२०१० व दिनांक २५.१०.२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्या अर्जात अपीलकर्त्यांने भोई मोहल्ला (बेस्तागुळम), वार्ड नं. ५, कोत्तागुडम, ता.सिरोंचा, जि. गडचिरोली येथील रहिवासांचे समिती मार्फत जात पडताळणी बाबतची कागदपत्रे तसेच जात प्रमाणपत्र संबंधीचे अधिनियम व नियमांची सत्यप्रत व त्याच प्रमाणे शासन निर्णय इत्यादी संबंधात एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. यापुर्वी देखील अपीलकर्त्याने दिनांक ६.६.२०१० रोजी देखील अश्याच प्रकारची व जसाचा तसा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला होता. या अर्जामध्ये देखील त्या अर्जातील आशय व विषय हा एकच होता. तश्याच स्वरुपात आजच्या अपीलातील देखील माहिती अर्ज त्यांनी केला आहे. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्यास त्यांचे कार्यालयाकडे उपलबध असलेली माहिती दिनांक २९.१०.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याच प्रमाणे अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क रुपये १३२/- भरणा केल्यानंतर दिनांक २९.११.२०१० च्या पत्राने उर्वरित माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविलेली असून ते अपीलकर्त्यास मिहाल्याचे पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा समोर दाखविली. तसेच अपीलकर्त्याने शासन निर्णयाची प्रत मागितलेली आहे त्या शासनाच्या संकेतस्थळी उपलब्ध असून त्या संकेतस्थळाचा सांकेतांक देखील अपीलकर्त्यास कळविले आहे. अशा प्रकारे अपीलकर्त्यास त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

३.	तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले आहे की, यापुर्वी देखील अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे अशाच प्रकारे एकूण सुमारे ११ अपील दाखल केले होते. त्यांचे अपील क्रमांक ४००, ४०६, ४०७, १७, १८, ८०५, ८०६, ८०७, ८०८, ८२५ व १७५४ या अपीलांचा समावेश होता. सदरचे सर्व अपील आयोगाने खारीज केले आहेत. त्यांच्या पुराव्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे पुर्वीचे खारीज केलेल्या आदेशाच्या प्रती अवलोकनार्थ सादर केल्या. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे

असेही निदर्शनास आणून दिले आहे की, आयोगाने यापुर्वी अपीलकर्त्याचे अपील खारीज केले असून त्या अपीलाचे निर्णयात असे देखील नमुद केले आहे की, अपीलार्थी जी माहिती मागत आहेत त्यात कोणतेही व्यापक जनहित नसल्यामुळे व त्यांचे वैयक्तिक हिताकरिता माहिती मागत असल्यामुळ त्यांची सर्व अपीले यापुर्वी खारीज केलेली आहेत म्हणून हे अपील देखील खारीज करण्यास पात्र आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती दिनांक २९.१०.२०१० च्या पत्राने व दिनांक २९.११.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३१९-३२१/११.५.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१८/२०११.

श्री. अनिरुध्द गुलाब भोयर,
न्यु आर्शिवाद नगर, गिरोला (कारधा),
ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

डॉ. आर. डी. खंडाईत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वैद्यकीय अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र, खमारी (बुटी)
ता. जि. भंडारा.

श्री. केशव मारबते,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ सहाय्यक,
प्राथमिक आरोग्य केंद्र, खमारी (बुटी)
ता. जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २२.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, खमारी (बुटी), ता.जि. भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन आरोग्य केंद्रामधील औषधाबाबत तसेच स्वच्छता फंड निधी, बी.पी.एल. रुग्णांना नेतांना वाहनाची सुविधा

... २

इत्यादी बाबत एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्ता हा दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांनी विनामुल्य माहिती मागितलेली होती. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १६.१०.२०१० रोजी पत्र पाठवून असे कळविले आहे की, आपण स्वतः दारिद्रय रेषेखालील आहे असे अर्जात नमुद केलेले आहे. परंतु प्रत्यक्ष अर्ज तपासणी अंती अर्जा सोबत जोडलेले दारिद्रय रेषेखालील दाखला आपल्या नावे नसून श्री. गुलाब भोयर यांचे नावे आहे. तसेच सदर दाखला सचिव, ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत, चांदोरी यांचेकडून दिल्याचे निदर्शनास येतो. परंतु कार्यालयीन कामाकरिता खंड विकास अधिकारी यांच्या सहीचा दाखल आवश्यक आहे. तरी आपण हे पत्र मिळताच आपले नावाचे दारिद्रय रेषेखालील दाखला खंड विकास अधिकारी, यांचे सहीनिशी सादर करावा. जेणे करुन आपणास माहिती देता येईल. तसेच आपण सदर माहितीचे कागदपत्रांची झेरॉक्स प्रतीचा खर्च करण्यास तयार असल्यास तसे कळवावे. म्हणजे आपणास माहिती देता येईल. असे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले होते. तथापी अपीलकर्त्याने दारिद्रय रेषेखालील दाखल्याची पुर्तता केली नाही किंवा या पत्रावर काही उत्तर देखील पाठविले नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतर अपीलकर्त्यास दिनांक २५.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु मिळालेली माहिती अपूर्ण असल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास एकूण ६ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तथापी मशागत फंडाविषयी व स्वच्छता फंडाविषयी त्यांना माहिती मिळाली नाही असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सन २००७ पुर्वी मशागत फंड उपलब्ध नव्हता. त्यानंतर मशागत फंड उपलब्ध झालेला आहे. तसेच जो स्वच्छता फंड उपलब्ध झालेला आहे त्याची माहिती अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात हजर झाल्यास त्यांना ती घेणे शक्य होईल असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात प्रत्यक्ष हजर होऊन मशागत फंड व स्वच्छता फंडाबाबतची माहिती निरिक्षण करण्याचे मान्य केले म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी उपस्थित राहून मशागत फंड व स्वच्छता फंड याबाबतची माहिती निरिक्षण करुन घेऊन प्राप्त करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचेकडे त्यांचे कार्यालयात उपस्थित झाल्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३२२-३२४/११.५.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१९/२०११.

श्री. अनिरुध्द गुलाब भोयर,
न्यु आर्शिवाद नगर, गिरोला (कारधा),
ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

डॉ. विजय मारोती वासनिक,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वैद्यकीय अधिक्षक,
उपजिल्हा रुग्णालय, साकोली,
ता. साकोली, जि. भंडारा.

श्री. दिपक नारायण डोंगरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अधिक्षक,
उपजिल्हा रुग्णालय, साकोली,
ता. साकोली, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २१.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, साकोली, जि. भंडारा यांचेकडे माहितीचा अधिकाराखाली अर्ज सादर करुन आरोग्य केंद्रामधील औषधांची माहिती तसेच बी.पी.एल.लाभ धारकांना देण्यात येत असलेली रुग्णवाहिकेची माहिती,

... २

स्वच्छता फंडाची माहिती, बिल्डींग मशागत फंड असे एकूण ६ मुद्यांबाबत माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोागाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २१.९.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ५.१०.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक २०.१०.२०१० च्या पत्राने यु.पी.सी. द्वारे ६ मुद्यांची माहिती मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती पोस्टाने यु.पी.सी.द्वारे पाठविल्याचा पोस्टाचा पुरावा जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविला. मात्र सदरची माहिती अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे प्राप्त झाली नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर अपीलकर्त्यास सुनावणीचे वेळी दिनांक २०.१०.२०१० च्या पत्राने पाठविलेल्या माहितीची पुन्हा एक प्रत उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत केली. तसेच अपीलकर्त्यास ग्रामीण रुग्णालयातील मुख्य औषधी भांडारात उपलब्ध असलेलया औषधांबाबत त्यांना माहिती मिळाली नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, त्यांच्या ग्रामीण रुग्णालयात उपलब्ध असलेल्या ओषधांच्याबाबत मुख्य औषध निर्माण अधिकारी श्री. एस. के. चाचेरकर यांची बदली झाल्याने त्यांनी अद्याप औषधांचा कार्यभार हस्तांतर केला नाही. त्यामुळे ही माहिती पुरविण्यास थोडा कालावधी लागण्याची शक्यता आहे असे अपीलकर्त्यास कळविले आहे. तथापी सदरच्या औषधी भांडाराचे अपीलकर्त्यास निरिक्षण करुन घेता येईल व निरिक्षणानंतर आवश्यक ती माहिती त्यांना पुरविता येईल असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलकर्ताचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून औषधीचे भांडाराचे निरिक्षण करुन घ्यावे व निरिक्षणानंतर अपीलकर्त्यास रुपये १००/- पर्यंत येणाऱ्या खर्चाची माहिती झेरॉक्स प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१७/२०११.**

श्री. श्रीकृष्ण केवळराम माहुरे,
न्यु आर्शिवाद नगर, गिरोला (कारधा),
ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. व्ही. जे. भुरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, अर्जुनी (मोरगांव),
ता. अर्जुनी (मोरगांव), जि. गोंदिया.

श्री. एच. एस. वरठे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, प्रतापगड,
पो. बोडगांव सुखंद,
ता. अजुनी (मोरगांव), जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, प्रतापगड, पो. बोडगांव सुखंद, ता. अर्जुनी/मोरगांव, जि. गोंदिया यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे

... २

कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने दिनांक १ जानेवारी २००५ ते आजपर्यंत ग्रामपंचायत मार्फत केलेल्या विकास कामाचे संदर्भात एकूण ७ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्या अनुषंगाने अपीलकर्ता हे दिनांक ५.५.२०११ रोजी त्यांना स्वतः प्रतापगड येथे येऊन भेटले व माहिती विषयी सविस्तर चर्चा केली. तेंव्हा त्यांना ७ मुद्यांची माहितीने समाधान झाल्याचे सांगितले व आवश्यक ती माहिती त्याचवेळी त्यांचे स्वाधीन केली. परंतु सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याबाबत कोणताही लेखी पुरावा त्यांनी आयोगापुढे सादर केला नाही. तसेच अपीलकर्त्याने प्रथम अपील गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्जुनी/मोरगांव यांचेकडे दाखल केले होते. त्याचा निर्णय दिनांक २०.१.२०११ रोजी देण्यात आला व त्यामध्ये देखील असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी अपीलकर्त्यास दिनांक ५.२.२०११ पर्यंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय प्रथम अपीलात देण्यात आलेला आहे.

३. अपीलकर्त्याने सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, प्रतापगड यांचेकडे दिनांक २२.११.२०१० रोजी माहितीचा अधिकाराखाली अर्ज सादर केलेला होता. तथापी माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील खंड विकास अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.१.२०११ रोजी देण्यात आला असून अपीलकर्त्यास दिनांक ५.२.२०११ पर्यंत जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला आहे. मात्र त्यानंतरही अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिल्याबाबत जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी कोणताही लेखी पुरावा आयोगापुढे सादर केलेला नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झाल्याचे सिध्द होत नाही. म्हणून माहिती उपलब्ध करुन देण्याचा विलंबास जनमाहिती अधिकारी तथा सचिव हे जबाबदार दिसून येतात. त्यांना विलंबाबद्यल खुलासा विचारला असता त्यांनी आयोगापुढे कोणताही समर्पक खुलासा केलेला नाही. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसचिव यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी अपीलकर्त्याच्या दिनांक २२.११.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन कोणतीही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नाही त्यामुळे त्या विलंबास जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- शास्तीची कार्यवाही लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

३) सदरच्या शास्तीची रक्कम खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्जुनी/मोरगांव, जि. गोंदिया यांनी वसूल करुन वर नमुद केलेल्या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३२८-३३०/११.५.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२०/२०११.

श्री. सुभाष हरिश्चंद्रजी कापगते,
मु. रेंगेपार/कोहळी, पो. पिंपळगांव/सडक,
ता. लाखनी, जि. भंडारा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
स्नेहा कन्या विद्यालय,
पिंपळगांव/सडक, ता. लाखनी,
जि. भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, स्नेहा कन्या विद्यालय, पिंपळगांव/सडक, हया गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे सामायिक प्रवेश परिक्षा कामात व्यस्त असल्यामुळे हजर राहू शकले नाही.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १९.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज

... २

सादर करुन एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरची माहिती मुख्याध्यापिका, स्नेहा कन्या विद्यालय, पिंपळगांव/सडक, ता. लाखनी, जि. भंडारा यांचेशी संबंधित असल्याने माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांनी सदरचा अर्ज दिनांक ८.१२.२०१० च्या पत्राने मुख्याध्यापक, स्नेहा कन्या विद्यालय, पिंपळगांव/सडक यांचेकडे पाठवून अपीलकर्त्यास मागितलेली माहिती आवश्यक शुल्क आकारुन उपलब्ध करुन देण्याचे कळविले होते. मात्र मुख्याध्यापकांकडून अपीलकर्त्यास आजपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे दाखल केले होते. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २८.१.२०११ रोजी घेण्यात आली. परंतु प्रथम अपीलाचे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका हया गैरहजर राहिल्या. त्यामुळे प्रथम अपीलानंतरही त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, स्नेहा कन्या विद्यालय, पिंपळगांव/सडक, ता. लाखनी, जि. भंडारा हया आजच्या सुनावणीस गैरहजर आहेत. तसेच त्यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती १५ दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच सदरची माहिती देण्यास कां विलंब झालेला आहे त्यांचाही खुलासा त्यांनी आयोगाकडे सादर करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यात येते.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, स्नेहा कन्या विद्यालय, पिंपळगांव/सडक, ता. लाखनी, जि. भंडारा यांनी अपीलकर्त्यास माहिती अर्जानुसार मागितलेली माहिती १५ दिवसांत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, स्नेहा कन्या विद्यालय, पिंपळगांव/सडक, ता. लाखनी, जि. भंडारा यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून दिनांक ८.१२.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्याने मागितलेली माहिती पुरविण्याचे आदेश देऊनही माहिती देण्यास विलंब केलेला आहे. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये १००००/- ची शास्तीची कार्यवाही कां करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३३१-३३३/१२.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२६/२०११.**

श्री. बाबुराव महागु नान्हे,
मु. पो. नवखळा,
ता. नागभिड, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार/अध्यक्ष,
तंटामुक्त तालुका समिती,
तहसील कार्यालय, नागभिड,
जि. चंद्रपूर.

श्री. अमरनाथ मुकुंदा वाघाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अध्यक्ष/सचिव,
महात्मा गांधी ग्राम तंटामुक्त समिती, ब्राम्हणी,
ता. नागभिड, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. विजय पवार, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १०.५.२०१० रोजी अध्यक्ष/सचिव, महात्मा गांधी ग्राम तंटामुक्त समिती, ब्राम्हणी, ता. नागभिड, जि. चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली

अर्ज सादर करुन दिनांक २७.६.२०१० च्या सभेत तंटामुक्त समितीमध्ये झालेल्या ठरावाची प्रत मागितलेली होती. परंतु त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसीलदार, नागभिड यांचेकडे दाखल केले. त्यानंतर तहसीलदार यांनी अध्यक्ष/सचिव, तंटामुक्त समिती, ब्राम्हणी यांना लेखी कळवूनही अपीलकर्त्यास माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधींनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती पोस्टाद्वारे महात्मा गांधी ग्राम तंटामुक्त समिती, ब्राम्हणीच्या माजी अध्यक्षांनी अपीलकर्त्यास माहिती पाठविली होती. तथापी अपीलकर्त्याने सदरची माहिती घेण्यास नकार दिला म्हणून पोस्टाचे पाकीट परत आले. त्याचा पुरावा म्हणून परत आलेले पोस्टाचे पाकीट आयोगासमोर दाखविले. त्याचप्रमाणे नायब तहसीलदार व तंटामुक्त समितीचे अध्यक्ष यांनी आयोगासमोर असे सांगितले की, आता देखील अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांनी सोबत आणली आहे. सदरची माहिती आयोगासमोर अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली ती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत केली व माहिती मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३३४-३३५/१२.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२५/२०११.**

श्री. ॲड. रविंद्र भगवंतराव खनके,
मातोश्री, यमुना नगर, तुकुम वार्ड नं. १,
ता. जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. पी. देशपांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

सौ. एल. व्ही. कुमरे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
शिक्षण विभाग (माध्यमिक),
जिल्हा परिषद, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ११.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन चंद्रपूर जिल्हयातील सर्व शाळेच्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मान्यतेबाबत सन १९९७-९८ ते आजपर्यंतची माहिती मागितलेली होती. तसेच शासनाकडील शासन निर्णयाच्या प्रती बाबत माहिती मागितलेली होती अशा प्रकारे

... २

त्यांनी एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती मिळाली. मात्र मुद्या क्रमांक ३ ते ५ ची माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, मागितलेली माहिती ही व्यापक स्वरुपाची असल्यामुळे त्यासाठी कार्यालयाची संपूर्ण साधन सामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे म्हणून मुद्या क्रमांक ३ ते ५ ची माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही असा निर्णय प्रथम अपीलात देण्यात आला म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ११.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व सदरची माहिती अपीलकर्त्यास दिनांक २३.११.२०१० व दिनांक ४.१२.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिली व मुद्या क्रमांक ३ बाबत आपणास कोणत्या शाळेतील कोणत्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मान्यता पत्राची प्रत आवश्यक आहे त्याबाबत स्पष्ट नमुद करुन त्या माहितीची मागणी करावी ती माहिती आपणास पुरविण्यात येईल असे देखील अपीलकर्त्यास कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. त्याची सुनावणी घेण्यात आली व सुनावणीमध्ये असा निर्णय दिला की, अपीलकर्त्याने मागितलेली मुद्या क्रमांक ३ व ५ ची माहिती व्यापक स्वरुपात असल्यामुळे तसेच त्यांचे कार्यालयातील संपूर्ण साधन सामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार असल्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही असा प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १०.१.२०११ रोजी दिला असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती उपलब्ध झालेली आहे. मात्र मुद्या क्रमांक ३ ते ५ ची माहिती ही व्यापक स्वरुपात आहे. त्यामुळे अपीलकर्त्याने त्या माहितीबाबत जनमाहिती

अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून त्या माहितीचे निरिक्षण करुन घेणे योग्य होईल म्हणून आयोगा समोर अपीलकर्त्याने माहितीचे निरिक्षण करुन घेण्याचे मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व कार्यालयीन वेळेत माहितीचे निरिक्षण करण्याची तारीख व वेळ कळवावी व अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयाकडे कागदपत्राचे निरिक्षण करण्यासाठी हजर झाल्यानंतर कागदपत्रे निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी व त्यांना हवी असलेली माहिती रुपये १००/- पर्यंत खर्चाची विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३३६-३३८/१२.५.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२४/२०११.

श्री. दिवाकर गोवर्धन,
प्लॉट नं. ७७, वार्ड नं. ६,
लक्ष्मीनगर, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. एन. होटवानी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
ता. आर्वी, जि. वर्धा.

श्री. एन. टी. लभाने,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता श्रेणी-१,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पुलगांव,
ता. देवळी, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.५.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी, जि. वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पुलगांव येथील उपअभियंताचे निवासी क्वॉर्टरबाबत एकूण ३

... २

मुद्यांची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी यांचेकडे दाखल केले. तथापी त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याने माहितीचा अर्ज त्यांचेकडे सादर न करता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी यांचे कार्यालयाकडे सादर केलेला आहे. कार्यकारी अभियंता, आर्वी यांचेकडून सदरचा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्रेणी-१, पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा यांचेकडे दिनांक ३०.९.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तयार करण्यात आली. तसेच अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात व्यक्तिशः माहिती घेणार असे नमुद केले असल्यामुळे अपीलकर्त्याने सदरची माहिती प्राप्त करण्यास त्यांचे कार्यालयात आले नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती दिनांक ६.१०.२०१० च्या पत्राने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी यांचेकडे पाठविली. त्यानंतर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी यांनी सदरची माहिती जनमाहिती अधिकारी पुलगांव यांचेकडे परत पाठवून आपले स्तरावरुनच अपीलकर्त्यास माहिती पुरवावी असे कळविले. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ४.११.२०१० च्या पत्राने त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले. मात्र मुद्या क्रमांक १ मध्ये श्री. शाम महोदय हे दिनांक ५.६.१९८९ ते दिनांक ३.१२.१९९२ पर्यंत या कार्यालयात उपविभागीय अभियंता पदावर कार्यरत होते व त्यानंतर ते सेवेतून निलंबित झाले. सदर कालावधीत हे कार्यालय सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा अंतर्गत होते. त्यांचे निलंबन काळाचे वेतन सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा विभागीय कार्यालयाकडून निघत होते. त्यामुळे त्यांचे निवासी क्वॉर्टरचे भाडे वसूली बाबतची माहिती या कार्यालयास उपलब्ध नाही व पुढे ते सेवेतून बडतर्फ झाले किंवा कसे याबाबत या कार्यालयास अवगत नाही. सदर बाब ही सार्वजनिब बांधकाम विभाग, वर्धा या कार्यालयाशी संबंधित आहे असे कळविले. तसेच मुद्या क्रमांक २ बाबत श्री. नासीरखॉ हजीजखॉ, जीपचालक हे सन २००२ पासून सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पुलगांव परिसरातील

शासकीय निवास स्थानांत राहत आहे. त्यांचे वेतन या कार्यालयाकडून निघत असल्यामुळे शासकीय निवासस्थानाचे भाडे नियमानुसार त्यांचे मासिक वेतन देयकातून प्रतीमाह कपात केल्या जात आहे अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. मात्र याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, श्री. शाम महोदय यांची मागितलेली माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा यांचे अंतर्गत जरी असली तरी ती माहिती जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच श्री. नासीरखॉ हजीजखॉ, जीपचालक हे ज्या निवासस्थानात राहत आहेत ते निवासस्थान वर्ग-२ च्या अधिकाऱ्यांसाठी असाईन केले अगर कसे याची माहिती त्यांना मिळणे आवश्यक आहे.

५. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्यामुळे त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आलेले आहे.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ४.११.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी मुद्या क्रमांक १ बाबत श्री. शाम महोदय यांचे बाबतची माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा यांचे कार्यालयाकडून जनमाहिती अधिकारी यांनी प्राप्त करुन घेउन अपीलकर्त्यास पुरविणे संयुक्तिक होईल. तसेच श्री. नासीरखॉ अजीजखॉ, जीपचालक हे राहत असलेल्या शासकीय निवासस्थान हे वर्ग-२ अधिकाऱ्यांसाठी असाईन आहे अगर कसे याची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाचे रेकॉर्डवरुन किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास पुरविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ४

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केलेल्या मुद्यांची आवश्यक ती माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२३/२०११.

श्री. सुभाष सुखदेव सहारे,
रेशिमबाग चौक, सिरसपेठ,
गौतम वाचनालय जवळ, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.

श्री. घायतडक,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, (नवि-२६)
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र त्या दिवशी सुनावणी होऊ शकती नाही म्हणून पुढील सुनावणी दिनांक २३.५.२०११ रोजी घेण्यात आली त्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मा. असिम गुप्ता यांनी दिनांक ७.५.२०१० ला नगर विकास विभागामध्ये जे पत्र पठविले त्या पत्राची प्रत

... २

व उत्तराची माहिती मागितलेली दिसते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २३.५.२०११ रोजी राज्य माहिती आयुक्तांकडे निवेदन दिले असून मला माहितीच्या अधिकारांतर्गत मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून या बाबतीत आता माझी कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे मी अपील मागे घेत आहे. असे निवेदन सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३४३-३४४/२३.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५४/२०११.**

श्री. शरद दिनकरराव पाचखेडे,
द्वारा श्री. कृष्णराव अवताडे, पोलीस मुख्यालया समोर, पटेलनगर, चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त संचालक,
संचालक, भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, भूजल भवन, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.

श्री. दिपक कापसे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी,
संचालक, भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, भूजल भवन, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र त्या दिवशी सुनावणी होऊ शकती नाही म्हणून पुढील सुनावणी दिनांक २३.५.२०११ रोजी घेण्यात आली त्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी भुजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन २ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २३.५.२०११ रोजी राज्य माहिती आयुक्तांकडे निवेदन सादर केले असून मला जी माहिती पाहिजे ती मिळाली आहे त्यामुळे माझे अपील मागे घेत आहे असे लेखी निवेदन सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३४५/२३.५.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४४/२०११.

श्री. शामदेव काशिरामजी तितरमारे,
प्लॉट नं. २७०, चंदननगर, पो. हनुमाननगर,
नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक,
सैनिक कल्याण विभाग,
महाराष्ट्र राज्य, घोरपडी, पुणे - ४११ ००१.

श्री. मिलींदकुमार बडगे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,
अमरावती कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.५.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र त्या दिवशी सुनावणी होऊ शकती नाही म्हणून पुढील सुनावणी दिनांक २४.५.२०११ रोजी घेण्यात आली त्या सुनावणीस अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. डी. बी. काळे, वरिष्ठ लिपीक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ६.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अमरावती कॅम्प, अमरावती यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या विषयी एकूण ७ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्यांना मुद्या क्रमांक ५ ची माहिती वगळून इतर मुद्यांची माहिती त्यांना मिळाली. मात्र मुद्या क्रमांक ५ ची माहिती व कर्मचाऱ्यांच्या अस्थायी पत्त्यांची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

... २

३. जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ६.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १०.११.२०१० रोजी प्राप्त झाला. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक १८.११.२०१० च्या पत्राने उत्तर पाठविण्यात आले. त्यानंतर अपीलकर्त्यास दिनांक १०.१.२०११ च्या पत्राने मुद्येनिहाय माहिती पाठविण्यांत आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. मात्र अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक ५ व कर्मचाऱ्यांच्या अस्थायी पत्त्यांची माहिती त्यांना अद्यापपर्यंत उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्त्याने सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, मुद्या क्रमांक ५ च्या संदर्भातील माहिती त्यांच्याकडे आता उपलब्ध झालेली आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या अस्थायी पत्त्यांची माहिती देखील त्यांचेकडे उपलब्ध आहे ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याची जनमाहिती अधिकारी यांनी मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक ५ ची माहिती व कर्मचाऱ्यांच्या अस्थायी पत्त्यांची माहितीबाबत त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या रेकॉर्डवरुन माहिती विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५७/२०११.

श्री. सुशिल दशरथ ढेंगरे,
विश्वकर्मानगर, रोड नं. २,
प्लॉट नं. १५, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सुशिल वैद्य,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
कळमेश्वर,
जि. नागपूर.

श्री. एम. एल. डुंबरे,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी,
अष्टीकला, ता. कळमेश्वर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र त्या दिवशी सुनावणी होऊ शकती नाही म्हणून पुढील सुनावणी दिनांक २४.५.२०११ रोजी घेण्यात आली त्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. आजच्या सुनावणीत अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. मात्र तहसीलदार, कळमेश्वर यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २९.११.२०१० चा

... २

माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही तलाठी, अष्टीकला यांचेकडून मागविली. त्याला अनुसरुन तलाठी, अष्टीकला यांनी सदरची माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक २२.१२.२०१० च्या पत्रान्वये सादर केली. तलाठी, अष्टीकला यांनी सादर केलेली माहिती तपासणी व छाननी केली व अपीलकर्त्यास दिनांक ६.१.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. तसेच तहसीलदार यांनी आयोगास असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याने ज्या जमीनीचा फेरफार मागितलेला आहे त्या फेरफार पंजी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्या जमीनीचा फेरफार त्यांचे नावावर होण्यासाठी त्यांना उपविभागीय अधिकारी यांचेकडे फेरफार नामंजूर केल्याच्या कार्यवाही विरुध्द अपील करणे आवश्यक आहे. परंतु अपीलकर्त्याने तशी कार्यवाही न करता वारंवार माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन कार्यालयास त्रास देण्याच्या हेतुने माहिती मागत असतात.

४. प्रस्तुत प्रकरणी तहसीलदार यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्यास फेरफारासंबंधी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु सदरच्या जमिनीचा फेरफार त्यांच्या नावावर नामंजूर झाल्यामुळे त्या विरुध्द अपीलकर्त्याने उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल करणे योग्य होईल. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास फेरफार बाबतची आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३४८-३४९/२४.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५६/२०११.**

श्रीमती अवंतिका चिटणवीस,
३०९, सर गंगाधरराव चिटणवीस मार्ग,
सिव्हील लाईन, नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
जि. रायगड अलिबाग.

श्री. एन. व्ही. कर्णिक,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार (सर्वसाधारण),
जि. रायगड अलिबाग. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक २३.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, मुंबई यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र त्या दिवशी सुनावणी होऊ शकती नाही म्हणून पुढील सुनावणी दिनांक २४.५.२०११ रोजी घेण्यात आली त्या सुनावणीस अपीलकर्ती हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार (सर्वसाधारण), जि. रायगड अलीबाग यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन मौजे आवास, ता. अलिबाग येथील गट नं. १२९५/२ ची फेरफार नोंद होण्याबाबतचा अर्ज दिनांक १७.९.२०१०

... २

रोजी केला होता. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २६.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ती यांचा दिनांक १.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १३.१०.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्तीने मागितलेली माहिती ही तहसीलदार, अलीबाग यांचे कार्यालयाशी संबंधित असल्याने दिनांक २१.१०.२०१० च्या पत्राने माहिती अधिकाराखालील अर्ज तहसीलदार, अलीबाग यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला व अपीलकर्तीस दिनांक २१.१०.२०१० रोजी पत्र पाठवून आपण तहसीलदार, अलीबाग यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा असे अपीलकर्तीस कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तथापी तहसीलदार, अलीबाग यांचेकडून अपीलकर्तीस कोणतीही माहिती उपलब्ध झाल्याचे दिसून येत नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड अलीबाग यांचेकडे दाखल केले व प्रथम अपील त्यांचे फेटाळण्यात आले असे जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी सुनावणीत नमुद केले.

४. अपीलकर्ती तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्तीच्या दिनांक १.१०.२०१० चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांचेकडे दिनांक १३.१०.२०१० रोजी प्राप्त झाला होता. सदरच्या माहिती अर्जातील माहिती ही तहसीलदार, अलीबाग यांचेशी संबंधित असल्याने तो अर्ज जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम ६(३) अन्वये ५ दिवसाचे कालावधीत म्हणजे दिनांक १८.१०.२०१० पर्यंत हस्तांतरण करणे आवश्यक होते. मात्र त्यांनी सदरचा अर्ज दिनांक २१.१०.२०१० च्या पत्राने तहसीलदार, अलीबाग यांचेकडे हस्तांतरण केलेला आहे. म्हणून ३ दिवस उशिराने हस्तांतरण केलेला आहे. त्यानंतर तहसीलदार, अलीबाग यांनी सदरच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची कोणतीही माहिती अपीलकर्तीस पुरविल्याचे दिसून येत नाही.

५. तसेच अपीलकर्तीन प्रथम अपील निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे दाखल केल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचे निर्णयात अपीलकर्तीस जनमाहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली अगर कसे याबाबत कोणतेही भाष्य केले नाही म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्यरितीने दिलेला दिसून येत नाही. म्हणून याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कडून भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही याची समज त्यांना देण्यात येत आहे. तसेच तहसीलदार, अलीबाग यांचेकडे अपीलकर्तीचा माहितीचा अर्ज हस्तांतरण झाल्यानंतर ३० दिवसाचे आंत तहसीलदार, अलीबाग यांचे कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची माहिती अपीलकर्तीस उपलब्ध झालेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्तीस माहिती उपलब्ध होण्याच्या विलंबास तहसीलदार, अलीबाग हे जबाबदार दिसून येतात. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत तहसीलदार, अलीबाग यांनी अपीलकर्तीस त्यांच्या माहितीच्या अर्जातील माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार (सर्वसाधारण) जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांनी सदरचा माहितीचा अर्ज ३ दिवस उशिराने हस्तांतरण केलेला आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही कां करु नये याचा खुलासा त्यांनी १५ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा.

३) अपीलकर्तीचा माहितीचा अर्ज तहसीलदार, अलीबाग यांचेकडे जनमाहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांचेकडून दिनांक २१.१०.२०१० च्या पत्राने हस्तांतरण केल्यानंतर ३० दिवसांचे मुदतीत अपीलकर्तीस त्यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्तीस माहिती देण्यास झालेल्या विलंबाबद्यल त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० प्रमाणे शास्तीची कार्यवाही कां करु नये याचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत तहसीलदार, अलीबाग यांनी आयोगाकडे मुदतीत सादर करावा. उक्त मुदतीत खुलासा सादर न केल्यास त्यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

४) या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे **तहसीलदार, अलीबाग, जि. रायगड** यांचेकडे खुलाश्यासाठी पाठविण्यात येत आहे.

५) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३५०-३५३/२४.५.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२८/२०११.

श्री. पी. एम. पद्मावार,
बी-१/२०२, शिवराया सोसायटी, समृध्दी संकूल,
अमरावती रोड, नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. टी. पी. राठोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १,
सदर, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १,
सदर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.५.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र त्या दिवशी सुनावणी होऊ शकती नाही म्हणून पुढील सुनावणी दिनांक २४.५.२०११ रोजी घेण्यात आली त्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकले नाही. त्यांचे वतीने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी बाजू मांडली.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ६.८.२०१० रोजी व दिनांक ११.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक - १, नागपूर

... २

यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन इतर विभागातील अधिकाऱ्यांकडून केलेल्या शासकीय निवास भाडे वसूलीबाबत माहिती मागितलेली होती. दिनांक ६.८.२०१० च्या माहितीच्या अर्जात एकूण ८ मुद्यांवर व दिनांक ११.८.२०१० च्या अर्जामध्ये एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना विहित मुदतीत अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ५.१०.२०१० व दिनांक ११.१०.२०१० रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद करुन त्यांच्या माहितीच्या दोन्ही अर्जातील प्रत्येक मुद्यांची त्यांना माहिती प्राप्त होणे गरजेचे आहे असे आग्रही प्रतिपाद अपीलकर्ता यांनी आयोगापुढे केले.

३. कार्यकारी अभियंता यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ६.८.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ९.८.२०१० रोजी प्राप्त झाला. तसेच दिनांक ११.८.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १६.८.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची व विखुरलेली असल्याने ती संकलीत करण्यात आली व सदरची माहिती संकलीत केल्यानंतर अपीलकर्त्यास दिनांक ३.२.२०११ च्या पत्राद्वारे उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण, अर्धवट व प्रत्येक मुद्दे निहाय नसल्याचे त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुरविलेली माहिती व अपीलकर्त्याने माहिती अर्जात मागितलेली माहिती याबाबत आयोगासमोर मुद्येनिहाय चर्चा करण्यात आली. त्यामध्ये असे दिसून आले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहितीमध्ये जी माहिती माहितीचे स्वरुपात उपलब्ध आहे ती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तथापी ज्या मुद्यांची माहिती जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसेल त्याबद्यल माहिती उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून प्रस्तुत प्रकरणी आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्येनिहाय माहिती देण्याचे मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचे कडील दिनांक ६.८.२०१० च्या माहिती अर्जातील मुद्येनिहाय माहिती तसेच दिनांक ११.८.२०१० च्या माहिती अर्जातील मुद्ये निहाय माहिती विनामुल्य किंवा व्यक्तिशः रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६१/२०११.**

श्री. जयवंत मधुकर मिश्रा,
प्लॉट नं. १६, जवाहर कॉलनी,
मु. पो. पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा - ४४२ ३०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एल. एस. सोनवणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
ललिताबाई मुरारका हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,
पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र त्या दिवशी सुनावणी होऊ शकती नाही म्हणून पुढील सुनावणी दिनांक २४.५.२०११ रोजी घेण्यात आली त्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने श्री. बियाला, लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,ललिताबाई मुरारका हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा यांचेकडे

... २

माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन सन १९८९-९० ते २००९-२०१० या कालावधीत पदोन्नत करण्यात आलेल्या कर्मचा-यांबाबत व भाडे वाढविण्याचा प्रस्तावाबाबत एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून एकूण ६ मुद्यांवर माहिती प्राप्त झाली मात्र मुद्यां क्रमांक ७ बाबत बांधकाम करुन भाडे वाढविण्यासाठी शिक्षण विभागाला मुख्याध्यापकांनी सादर केलेल्या प्रमाणपत्राची माहितीची झेरॉक्सा प्रत त्यांना मिळाली नाही असे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने हजर असलेले लिपीक यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी ६ मुद्याची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र मुद्या क्रमांक ७ बांधकामा संबंधात पूर्ण दस्ताऐवज हरविले असल्यामुळे आढळून येत नाही म्हणून ती माहिती उपलब्ध झाली नाही.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, वर्धा यांनी सुंनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी ६ मुद्यांचे एकूण २२५ पेजेसची माहिती उपलब्ध करुन दिली आहे. मात्र मुद्या क्रमांक ७ बाबत बांधकाम करुन भाडेवाढीसाठी शिक्षण विभागाला मुख्याध्यापकांनी सादर केलेल्या प्रमाणपत्राची प्रत अपीलकर्त्यास मिळालेली नाही. याबाबत शाळेकडून शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयाकडे भाडेवाढीचा प्रस्ताव प्राप्त झाला असल्यास त्या प्रस्तावाची प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात येईल असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, वर्धा यांनी आयोागापुढे सुनावणीत नमुद केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा आदेश मिहाल्यापासून १० दिवसांचे आंत बांधकामासंबंधीचे पूर्ण दस्तऐवज हरविल्यामुळे त्यांचे प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य पोस्टाने कळवावे.

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे शाळेने बांधकाम करुन भाडेवाढविण्यासाठी त्यांचे मार्फत शिक्षण विभागाला प्रस्ताव पाठविण्यासाठी सादर केला असल्यास त्याचा शोध घ्यावा व त्यांचे कार्यालयात सदरचा प्रस्ताव उपलब्ध झाल्यास व त्या प्रस्तावास अपीलकर्त्याने मागितलेल्या प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध झाल्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रमाणपत्राची प्रत विनामुल्य हा आदेश मिळाल्यापासून १० दिवसात उपलब्ध करुन द्यावी. तथापी प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास पोस्टाने कळवावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३५७-३५९/२४.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६२/२०११.**

श्री. जयवंत मधुकर मिश्रा,
प्लॉट नं. १६, जवाहर कॉलनी,
मु. पो. पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा - ४४२ ३०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एल. एस. सोनवणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
ललिताबाई मुरारका हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,
पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र त्या दिवशी सुनावणी होऊ शकती नाही म्हणून पुढील सुनावणी दिनांक २४.५.२०११ रोजी घेण्यात आली त्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने श्री. बियाला, लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १७.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ललिताबाई मुरारका हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय, पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन शैक्षणिक सत्र २००९-२०१० मधील शाळा समितीचे सभासदाबाबत माहिती मागितलेली होती. तसेच सन २००९-२०१० या कालावधीत शाळा समितीच्या झालेलया

... २

सभेचे संख्या माहिती व झालेलया सर्व सभेचे ठराव व इतिवृत्ताची माहिती त्यांनी मागितली. तथापी त्याना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक २८.७.२०१० रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने हजर असलेले लिपीक यांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याने शाळा समितीचे संदर्भात माहिती मागिलेली आहे. तथापी शाळा समितीची मांहिती ही मुख्याध्यापक तथा जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नसून सदरची माहिती अध्यक्ष, ललिताबाई मुरारका हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुलगांव यांचेकडे आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी सदरची माहिती अध्यक्ष यांचेकडे उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केलेली आहे. तथापी अध्यक्ष यांनी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. म्हणून सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याची पुन्हा ८ दिवसाची मुदत देण्यात यावी. म्हणजे सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येणे शक्य होईल.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, वर्धा यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेली शाळा समितीचे संदर्भातील माहिती ही मुख्याध्यापक यांचेकडे उपलब्ध नसून सदरची माहिती अध्यक्ष, ललिताबाई मुरारका हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुलगांव यांचेकडे आहे. त्यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे योग्य होईल असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे नसून सदरची माहिती अध्यक्ष यांचेकडे आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी सदरची माहिती अध्यक्ष यांचे कडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास पुरविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ८ दिवसांत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अध्यक्ष, ललिताबाई मुरारका हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी व सदरची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तिशः किंवा पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३६०-३६२/२४.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६०/२०११.**

श्री. राधेश्याम परसरामजी काबरा,
शिवाजी वार्ड, मु. पो. ता. देसाईगंज,
जि. गडचिरोली . ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,
जि. गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. देसाईगंज, जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र त्या दिवशी सुनावणी होऊ शकती नाही म्हणून पुढील सुनावणी दिनांक २४.५.२०११ रोजी घेण्यात आली त्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. आर. पुप्पालवार, तहसीलदार हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने श्री. एस. टी. गोहणे, तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

... २

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २५.६.२०१० च्या माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २८.६.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्ता यांनी या माहितीच्या अर्तात एकूण ८ मुद्यांवर मौजा देसाईगंज येथील बाजार विभाग ख.नं. २२/८०/१, प्लॉट क्रमांक १३० बाबत प्रश्नोत्तर स्वरुपात व कार्यवाही करुन मिळणे संबंघाने माहिती मागितलेली आहे. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २६.७.२०१० च्या पत्राने एकूण ८ मुद्यांचे उत्तर पाठविले आहे. तसेच मुद्या क्रमांक ६ बाबत टिपणीची सत्यप्रत माहितीच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र इतर मुद्यांची माहिती ही प्रश्नार्थक असल्यामुळे त्यांची माहिती कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकर्त्यास दिनांक २६.७.२०१० च्या पत्राने कळविले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडे दाखल केले त्या अपीलाची सुनावणी घेण्यात आली. परंतु प्रथम अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर राहिले. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.१०.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित केला व त्यामध्ये असे नमुद केले की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार नागरिकांना माहिती मिळवण्याचा हक्क प्रदान केला असून त्यानुसार दस्तऐवजांची व अभिलेखाच्या प्रती मिळविणे, टिपणी काढणे, उतारे, प्रमाणित सामुग्रीचे नमुने, संगणकात साठवलेली माहिती, इत्यादी माहिती तपासण्याचा व मागण्याचा अधिकार आहे. मात्र तशी माहिती अपीलकर्त्याने मागणी केलेली नसून प्रश्न व कारवाई करण्याचे स्वरुपात माहिती मागितलेली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रत्यक्ष त्यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व कार्यालयीन वेळेत बोलावून त्यांना आवश्यक असलेले दस्तऐवज तपासणीसाठी देऊन त्याच्या प्रती अर्जदारास पुरविण्यात याव्यात असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिला. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १६.११.२०१० रोजी पत्र पाठवून दिनांक १८.११.२०१० रोजी त्यांचे कार्यालयात दस्तऐवज तपासणीसाठी व दस्तऐवजांच्या प्रती प्राप्त करण्यासाठी बोलाविले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचे

कार्यालयाकडे दिनांक १८.११.२०१० रोजी दस्तऐवजांच्या तपासणीसाठी आले असता त्यांना सर्व दस्तऐवजांची तपासणी देण्यात आली व त्यांनी मागणी केलेल्या दस्तऐवज एकूण १६ पृष्ठ डाकबुकाद्वारे उपलब्ध करुन दिलेली आहेत असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचे वेळी सांगितले व सदरची प्रत डाकबुकातून अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली.

५. यावरुन असे दिसून येते की, प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे जनमाहिती अधिकाींरी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ते दस्तऐवज तपासणीसाठी उपलब्ध करुन दिले असून त्यांनी मागणी केल्याप्रमाणे त्या दस्तऐवजांच्या प्रती देखील अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन दिलेल्या असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३६३-३६५/२४.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५८/२०११.**

श्री. शैलेष उत्तमराव निंभोरकर,
मु. पो. तळेगांव (शा.पंत),
ता. आष्टी, जि. वर्धा - ४४२ २०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार, आर्वी, जि. वर्धा.

श्री. धनंजय यशवंत देशमुख,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, आर्वी, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०.४.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र त्या दिवशी सुनावणी होऊ शकती नाही म्हणून पुढील सुनावणी दिनांक २४.५.२०११ रोजी घेण्यात आली त्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, आर्वी यांचेकडे दिनांक १४.१०.२०१० रोजी २ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयुक्त यांचेकडे दिनांक २४.५.२०११ रोजी निवेदन सादर करुन मला सदर प्रकरणी सर्व माहिती प्राप्त झाल्याने मी माझे अपील मागे घेत आहे असे लेखी निवेदन सादर केल्यामुळे सदर अपील खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३६६/२४.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २४२/२०११.**

श्री. नागोराव गुंडेराव इंगळे,
मु. पो. पाटणसावंगी, ता. सावनेर,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. जे. धोटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
राज्य उत्पादन शुल्क विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,
नागपूर.

श्री. सी. आर. वाघ,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअधिक्षक,
राज्य उत्पादन शुल्क विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ११.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज

... २

सादर करुन देशी दारु दुकान पाटणसावंगी सी.एल. - ३ या दुकानाविषयी माहिती मागितलेली होती. दिनांक १.४.२००६ ते दिनांक ३१.३.२०१० या कालावधीतील इंडेन कॉपी (मालाचे मागणी पत्रक), टी.पी. पास, दररोज विक्री रजिस्टरच्या पानाच्या झेरॉक्स प्रती, वरील आर्थीक वर्षात येणाऱ्या सुट्टयांची यादी याची प्रत त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ४.११.२०१० च्या पत्राने असे कळविण्यात आले की, आपण सीएल-३ अनुज्ञप्ती क्रमांक २३५ च्या दिनांक १.४.२००६ ते दिनांक ३१.३.२०१० या कालावधीतील इंडेन बुक, परिवहन पास, दैनिक विक्री नोंदवही याच्या प्रती मागितल्या आहेत. सदर अभिलेख हा अनुज्ञप्तीधारकाकडील असल्यामुळे तो त्यांचेकडून मागविण्यात आला असता त्यांनी सदरा अभिलेख हा एका वर्षापर्यंतचा असल्यामुळे त्यांनी तो नाश केला असल्याबाबत कळविले आहे. त्यामुळे सदर अभिलेख आपणास पुरविता येणे शक्य नाही. तसेच वरील कालावधीतील कोरडया दिवसांची माहिती पाहिजे असल्यास त्याचे शुल्क रुपये ८०/- शासन जमा करावे म्हणजे माहिती पुरविता येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ४.११.२०१० च्या पत्राने कळविले. मात्र त्यांना त्यांचे अपेक्षेप्रमाणे माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर यांचेकडे दिनांक २०.१२.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचे अर्जात त्यांनी वर नमुद केलेली माहिती त्यांना अपेक्षेप्रमाणे प्राप्त झाली नाही तसेच त्यांना २००६-२००७ चा नोकरनामा प्रत देखील मिळाली नाही असे त्यांनी प्रथम अपीलात नमुद केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व सुनावणी नंतर प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३.२.२०११ रोजी निर्गमित करुन त्यांचे प्रथम अपील खारीज केले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ११.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १२.१०.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही पाटणसावंगी येथील अनुज्ञप्ती क्रमांक २३५ सी. एल. - ३ या दुकानाची होती. म्हणून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून या अनुज्ञप्तीधारकाकडे वर नमुद केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत अनुज्ञप्तीधारकास कळविले. मात्र संबंधित अनुज्ञप्तीधारकाने जनमाहिती अधिकारी यांना असे कळविले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहितीचे संदर्भातील अभिलेख हे फक्त हया वर्षापर्यंतचा असल्यामुळे

बाकी अभिलेख त्यांनी नष्ट केला आहे. त्यामुळे हा अभिलेख पुरविता येणे शक्य नाही असे अनुज्ञप्तीधारकांनी जनमाहिती अधिकारी यांना कळविले. त्यानंतर याबाबींची खात्री करुन घेण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी दुय्यम निरिक्षक, सावनेर यांना अनुज्ञप्तीधारकांकडे सदरचा रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्याचे दृष्टिकोनातून पाठविण्यात आले. तथापी दुय्यम निरिक्षकानी अनुज्ञप्तीधारकांचे दुकानास भेट देऊन फक्त हया वर्षीच्या कालावधीचा रेकॉर्ड त्यांचेकडे उपलब्ध आहे बाकी रेकॉर्ड नष्ट केला आहे असे दुय्यम निरिक्षकांनी देखील जनमाहिती अधिकारी यांना कळविले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ४.११.२०१० च्या पत्राने वर नमुद केलेली वस्तुस्थिती कळविली. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर यांचेकडे दिनांक २०.१२.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३.२.२०११ रोजी देण्यात आला आणि जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्याचे नमुद करुन प्रथम अपील फेटाळले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, त्यांचे विभागाकडून अनुज्ञप्तीधारकांचे परवान्याचे नुतनीकरण करण्यात येत असते. पुरवान्याचे नुतनीकरणाचे वेळेला आवश्यक असलेल्या कागदपत्राची खात्री करुन घेऊन परवान्याचे नुतनीकरण करण्यात येते. मात्र त्या दुकानदाराने दैनंदिन किती मालाची विक्री केली आहे या संबंधातील कोणतीही माहिती त्यांचे विभागाकडे येत नाही. मात्र दर महिन्याला त्या दुकानाचे मासिक विवरण पत्र संबंधित दुय्यम निरिक्षकाकडे प्राप्त होत असतात. त्या मासिक विवरणपत्राची प्रत त्यांचे कार्यालयाकडे ज्या कालावधीची उपलब्ध असेल त्या मासिक विवरणपत्राची प्रत हया अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यास जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगासमोर मान्य केले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांचे कार्यालयाकडे किंवा त्यांचे अधिनस्थ असलेल्या कार्यालयाकडे उपलब्ध असेल ती माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ४

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेल्या माहिती पैकी जी माहिती त्यांचे कार्यालयात किंवा त्यांचे अधिनस्थ असलेल्या कार्यालयास उपलब्ध असेल ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापी ज्या कालावधीची माहिती उपलब्ध होणार नाही ते स्पष्टपणे कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २४०/२०११.

श्री. श्रीराम सितारामजी भातकुलकर,
कुंभारपेठ, वार्ड नं. १४, ता. नरखेड,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अशोक परसरामजी गऱ्हाटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, नरखेड, जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, नरखेड, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचेवतीने श्री. डफरे, लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ९.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, नरखेड यांचेकडे माहितीचया अधिकाराखाली अर्ज सादर करुन अतिक्रमण हटविणेबाबत व अवैध बांधकाम तोडण्याबाबत एकूण १९ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी, नगर परिषद, नरखेड यांचेकडे

... २

दिनांक १२.११.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १३.४.२०११ रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधीनी आयोगाचे समोर असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनाक ९.९.२०१० रोजीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १४.९.२०१० ला प्राप्त झाला. अपीलकर्त्याने श्री. सुरजुसे यांचे अतिक्रमण हटविण्याबाबत व अवैध बांधकाम तोडण्याबाबत व नगर परिषदेच्या इतर कामकाजाबाबत एकूण १९ मुद्यांवर विस्तृत स्वरुपात माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली १९ मुद्यांतील माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, सदरच्या माहितीची व्याप्ती ही मोठी असल्याने माहिती काढण्याचे काम सुरु केले. कारण अपीलकर्त्याने सन १९९९ ते २०१० या प्रकारे एकूण ११ वर्षाची माहिती मागितलेली होती. सदरची माहिती विस्तृत प्रमाणात असल्याने ३० दिवसांच्या मुदतीत माहिती देणे शक्य होणार नाही म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ८.१०.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेली माहिती ही फार विस्तृत प्रमाणात असल्यामुळे ती तयार करणे सुरु केले असून त्या माहितीचे संकलन ३० दिवसाचे मुदतीत होणे शक्य नाही. म्हणून माहिती संकलीत करण्याचे काम पूर्ण होताच आपणास माहिती पुरविण्याची कार्यवाही करण्यात येईल असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविलेले होते.

४. तथापी त्यानंतर अपीलकर्त्याने मुख्याधिकारी यांचेकडे दिनांक १२.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. मुख्याधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली व सुनावणी मध्ये अपीलकर्ता यांचे माहिती बाबत मुद्येनिहाय चर्चा केली. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती देण्याचे आदेश दिले आहे. त्यानुसार माहिती अद्यापही तयार करण्याचे काम सुरु आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नमुद केले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने सन १९९९ ते २०१० या कालावधीतील म्हणजे सुमारे ११ वर्षाची एकूण १९ मुद्यांची माहिती मागितलेली आहे. सदरच्या माहितीची व्याप्ती ही मोठया प्रमाणात असल्याचे दिसून येते. म्हणून प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध असेल ती माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य पुरविणे संयुक्तिक होईल व जे मुद्दे कार्यवाहीच्या संदर्भात आहे त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे त्यांचे कार्यालयाकडे जी माहिती उपलब्ध असेल ती माहिती विनामुल्य पुरवावी व जे मुद्दे कार्यवाहीचे संदर्भात आहेत त्याबद्यल केलेल्या कार्यवाहीची माहिती देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३७१-३७३/२५.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २४१/२०११.**

श्री. जियाउद्दीन फिरोज गुलाम मोहीउद्दीन,
क्विदवाई ग्राऊंड जवळ, लष्करीबाग,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. ए. जगशेट्टीवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, जि. नागपूर.

श्री. एच. डी. आसमवार,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
जिल्हा परिषद, (बांधकाम) उपविभाग, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २६.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन दिनांक १.८.१९९० ते १९.१२.२००५ या कालावधीच्या सी.आर.टी.ई. मजुरांचे हजेरी पटाची सत्यप्रत मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ७.१२.२०१० रोजी

... २

असे कळविले की, आपण मागितलेल्या दिनांक १.८.१९९० ते दिनांक १९.१२.२००५ पर्यंतचे सी.आर.टी. मजुरांचे मस्टर रोजची सत्यप्रत मागितलेली आहे. सदर प्रकरणी रेकॉर्डची पडताळणी केली असता सदर रेकॉर्ड कार्यालयात उपलब्ध नाही. या प्रकरणी आपण यापुर्वी सुध्दा वैयक्तिकरित्या उपस्थित राहून याबाबत शहानिशा केलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. म्हणून त्यांनी दिनांक २४.१२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील माहिती उपलब्ध नाही असे कळविल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २६.११.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने दिनांक १.८.१९९० ते दिनांक १९.१२.२००५ या कालावधीच्या सी.आर.टी.ई. मजूरांचे मस्टर रोलची सत्यप्रत मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे २० वर्षा पुर्वीची आहे. त्यामुळे सदरच्या माहितीचा रेकॉर्डमध्ये शोध घेतला असता अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास दिनांक ७.१२.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध नाही असे कळविण्यात आले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील दिनांक ११.१.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध झालेली नाही असे अपीलकर्त्यास कळविलेले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली पुस्तक १९८४ च्या परिशिष्ट ६ मध्ये कार्यालयीन रेकॉर्ड जतन करण्याचा कालावधी दिलेला आहे त्यामध्ये मस्टर रोल किंवा हजेरी पुस्तक यांची जतन करण्याचा कालावधी हा ३ वर्षाचा आहे. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे २० वर्षापुर्वीची असल्यामुळे रेकॉर्ड छाननीमध्ये हा रेकॉर्ड नियमानुसार नष्ट केलेला असल्याची शक्यता आहे. त्यामुळे अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेऊनही माहिती उपलब्ध झालेली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे २० वर्षापुर्वीची असल्यामुळे व हजेरी पत्रक जतन करण्याचा कालावधी वर नमुद केल्याप्रमाणे ३ वर्षाची असल्यामुळे सदरच्या माहितीचा शोध घेऊन उपलब्ध झाली नाही म्हणून व तसेच अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविले असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३७४-३७६/२५.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २४३/२०११.**

श्री. टी. एच. नायडू,
२३, सप्तश्रृंगी विहार, शिवमंदीराचे बाजुला,
एच.बी. इस्टेट, सोनेगांव, नागपूर - ४४० ०२५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. चुन्नीलाल शंकरराव झाडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग,
महानगरपालिका, पहिला माळा, नारंग टॉवर,
पाम रोड, सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. भुते,
जनमाहिती अधिकारी तथा
उप अभियंता, नगर रचना विभाग,
महानगरपालिका, पहिला माळा, नारंग टॉवर,
पाम रोड, सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. महेश धामेजा,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
लक्ष्मीनगर झोन क्रमांक १,
महानगरपालिका, नागपूर.

श्री. कहाळकर,
जनमाहिती अधिकारी तथा
उप विभागीय अभियंता,
लक्ष्मीनगर झोन क्रमांक १,
महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. ... २

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २८.१०.२०१० रोजी तसेच दिनांक ३०.१०.२०१० रोजी व दिनांक ११.१०.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली ३ स्वतंत्र अर्ज दाखल करुन प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. दिनांक २८.१०.२०१० च्या अर्जात एकूण १ ते १० मुद्यांतील तसेच दिनांक ३०.१०.२०१० च्या अर्जात एकूण १ ते १४ मुद्यांवर व दिनांक ११.१०.२०१० च्या अर्जात एकूण १ ते २१ मुद्यांतील माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक आयुक्त, लक्ष्मीनगर झोन क्रमांक १, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली व प्रथम अपीलाचा असा निर्णय देण्यात आला की, अपीलकर्ता यांनी त्यांना मागणी केलेल्या कागदपत्राच्या संदर्भात संपूर्ण धारिका अवलोकनाकरिता जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी व ते मागणी करतील ती संपूर्ण कागदपत्रे त्यांना फी आकारुन १५ दिवसांत उपलब्ध करुन द्यावी. त्याप्रमाणे त्यांनी कागदपत्राचे निरिक्षण केले व काही माहिती त्यांना मिळाली. मात्र त्यांचे अपेक्षेप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ११.१०.२०१० च्या अर्जाची माहिती अपीलकर्त्यास दिनांक ११.११.२०१० रोजी देण्यात आली व अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीमध्ये १ ते ६ मुद्यांची माहिती ही कागदपत्राचे स्वरुपात असल्यामुळे ती कागदपत्रे अपीलकर्त्यास देण्यात आली. मात्र मुद्या क्रमांक ७ ते २१ ही माहिती प्रश्नोत्तराचे स्वरुपात असल्यामुळे प्रश्नोत्तर स्वरुपाची माहिती माहिती अधिकारात देणे अपेक्षित नाही म्हणून ती देता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविले. तसेच अपीलकर्त्याचा दिनांक २८.१०.२०१० चा माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक २६.११.२०१० रोजी असे उत्तर पाठविले की, आपण विचारलेली माहिती प्रश्नोत्तर स्वरुपात असल्याने माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत ती माहिती येत नाही म्हणून माहिती देता येत नाही असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. त्याचप्रमाणे दिनांक ३०.१०.२०१० च्या अर्जाच्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २२.११.२०१० रोजी असे कळविले की, आपण विचारलेली माहिती ही प्रश्नोत्तराचे स्वरुपात असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत येत नाही.

... ३

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दाखल केले. त्या अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्या सुनावणीत अपीलकर्ता हजर होते व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन असा निर्णय दिला की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी त्यांना मागणी केलेल्या कागदपत्राचे संबंधात संपूर्ण धारिका अवलोकनाकरिता उपलब्ध करुन देण्यात यावी व ते मागणी करतील त्या संपूर्ण कागदपत्राची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी योग्य ती फी आकारुन द्यावी असा प्रथम अपीलाचा त्यांनी निर्णय दिला. त्याला अनुसरुन अपीलकर्ता दिनांक २७.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात संबंधित नस्तीचे निरिक्षण करुन घेऊन १६१ पेजेसचे झेरॉक्स कॉपी त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी कागदपत्राचे स्वरुपात जी माहिती मागितलेली होती ती माहिती जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयानंतर संबंधित नस्तीचे निरिक्षण अपीलकर्ता यांनी करुन घेऊन त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्राची झेरॉक्स प्रती देखील त्यांनी घेतलेल्या आहेत. मात्र त्यांच्या माहिती अर्जातील बाकी मुद्दे हे प्रश्नोत्तर स्वरुपाचे असल्याचे दिसून येते. म्हणून माहिती अधिकारात प्रश्नोत्तर स्वरुपाची माहिती किंवा अभिप्राय तसेच मत अथवा मार्गदर्शन अशा स्वरुपात माहिती देणे अपेक्षित नाही. म्हणून अपीलकर्त्याने प्रश्नोत्तर स्वरुपात जी माहिती मागितलेली आहे त्या संदर्भात कागदपत्राचे स्वरुपात किंवा माहितीच्या व्याख्येत नमुद केल्याप्रमाणे त्यांनी स्वतंत्रपणे माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे सादर करुन माहिती प्राप्त करणे संयुक्तिक होईल. तथापी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे कागदपत्राचे स्वरुपात असलेली माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

... ४

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३७७-३८०/२५.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २४९/२०११.**

श्री. राजू झेड्. दुनेदार,
मु. कोंडासावळी, पो. नवेगांव खैरी,
ता. पारशिवनी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती अनिता तेलंग,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पारशिवनी,
जि. नागपूर.

श्री. ए. डी. पानतावणे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती (बांधकाम), पारशिवनी,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी दिनांक २२.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी पंचायत समिती, (बांधकाम विभाग), पारशिवनी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन पंचायत समिती बांधकाम विभागाचे संबंधित माहिती मागितलेली होती. त्या माहितीमध्ये बांधकाम विभागामार्फत शासनाच्या

विविध योजनांची माहिती, अभियंता तथा सहाय्यक यांची माहिती, त्याचप्रमाणे केलेल्या कामाची माहिती, ठेकेदाराची माहिती, ठेकेदाराला काम देण्याची पध्दत त्याची प्रक्रिया इत्यादी बाबत विस्तृत प्रमाणात माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली. परंतु त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २५.१०.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती पंचायत समिती, बांधकाम विभागाशी संबंधित असल्याने त्यांनी दिनांक २.११.२०१० रोजी शाखा अभियंता, पंचायत समिती, पारशिवनी यांना लेखी पत्र देऊन त्यांचेकडून माहिती मागितली व त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठविली. शाखा अभियंता यांनी दिनांक ८.११.२०१० रोजी त्यांचेकडे पत्र पाठवून अर्जदाराने मागितलेल्या माहितीचे अर्जातील मजकुर कटलेला असून अस्पष्ट आहे. म्हणून पत्रासोबत अर्जदाराचे मुळ अर्जाची स्पष्ट दिसणारी झेरॉक्सप्रत जोडावी असे कळविले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १५.११.२०१० रोजी पुन्हा शाखा अभियंता यांना अपीलकर्त्यास द्यावयाच्या माहिती बाबत स्पष्ट उल्लेख कळविला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही विस्तृत प्रमाणात असल्यामुळे शाखा अभियंता यांनी माहिती तयार करुन जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १४.१२.२०१० ला बांधकाम विभागास सादर केली. तथापी अपीलकर्ता कार्यालयात आल्यानंतर त्यांना माहिती दिली असता त्यांनी ती माहिती स्विकारली नाही व त्यांनी प्रथम अपील दाखल केल्यामुळे प्रथम अपीलात माहिती घेईन असे नमुद केले. त्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी झाली. प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्यास अपीलाचे सुनावणीचे वेळेस माहिती देण्यात आली. त्यांनी प्रथम माहिती स्विकारली व सही केली व नंतर स्वाक्षरी स्वतः खोडली व माहिती घेण्यास नकार दिला. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी नमुद केले. यावर अपीलकर्त्यानी आयोगापुढे असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांचे कडून कोणतीही माहिती मिळालेली नाही. तसेच माहिती घेण्यास त्यांनी नकार देखील दिला नाही.

४. अपीलकर्ता, तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. तथापी अपीलकर्त्याने ती स्विकारलेली नाही. त्याबाबत प्रथम अपीलाचे निर्णयात देखील ही बाब स्पष्ट करण्यात आलेली आहे. तथापी आज आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली ती माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत केली. अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्याने अपील खारीज करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५०/२०११.**

श्री. राजू झेड्. दुनेदार,
मु. कोंडासावळी, पो. नवेगांव खैरी,
ता. पारशिवनी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग,
वैनगंगानगर, अजनी, नागपूर.

श्री. एन. जी. पोपटे,
जनमाहिती अधिकारी तथा
उप अभियंता,
पेंच पाटबंधारे, उपविभाग पारशिवनी,
ता. पारशिवनी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. बन्सोड, उपकार्यकारी अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २२.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, पेंच पाटबंधारे, उपविभाग, पारशिवनी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज

... २

सादर करुन पाणी वाटप संस्था बाबत तसेच त्यांच्या पदाधिकाऱ्यांचे नांव, पत्ता, त्या संस्थेमार्फत देण्यात येणाऱ्या लाभ क्षेत्र एकर मध्ये किती, संस्थेच्या ठरावाचे कार्यवृत्त तसेच सदरचे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांची यादी व पत्ता तसेच पेंच धरणातील किती पाणी पेंच नदीत केंव्हा सोडले इत्यादी बाबत माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १०.१२.२०१० रोजी कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, नागपूर यांचेकडे दाखल केले. तथापी प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही पाणी वापर सहकारी संस्था त्यांचे पदाधिकारी तसेच या संस्थाना देण्यात येणारे लाभ तसेच कर्मचाऱ्यांची माहिती, त्यांचे पत्ते, दुरध्वनी क्रमांक इत्यादी बाबत व्यापक स्वरुपात माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती संबंधीत संस्थाकडून संकलीत करुन तसेच त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती तयार करुन अपीलकर्त्यास दिनांक १८.११.२०१० रोजी यु.पी.सी. पोस्टाद्वारे माहिती पाठविली. तथापी सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८.११.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास जी माहिती पाठविली आहे ती पोस्टाद्वारे यु.पी.सी.ने पाठविली असून त्याबाबतचा जावक रजिस्टरचा पुरावा आयोगास दाखविला. त्यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्त्यास दिनांक १८.११.२०१० रोजी माहिती पाठविली आहे.

४. अपीलकर्त्यास यु.पी.सी. पोस्टाद्वारे माहिती प्राप्त झालेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा माहितीची एक जादा प्रत अपीलकर्त्यास आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. सदरच्या माहितीची प्रत अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत केली.

५. अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येते.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३८४-३८६/२६.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५१/२०११.**

श्री. वामन चिंतामन बोरकर,
मु. पो. गोरेगांव, जुने बाजार चौक,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
गोरेगांव, जि. गोंदिया.

श्री. मिश्रा,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १६.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गोरेगांव, जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन मौजा गोरेगांव येथील गट नं. २१७/१ अ बाबत फेरफार नोंद, गैर अर्जदाराचे बयान ८ अ व ७/१२ चे उतारे इत्यादी माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली.

... २

मात्र सदरची माहिती त्यांचे अपेक्षेप्रमाणे नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दिनांक १५.१२.२०१० रोजी तहसीलदार, गोरेगांव यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली व प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी आयोगापुढे सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहिती अधिकाराखालील अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही मंडळ अधिकारी, गोरेगांव यांचेशी संबंधित असल्यामुळे सदरच्या माहितीचा अर्ज त्यांचेकडे दिनांक २५.११.२०१० च्या पत्राने सदरचा अर्ज हस्तांतरण केला व अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले व त्यांची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. त्यानंतर मंडळ अधिकारी, गोरेगांव यांनी अपीलकर्त्यास गट नं. २१७/१ अ चा ७/१२, ८ अ फेरफार बाबत माहिती दिनांक २०.१२.२०१० रोजी उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाल्याचे त्यांनी सूनावणीत मान्य केले. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलकर्त्यास सदर गट नं. फेरफार संबंधातील केस मधील संपूर्ण कागदपत्रे उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, गट नं. २१७/१ अ बाबत उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांचेकडे महसूल कायद्यान्वये अपील दाखल झालेले असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. म्हणून सद्य:स्थितीत गट नं. २१७/१ अ च्या संबंधात फेरफारच्या ज्या नोंदी तसेच ७/१२ उतारे जे आहेत ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल झालेल्या अपीलाच्या निर्णयानंतर प्रस्तुत प्रकरणात पुढील ती योग्य कार्यवाही करण्यात येईल असेही जनमाहिती अधिकारी यांनी नमुद केले.

५. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने गट नं. २१७/१ अ बाबत मागितलेली माहिती सद्य:स्थितीत जी उपलब्ध आहे ती जनमाहिती अधिकाऱ्यांनी दिलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २४८/२०११.**

श्री. वासुदेव फजितराणा पाठक,
मु. पो. गोरेगांव, ता. गोरेगांव,
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. एस. खुणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय वन अधिकारी,
उपवनसंरक्षक, वन विभाग, गोंदिया,
जि. गोंदिया.

श्री. यु. टी. बिसेन,
जनमाहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी,
वनपरिक्षेत्र गोरेगांव, ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी दिनांक १५.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वन विभाग, गोरेगांव यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांनी दिनांक २५.१०.२०१० रोजी गोरेगांव येथील गट नं. ५४५ मधील अतिक्रमण केलेल्या जागेची व शेतातील पिकाची

... २

नुकसान केल्याबाबत तक्रार केली होती. त्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपवनसंरक्षक यांचेकडे दिनांक १५.१२.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. त्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १५.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने दिनांक २५.९.२०१० व दिनांक २५.१०.२०१० रोजी जी तक्रार या कार्यालयाकडे केल्याचे नमुद केलेले आहे. त्या तक्रारीचा शोध त्यांचे कार्यालयात घेण्यात आला. परंतु सदरची तक्रार त्यांचे कार्यालयास प्राप्त झालेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास दिनांक १८.११.२०१० च्या पत्राने असे कळविण्यात आले की, आपले कडील दिनांक २५.१०.२०१० ची तक्रार आणि दिनांक २५.९.२०१० ची तक्रार या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपविभागीय वन अधिकारी, वनविभाग, गोंदिया यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद करण्यात आले की, अपीलकर्त्या यांनी त्यांनी अतिक्रमण केलेल्या जमीनीतील पिकाची जाळपोळ व नासधुस केली त्याबाबत उपवनसंरक्षक यांना केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय वन अधिकारी, गोंदिया यांचेकडील दिनांक २२.१०.२०१० अन्वये सादर केलेला चौकशी अहवालाची प्रत देण्यात यावी असे नमुद केले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाचे निर्णयाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक १८.१.२०११ रोजी चौकशी अहवालाची प्रत व त्यासोबतची कागदपत्रे पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांनी वनजमीनीवर अतिक्रमण केलेले आहे. त्या अतिक्रमण केलेल्या जमीनीवर फसल लावली होती तीची जाळपोळ व फेकाफेक करण्यात आलेली होती. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना पाहिजे होती. तथापी जनमाहिती अधिकारी

यांनी जो चौकशी अहवाल सादर केलेला आहे त्यामध्ये असे नमुद केले आहे की, अपीलकर्त्याने कोणत्याही वन जमीनीवर अतिक्रमण केलेले नाही. तसेच त्यांनी त्या अतिक्रमण जमीनीवर कोणत्याच प्रकारचे पिकाची लागवड केलेली नाही. त्यामुळे पिकाची नासधुस केली असे अपीलकर्त्याचे म्हणणे खोटे आहे असे चौकशी अहवालावरुन दिसून येते व या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३९०-३९२/२६.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५२/२०११, अपील क्रमांक २५३/२०११, अपील क्रमांक २५५/२०११ व अपील क्रमांक २५६/२०११.**

श्री. सुधाकर बागडे,
हाऊसिंग बोर्ड कॉलनी,
बसस्थानक मागे, ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. व्ही. बुटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, सावनेर, जि. नागपूर.

श्री. पी. एन. मुंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्राम पंचायत, दहेगांव (रंगारी),
ता. सावनेर, जि. नागपूर.

श्री. एस. आर. कुबडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत, सिल्लेवाडा,
ता. सावनेर, जि. नागपूर.

श्री. पी. एन. मुंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्राम पंचायत, दहेगांव (रंगारी),
ता. सावनेर, जि. नागपूर.

श्री. रमेश बन्नगरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत, पोटा,
ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.५.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये वर नमुद केलेली ४ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २७.५.२०११ रोजी चारही अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. प्रस्तुत चारही अपीलांमध्ये अपीलकर्ता एकच असून प्रथम अपीलीय अधिकारी हे देखील एकच आहे. त्याचप्रमाणे चारही अपीलांमधील मागितलेली माहिती देखील सारखीच असल्यामुळे या चारही द्वितीय अपीलांची सुनावणी एकत्रित घेण्यात आली आणि चारही अपीलांचा एकत्रित निर्णय देण्यात आला.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २४.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांचेकडे माहिती अधिकाराखाली ४ अर्ज सादर करुन ग्रामपंचायत दहेगांव रंगारी, ग्रामपंचायत, सिल्लेवाडा, ग्रामपंचायत वलनी व ग्रामपंचायत पोटा हद्दीत दिनांक १ जानेवारी २००७ ते दिनांक २४.५.२०१० या कालावधीत गावठाणात दर्शवून ग्रामपंचायत रेकॉर्डवर किती ग्रामस्थांची कर आकारणी करण्यात आली. त्यांच्या नावाची यादी मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी ४ प्रथम अपीले खंड विकास अधिकारी, पंचायत समिती सावनेर यांचेकडे दाखल केली. मात्र चारही प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे ४ द्वितीय अपीले दाखल केल्याचे नमुद केले व माहिती देण्यास विलंब झाल्याबद्यल जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत दहेगांव (रंगारी), ग्राम पंचायत सिल्लेवाडा, ग्रामपंचायत वलनी व ग्रामपंचायत पोटा यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याने दिनांक २४.५.२०१० चा माहितीचा अर्ज प्रथमतः पंचायत समिती, सावनेर यांचेकडे दाखल केला होता. सदरचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २.६.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांचेकडून दिनांक ३.६.२०१० रोजी प्राप्त झाले. अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ग्रामपंचायतीच्या कार्यबाहुल्यामुळे अपीलकर्त्यास ३० दिवसाचे मुदतीत माहिती देता आली नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने विस्तार

अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांचेकडे दिनांक २१.९.२०१० रोजी ४ प्रथम अपीले दाखल केली. चारही प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १६.१०.२०१० रोजी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.१०.२०१० रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाचे निर्णयात अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती पुरविण्याचे आदेश दिले. त्यानुसार अपीलकर्त्यास दिनांक २७.१०.२०१० च्या पत्राने ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत दहेगांव (रंगारी) यांनी असे कळविले की, आपण मागितलेली माहिती ग्रामपंचायत दप्तरी उपलब्ध आहे. तरी ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित होऊन विनामुल्य माहिती घेऊन जावी. ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत सिलेवाडा यांनी असे कळविले की, प्रथम अपीलाचे निर्णयानुसार अपीलकर्त्यास दिनांक २.११.२०१० च्या पत्राने ग्राम विकास अधिकारी, सिल्लेवाडा येथे गावठाण व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे एकही ले आऊट नाहीत. फक्त गावठाण मध्येच असणाऱ्या घरावर व खाली जागेवरच घरकराची आकारणी केलेली आहे. गावठाण व्यतिरिक्त एकाही व्यक्तीचे नावाने कर आकारणी करण्यात आलेली नाही. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वलनी यांनी दिनांक २७.१०.२०१० च्या पत्राने असे कळविले की, अपीलीय अधिकारी, सावनेर यांनी दिलेल्या आदेशानुसार आपण मागितलेली माहिती ग्रामपंचात दप्तरी उपलब्ध आहे. तरी कृपया निशुल्क माहिती घेऊन जावी. तसेच सचिव, ग्रामपंचायत, पोटा (चनकापूर) यांनी दिनांक २७.१०.२०१० च्या पत्राने असे कळविले की, अपीलीय अधिकारी, सावनेर यांनी दिलेल्या आदेशानुसार आपण मागितलेली माहिती ग्रामपंचायत कार्यालय, पोटा येथे निशुल्क उपलब्ध करुन ठेवण्यात आलेली आहे. तरी माहिती निशुल्क घेऊन जावे. सदरचे पत्र जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास यु.पी.सी.ने पाठविल्याचे दिसून येते. त्याबाबत यु.पी.सी.चा पुरावा जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविला. त्यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्त्यास माहिती घेऊन जाण्याबाबत पत्राने कळविलेले दिसते. मात्र अपीलकर्त्यास सदरचे पत्र मिळाले नाही असे त्यांनी नमुद केले. म्हणून ते ग्रामपंचायत कार्यालयात माहिती घेण्यासाठी गेलेले नाही.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याचे चारही प्रथम अपीले त्यांचेकडे दिनांक २१.९.२०१० रोजी दाखल झाले होते. चारही प्रथम अपीलाचा सुनावणी दिनांक १६.१०.२०१० रोजी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.१०.२०१० रोजी देण्यात आला व त्या निर्णयात असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३१.१०.२०१० पर्यंत विनामुल्य माहिती पुरवावी असा आदेश दिलेला आहे.

६. अपीलकर्ता, तसेच संबंधित जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दिनांक २४.५.२०१० च्या माहिती अधिकाराखालील चारही अर्ज जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, दहेगांव (रंगारी), ग्रामपंचायत सिल्लेवाडा, ग्रामपंचायत वलनी व ग्राम पंचायत पोटा (चनकापूर) यांचेकडे पंचायत समिती, सावनेर यांचेकडून दिनांक २.६.२०१० च्या पत्राने पाठवून ते माहितीचे अर्ज त्यांचेकडे दिनांक ३.६.२०१० रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. म्हणून ३० दिवसांचे आंत म्हणजे दिनांक ३.६.२०१० ते ३.७.२०१० पर्यंत अपीलकर्त्यास वरील चारही जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तथापी चारही जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानपंतर अपीलकर्त्यास माहिती घेऊन जाणेबाबत दिनांक २७.१०.२०१० व दिनांक २.११.२०१० च्या पत्राने कळविल्याचे दिसते. म्हणजे अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळविलेले दिसून येते. या विलंबाबद्यल चारही जनमाहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता त्यांनी असे नमुद केले की, ग्रामपंचायतच्या कार्यबाहुल्यामुळे त्यांना अपीलकर्त्यास ३० दिवसांचे आंत माहिती देता आली नाही. तथापी चारही जनमाहिती अधिकारी यांचा हा खुलासा मान्य करता येत नाही. कारण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार अपीलकर्त्यास ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. म्हणून माहिती उपलब्ध होण्याच्या विलंबास चारही जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. म्हणून अपीलकर्त्याची अपीले हे मंजूर करण्यात येत आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २५२/२०११, अपील क्रमांक २५३/२०११, अपील क्रमांक २५५/२०११ व अपील क्रमांक २५६/२०११ हे मंजूर करण्यात येत आहेत.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास हा आदेश मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत त्यांच्याकडे तयार असलेली माहिती व्यक्तिशः विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) जनमाहिती अधिकारी तथा सचिव, **ग्रामपंचायत, दहेगांव(रंगारी) श्री. पी. एन. मुंडे**, जनमाहिती अधिकारी तथा **सचिव, ग्रामपंचायत, सिल्लेवाडा श्री. एस.आर. कुबडे,** जनमाहिती अधिकारी तथा **सचिव, ग्रामपंचायत, वलनी श्री. पी. एन. मुंढे** व जनमाहिती अधिकारी तथा **सचिव, ग्रामपंचायत, पोटा (चनकापूर) श्री. रमेश बन्नगरे** यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाल्याबद्यल ते जबाबदार दिसून येतात व विलंबाबद्यल त्यांनी केलेला खुलासा मान्य करता येत नाही म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये प्रत्येकी रुपये २०००/- शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे.

४) सदरच्या शास्तीची रक्कम **संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, सावनेर, जि. नागपूर** यांनी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, दहेगांव(रंगारी), जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, सिल्लेवाडा, जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, वलनी व जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, पोटा (चनकापूर) यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-  दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३९३-३९७/२७.५.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५४/२०११ व अपील क्रमांक २५७/२०११.

श्री. सुधाकर बागडे,
हाऊसिंग बोर्ड कॉलनी,
बसस्थानक मागे, ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. व्ही. बुटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, सावनेर, जि. नागपूर.

श्री. पवन हरीदास ऊईके,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्राम पंचायत, टेंभूरडोह,
ता. सावनेर, जि. नागपूर.

श्री. आर. पी. बोबडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत, बडेगांव,
ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.५.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये २ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २७.५.२०११ रोजी दोन्ही अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. प्रस्तुत दोन्ही अपीलांमध्ये अपीलकर्ता एकच असून प्रथम अपीलीय अधिकारी हे देखील एकच आहे. त्याचप्रमाणे दोन्ही अपीलांमधील मागितलेली माहिती देखील सारखीच असल्यामुळे या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी एकत्रित घेण्यात आली आणि दोन्ही अपीलांचा एकत्रित निर्णय देण्यात आला.

... २

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २४.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत टेंभूरडोह व ग्राम पंचायत बडेगांव हद्दीत दिनांक १ जानेवारी २००७ ते दिनांक २४.५.२०१० या कालावधीत गावठाणात दर्शवून ग्रामपंचायत रेकॉर्डवर किती ग्रामस्थांची कर आकारणी करण्यात आली. त्यांच्या नावांची यादी माहितीच्या अधिकाराअंतर्गत मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २९.६.२०१० च्या पत्राने व दिनांक ७.६.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र ती माहिती समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, टेंभूरडोह व ग्राम पंचायत, बडेगांव यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २४.५.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे पंचायत समिती, सावनेर यांचेकडून दिनांक ३.६.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिनांक २९.६.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की, गावठाण दर्शवून ग्रामपंचायत रेकॉर्डवर ग्रामस्थांची कर आकारणी करणे प्रकरणी ग्रामपंचायत अभिलेखात दस्ताऐवज उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास ग्रामपंचायत टेंभूरडोह यांनी कळविले आहे. तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिनांक ७.६.२०१० च्या पत्राने सचिव, ग्रामपंचायत बडेगांव यांनी अपीलकर्त्यास असे कळविले की, प्रश्न विचारुन मत, अभिप्राय विचारणे माहिती व माहितीचा अधिकार या संज्ञेनेच्या व्याख्येत काय, कसे, कोणकोणत्या, किती अशा प्रकारची उत्तरे देणे तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. सबब अशा तऱ्हेचे दस्तऐवज उपलब्ध करुन देणे शक्य नाही असे अपीलकर्त्यास ग्रामपंचायत बडेगांव यांनी कळविले आहे. सदरचे पत्र अपीलकर्त्यास पोस्टाने पाठविले असून सदरचे पत्र यु.पी.सी.द्वारे पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १६.१०.२०१० रोजी घेण्यात आली. प्रथम अपीलाचा निर्णय

दिनांक २१.१०.२०१० रोजी देण्यात आला व त्या निर्णयात अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती पुरविण्याचे आदेश दिले. तसेच अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ७.१०.२०१० रोजी घेण्यात आली. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ११.१०.२०१० रोजी देण्यात आला व त्या निर्णयात अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती पुरविण्याचे आदेश दिले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, टेंभूरडोह आणि जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, बडेगांव यांचेकडे अपीलकर्त्याचा दिनांक २४.५.२०१० चा माहितीचा अर्ज पंचायत समिती, सावनेर यांचेकडून दिनांक ३.६.२०१० रोजी प्राप्त झाला होता. व त्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २९.६.२०१० च्या पत्राने व दिनांक ७.६.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरचे दिनांक २९.६.२०१० व दिनांक ७.६.२०१० चे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणी मान्य केले. म्हणून अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले खारीज करण्यात येत आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २५४/२०११, व अपील क्रमांक २५७/२०११ हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/३९८-४००/२७.५.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६४/२०११.**

सौ. प्रभाताई शालिक मंदुरकर,
प्रगती कॉलनी, तिडके ले आऊट,
सत्यम टॉकीजच्या मागे, वरठी रोड,
ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. सुधीर शंभरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, भंडारा.

श्री. देवदत्त रमेश नागदेवे,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.५.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक ५.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७.४.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २३.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन मा.राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचेकडील दिनांक ११ जून २०१० च्या आदेशात जनमाहिती अधिकारी तथा

... २

कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, भंडारा यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस केली होती त्याबाबतची माहिती मागितलेली होती. तसेच सेफ्टीक टँकचे केलेले अवैध बांधकामाबाबत त्यांनी माहिती मागितली. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी, नगर परिषद, भंडारा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. तथापी प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक २३.८.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २४.८.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्तीने माहितीच्या अर्जात माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे अपीलकर्तीस दिनांक १३.९.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संपूर्ण नस्तीचे अवलोकन करण्यासाठी दिनांक २४.९.२०१० ला दुपारी ११:०० ते १:०० चे दरम्यान उपस्थित राहावे व संपूर्ण नस्तीचे अवलोकन करुन आपणास आवश्यक असलेली माहिती प्रत्येक पृष्ठावर चिन्हांकित करुन प्राप्त करुन घ्यावी असे अपीलकर्तीस कळविले. त्यानुसार अपीलकर्तीने दिनांक २४.९.२०१० ला नस्तीचे अवलोकन केले व त्यांना पाहिजे असलेली माहिती दिनांक ५.१०.२०१० च्या पत्राने पाठविली. तथापी सदरची माहिती घेण्यास अपीलकर्तीने त्यांना नकार देऊन मुख्याधिकाऱ्यांची मुळ सही पाहिजे अशी मागणी केली. मात्र यावर अपीलकर्तीचे असे म्हणणे आहे की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारची माहिती लेखी स्वरुपात प्राप्त झाली नाही. त्यानंतर अपीलकर्तीने प्रथम अपील मुख्याधिकारी, नगरपरिषद, भंडारा यांचेकडे दाखल केले. त्याची सुनावणी घेण्यात आली. परंतु सुनावणीचे दिवशी अपीलकर्ती सुनावणीस हजर असल्याबाबत स्वाक्षरी करण्यास नकार दिला. त्यावर अपीलकर्तीने आयोगासमोर असे सांगितले की, प्रथम अपीलाची सुनावणीस जनमाहिती अधिकारी हजर नव्हते. त्यांचे वतीने हजर असणारे कर्मचारी मुख्याधिकारी यांचेकडे दिशाभूल करणारी सांगत होते. म्हणून त्यांनी प्रथम अपीलाचे सुनावणीस हजर असल्याबाबत रोजनाम्यावर सही केली नाही.

... ३

४.	अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्तीचा दिनांक २३.८.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस दिनांक १३.९.२०१० च्या पत्राने प्रथम त्यांचे कार्यालयात नस्तीचे निरिक्षण करुन घेऊन माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कळविले होते. परंतु सदरचे पत्र अपीलकर्तीस मिळाले नसल्याचे अपीलकर्तीने सांगितले. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलात अपीलकर्तीस माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय दिला. म्हणून निरिक्षणानंतर अपीलकर्तीस जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस त्यांचेकडील दिनांक २३.८.२०१० च्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक १ व २ ची पुन्हा स्पष्टपणे केलेली कार्यवाही रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-    दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

क्रमांक : रामाआ/    /२०१०
कार्यालय, राज्य माहिती आयोग,
पहिला माळा, प्रशासकीय भवन क्र -२,
सिव्हील लाईन, नागपूर.
दिनांक :-    मार्च, २०११

प्रति,

सौ. मंदा विलास लाहोटे,
बी ३/११२, बजरंग कॉम्प्लेक्स,
सिरसपेठ, नागपूर - ४४० ००९.

विषय :- माहिती अधिकार अधिनियम, २००५ केलेला द्वितीय अपील अर्ज.

आपण सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, आपण माहिती अधिकार अधिनियम, २००५ मध्ये दिनांक ९.९.२००९ रोजी सादर केलेल्या माहिती अर्जावर जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी दिनांक २९.१०.२००९ रोजी उत्तर दिले आहे.

माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) नुसार जनमाहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान झाले नसल्यास प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांकडे प्रथम अपील दाखल करण्याची तरतुद आहे. त्याला अनुसरुन प्रथम अपील दाखल करावे. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयाने आपले समाधान न झाल्यास, अधिनियमातील कलम १९(३) अन्वये आयोगाकडे द्वितीय अपील सादर करण्यास आपणास मुभा आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी लवकर सुनावणी घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

प्रति,

मा. राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**विषय :- अपील क्रमांक १५२३/२०१० मध्ये झालेल्या आदेशात बाजू मांडण्याची संधी देणेबाबत.**

महोदय,

श्री. रामप्रसाद गंभीराजी बोरकर यांनी माहिती मिळण्याबाबत सादर केलेल्या माहिती अर्जावर माहिती मिळाली नाही म्हणून आपल्या कार्यालयात द्वितीय अपील दाखल केले. त्यावर दिनांक २९.१२.२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली व आदेश पारित करण्यात आले आहेत.

२. अर्जदार श्री. रामप्रसाद गंभीराजी बोरकर यांचा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेपर्यंत सादर न केल्यामुळे त्यांना माहिती मिळाली नाही व तो अर्ज माझेकडे प्राप्त झाला होता व तो मी दडवून ठेवला होता असे आदेशात नमुद आहे. सदर आदेशात मला सहाय्यक माहिती अधिकारी गृहीत धरुन नियम ५(५) अन्वये मला दोषी ठरविण्यात आले व नियम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित केली आहे.

३. माननीय महोदय मी आपणास नम्रपणे निवेदन करतो की, सदर प्रकरणामध्ये माझा काहीच संबंध नाही, माननीय आयोगासमोर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी चुकीची वस्तुस्थित विषद केल्यामुळे माझ्यावर दोष ठेवण्यात आले आहेत.

४. मी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर येथे दिनांक २५ जून २०१० पासून रुजू झालो. श्री. रामप्रसाद गंभीराजी बोरकर यांचा अर्ज माझ्याकडे दिनांक १२.७.२०१० रोजी दर्शविण्यात आला. तथापी मला दिनांक २१.७.२०१० रोजी प्राप्त झाला आहे. त्याप्रमाणे मी आवक नोंद वहीवर स्वाक्षरी केली आहे. तसेच हा विषय माझ्याशी संबंधित नसल्यामुळे तो अर्ज जावक क्रमांक ७६६८, दिनांक २२.७.२०१० रोजी मी परत

... २



केला आहे. सदर माहितीचा अर्ज माझ्याकडे प्राप्त झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी हस्तांतरीत केला आहे. त्यामुळे सदर विषयाबाबत माझा काही संबंधच आलेला नाही. तसेच याबाबत माझ्याबरोबर जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कधीही पत्रव्यवहार केलेला नाही. तसेच तोंडीही चर्चा केलेली नाही.

५.	माहिती अर्जावर माननीय शिक्षणाधिकारी साहेबा समोर सुनावणी झाली. जर तो अर्ज माझ्याकडे दडवून ठेवला होता तर सुनावणी दरम्यान मला बोलवणे आवश्यक होते. तथापी मला कोणतीही संधी न देता द्वितीय अपीलात माझ्यावर दोष ठेवण्यात आले. सदर प्रकरणी माझा काहीही संबंध नसून माहितीचा अर्ज माझ्या जवळ केवळ १ दिवसच माझ्याजवळ असतांना अर्ज गहाळ केला असा आरोप माझ्या अपरोक्त न करणे म्हणजे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्वतःची जबाबदारी नाकारली आहे असे वाटते. तरी आपणास नम्र विनंती आहे की, मला सदर प्रकरणी माझी बाजू मांडण्यासाठी नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार संधी द्यावी ही नम्र विनंती.

**(निलेश मेश्राम)**
**वरिष्ठ लिपिक,**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
**जिल्हा परिषद, नागपूर.**